UNIVERSAL
LIBRARY
OU_192094
UNIVERSAL
LIBRARY

ब्रह्म पुराण

आज बरेच महिने ब्रह्मी बंडाच्या भीतिप्रद बातम्या येत आहेत
ब्रह्मी प्रजाजनानी हिंदी व्यापाऱ्यावर व मजुरावर क्रूरपणे हल्ले आरंभिले असल्याचे वृत्त सर्वत्र पसरले आहे
तिकडील हजारो हिंदी बायका घरेंदारे, मालमत्ता, जमीनजुमला सोडून जीव वाचविण्यासाठी स्वदेशी परत फिरले
सुमारे १०८४ इसमाचा बळी ब्रह्मी बदखोरानी घेतला
एकदर ८००० खडी फौज बंडाळीच्या क्षेत्रात जय्यत तयारी ठेविला आहे
बदखोराचा पुढारी सायासेन यास फाशीची शिक्षा फर्माविली. ...

....

पण बंडाळी अद्यापि कमी होत नाही ती नाहीच ! तेव्हा हा सर्व प्रकार आहे तरी काय, याविषयीची सविस्तर चर्चा ब्रह्म पुराणात आढळेल
ब्रह्मदेश वेगळा करण्याचा घाट कशासाठी आहे, त्यामुळे हिंदी राष्टावर काय आपत्ति ओढवणार, ब्रह्मी प्रजेचे नुकसान कोणतें वगैरे बाबींचा खुलासाही ब्रह्म पुराणांत केला आहे

चितगांगमध्ये क्रांतिकारकानी गाजविलेल्या कर्तबगारीचे व 'आर्मरी रेड'चे वर्णन परिशिष्टांत पहा.

ब्रह्मी बंडाळीचें

ब्रह्मपुराण

बंडाळी व विभागणी या प्रचलित प्रश्नांचे सांगोपांग विवेचन

(दहा चित्रें व नकाशासह)

श्रीपाद रामचंद्र टिकेकर

प्रथमावृत्ति] किंमत १ रुपाया [१९३१

प्रकाशक
चिंतामण रामचंद्र टिकेकर
'दूत' ऑफिस, सोलापूर.

CHECKED 1951

CHECKED 1956

[लेखकाने सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत]


Checked 1963

मुद्रक
सदाशिव रामचंद्र सरदेसाई, बी ए, एल्एल्. बी.
नवीन समर्थ विद्यालयाचा 'समर्थ भारत' छापखाना,
९४७, सदाशिव पेठ, पुणे २.

ती. नाना, आबा व भाऊ

यांस आदरपूर्वक अर्पण

ब्रह्मदेश



चित्रांचा खुलासा

गौतमबुद्धाचा अजस्र पुतळा—(पृ. १) चात्रान चौंगमधील हा पुतळा. ब्रह्मदेशात सर्व पॅगोडा व चौंग यामध्ये विद्युद्दीपांची खास व्यवस्था असते हे विशेष होय. ह्या पुतळ्यावरहि दिवे लावलेले दिसतात आणि त्यावरूनच पुतळ्याची उची अजमावता येईल.

श्वे-डेगॉन पॅगोडा, दुसरी बाजू—(पृ. १७) पॅगोडाच्या एका बाजूस असे नक्षीचे एक मंदिर आहे. जिकडेतिकडे बुद्धाचे पुतळे दिसतात. अशा प्रकारचे बाह्यांग ब्रह्मी देवळाचे असते. 'पॅगोडा'चे चित्र म्हणून ओळखण्याची हीच खूण होय.

ब्रह्मी घरांचा नमुना, 'जल-महाल'—(पृ. ३२) पाण्यावर तरंगत आहेत अशीं दिसणारी ही घरे म्हणजे खरोखर जलमहालच होत. आगीपासून त्याना भीति कमी. पण पाण्याचा सहवास आपणासारख्याना त्रासदायकच वाटावयाचा पूर्व बंगाल्यांतही असलीं घरे आहेत.

श्वे-डेगॉन पॅगोडा, सुवर्णमय कळस—(पृ.४८) रंगूनमधील श्वे-डेगॉन पॅगोडाचा हा मुख्य भाग म्हणण्यास हरकत नाही. हे सर्व कळस सुवर्णमय दिसतात. त्याच्या खाली बुद्धाच्या लहानमोठ्या मूर्ति आहेत. मागे दिसणारा मोठा घेर मुख्य उंच स्तूपाचा असून त्याच्या विस्ताराची कल्पना माणसें उभीं आहेत त्यावरून करावी. तोही सुवर्णाने मढविलेला दिसतो.

'ब्रह्मदेश विलग करूं नका' म्हणणारांची सभा—(पृ. ५६) रंगून येथे ज्युबिली हॉलमध्ये ता. २८-५-३१ रोजी सभा भरली होती, तेव्हा वरच्या मजल्यावरून घेतलेला फोटो. थाराबडी यू पू भाषण करीत आहेत. हें सर्व एका नाटकाप्रमाणे दिसतें. कारण प्रमुख फुजी (सायडॉ) व वक्ते हे रंगभूमीवरच असून बाकीची मडळी रागेने खुर्चीवर बसली आहेत. फोटो वरून व श्रोत्याच्या मागून घेतल्याने सर्वांचीं डोकींच तेवढीं फोटोंत दिसतात.

सुधारलेली पण लाकडी घरे—(पृ. ६४) **थाराबडी येथील पोलिस-लाइन.** यात सुधारणा म्हणजे घरावर कौले घातली आहेत. अशी चाळीवजा घरे ठिकठिकाणी असतात.

चौगमधील फुंजी, शिक्षक व विद्यार्थी—(पृ. ८०) रगूनजवळ चात्रान म्हणून एक खेडे आहे. तेथील बुद्धविहारात शाळाही भरत असे. त्या शाळेत येणारे सर्व विद्यार्थी, तात्पुरते झालेले फुजी व मुख्य 'भिक्षु' अशा सर्वांचा मिळून घेतलेला फोटो.

चात्रान चौगमधील वृद्ध फुंजी—(पृ. ८८) सुमारे ९२ वर्षांचा हा वृद्ध फुजी अद्यापि आपल्या नित्य व्यवसायात गर्क असतो. 'अग गलित पलित मुड दशनविहीन जात तुडम्' अशी स्थिति असली तरी अध्यापनाच्या 'आशापिडा'तून तो मुक्त झाला नाही.

बुद्धविहारमधील मोफत शाळा—(पृ. ९६) ह्या शाळेत अभ्यास कसा चालला आहे आणि विद्यार्थी कस कोणत्या प्रकारे कापतात, हे चित्रावरून कळते.

सरकारी पोलिसांचे शस्त्रागार, चितगाग—(पृ. १०४) क्रांतिकारकानी दोन शस्त्रागारे फोडली व लुटली, त्यापैकी हे एक. याच्या मागे दिसणारी पोलिस-लाइन. फोटो दूरवरून कोणाला नकळत घ्यावा लागला म्हणून इमारत व आजूबाजूस बसलेले गुरखे स्पष्टपणे दिसत नाहीत.

चित्राचे ब्लॉक करून ते छापण्याचे काम मुबईस श्री. विठ्ठलराव वागळे यांच्या प्रोसेस स्टूडिओ व प्रेसमध्ये झाले आहे.

अनुक्रमणिका

मगलाचरण		....	पृ. १— १४
अध्याय १ ला	ऐतिहासिक	...	१— १४
,, २ रा	आर्थिक	....	१४— २१
,, ३ रा	राजकीय	....	२१— २७
,, ४ था	सामाजिक		२८— ३६
,, ५ वा	युरोपियनाचें मत		३६— ४२
,, ६ वा	हिंदी लोकाची गाऱ्हाणी		४२— ४७
,, ७ वा	ब्रह्मी जनतेचें म्हणणें		४८— ५५
,, ८ वा	मुलाखती	..	५५— ६०
,, ९ वा	समालोचन	....	६१— ६८
,, १० वा	समाजस्थिति	....	६९— ९८
परिशिष्ट—चितगाग शस्त्रागारावरील आक्रमण			९९—११६

ब्रह्मी बंडाळीचें ब्रह्मपुराण

मं ग ला च र ण

ब्रह्मपुराण म्हटले की, मग त्याची सुरुवात मगलाचरणापासूनच व्हावयास पाहिजे, आणि बुद्धानुयायी प्रदेशाची माहिती देताना गौतमबुद्धाशिवाय दुसऱ्या कोणाला वदन करावयाचे?

ब्रह्मदेशात बड बड म्हणून जे म्हणतात, ते आज आठ महिने होऊन गेलें तरी थडावत नाही. यःकश्चित् ब्रह्मी प्रजा ती काय आणि साम्राज्य-सरकारला सातआठ महिने सारखी सतावून सोडते काय, सर्वच विचित्र वाटते. बडाळी शमविण्यासाठी व्हाइसरॉयाकरवी तीन 'बरवटी' कायदे निघाले, खास त्रिकुटी (ट्रिब्यूनल) कोर्ट स्थापली, छप्पन्न जणाना फाशीची शिक्षा फर्मावली, शेकडो इसमाना काळे पाणी ठोठावले, हजारो प्रजाजनाना डाबून ठेवले, त्याच्या बायकापोराना अटक केली, ठिक-ठिकाणी लष्करी छावण्या उभारल्या; हिंदुस्थानातून पलटणीवर पलटणी मागवल्या—पण अद्याप बड आहे तसेच आहे, काही कमी नाही. ब्रह्मी गव्हर्नरानी खास मजलस भरविली, 'बडखोराना माफी करतो' असें जाहीर केले, काही धर्मगुरूना मथवून 'शाततेचा प्रसार' करण्याकरिता बडाच्या आवारात पाठविले—परतु सर्वच गाडा पूर्ववत् चालू आहे. रोज लुटालूट, डाके, हल्ले, दरोडे याची बातमी पहिल्याप्रमाणेच भरपूर येते. इकडे सरकार मात्र रोज पत्रके काढून बड दबत आल्याची (कोरडी) आश्वासने देते. 'बहुतेक बडखोर हार्ती आले. आता लवकर सामसूम होईल.' अशी 'भरत-वाक्ये' भारतमत्र्यानी व व्हाइसरॉयानी किती तरी वेळा म्हटलीं. परतु ती भरतवाक्ये न ठरता नवीन बडाचीं मगलाचरणेंच ठरलीं! आतापर्यंत सरकारच्या पत्रकावरून हिशेब केला तर असें दिसतें की, सुमारे २७०० बंडखोर सरकारास शरण आले; सुमारे एक हजाराना मृत्युमुखीं पडावे लागले; आणि अदाजे दोन हजार बडखोर सरकारने कैदेतच ठेवले होते. इतक्याचा हिशेब लागला तरी बड काबूत आलें, असें छातीठोकपणे कोणीच सागत नाही. मग हे बडखोर आहेत तरी किती? त्याचा पराक्रम कशा प्रकारचा

आहे? आणि सरकारच्या ताब्यांत ते का सापडू शकत नाहीत? इत्यादि प्रश्नांची उत्तरें कशीं मिळावयाचीं? खरें पाहू गेले तर सरकारी अधिकाऱ्यांच्या कृपेमुळेंच ब्रह्मी बडाळींची काहीच खरी बातमी कळत नाही. म्हणजे सरकारला त्यांनी किती जेरीस आणले आहे याची यथार्थपणे कबुली सरकार मुळींच देणार नाहीं. फक्त स्वत:ची बडेजावी, बडखोराची नालस्ती आणि हिंदी जनतेवर हल्ला केल्याच्या विकृत बातम्या सांगण्यासाठी सरकारचें प्रसिद्धिखातें आहे हें खरें. परंतु अशा एकपक्षीय बातमीवर विश्वास ठेवून कसें चालेल? त्यांतील खरा अर्थ तर्कानेंच ताडला पाहिजे. आतापर्यंत बडखोरांनी सुमारे १२५ गावकामगाराचे (पाटील) बळी घेतले. दोन डिस्ट्रिक्ट पोलिस सुपरिंटेंडेंट, एक असिस्टंट पो. सुपरिंटेंडेंट व एक इन्स्पेक्टर इतक्या सरकारी अधिकाऱ्यांना ठार केले असून, बऱ्याच काळ्या-गोऱ्यांना जखमीही केले आहे. एकंदर १०७४ इसम बडखोरांच्या क्रोधास बळी पडले. पैकी फक्त ७४ च हिंदी आहेत. असें असतांही ब्रह्मी बडखोर हिंदी जनतेवर सारखा हल्ला करतात, त्यांना हिंदीद्वेषाने पछाडले आहे; हिंदी लोकांना ब्रह्मदेशांत राहणे धोक्याचे आहे, अशा 'रंगीत' बातम्या उठविण्यांत सरकारचा हेतु काय असावा, हें पुढील विवेचनावरून स्पष्ट होईलच.

बंड सुरू झाल्यापासून एकंदर ९८ संस्था सरकारने गैरकायदा ठरविल्या आहेत. त्यांतच G. C. B. A. (ग्रॅंड कौन्सिल ऑफ बर्मीज् असोसिएशन) ही प्रमुख संस्था समाविष्ट आहे. पोलिसांवर हल्ला करणे, येनागजांग येथील तेलाच्या खाणींचे नुकसान करण्यासाठी झटणे, इतरत्र असलेल्या तेलाच्या टाक्यांवर किंवा नळींवर हल्ला करण्यासाठी टपणे, मंडाले मेल उलथून पाडणे किंवा ब्रह्मी सरकारशी राजनिष्ठ राहणारी स्वतंत्र 'शान' संस्थाने, चीन व ब्रह्मदेश यांच्यामध्ये आहेत त्यांत बंडाळी माजविणे, असे कितीतरी पराक्रम बडखोरांनी केले आहेत. बंड डिसेंबर १९३० च्या शेवटच्या आठवड्यांत सुरू झालें असलें तरी बडखोरांचा पुढारी 'साया सान' हा ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यांत म्हणजे आठव्या महिन्यांत सरकारच्या हातीं लागला आहे असें समजतात. कारण असे कितीतरी पुढारी पकडले व कित्येकांना शिक्षा ठोठावल्या, पण बंडाच्या धामधुमींत काडीमात्र फेर पडलेला नाही. बंडाचें

क्षेत्र विस्तृत असून ते सलग्न असे नसतांही बडखोराची ही धामधूम व्यवस्थेशीर चालली आहे हे सरकारची अपात्रता दर्शविते की बडखोराची तयारी उत्कृष्ट आहे असे त्यावरून अनुमान काढावयाचे?

ते ज्याचे त्याने वाटेल तसे करावे. बडखोराच्या त्रासामुळे हजारो हिंदी मजूर स्वदेशाकडे पळाले, असे बोटीतील उतारूचे आकडे घेऊन काही बर्तमानपत्रानी दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. पण साधारणपणे दर वर्षी त्या सुमारास किती प्रवासी जातयेत असतात, याचा त्यानी मुळीच विचार केला नाही. म्हणून एका दृष्टीने ते आकडे विशेष फुगलेले दिसतात. ब्रह्मदेशात व हिंदुस्थानात हिंदी मुशाफरांची जा-ये इतकी आहे की, प्रत्येक बोटीत त्याची गर्दी असते. तेव्हा नुसती ब्रह्मदेशाहून येणाऱ्या हिंदी लोकांची सख्या सागून आमच्या इतक्या बाधवाना ब्रह्मदेश सोडावा लागला अशी त्याबर मल्लीनाथी करणे म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास करण्यासारखेच आहे. ह्यावरून असे म्हणता येत नाही की, ब्रह्मदेशातून कोणी पळून आलेच नाहीत. जी मडळी आली ती का व कशी याचे विवेचन पुढे केलेच आहे. हिंदी बाधवाबद्दल मला आपलेपणा वाटत नाही, असा आरोप मात्र मजवर कोणी करू नये. विनाकारण खऱ्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून आपणास अनुकूल व ब्रह्मी प्रजेस प्रतिकूल अशी अनुमाने काढणे मला बिलकूल पसत नाही आणि म्हणून मी तसे केले नाहीं. वस्तुस्थिति जशी आहे तशी वाचकापुढे माडली आहे. तिचा त्यानी पाहिजे तसा उपयोग करावा.

ब्रह्मपुराणाची माडणी सुबोध व्हावी म्हणून प्रथमत: ब्रह्मदेशचा ऐतिहासिक चित्रपट दाखवून नतर बंडाळीच्या प्रश्नाची आर्थिक, राजकीय व सामाजिक कारणमीमासा केली आहे. ब्रह्मदेशविभागणीचे वावटळही सध्या उठलेले आहे. त्याचा विचार टाळणे अशक्य होते. म्हणून बडाळीच्या कारणमीमासेवरून पुढे लगेच विभागणीच्या वादातील धागेदोरे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. विभागणीविषयी युरोपियन, हिंदी व ब्रह्मीजनाची मते काय आहेत हे पाहून मग काही मुलाखतींचा विचार केला. आणि शेवटी सर्वच प्रश्नाची साकल्याने चर्चा आटोपून ब्रह्मी समाजस्थितीचें थोडक्यात वर्णन केले असून परिशिष्टात चितगाग येथील शस्त्रागारावरील आक्रमण कसे झालें, याची माहिती सागितली आहे.

आता मूळ पुराणास प्रारंभ करण्यापूर्वी ब्रह्मदेशचे बाबतीत सायमन कमिशनने केलेल्या शिफारशीचा समाचार घ्यावयाचा आहे. ज्या गोष्टींकडे लक्ष वेधावयास पाहिजे होते त्याकडे मुद्दाम कानाडोळा करून 'ब्रह्मदेश वेगळा केलाच पाहिजे' अशा ताबडतोबीच्या शिफारशी करण्यात सायमनसाहेबाचा स्वार्थी कावा असला पाहिजे, यात शकाच नाही. तसेच लंडनमध्ये गोलमेजाच्या ब्रह्मी पोटकमिटीने तडकाफडकी केलेला विभागणीविषयक निर्णय, त्यानंतर त्याविषयी माजलेले वादळ आणि शेवटी त्याचा फेरविचार करण्यासाठी ब्रह्मदेश-वर्तुळ-परिषद बोलावण्याचें सरकारी आश्वासन, व त्यानंतर पुनः ब्रह्मदेशविभागणीचा प्रश्न विवाद्य नाही हा जाहिरनामा, नोव्हेंबर (१९३१)-मध्ये मंडलाकार मेजाभोवती खास ब्रह्मदेशीय मजलस भरविण्याची योजना इ. गोष्टींची सांगड घातल्यावर ह्यातील इंग्रजी पेच उघडकीस येतील. सायमनसाहेबाच्या म्हणण्याचा मतितार्थ असा:—

१. हिंदुस्थानचे संरक्षण करण्यासाठी वायव्य व ईशान्य सरहद्दीवरील तांबा व देखरेख स्वतंत्र (?) हिंदुस्थानच्या हाती न देता सर्वदा साम्राज्य-सरकारच्याच अधिकारात राहिली पाहिजे.

२. ब्रह्मदेशात काही वर्षे मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा अमलात आल्या असल्या तरी ब्रह्मदेश व हिंदुस्थान यात पुष्कळ फरक आहे. म्हणून ब्रह्मदेशासाठी वेगळ्याच राजकीय सुधारणांचा 'डोस' पाहिजे.

३. ब्रह्मदेश हिंदुस्थानपासून लवकर विलग केला नाही तर (ब्रह्मी) प्रजेत असंतोष फैलावेल.

४. ब्रह्मदेश वेगळा होताच ब्रह्मी जनतेवर कराचा बोजा कमी होईल, अशी अपेक्षा खुद्द ब्रह्मी लोकांचीही नाही.

ह्या सूचनांचा परामर्ष क्रमाक्रमानें घेऊ. हिंदुस्थानच्या संरक्षणाचा डौल पोकळ आहे. आजपर्यंत आमचे संरक्षण कोणी केले व ते कसे झाले, हे थोड्या विचाराती कळून येणार आहे. संरक्षण करण्याची कला फक्त ब्रिटिशासच उपजल्यापासून अवगत असते आणि इतर लोकांना ती कला कदापि साधावयाची नाही, ह्या भ्रमात सायमनसाहेब आकंठ डुबलेले दिसतात. शिखांचे राज्य पंजाबवर कितीतरी वर्षे होते आणि त्यांनी वायव्य सरहद्दीचा

बदोबस्त थोडक्या खर्चात हल्ली ब्रिटिश ठेवतात, त्यापेक्षा चागल्या प्रकारे राखला होता, ही गोष्ट इतिहासांत नमूद आहे. वायव्य सरहद्दीवर ब्रिटिशांचा तावा आल्यापासून ७२ वर्षांत ७२ हल्ले ब्रिटिशाना सरहद्दीवरील रानटी टोळ्यावर करावे लागले, ही एकच गोष्ट त्यांच्या कार्यक्षमतेची साक्ष देईल. आणि बहुतेक चकमकीत शेकडा ७५ पेक्षा अधिक लढवय्ये हिदी होते असे आता पुराव्यानिशी सिद्ध करतां येते. अशा छोट्यामोठ्या लढाया शिखांच्या अमदानींत होत नव्हत्या, किवा साल दरसाल क्रोडो रुपये सरहद्दीवरील टोळ्याना ते वाटीतही नव्हते. ह्यावरून ब्रिटिश सत्ता अधिक चांगली असे कसे म्हणावे?

हिदुस्थानचे 'सरक्षण' 'सरक्षण' म्हणून भीतिप्रद नावाखाली महागड्या ब्रिटिश फौजेचे किवा जबरदस्त लष्करी खर्चाचे समर्थन करण्याची हिदुस्थान सरकारला सवयच जडलेली दिसते. गेल्या वर्षी चितगाग येथे झालेले शस्त्रागारावरील आक्रमण व हल्ली चालू असलेले ब्रह्मदेशातील 'बड' या दोन्ही गोष्टी, हिदुस्थान-सरक्षणाचे कामीं ब्रिटिश अधिकारी पूर्णपणे नालायक आहेत हेच स्पष्टपणे सिद्ध करतात. काहीही कारणे दर्शविता आलीं किवा आपल्या चुकीचे समर्थन करण्याचे धाष्टर्य अधिकाऱ्याचे अगी असले तरी नालायकीचा आरोप रतिभर देखील कमी होत नाही. कारण आणीबाणीचे वेळी अथवा कसोटीच्या प्रसगीच जर धैर्य खचले तर इतर समयी दाखविलेल्या धैर्यनिधीचा मुळीच उपयोग नाही हे उघड आहे. रणभूमीवर सैनिकाला शौर्य गाजविता आले नाही तर त्याच्या शौर्याचा इतर ठिकाणी काय उपयोग? चितगांगमध्ये शस्त्रागारांवर हल्ला होत असता एक युरोपियन अधिकारी चोकशीसाठीही पुढे जाऊ शकला नाही किवा हल्ला करणाराना विरोध करण्याचे सामर्थ्य असलेला एकही हिंदुस्थान-सरक्षणाच्या 'मायेचा पूत' निघाला नाही! ह्यावरून सर्व अधिकारी परचक्रापासून हिदुस्थानचें सरक्षण करण्यास अयोग्य आहेत, ह्याखेरीज दुसरें कोणते अनुमान निघू शकेल बरे? तीच बाब ब्रह्मी बडाळीची. सात सोडून आठ महिने होऊन गेले; बड आपले पूर्वीपेक्षा काकणभर अधिक जोरांतच दिसतें. अणुमात्र कमी नाही. बडखोराना कोणा त्रयस्थाचें साहाय्य नाही; त्याच्यात लष्करी सघटना नाही, सुधारलेलीं लांब पल्ल्याचीं शस्त्रे त्याचेजवळ नाहीत, द्रव्यबल

त्याना जवळजवळ नाहीच, मनुष्यसाहाय्यही अगदीच थोडके, असे असता कायद्याने निःशस्त्र केलेली बुद्धानुयायी प्रजा, जगात अव्वल दर्जाचे म्हणून नाणावलेल्या, सपन्न, कार्यक्षम अशा सरकारशी इतके दिवस तीव्र विरोध चालू ठेवते, यात सरकारची अपात्रताच दिसून येते! कारण सरकारला द्रव्य-मनुष्यबलाची वाण मुळीच नाही. आधुनिक यात्रिक युद्धसामग्रीचा भरपूर पुरवठा त्याचे जवळ आहे. आकाशात सचारणारी विमाने आहेत. इतकेंच काय, पण पैसे चारून किवा अन्य मार्गानी प्रजेत आपसात कलहाग्नि भडकावून देण्यात पटाईत असून सुद्धा ब्रिटिश अधिकाऱ्याना ह्या बडाचा उपशम करता आला नाही, ही गोष्ट काय दर्शविते?

इतका विस्तार करून सागितल्याखेरीज ही गोष्ट पटणारी नाही. ब्रिटिश सरकारच्या शौर्यामुळेच हिदुस्थानात शातता नादत आहे, ही समजूत सपशेल खोटी. ब्रिटिशाचा अधिकार किवा सत्ता हिदुस्थानात टिकली याचे कारण तिला विरोध करण्याचा किवा न जुमानण्याचा प्रयत्नच मुळी फारसा झालेला नाही. आणि जेव्हा जेव्हा असा प्रयत्न—मग तो सघटित असो अथवा नसो—प्रजेने केला तेव्हा तेव्हा सर्वशक्तिमान् अशा साम्राज्यसत्तेला जबरदस्त धक्का बसला असून खोलवर विचार करणारास यशाचा काटा प्रजेच्या प्रयत्नाकडेच झुकलेला दिसेल. नुसत्या दबदब्यावरच मिरविले जाणारे हे सरक्षणाच्या हत्तीचे धूड म्हणजे शेतात पक्षाना भिवविण्यासाठी उभारलेले बुजगावणेच होय. एकदा त्याचे स्वरूप नीटपणे कळून चुकले की, त्यासबधी भीति मुळीच वाटावयाची नाही, आणि इतके दिवसाचा मूर्खपणा ध्यानात येईल.

दुसरी बाब राजकीय सुधारणाची. ब्रह्मदेशातील प्रजाजन हिदी लोकापेक्षा अगदी भिन्न आहेत. त्याच्या चालीरीती एक नाहीत, त्याचे आचार वेगवेगळे आहेत, एवढे सागितल्याने ब्रह्मी प्रजेला निराळ्या राजकीय सुधारणा पाहिजेत हे कसे सिद्ध होतें ते मात्र सर जॉन सायमन स्पष्ट करू शकले नाहीत. ब्रह्मदेशाला इ. स. १९१९ च्या 'मॉटफर्ड' सुधारणातून वगळले ही चूक, नतर चार वर्षानी सर फ्रेडरिक व्हाइट याच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या कमिटीने दुरुस्त केली. ब्रह्मदेश आणि हिदुस्थान याना एकच सुधारणाचा कायदा लागू केला. परतु आता सर जॉन नवीनच शक्कल लढवू पाहत आहेत. मागे दिलेल्या सुधारणा ब्रह्मदेशाला पचल्या नाहीत, हे सिद्ध केल्याविना

किंवा त्यामुळे ब्रह्मदेशाचे नुकसान झाल्याचे माप पदरात घातल्याखेरीज 'ब्रह्मदेशाला वेगळ्या सुधारणाचा हप्ता दिला पाहिजे.' या याच्या शिफारशीस मुळीच किमत नाही. मग सर जॉन सायमनसारख्या प्रख्यात मुत्सद्द्याने ती सूचना केलेली असो अथवा तिसरा कोणी एखादा राजकार्यधुरधर तिचा जनक असो.

ब्रह्मदेश विलग करण्याच्या घिसाडघाई शिफारशींत तर सायमनसाहेब सपशेल घसरले. ब्रह्मी कौन्सिलातील ठरावाचा आधार घेऊन ते म्हणतात की, 'लोक-प्रतिनिधीना ब्रह्मदेश ताबडतोब वेगळा व्हावा असे वाटते.' पण आतली गोम अशी की, सायमन कमिशन रगूनमध्ये गेले तेव्हाच हा ठराव कौन्सिलपुढे विचारार्थ निघाला. शिवाय नेहमीच्या ठरावाच्या रूपाने रीतसर नोटीस देऊन तो कधीच जनतेपुढे मतप्रदर्शनार्थ आला नव्हता. सायमनसाहेबाच्या शिकवणीमुळेच काही 'जी हुजूर' सभासदानी कौन्सिलात बैठक-तहकुबीची सूचना आणली. ब्रह्मदेश वेगळा व्हावा की नाही याविषयी चर्चा करण्यासाठी ही तहकुबीची सूचना होती. तेव्हा कौन्सिलच्या अध्यक्षानी, हा विषय विशेष निकडीचा म्हणून ती विचारार्थ घेण्यास सम्मति दिली आणि थोडासा वाद-विवाद होऊन ब्रह्मदेश वेगळा व्हावा हा ठराव मजूर झाला. अर्थातच ह्या बाबीवर एकमत होऊ शकले नाही. परतु ब्रह्मी प्रजेला हिंदुस्थानचा सबध तोडूनच टाकावयाचा होता, तर सायमन-सप्तकाचा पाय ब्रह्मी भूमीला लागण्यापूर्वी असा ठराव माडण्याची बुद्धि त्याना नव्हती काय? सायमनाचा मुक्काम रगूनमध्ये फेब्रुआरी १९२९ मध्ये होता आणि १८ फेब्रुआरी १९२९ रोजीच हा जादा तहकुबीचा फार्स ब्रह्मी कौन्सिलमध्ये झाला! ह्या गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. बरे, ब्रह्मी कौन्सिलमधील सभासदाचे मत तेच ब्रह्मी समाजाचे मत, असे गृहीत धरण्याची तयारी सरकारची आहे असें मानले तर काय काय अनर्थ ओढवतील ते सागावयास नकोतच! फार दूर कशाला, ब्रह्मी कायदेकौन्सिलात १९२३–२५ ह्या दोन वर्षात सरकारी विरोधास न जुमानता अगदी साध्या बाबतीतले महा ठराव मजूर झाले. सरकारने त्यासबधी काहीच केले नाही—त्याना वाटाण्याच्या अक्षता लावल्या, ही गोष्ट सरकारी दप्तरात अगदी निर्लज्जपणे नमूद आहे. आपणांस अनुकूल अशा वेळीच कौन्सिलातील ठरावास व लोकमतास

महत्त्व देणाऱ्या सायमनसाहेबाच्या असल्या प्रामाणिक मताबद्दल आदर का वाटावा?

हिंदुस्थानाबाहेर ब्रह्मदेश ताबडतोब विलग केला नाही तर ब्रह्मदेशांत असतोष फैलावेल अशी धमकी सर जॉन सायमन देतात. याचा अर्थ असाच की, सरकारच्या मनातून ब्रह्मदेश वेगळा करावयाचा आहे. प्रजेतील असतोषाची कदर ब्रिटिश सरकार कधीपासून बाळगू लागले, असा प्रश्न विचारण्याचा मोह, हे लगडे कारण पुढे केलेले पाहून होतो. मिठावरील कर असेंब्लीच्या मनाविरुद्ध व्हाइसरॉयानी खास अधिकार उपयोजून वाढविला, तेव्हा प्रजेतील असतोष ही काय चीज आहे हे आपणास ठाऊकच नाही अशा प्रकारे हिंदुस्थान सरकार वागले. प्रसवप्रवीण लॉर्ड आयर्विन यानी गेल्या वर्षी एकामागोमाग नऊदहा ऑर्डिनन्स काढले तेव्हा लोकातील असतोषाचा विचार सरकारच्या डोक्यात आला काय? मुंबईस अनेक वेळा निरपराधी व निःशस्त्र बायकामुलावर शिपायाकरवी लाठीचा प्रसाद देण्याची मौज पाहणाराना प्रजेत असतोष उत्पन्न होईल अशी कल्पना जशी काही सुचलीच नसावी! ह्याच प्रकारची एक ना दोन शेकडो उदाहरणे प्रतिवर्षाच्या कारकीर्दीतून काढून देता येतील.

ब्रह्मी लोकमताचा इतका कळवळाच सायमनसाहेबांना आला असेल तर त्यानी एका पक्षाचेच मत ग्राह्य का धरले? अथवा सर्व देशात एकच मत प्रचलित आहे अशी त्याची समजूत आहे की काय? इतरत्र चौकस बुद्धि प्रकट करणारे सर जॉन जेव्हा मुद्दामच मूळ मुद्दे गाळून ब्रह्मदेशविभागणीवर विलक्षण भर एकसारखा देतात, तेव्हा यात त्याचा काहीतरी स्वार्थ असलाच पाहिजे, यात शंका मुळीच उरत नाही. अस्तु. हा कोळसा उगाळावा तितका काळाच असणार. कारण इंग्रज बोलूनचालूनच आशिया लुबाडण्यास बसले आहेत, त्याचेवर सद्धेतूचा वृथारोप का म्हणून करावा?

ब्रह्मदेशचे लग्न हिंदुस्थानशी लागल्याने कांही बाबतींत प्रजेवर निष्कारण कराचा बोजा पडला आहे, ही गोष्ट आकड्याच्या साहाय्याने पुढे यथानुक्रम सिद्ध करावयाचीच आहे. आणि म्हणून ब्रह्मी प्रजेची विभागणी मागण्यात मुख्य मनीषा कराचा बोजा कमी व्हावा अशीच असावी, यांत नवल नाही. परंतु आमचे सायमन-सप्तक पुनः पुनः वजावून काय सांगते ते लक्षात ठेवा.

त्यांचे म्हणणे असे की, कराचा बोजा तर कमी व्हावयाचा नाहीच, पण तशी अपेक्षा खुद्द ब्रह्मी प्रजेची देखील नाही. वस्तुस्थितीचा वाटेल तसा विपर्यास करण्यासाठीच बादशहानी खास सायमनाची नेमणूक केली असती, तर असे लिहिणे त्याना शोभले असते. परतु इग्लड, अमेरिका किवा असल्या गर्भश्रीमत राष्ट्रात करात क्षुल्लक वाढ झाली असता केवढा मोठा गिल्ला माजतो हे लक्षात घेता दरिद्री व शेतकीप्रधान अशा राष्ट्रात, ज्याचा कच्चा माल बहुतेक परदेशी जातो अशाना, करात थोडी सुद्धा वाढ किती जबरपणे जाणवते हे शहाण्याना तरी समजावून सांगण्याचे कारण नाही. राजनैतिक अर्थशास्त्रातील तो एक सर्वमान्य व अविवाद्य असा सिद्धात असता सायमन-साहेब बेधडकपणे वरील विधान दडपून देतात तेव्हा त्याच्या धाष्टर्याची कमालच म्हटली पाहिजे. शिवाय ज्या ब्रह्मी कान्सिलचा त्यानी विभागणीचे बाबतीत आधार घेतला आणि त्याला मान दिला, त्याच कौन्सिलात डोईपट्टी (Capitation tax) कर रद्द करण्याबद्दल आठ वेळा ठराव आले होते, इकडे त्यानी दुर्लक्ष का केले? आणि ह्यावरून ब्रह्मदेश वेगळा झाल्यावर कर कमी व्हावे अशी अपेक्षा ब्रह्मी प्रजा करीत नाही, हेच सिद्ध होते काय? बादशहाना बजावून सागितले पाहिजे की, सायमन-सप्तकाने तुम्हास अगदी सपशेल फसविले, तुमची दिशाभूल केली. इतर लोकाचे आचार असे आहेत, त्यांचे विचार तसे आहेत, अमुक भावनाचा पगडा त्याचे मनावर आहे अशी बारीकसारीक वर्णने देणारानी ब्रह्मदेशातील शेतकऱ्यावर कराचा बोजा सर्वात अधिक आहे ही गोष्ट नमूद करण्याचे टाळावे यात खात्रीने गोम आहे. कारण डोईपट्टी रद्द करण्याबद्दलची ब्रह्मी कान्सिलमधील चर्चा ह्या भल्या बहादरानी तर अगदीच डोळ्याआड केली आणि उलट ब्रह्मी प्रजेची कर कमी होतील अशी अपेक्षा मुळीच नसल्याचे ते बेधडक सागतात. प्रस्तुत बडाळीच्या बुडाशी ब्रह्मी प्रजेवर पडलेला कराचा कल्पनातीत बोजा हे एक कारण आहे, ही गोष्ट कोणीही ज्ञाता नाकबूल करीत नसता सायमनाच्या ह्या विधानास कितपत किमत देता येईल, ह्याचा विचारच करावा. याहीपेक्षा अधिक महत्त्वाची बाब म्हणजे ब्रह्मदेशविभागणीचा आर्थिक दृष्ट्या विचार सायमन कमिशनसाठी एका हुषार अधिकृत तज्ज्ञाने केला आहे. त्याच्या विवेचनास सायमन रिपोर्टात स्थळ मिळाले आहे. त्याने स्पष्टच

म्हटले आहे की, 'सुमारे १७६ लक्ष रुपये नवीन कर बसवून ब्रह्मी प्रजेकडून वसूल करावे लागतील.'* हिंदुस्थानच्या हाताला हात लावल्याने विनाकारण नसत्या खर्चाची धोड आपल्या अगावर पडते असे वाटून ब्रह्मदेश अलग राहू पाहतो तर हे आर्थिक तज्ज्ञ काय बजावतात ते पहा म्हणजे झाले. अगदी साध्या परिस्थितीत हा कराचा बोजा. मग ब्रह्मदेशात सीलोनप्रमाणे 'बादशाही वसाहत' (Crown Colony) प्रस्थापित झाल्यानंतर साम्राज्यशाही खर्चाचे तट्टू अधिकाधिक चर्दा मागू लागणारच. ह्या आर्थिक तज्ज्ञानी कित्येक वादग्रस्त मुद्दे गृहीत धरले आहेत. हिंदुस्थानने ब्रह्मदेशासाठी सोसलेल्या झिजेची भरपाई, एकदर राष्ट्रीय कर्जात ब्रह्मदेशचा भाग वगैरे बाबी नुसत्या तज्ज्ञाच्या मताने सुटणाऱ्या नाहीत. त्यावर पुष्कळच रणे माजतील. त्यातही एका महत्त्वाच्या आतरराष्ट्रीय शिरस्त्याचा भग देखील करावा लागेल. अशी गोष्ट सोईसाठी घडून येणार, असे समजून आर्थिक ज्ञात्यानी हा हिशेब केला आहे. साम्राज्यातील सवलतीच्या जकातीचे (Imperial Preference) तत्त्व इग्लड व इतर साम्राज्यातील घटक राष्ट्रे यातच आतापर्यंत लाग् आहे. कानडा व ऑस्ट्रेलिया अथवा हिंदुस्थान अशा साम्राज्यातील घटकानी आपसात ते उपयोजिले नाही आणि आतरराष्ट्रीय शिरस्ता लक्षात घेता तसे उपयोजिता यावयाचे नाही. ब्रह्मदेश हिंदुस्थानापासून वेगळा झाला म्हणजे आयातजकातीचा प्रश्न कसा सोडवावा ही चर्चा करताना ह्या आर्थिक तज्ज्ञानी एक बाब गृहीत धरली आहे. हे दोन्ही देश आपसात जकाती ठरवितील त्या इतर राष्ट्राच्या मानाने सवलतीच्या असावयाच्या असे त्याचे म्हणणे आहे. परतु, हा पक्षपात इग्लडला आपल्या वसाहतीच्या बाबतीत करता आला तरी हिंदुस्थान किंवा ब्रह्मदेशाला परस्परासाठी करता येईल की नाही हा मोठाच वादग्रस्त मुद्दा आहे. पण ह्या सर्वच गोष्टी गृहीत धरून सुचविलेली योजना लोकाना मान्य होईल असे मुळीच नाही. कारण बहुजनसमाज हा होता होईल तो आपणावर पडणारा कराचा बोजा कमी होणार असेल त्या योजनेसच तत्काळ समति देतो. जेणेकरून ब्रह्मी रयतेवर दर डोईमागे निदान वीसबावीस आणे दर वर्षी सरासरीने कर वाढणार आहे, अशा योजनेस आतुरतेने समति

---

* *Indian Statutory Commission*, Vol. II, p. 283

देण्याइतके खुळचट ब्रह्मी पुढारी असतील असे वाटत नाही. पण ते तसे आहेत असे सायमनसाहेब भासवीत आहेत.

हिंदुस्थानात ब्रह्मदेशाचा समावेश झाल्यापासून एकदर राष्ट्रीय म्हणून जे कर्ज हिंदी सरकारच्या माथ्यावर बसले त्यात ब्रह्मदेशाचा हिस्सा असलाच पाहिजे. तसेच ब्रह्मदेशाचा राज्यसंसार परवापर्यंत उधळेगिरीचा होता. तोंडमिळवणी करण्यासाठी मध्यवर्ति सरकारला साल दरसाल त्यात काही तरी भर घालावी लागे. ह्या सर्व देण्याघेण्याचा विचार, एकत्र कुटुंबातून विभक्त होणाऱ्या ब्रह्मदेशामुळे करावा लागून योग्य प्रमाणात त्यातील बोजा ब्रह्मी प्रजेवर टाकावयास पाहिजे. तिन्ही ब्रह्मी युद्धाचा खर्च कोणी सोसावयाचा हा प्रश्नही पुनः उरतोच. ब्रह्मी प्रदेश खालसा व्हावयाचे, खर्च (द्रव्य व माणसेदेखील) हिंदुस्थानचा आणि साम्राज्य वाढून नावलौकिक पसरावयाचा तो मात्र ब्रिटिशांचा! तेव्हा सरळ पहाणारास हा खर्च ब्रिटिशांनीच द्यावा हे रास्त दिसेल. परंतु सायमन कमिशनचे तज्ज्ञ फडणिशी सल्लागार असे तसे नव्हते. त्यानी इग्लंडचा जसा काही या प्रकरणी काडीइतकाही संबंध नाही असे दाखवून म्हटले की, 'ब्रह्मदेशाने हा खर्च सोसावा किंवा नाही हा वादग्रस्त मुद्दा आहे!' इग्लंडने ह्या बोजाची जबाबदारी का घेऊ नये? याबद्दल मात्र त्यानी अवाक्षरही लिहिलें नाही. तिन्ही युद्धाचा खर्च सुमारे १ कोटि ८७ लक्ष पौंड झाला.* ब्रह्मदेशीय बजेटांतील तूट भरून काढण्यासाठी हिंदी सरकारने वेळावेळी खर्च केलेली रक्कम तींत मिळविली आणि चक्रवाढव्याज आकारल्यास सुमारे ९० कोटि रुपये ब्रह्मदेशाकडून येणे निघेल§ असा सायमन-तज्ज्ञांचा अंदाज आहे. पण असे चक्रवाढव्याज आकारले जात नाही, आणि ब्रह्मदेश वेगळा करण्यासाठी चंग बांधलेले सरकार ही मागणी मान्यही करीत नाही. तात्त्विक दृष्ट्या हिंदी प्रजेवर ह्या खर्चाचा बोजा पडावयास नको होता, हे दिसून येईल.

सायमन-सुधारणांचा नूर एकदा कळल्यावर त्यांना किती किंमत द्यावी हें कळेल. पण सायमन-कमिशनच्या शिफारशींच्या बुडाशीं काय आहे हे पाहि-

---

* *Financial Obligations Between Great Britain & India*, Indian National Congress.

§ *Indian Statutory Commission*, Vol. II, p. 281

ल्याने ह्या बादशाही कमिशनचे खरे स्वरूप एकदम प्रकट होईल. सायमनसाहेब म्हणतात, 'ली कमिशनसारख्याच्या सूचना हिंदुस्थानचे बाबतीत लागू करावयाच्या असल्या तरी ब्रह्मदेशात मात्र त्या मुळीच लागू करतां कामा नये.' सिम्हिल सर्व्हंटात तद्देशीय प्रजाजनाचे प्रमाण मुगीच्या पावलाने वाढवावे, ही ली कमिशनची साधी सूचना. तीमुळे हिंदुस्थानातील जबाबदार लोकमत असतुष्टच आहे. पण तसली सुधारणादेखील ब्रह्मदेशाला पचणार नाही, असे हे सायमन 'डॉक्टर' सागत आहेत, तेव्हा त्याचा डोळा कशावर आहे हे सागावयास का पाहिजे? कोणीकडून तरी गोऱ्यांना मनसोक्त चरण्यास कुरण मिळावे, अशीच त्या सप्तकाची इच्छा, आणि खरोखर त्याची तरतूद करण्यासाठीच ब्रह्मदेशांतले लोकमत, तेथील असतोष किंवा त्या प्रांताचे हिताहित अशा बाबीचा कळवळा आहे, असें सोग सायमनसाहेबाना आणावे लागले. असो. अन्यत्र कोठेही सायमन-सूचनांचा समाचार घेण्यास अवसर मिळाला नसता, तो ह्या ब्रह्मपुराणाच्या मगलाचरणात मिळाला.

ब्रह्मदेशाकडे आमचे लक्ष मुळीच गेले नाही. वायव्य सरहद्दीकडे नेहमी काहीना काही तरी गडबड होते आणि म्हणून नुसती सरहद्द म्हटली की ती अफगाणिस्थानकडील वायव्य सरहद्दच, असा समज सर्वत्र दृढ झालेला दिसतो. परतु वायव्येइतकेच महत्त्व ईशान्येकडे आहे, हें अद्यापि कोणाच्या लक्षात आलेले दिसत नाही. ब्रह्मदेशाला इतकें जपण्याचे कारण असे की, सुमारे १७०० मैल लाबीची ब्रह्मदेशीय सरहद्द परकीयाच्या प्रदेशाला लागून आहे. चीनच्या सीमेशीं सुमारे हजार मैल, फ्रेंच इडोचायनाच्या हद्दीबरोबर सुमारे शभर मैल आणि स्वतत्र सयामच्या जोडीने जवळजवळ सहाशे मैल अशा रीतीने १७०० मैलाची सरहद्द परराज्याशीं जोडून आहे. तो प्रदेश डोगराळ असला किंवा त्यातून रहदारी फारशी नसली तरी तिकडून परचक्राची भीति नाही, असे समजून चालणें धोक्याचे होईल. चीनची अलोट लोकसख्या, बोल्शेव्हिकाची तेथील लुडबूड, फ्रेंचाचा व ब्रिटिशाचा फाटत चाललेला स्नेहसबध, इडोचायनांतील २८००० खडें सैन्य, सयाममधील तत्तीचें लष्करी शिक्षण व म्हणून तेथे युद्धास लायक अशी प्रचड सेना, अडीचशे विमाने ठेवून सयामने आकाशमार्गाचा केलेला बदोबस्त, इत्यादि सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करतां येत नाही. विशेषतः 'सम्राटाच्या मुकुटातील

दैदीप्यमान हिरा' सांभाळण्याचे काम असलेल्याना तर ह्यामुळे चिंता अधिकच उत्पन्न होते. चीनमध्ये शांतता नाही, म्हणूनच बरें आहे. तेथील यादवी एकदा का थांबली की, वायव्य सरहद्द बरी पण ईशान्य नको, असे म्हणण्याची पाळी येईल, आणि म्हणून कदाचित् चीनमध्ये अतस्थ कलह पेरण्याचें श्रेयही साम्राज्याहितदक्षाकडेच असल्यास त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही. अस्तु.

ब्रह्मदेशातील बडाळीची कारणमीमासा करण्यासाठी त्या प्रदेशात अल्पकाळ वास्तव्य घडले त्या अवधीत जे पाहिले व जें समजले तेच ह्या ब्रह्मपुराणात सागितले आहे. तिकडील समाजस्थितीचा अभ्यास अत्यत मनोरजक व उद्बोधक असला तरी तो करावयास पाहिजे तसा करण्यास किवा इतर महत्त्वाची शहरे पाहण्यास मला अवसर नव्हता. तेथील वातावरण दोन्ही अर्थाने अनुकूल नव्हते. म्हणून ब्रह्मदेशासबधाचे सर्वांगीण विवेचन करण्याची माझी पात्रता नाही. बंडाळीची व विभागणीची चर्चा यथाशक्ति व यथामति केली आहे, ती सर्वानाच पटेल असे नाही. हिदी बाधवाचीच कड घ्यावयास पाहिजे, त्याच्या दोषाकडे डोळेझाक करावयास हवी, अशा प्रकारचे आरोप मजवर येतील, हे मी जाणून आहे. पण वेगळ्या मनोभूमिकेमुळे उद्भवणारा हा मतभेद केव्हाही राहणारच. मिळविलेली माहिती चुकीची किवा अपुरी असल्यास आणि तिजवरून मी काढिलेली अनुमाने बरोबर नसल्यास टीकाकारानी सडकून टीका करावी. तिजबद्दल मला विषाद न वाटता उलट आनदच होईल. परतु विनाकारण नापसती दर्शविणे अथवा बळेंच कांही तरी दोष काढावयाचे म्हणूनच काढून शिष्टाचा आव आणून परीक्षण करावयाचे ही रीत कोणी अवलबू नये, अशी माझी विनति आहे. त्यामुळे टीकेला व टीकाकाराला देखील किमत उरत नाही. चुकीचे माप पदरांत घालणे किंवा लेखकाची प्रगति होईल अशा सूचना करणे ह्याच बाबींना प्राधान्य देऊन परीक्षण लिहिल्यास सर्वच लेखक त्यांचे ऋणी राहतील हे विनवून सांगावें लागण्याची पाळी येते.


उद्धृत केलेले बहुतेक सर्व आकडे व इतर माहिती सरकारी पुस्तकांतूनच घेतलेली आहे. त्यासाठी मुख्यतः पुढील पुस्तकांचा उपयोग केला :—

1 *Memoranda submitted to the Statutory Commission by the Government of Burma.*
2. *Report of the Burma Provincial Banking Enquiry Committee, 1928-30, Vol. I.*
3. *Report of the Administration of Burma, 1928-29.*
4 *Indian Statutory Commission, Vol. I & II.*
5 *The Burman His Life & Notion-Shway Yoel*

ब्रह्मदेशात जाताना वाटेंत चितगाग येथे उतरून तेथील खटल्याची हकीकत समजावून घेतली. तीच थोडक्यात परिशिष्टात दिली आहे. प्रत्यक्ष ब्रह्मदेशाशी तिचा सबध नसला तरी ती इकडे कोणासच वाचावयास मिळाली नाही. नागपूरच्या 'महाराष्ट्रा'त व मुबईच्या 'प्रभात'मध्ये प्रसिद्ध झालेली ही माझी पत्रे पुस्तकरूपाने वाचकापुढे ठेवण्यास त्या त्या सचालकानी अनुज्ञा दिली, याबद्दल मी त्याचा आभारी आहें.

टिळक रोड,
पुणे, २८।८।३१

श्री. रा. टिकेकर.



गौतमबुद्धाचा अजस्र पुतळा—चात्रान.

अध्याय पहिला

ऐतिहासिक

ब्रह्मदेशचा आणि हिदुस्थानचा अर्थाअर्थी काही सबध नसता, 'ब्रह्म' हे ब्राह्मणी नाव त्या देशाला कसे मिळाले हे खरोखरीच एक कोडे आहे. इग्रजी भाषेत बर्मा (Burma) म्हणून म्हणतात तोच उच्चार खरा आहे. कारण आग्ल-वाग्देवीस काही बोबड्या मुलाप्रमाणे R चा उच्चार स्पष्टपणे करताच येत नाही, असे म्हणावे लागते. 'बर्मा' यातील रेफ वर्ज्य करून जो उच्चार होईल त्याच नांवाने 'ब्रम्ही' लोक स्वदेश ओळखतात. मात्र लिहितांना 'म्रह्मा' असा काही तरी विचित्रच पाठ लिहिण्याचा प्रघात त्याचेकडे पूर्वापार चालत आलेला आहे. हिदुस्थानातून ब्रह्मदेशात गेलेले रहिवासी देखील ब्रह्मदेश हा शब्दप्रयोग न करता 'र'कार अगदी नरमपणे उच्चारून 'बरमा' असेच त्या देशाला सबोधित असतात. यावरून इतकेच अनुमान निघते की, ब्राह्मण्याचा, ब्रह्मदेवाचा किवा 'ब्रह्मज्ञानां'तील ब्रह्माचा ब्रह्मदेशाशी कोणत्याही प्रकारचा दूरान्वयी सबध देखील पोहोचत नाही. मग हे नाव त्या प्राताला कसे मिळाले याविषयी सशोधकानी शोध लावण्याचा प्रयत्न खुशाल करावा. तशा प्रकारच्या प्रयत्नास पुष्कळ वाव आहे.

ब्राह्मणी शिकवणीचा किवा वैदिक धर्माचा पगडा ब्रह्मदेशांत आजमितीस असणे सभवनीय नसावे असे वाटते. कारण बौद्धधर्माचाच प्रसार तेथे प्राचीन काळपासून झालेला असणार हे उघड आहे. तत्पूर्वी हिदु

संस्कृतीचा संपर्क तत्स्थानियास लागलेला असल्यास तो अथवा बुद्धोत्तर कालात कोणी हिंदु धर्मोपदेशक तिकडे गेले असल्यास त्याच्या मताचा प्रभाव, अशा दोन प्रकारानींच आर्यधर्माचे काही अवशेष मात्र ब्रह्मदेशात आढळणे शक्य आहे. अभ्यासू दृष्टीने प्राचीन काळापासून आजपर्यंतचा इतिहास थोडक्यात अवलोकन केल्यास आपणास पाहिजे ती माहिती मिळेल. व्यापक अर्थाने इतिहासात प्रत्यक्ष इतिहासाव्यतिरिक्त इतर अनेक बाबींचा समावेश होतो हे लक्षात घेतले म्हणजे मी पुढे जी माहिती माडणार आहे ती अप्रस्तुत नाही असे कळून येईल. कोणत्याही लोकाचा परिचय करून घ्यावयाचा असल्यास त्याचा थोडासा पूर्वेतिहास, त्याच्या चालीरीती व समाजव्यवस्था पाहिली म्हणजे ओळख नीटपणे होण्यास आणि झालेली ओळख टिकण्यास मदत होते. शिवाय कित्येक अज्ञात व आजपर्यंत अगम्य राहिलेल्या गोष्टी ठाऊक होतात. तेव्हा हिंदुस्थानास पूर्वेकडे लागून असलेल्या या ब्रह्मी शेजाऱ्यावर हिंदु संस्कृतीचे व हिंदु धर्माचे काय काय परिणाम झालेले असावेत हे आपण प्रथम पाहू. कारण ह्यावरूनच काही माहिती मिळण्याचा संभव आहे.

आपण ब्रह्मदेश म्हणून ओळखतो त्या प्रदेशात बौद्धधर्माचा प्रसार असल्याचे वर सांगितलेच. परंतु शुद्ध बुद्धानुयायाप्रमाणे तेथील जनतेचे आचरण दिसत नाही. त्याच्या आचारात कित्येक बाबी अशा आहेत की, त्यात इतर कोणत्या तरी बाह्य रूढीचा परिणाम स्पष्टपणे दिसतो. ब्रह्मी प्रजेत सर्वत्र प्रचलित असलेली नॅट्पूजा पहा. नॅट् म्हणजे एक देवता. मग जलदेवता, वनदेवता, वास्तुदेवता, ग्रामदेवता अशाप्रमाणेच हे निरनिराळे 'नॅट्' असतात. कारण प्रत्येक वस्तूचे किंवा प्राण्याचें संरक्षण करणारी कोणी तरी एक देवता आहे असे त्याचे म्हणणे आहे. मुख्य असे पाच 'नॅट्' मानले आहेत. त्याची नावेः—

१. मेक्का-सो, २. बोम्म-सो, ३. योक्क-सो, ४. आकाथ-सो, ५. थर-सो. ह्यांत 'सो' ह्याचा अर्थ 'देव' अथवा 'अधिपति' असा आहे. ही पंचमहाभूतेच आहेत असे म्हणण्यास फारसा प्रत्यवाय नाही. त्याच्या मूळ संस्कृत नावावरील ब्रह्मी पोषाख उतरविला म्हणजे ह्या विधानाची सत्यता पटेल. मेघ, भूमि, वृक्ष (रुख्ख), आकाश व सरस् अशा संस्कृत शब्दाची

ही विकृत स्वरूपेच होत. 'र' ऐवजी 'य' व 'श, ष, स' बद्दल 'थ' असा फरक, सस्कृत शब्द ब्रह्मी भाषेत जातात तेव्हा होतो, असा नियम काढता येईल, इतकी उदाहरणे देता येतील. असो. नॅट्पूजेचे प्रकरण पुढेही पाहिले पाहिजे.

वरील पाच मुख्य नॅट् सोडले तर इतर ३७ नॅट् ब्रह्मी पुराणातून अथवा दतकथातून निर्दिष्टलेले आहेत. आपल्या इतिहासातील काही महत्त्वाच्या पण शोकमय आयुःक्रमाच्या पुरुषाची नावे नटच्या वरील यादीत काही जणानी गोवलेली दिसतात. पण त्यातील प्रमुख व राजा म्हणून 'थग्य' नॅट् आहे. त्याचे वर्णन 'शक्र' (देवाधिदेव इन्द्र) या हिंदु देवतेशी जमते, म्हणून हे ३७ नॅट म्हणजे हिंदूच्या ३३ देवाची (देशकालास्थित्यनुसार) सुधारून वाढविलेली आवृत्ति होय, असे तज्ज्ञाना वाटते.

ही नॅट्-प्रतिमेची पूजा ब्रह्मी प्रजेत कशी रूढ झाली यासबधी विचार केल्यास (१) निसर्गपूजन, (२) पितृपूजन व (३) राक्षसपूजन अशा तिन्ही पूजनाचे ते एकत्रित स्वरूप असावे असे वाटते. समाजाच्या प्राथमिक अवस्थेत निसर्गात दृश्य होणाऱ्या सूर्य, वृक्ष, नदी इत्यादि 'शक्ती'ची भीति वाटून (अथवा इतर कारणानी) त्याची पूजा करण्याकडे प्रवृत्ति होते तदनतर मृत्युवश झालेल्या पितराविषयी पूज्यभाव व्यक्त करण्यासाठी किंवा त्यानी आपणावर प्रकोप करू नये म्हणून त्यांची पूजाअर्चा सुरू होते. आणि अज्ञात अशा 'राक्षस'शक्तीची उपासना करण्याकडे मन.प्रवृत्ति समाजाच्या बाल्यावस्थेत झुकली तर आश्चर्य नव्हे. परतु ही त्रिविध पूजा आर्यांचीच असावी व ब्रह्मी प्रजेत नतरच तिचे अनुकरण झाले असावे असे म्हणतात. खुद्द नॅट् शब्द देखील 'नाथ' या सस्कृत शब्दापासूनच व्युत्पादिला जातो. अशा रीतीने आर्यांच्या आचाराचा परिणाम बुद्धानुयायी ब्रह्मी प्रजेवर न कळतच बसलेला दिसतो. आजमितीसही त्याच्या चालीरीतीत तो व्यक्त होत आहे.

आणखीही कित्येक गोष्टी विचारात घेतल्या पाहिजेत. आर्यधर्माचे वर्चस्व ब्रह्मदेशावर पडलेले स्पष्टपणे दिसून येणार नाही हे खरे, पण काही बाबी अशा आहेत की, त्यावरून हिंदु सस्कृतीचा सबध ब्रह्मदेशाशी आला असावा असा तर्क करण्यास पुष्कळशी जागा आहे. तेवढ्यावरून इतर बऱ्याच

गोष्टीची माहिती होईल. उदाहरणार्थ, हिंदुधर्मशास्त्राप्रमाणे सगोत्र विवाह निषिद्ध आहे. तीच चाल ब्रह्मदेशातील अनेक जातींपैकी कचीन जातीत प्रथमपासून रूढ आहे. राज्यपदारूढ होणाऱ्या

"भावाचे ते लगिन वहिणीशी लावावे"

अशी विचित्र चाल जेथे आहे व सापत्न माता किंवा सावत्र बहीण याच्याशीं लग्न करणे जेथे निषिद्ध नाही, तेथे सगोत्र विवाहास धर्मशास्त्राप्रमाणे बंदी असावी, ह्यावरून ही चाल हिंदुस्थानातूनच तिकडे गेली असावी असा तर्क करण्यास हरकत कसली? विशेषतः कचीन लोकात तर विधवा भावजयीवर दिराचा हक्क असतो. तो विवाहित असला तरी त्याने द्वितीय कुटुंब म्हणून विधवा भावजयीशी लग्न लावावे, अशी 'धर्माज्ञा' असताना सुद्धा सगोत्र विवाह निषिद्ध असावा हे आश्चर्य होय. मात्र एवढे खरे की, 'गोत्र' असे त्याना ठाऊक नाही. ज्याचे 'कुलनाम' एकच आहे—मग ते कोठल्याही जातीचे असोत—अशाना आपसात विवाहबद्ध होता येत नाही अशी 'शास्त्राज्ञा' आहे.

आज रूढ असलेल्या चालीरीतींची बाब सोडून निरनिराळ्या जातीत प्रचलित असलेल्या दंतकथाकडे लक्ष दिल्यास आणखी महत्त्वाची माहिती मिळते. ब्रह्मदेशीयच पण निरनिराळ्या लोकाच्या अनेक जाती तेथे आहेत आणि त्याच्या मानवोत्पत्तिविषयी वेगवेगळ्या अशा 'पौराणिक' कल्पना सांगतात. 'स्वर्गातून पाच पुरुष व चार स्त्रिया पृथ्वीवर आल्या व त्याची संतति म्हणजेच मानववंश,' असे एक जात मानते, तर दुसरीचे म्हणणे असे की, 'सूर्याने अंडे घातले आणि एका ब्रह्मी स्त्रीने ते उबविले आणि त्यापासून मनुष्य झाला.' तिसऱ्या जातीची समजूत जराशी वेगळी आहे. ब्रह्मी राजकन्येपासून सर्व ब्रह्मी प्रजा उत्पन्न झाली असली, तरी तिला आपल्या 'प्राणप्रिया'चे दर्शन कधीच झाले नाही. यावरून ती आधळी होती असे नव्हे, तर अज्ञात व अदृश्य अशाच प्राणप्रियापासून तिला गर्भ राहिला. कचीन लोकाची कल्पना या सर्वांहून वेगळी आहे. 'भाऊबहिणीचे लग्न झाले व त्याच्यापासून आमचे पूर्वज जन्मले,' असे ते म्हणतात. अशा अनेक कल्पनाच्या जालात गुरफटून जाण्याचे कारण नाही. त्याचा अर्थ कसा लावावयाचा अथवा हिंदु-पुराणादि ग्रंथाशी त्याचा

सबध कसा पोहोचतो एवढेच ज्ञात्यानी सागितले म्हणजे काम साधेल. अफगाण पठाणात दीर्घभावजयीच्या लग्नाची चाल आहे हे समजल्याने अभ्यासकास ऋग्वेदातील एका ऋचेचा अर्थ कळला. तसेच ह्या ब्रह्मी चालीरीती व कल्पनावरूनही पुष्कळच कळण्याचा सभव आहे. अनेक जातीच्या भिन्न भिन्न रूपान्तरित नावात दनु व दानव ही नावे आहेत. ब्रह्मदेशच्या वायव्येस 'नाग' लोकाचा प्रदेश व मणिपूर सस्थान आहे. मणिपुरासच 'पाकुनृपतिजनक' असा अर्जुन गेला होता. तेथे त्यास तद्देशीय पत्नी लाभून बभ्रुवाहन नामक पुत्रही झाला होता, इत्यादि पौराणिक कथाभाग लक्षात आणल्यास बरीच माहेती मिळेल व अगम्य राहिलेल्या दालनाची दारे उघडतील. पण त्यासाठी पुष्कळच सशोधन करावे लागेल. नुसत्या कल्पनेने धागेदोरे जुळविता येतात. एवढ्यावरूनच कसलेही विधान एकदम करता यावयाचे नाही. मात्र त्याबरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की, असल्या शोधामुळे ब्रह्मदेश आमचाच आहे असा हट्ट घेऊन बसण्याचे कारण नाही.

आसामच्या पूर्वेस असलेला हा ब्रह्मदेश दक्षिणोत्तर सुमारे तेराशे मैल लाब पसरला असून पूर्वपश्चिम रुदी जास्तीत जास्त सातशे मैल आहे. वायव्येस आसाम, ईशान्येस चीन, नैऋत्येस बगाली उपसागर व आग्नेयेस सयामचे स्वतत्र राज्य अशा त्या राज्याच्या चतु.सीमा सागता येतील. त्या प्रदेशातील 'अमरपुरा' एवढे एकच शहर सस्कृत नाव धारण करून असले तरी इतर कोणत्याही गावाचे नाव सस्कृत नाही. परतु, प्रोम शहरास **श्रीक्षेत्र**, पेगू शहरास **हंसावती** आणि साड्डे गावास **द्वारवती*** अशी हिदु पौराणिक नावे होती, असे श्रीमती **सरलादेवी चौधराणी** यानी ब्रह्मदेशीय हिदु सभेच्या तृतीय परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून केलेल्या भाषणात म्हटले आहे. (रगून-२३-२४ मे, १९३०). ह्या विधानास दुसरा आधार सापडला नाही. पण ते काहीही असो, शेजारधर्मामुळे हिदु आचारविचारांची लाट पलीकडे ब्रह्मदेशात गेली व तेथे बुद्धाचा धर्म सर्वमान्य झाला असतांनाही काही हिंदु

---

* "द्वारवतीत वसे तो यति वार्षिक मास चार पर्यत" असें त्रिदडी सन्यासी अर्जुनाचें वर्णन 'सुभद्राहरणा'त आहे, तीं द्वारवती ब्रह्मदेशात होती असें समजावयाचे कीं काय?

चालीरीती आज देखील त्या प्रदेशात थोड्याफार फरकाने प्रचलित गाहिल्या, यावरून सास्कृतिक हल्ले कसकसे होत असतात आणि त्याचे स्वरूप किती काळपर्यंत टिकू शकते इत्यादि गोष्टी सिद्ध होतील. हिदुस्थानसारखे प्रचड राष्ट्र एका बाजूस व दुसरीकडे त्याहून विस्तृत असे चीनचे साम्राज्य, अशा दुहेरी कचाटीत ब्रह्मदेश निसर्गतःच सापडला असल्याने दोन्ही शेजाऱ्याचे भिन्न भिन्न स्वरूपाचे आघात त्याजवर व्हावे यात आश्चर्य काहीच नाही. भौगोलिक परिस्थितीचा परिणाम सामाजिक व्यवस्थेवर कसा घडून येतो हे कळण्यास ब्रह्मी समाजस्थितीचा अभ्यास करावा लागेल. परतु हे काम शेवटच्या प्रकरणावर सोपवून हल्लोच्या प्रश्नासच हात घालणे इष्ट आहे.

प्राचीनकालीन इतिहास असा ब्रह्मदेशचे बाबतीत निश्चितोने सागता येण्यासारखा नाही. मध्य आशियातील काकेशस पर्वताच्या पायथ्यापासून निघालेल्या आर्य टोळ्यापैकीच काही ब्रह्मदेशात गेल्या असाव्या असे बहुतेकाना वाटते. त्याचा मार्ग अर्थातच समुद्रावरचा नसून उत्तरेकडून सरकत सरकतच त्या पूर्वेकडे गेल्या आणि नतर इरावतीच्या तीरी त्यानी प्रथम वसति केली असावी. तगॉ (Tagaung) येथे त्याची ' राजधानी ' होती असे म्हणतात. आज तगॉ हे कथा जिल्ह्यात इरावतीच्या पूर्वतीरी एक खेडे आहे. येथून मग त्या टोळीतील लोक भिन्न दिशाकडे पागले असावे. ह्या प्राचीन इतिहासाचे निरीक्षण करतानाच प्रादेशिक रचनेमुळे काय काय परिणाम घडून आले असावेत हे अनुमानिता येते. मुख्य कपू विभागला जाऊन त्याचे पक्ष इतरत्र गेले ते देखील दुसऱ्या नदीच्या आश्रयालाच. कारण नदीकिनाऱ्याकिनाऱ्यानेच नवी वस्ती वाढत असते. शिवाय वास्तव्य करण्यास सुपीकतेच्या व समृद्धीच्या दृष्टीने ' उतार वयातल्या ' नदीतीरासारखी किवा दुआबासारखी सोईची जागा नसते. गगा-यमुना याच्यामधील सपन्न देशाचा किवा पजाबातील कसदार जमिनीचा परिणाम त्या त्या ठिकाणच्या इतिहासावर कसा झाला आहे हे लक्षात आणले म्हणजे ब्रह्मदेशातही तशाच प्रकारच्या इतिहासाची पुनरावृत्ति झालेली दिसेल समृद्ध देशावर डोळा सर्वाचाच असावयाचा आणि त्यावर मालकी गाजविण्यासाठी आपसातील लढाया व्हावयाच्या. अशाच प्रकारचा इतिहास ब्रह्मदेशच्या बाबतीत झालेला आढळून येईल.

नकाशाकडे दृष्टि फेकताक्षणींच ब्रह्मदेशातील मुख्य भाग म्हणजे दक्षिणेकडील दक्षिणवाहिनी नद्यांच्या मुखाकडचाच असावा हे स्पष्ट दिसते. इरावती, चिंड्विन, सिताग व साल्वीन ह्या तेथील मुख्य नद्या होत. त्याचा उगम उत्तरेकडील डोगराळ मुलखात असल्याने तेथे वस्ती तुरळक व विभक्त अशी असल्यास नवल नाही. ब्रह्मदेशच्या उत्तरेस, ईशान्येस व वायव्येस देखील सर्व प्रदेश गिरिराजीनी व्याप्त असाच असल्याने तेथे फारशी वस्ती नाही. जसजसे दक्षिणेकडे जावे तसतशी सपन्नता वाढीस लागल्याची चिन्हे दिसतात. अगदी ढोबळ मानाने ब्रह्मदेशचे विभाग तीन पाडता येतील. चितगागला लागून असलेला आराकान प्रात व तसाच पूर्वेकडील तेनासरीमचा निरुद पण लाबट असा पट्टा, हे दोन भाग आणि दोन्हीमधील उरलेला तिसरा. ह्यातच सर्व नद्यांची पात्रे असून त्याच्या काठाकाठाने आबादी वाढत गेली आहे. आराकान हा भाग डोगराळ आहे. मध्यतरीचा जो मुख्य भाग म्हटला तो विस्तृत असून त्याचे चार पोटविभाग पाडता येतातः (१) उत्तरेकडील डोगरी प्रदेश, (२) मध्यविभाग, (३) इरावती दुआब व (४) सिताग-साल्वीन दुआब, अशी त्याना नावे देण्यास हरकत नाही. पैकी डोगराळ मुलूख उत्तरेस असून चिंड्विन व इरावती त्यांतूनच वाहत येतात. आराकान व पूर्वेकडील शान सस्थाने याच्या मधील प्रदेशास मध्यविभाग म्हटले आहे. ब्रह्मदेशचे 'केंद्र' असे काढले तर याच विभागांत ते पडेल. ब्रह्मी लोकाचे खरे घर म्हणजे येथीलच आणि म्हणूनच येथे बारबार लढाया चालू असत. याच्या दक्षिणेकडील इरावतीच्या मुखापर्यंतचा प्रदेश तिसऱ्या विभागात मोडतो. पूर्वी तल्हॉ* लोकाचे ब्रह्मदेशात राज्य होते ते याच ठिकाणी. चवथ्या विभागात उत्तरेकडे थोडे डोगर आहेत, पण बाकीचा प्रदेश नद्यामुळे सुपीक व सपाट आहे.

प्रथमतः उत्तरेकडे आलेल्या ब्रह्मी पूर्वजापैकी काही आराकानकडे गेले व त्यांनी तेथे आपले राज्य स्थापिले. ब्रह्मदेशच्या मध्यभागचा व आराकान प्रांताचा सबध तुटण्यास मधील आराकान योमा ही डोगराची राग कारणीभूत होते, म्हणून तेथे विशेष कोणाचे हल्ले न सोसता त्याना अठराव्या शतका-

* Talaings—यांसच मॉन व पॅगुआन अशीं नावें आहेत.

पर्यंत राज्य करता आले. मध्यविभागाचे मात्र तसे झाले नाही. तेथे स्थायिक झालेल्या ब्रह्मी लोकाना दक्षिणेकडील तल्हॉ लोकाशी सारखे झगडावे लागले. मध्यविभागाची राजधानी प्रोम शहर असून तल्हॉचे मुख्य शहर **ठटोन** (Thaton) हे होते. इ. स. ७४२ च्या सुमारास ठटोनकरानी प्रोम हस्तगत करून त्याचा धुव्वा उडविला. तरी ब्रह्मी राजानी **पगान** येथे नवीन राज्य स्थापले. तल्हॉचा ब्रह्मदेशाशी सबध फार पूर्वापारचा असल्याने त्याना तो प्रदेश आपल्याच हाती असावा असे वाटे आणि म्हणून त्याचे ब्रह्मी राज्यकर्त्याशी वारवार झगडे होऊन 'ब्रह्मदेशावर मालकी कोणाची' हा प्रश्न रणभूमीवर सुटत असे. ब्रह्मी घराण्याचे वर्चस्व प्रोमच्या पाडावानतर सुमारे पांच शतके अबाधित राहू शकले आणि ह्याच कालात ब्रह्मदेशातील उत्कृष्ट अशी कारागिरी, पॅगोडा (बुद्धमदिर) व इतर इमारतीच्या रूपाने प्रकट झाली. इतकी शातता, सुबत्ता व वैभवशालीनता भूतकालातील अथवा भविष्यकालच्या कोणत्याही राज्यकर्त्यास लाधली नाही असे त्या वेळचे वर्णन करितात. **अनाव्रत** हा त्याच्या घराण्यातील पराक्रमी व थोर राजा होऊन गेला. त्याने इ. स. १०४४ पासून १०७७ पर्यंत राज्य केले आणि तेवढ्यातच तल्हॉचा पराभव करून त्याचे राज्य आपल्या अमलाखाली आणले. याच वेळी ठटोनहून त्याने बुद्धधर्माचे 'बी' आणून आपल्या देशबाधवात त्याचा प्रसार केला. कित्येकाचे असे म्हणणे आहे की, ब्रह्मदेशात उत्तरेकडूनच बौद्धधर्म गेला आणि बौद्धधर्माच्या 'महायान' शाखेने हे धर्म-प्रसाराचे कार्य केले. सिलोनातील 'हीनयान' शाखेने दक्षिण ब्रह्मदेशातील तल्हॉ लोकावर नवीन धर्माची छाप पाडून त्याच्याकरवी ब्रह्मदेशात गौत-माची शिकवण पसरविली असे काहीचे म्हणणे आहे. यातील खरेखोटे समजावयाचे कसे हे कोडेच पडेल. पण तूर्त हा प्रश्न बाजूसच ठेवला पाहिजे.

अनाव्रताचे पश्चात् पगानचे गादीवर १३ व्या शतकापर्यंत ब्रह्मी राजेच आले, पण शेवटचे दोघे कमनशिबी निघाले. **नरथु** हा शत्रूकरवी मारला गेला म्हणून त्याला 'कलाच्या मिन्'*(परकीयांनी पराभूत केलेला राजा) म्हणत. त्याच्या नतर आलेला **नरातिपाद** हा पुढे 'तयो प्ये मिन्' (शत्रूच्या

---

* मिन् = राजा, असा ब्रह्मी भाषेंतला अर्थ आहे.

पुढून पळालेला राजा) म्हणून ओळखला जाई. कारण ब्रह्मदेशच्या पूर्वेकडील शान व चिनी लोकानी मिळून पगानवर हल्ला करून वरील दोन्ही राजाचा अशी दुर्दशा केली व आपली सत्ता त्या प्रदेशावर स्थापिली. मात्र त्यात मध्यवर्ती अधिकार कोणाचाच नसे. ब्रह्मदेशचे लहान लहान सुभे पाडले जाऊन त्यावर शान व चिनी 'सुभेदार' राज्य करीत. हा प्रकार १६ व्या शतकापर्यंत चालला. ब्रह्मी राजाचा पुरा नायनाट कधीच झाला नसल्याने ह्या धामधुमीच्या काळात कसेबसे टिकून राहिलेले **टाऊंगू** (Toungoo) येथील घराणे पुढे सरसावले आणि पुनः एकदा ब्रह्मदेशावर ब्रह्मदेशीय राजे अधिकार चालवू लागले. त्याच्यात **तबिनश्वेती** व **बइननॉंव** (Bayinnaung) हे दोन मोठे पराक्रमी राजे झाले. बइननॉंवची कारकीर्द इ. स. १५५१ ते १५८१ पर्यंत होती. तल्हॉं राजाच्या मुलखावर देखील सत्ता ह्या नूतनोदित ब्रह्मी घराण्याची असल्याने वडग्वोरीस वाव राहिलाच होता. पण याच सुमारास टोपीवाल्या फिरंग्याचा प्रवेश ब्रह्मी भूमीत झाला आणि येथून ब्रह्मदेशच्या इतिहासास वेगळेच वळण लागलेले दिसते.

टोपीवाल्यात पोर्तुगीजाचा नंबर पहिला होता. त्यानी इ. स. १६१९ मध्ये टाऊंगूच्या राजाकडून 'व्यापारास सवलती' मागितल्या आणि सिरियम व मर्तबान (म्हणजे आज रंगून व मोल्मीन आहे त्याच्या आसपास) येथे 'वखारी' स्थापिल्या. डच व इंग्रज मागोमाग आलेच. नीग्रे, बसीन, प्रोम, एवा, इत्यादि ठिकाणी 'वखारी' व दलालाची दुकाने वाढली. इकडे तल्हॉं लोकाची राज्यपदप्राप्तीसाठी धडपड चालूच होती. इ. स. १७५० च्या सुमारास त्यानी जोराचा प्रयत्न करून एवा हे राजनगर जाळून उद्ध्वस्त केले. त्याच्या जोडीस चीन व मणिपूर या दोन्ही बाजूनी ब्रह्मदेशावर हल्ले होतच होते. परतु **औंगझेया** अथवा **अलौंपया** (Alaungpaya) नावाचा ब्रह्मी राजा ह्याच समयी प्रबळ होऊन त्याने तल्हॉंचा सपूर्ण पाडाव इ. स. १६६० चे सुमारास केला. इतकेच काय, पण सयाम व मणिपूर अशा विरुद्ध दिशाकडील प्रदेशावर हुकमत चालविण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती व ती तृप्त करण्यासाठी त्याने त्या प्रांतांवर स्वारीही केली. पण तो लगेच मृत्युवश झाला. मात्र ब्रह्मी राज्य पुनः ब्रह्मी राजांच्या

तत्राखाली त्याच्या कर्तबगारीनेच आले. शिवाय तल्हाँचा पराभव झाला त्याचे कायमचे स्मारक म्हणूनच की काय, औगझेयाने रगून हे शहर वसविले. रगून हे नाव हुडकून काढण्यातही त्याने तल्हॉचा बीमोड झाला असा आशय आणला. ' यगन ' म्हणजे ' युद्धाची अखेर ' (ब्रह्मी भाषेत ' य र योरभेदः ' हे सूत्र प्रचलित दिसते, म्हणून रगनला ' यगून ' म्हणतात) हा अर्थ असला तरी ब्रह्मी भूमीवरील रक्ताचा सडा काही थाबला नाही किवा आपलेच पुत्र आपसात भाडून आपल्या माडीवर चिरतनची निद्रा घेत पडलेले पाहण्याचे दुःख ब्रह्मी भूमीच्या कपाळचे चुकले नाही. एका अर्थाने युद्धाचा शेवट झाला खरा, पण तल्हॉशी यापुढे लढाया झाल्या नाहीत, तरी दूरदेशस्थ, परधर्मी लुटारूनी व्यापाराच्या मिषाने ब्रह्मदेशात पाऊल ठेवले व आपणास आश्रय देणारावरच उलटून त्याच्याशी लढाई करण्यास ते सिद्ध झाले, हा विचित्र इतिहास आता पहावयाचा आहे. त्रयस्थानी येऊन ब्रह्मी भूमातेच्या लाडक्या पुत्रास चोरदरोडेखोराप्रमाणे वागविले आणि तिच्या सर्व पुत्राना भिकेला लावून आपण सर्व मुलखाचे मालक होऊन बसले. ही अघटित घटना ब्रह्मदेशदेवतेला पहावयाची होती ! तिच्या पुत्राना म्याडाच्या हातून कपटाने व लबाडीने मरण यावयाने होते ! अस्तु.

फिरगी व्यापारी व बौद्ध राजे याचे आपसात पटेना. नुसत्या व्यापाराबर टोपीकर सतुष्ट होते कोठे ? त्याना ब्रह्मी राजाना टोपी घालून आपल्या मस्तकी मुकुट ठेवण्याची हाव सुटली. म्हणून कसल्या ना कसल्या तरी कुरापती निघत. प्रथम फ्रेचानी कारस्थानें सुरू केली. त्यानी प्रचलित राजाविरुद्ध तल्हॉशी बोलणे सुरू करून ब्रह्मी राजाना सिहासनावरून उतरविण्याचा घाट घातला. म्हणजे त्याना कोणाविषयी प्रेम होते असा प्रकार नव्हता. पण बाममार्गाने जाण्याची ही फिरग्याची रीतच ! ह्या राजद्रोहाच्या गुन्ह्याबद्दल फ्रेचाना योग्य ती शिक्षा झाली. इग्रजानी हा वेळ पावेतो कोणाचीच बाजू घेतली नाही. दोन्ही शत्रु भाडत असता ब्रिटिशानी फक्त ' व्यापार वाढविण्यासाठी ' अधिक सबलती मागितल्या आणि राजकीय घडामोडीकडे आमचे लक्षच नाही असे दाखविले ! पण पुढे त्यांचेही गुण उघडकीला आले आणि तत्कालीन राजाने त्याना त्याच्या घोर गुन्ह्याबद्दल यथायोग्य प्रायश्चित्त दिले. ह्या सर्व घडामोडी अलौपयाच्या कारकीर्दीत घडल्या.

हा पराक्रमी राजा इ. स. १७६० मध्ये निवर्तला. आणि नोगद्राजी गादीवर आला. त्याची मनधरणी करून आणि मागील प्रकार मुकाट्याने विसरून ब्रिटिशानी आपले हातपाय पसरण्यास सुरुवात केली. नौगद्राजीनतर एकदर चार पाच राजे इ. स. १७८१ पर्यत एवाच्या गादीवर बसले, व इ. स. १७८३ मध्ये एवाची राजधानी अमरपुऱ्यास नेण्यात आली. त्या वेळी बौदोपाया हा राजा होता. ह्या अमदानींत मणिपूर व सयामवर ब्रह्मी झेडा फडकून आला! आणि ह्या विजयाने उत्साहित झालेले ब्रह्मी लोक आसाम जिंकण्यास उत्सुक झाले होते. हिदुस्थान सरकारला ब्रह्मदेशाविषयी विशेष काळजी वाटू लागली आणि त्यानी नेहमीची चचुप्रवेशाची पहिली पायरी म्हणून 'आमचा वकील आपल्या दरबारी घ्या,' अशी विनति केली. इ. स. १७९५ मध्ये अमरपुऱ्यास आलेला ब्रिटिश वकील दोन वर्षे राहिला. पण ब्रह्मी राजा मुळीच बधला नाही म्हणून हात हालवीतच त्यास परतावे लागले. बोदोपाया इ. स. १८१९ मध्ये निर्वाणपदी गेल्यावर बाजीडो गादीवर आला. नतर त्याने आसामवर स्वारी केली व तो प्रदेश जिकला! लगेच ब्रिटिश सरकार खवळले आणि इतके दिवस सुप्त असलेला क्रोधाग्नि भडकला. त्यानी ब्रह्मी सेनानी महाबदुला हा बगालवर हल्ला करण्यात गुतला आहे हे पाहून तेनासरीम प्रात बळकाविला आणि मर्तबान व रगून येथेही ब्रिटिश निशाण रोवले! प्रत्यक्ष लढाई करून जिकण्याचे सामर्थ्य जसे काही त्याच्या अगी नव्हतेच. इ. स. १८२५ मध्ये महाबदुला मृत्यु पावला आणि मग ब्रिटिशाना स्फुरण चढले. इ. स. १८२६ मध्ये यांडबो येथे ब्रिटिशानी ब्रह्मी राजाशी तह केला. पहिले ब्रह्मी युद्ध अशा रीतीने दोनअडीच वर्षे चालले आणि त्यामुळे ब्रिटिशाना आसाम, आराकान व तेनासरीम हे तिन्ही प्रात मिळाले, युद्धाप्रीत्यर्थ खडणी म्हणून एक कोट रुपये ब्रह्मी सरकारने कलकत्तेकर कपनीसरकारला द्यावे व परस्पराचे वकील एकमेकानी आपल्या दरबारी ठेवून घ्यावे असे ठरले.

बाजीडो राजाच्या कारकीर्दीत ब्रिटिशाची सरशी होऊन अपमानास्पद अटी ब्रह्मी राजावर लादल्या गेल्या, हे अर्थातच ब्रह्मी प्रजेला आवडले नाही. बाजीडोला हुसकावून त्याचा भाऊ थारावडी गादीवर आला. त्याचें व ब्रिटिशाचे काही केल्या जमेना. ब्रिटिशाची अपेक्षा अशी की, ब्रह्मी

राजाने आपल्या मुठीत रहावे. पण ब्रह्मी राजा त्यांना परधर्मी, उपरे, लुटारू असेच मानीत असे आणि कोणत्याही प्रकारचा पक्षपात न दर्शविता केलेल्या गुन्ह्याबद्दल ब्रिटिशाना तो शिक्षा देई. पुढे इ. स. १८४६ मध्ये थारावडीच्या निधनानतर त्याचा पुत्र पगानमिन सिहासनारूढ झाला. तरी ब्रिटिशाची डाळ काही केल्या शिजेना. बापाचे निःपक्षपातीपणाचेच आचरण पगानमिनाने चालविले. ब्रिटिशाना त्याने काही सवलती दिल्याच नाहीत. ब्रिटिश कप्तानानी खलाशास मारल्याबद्दल त्याना पगानमिनने शिक्षा दिली म्हणून हिदी गव्हर्नर जनरल डलहौसी यानी ब्रह्मी सरकारकडून नुकसानभरपाई मागितली! ब्रिटिश प्रजाजन म्हणजे जसे काही गुन्हे करणारे नसतातच! नुकसानभरपाईच्या पत्राचे उत्तर आले नाही म्हणून लगेच ५-४-१८५२ रोजी लढाई आरभून एक जाहीरनामा काढून पेगू प्रात ब्रिटिश सत्तेखाली असल्याचे जाहीर केले. ब्रह्मी राजावर देखील काही अटी लादल्या, असे जाहीरनाम्यातच लिहिले. प्रत्यक्ष दरबाराशी लेखी अथवा तोडी अशी कसलीही कारवाई न चालविता 'दडपश्चमे'च्या धोरणाने आपले घोडे एकसारखे पुढे दामटण्याची ब्रिटिशाची ही नित्य वृत्ति आशियात सर्वत्रच दिसते. वरील प्रकारचा जाहीरनामा म्हणजे दुसऱ्या ब्रह्मी युद्धाची अरेरच होय. दोन्ही युद्धाचा मिळून एक कोट चाळीस लक्ष पोड* खर्च मात्र हिदुस्थानच्या माथ्यावर लादण्यात आला!

ब्रह्मदेशात आराकान, तेनासरीम, मर्तबान व पेगू इतके प्रांत ब्रिटिश सत्तेखाली आले असल्याने त्याचा मिळून एक इलाखा इ. स. १८६२ मध्ये करण्यात आला व त्यावर चीफ कमिशनरची नेमणूक झाली. हेतु हा की, त्याने हळूहळू इतर प्रदेश घशाखाली घालावा. कारण ब्रिटिशानी ब्रह्मी अज्ञान राजे अधिकारारूढ असताना किवा ते पेशाच्या अडचणीत असता, त्याना कर्ज दिले असे दाखवून व्यापारासाठी सवलती, हक्क व काही मक्ते मिळवून ठेवले होते. ते निर्धोकपणे यावच्चद्रदिवाकरौ चालावेत अशी त्याची इच्छा. पण अशी उघड लुटालूट कोणता शहाणा राजा चालू देईल? पगानमिनच्या पश्चात् मिडोमिन गादीवर आला असल्याने भोळेपणाने त्याने

* *Financial Obligations Between Great Britain and India*— (Indian National Congress) p. 17

ब्रिटिशाना पुष्कळच जवळ केले. मडालेचा तह करून ब्रिटिशाचा वकील आपल्या दरबारी ठेवून घेतला व त्याच्या बऱ्याच अटी कबूल केल्या. थोडक्यात बोलावयाचे तर तो इग्रज मुत्सद्द्याच्या चागलाच आहारी गेला. पुढे इ. स. १८७८ मध्ये थीबा गादीवर आला व त्याने मात्र इग्रजी काबा नीट ओळखला. ब्रिटिशाची व थीबाची बाचाबाची सुरू झाली. थीबाने युरोपमध्ये एक शिष्टमडळ पाठवून इतर राष्ट्राशी मधाने बाधण्याचे काम सुरू केले. ब्रिटिशाचा वकील मात्र तो ब्रह्मदेशात येऊ देईना. खलित्यावर खलिते हिदुस्थान सरकारकडून रवाना होत. पण थीबाने कशालाच दाद दिली नाही. ब्रह्मदेशातील लाकूड लुटणारी एक ब्रिटिश कपनी आहे. तिच्या अधिकाऱ्यानी कलमाप्रमाणे सरकारची फी बरीच वर्षे भरली नाही म्हणून ब्रह्मी हायकोर्टाने कपनीकडून येणे राहिलेले २३ लक्ष रुपये ताबडतोब वसूल करावे, असा निकाल दिला. पण परकीयाची सपत्ति लुबाडण्यास सोकावलेले हे लाटेगगाजी त्याला कबूल होईनात. 'तुम्ही परराष्ट्राशी सबध ठेवणे हे ठीक नाही. सर्व कारवाई आमच्या मार्फतच झाली पाहिजे.' अशी धमकी हिदी सरकारने थीबास किती वेळा तरी दिली. परतु थीबाने तिकडे लक्षच दिले नाही आणि आपले स्वतत्र बाण्याचे वर्तन चालू ठेवले. शेवटी एकदा ब्रिटिशाकडून निर्वाणीचा खलिता थीबाकडे गेला आणि ता. ११ नोव्हेंबर १८८५ रोजी ब्रह्मदेशावर हल्ला झाला! कोठेही विशेष लढाई न होता किवा चकमकी न होता १५-२० दिवसातच सर्व ब्रह्मदेशावर लाल रग फासला गेल्याचे नकाशावर दिसू लागले! थीबा राजा कैदी बनला व ब्रिटिशाचा आश्रित म्हणून त्याला मोठ्या लवाजम्यानिशी रत्नागिरीस नेऊन ठेविले! इ. स. १८८६ च्या आरभापासून ब्रह्मदेश हिदुस्थानास जोडला गेला. हिदुस्थानांतील इतर राजवटीप्रमाणेच ब्रह्मी राजसत्ता लुप्त झाली आणि पारतत्र्यातील गुलामगिरी व जबरीने लादलेले दारिद्र्य त्याच्या नशिबी आले.

असा हा पूर्वीचा इतिहास आहे. ब्रह्मदेश हिदुस्थानला का जोडला किवा ह्या सर्व युद्धाचा खर्च हिदी तिजोरीवर का पडला, ह्याचें उत्तर एकच. 'हिदुस्थानच्या सरक्षणाप्रीत्यर्थ'. आजमितीस ब्रह्मदेशचे अधिपति कोणीही असोत. मागील इतिहासावरून हें स्पष्ट होते की, ब्रह्मदेशांत परकी सत्ताधीश–

परधर्मीय राजा–आला असेल तर तो ह्याच वेळी होय. हिंदुस्थानात मोगलाचे किंवा इतर यवनी राजाचे राज्य पूर्वी पुष्कळ वर्षे झाले, तशी गोष्ट ब्रह्मी प्रजेची नव्हती. त्याचे स्वराज्य निर्भेळ होते. आज त्याच्यावर परधर्मी परदेशस्थ राज्यकर्ते आले. उपऱ्या लोकांनी त्याना लुबाडण्यास सुरवात केली म्हणून ब्रह्मी प्रजा चिडली आहे. हिंदुस्थानवर राज्य करावयास लागून पन्नास वर्षे होण्याचे सुमारास हिंदुस्थानातही 'बड' माजले होते, तशापैकीच प्रकार प्रस्तुत काली ब्रह्मदेशातला असावा. त्याची भूमिका नीटपणे समजावी म्हणून हा ऐतिहासिक चित्रपट थोडक्यात काढला आहे. ब्रह्मदेशचा इतिहास स्वतंत्रपणे लिहिण्यास अधिक जागा लागेल आणि इतिहासलेखनास लागणारी पात्रता प्रस्तुत लेखकास नाही याची त्यास जाणीव आहे. ब्रह्मदेशस्थाचे गाऱ्हाणे तरी काय आहे याची कल्पना येण्यास मात्र हा त्रोटक वृत्तांत पुरेसा आहे.

अध्याय दुसरा

आर्थिक

ब्रम्हदेशातील बडाळीचे खरे कारण 'आर्थिक' आहे, राजकीय हेतु त्या बडवाल्याच्या मनात नाहीत, असे दर्शविण्याचा हिंदी पत्राचा रोख असतो. याच्या उलट, ब्रिटिश राज्य उलथन पाडण्याचे कट करणारे या बडात सामील आहेत, असे सिद्ध करण्यास लेखी पुरावा आपणाजवळ आहे, म्हणून सरकार जाहीर करते. तेव्हा यातले खरे कोणते? किंवा नुसते 'आर्थिक,' 'आर्थिक' म्हणजे तरी कसले कारण?–ह्या बाबीचा कळेल अशा रीतीने उलगडा केला पाहिजे. सध्याच्या कल्पनातीत मदीमुळे उद्भवलेला 'आर्थिक' जुलूम ब्रह्मी प्रजेलाच भोगावा लागला असे नव्हे, किंवा तेवढ्याने ह्या बडाळीस उग्र

स्वरूप प्राप्त होऊन, तो वणवा सातआठ महिने धुमसत रहावा असेही नव्हे. यावरून खरेखुरे कारण वेगळेच असले पाहिजे असे वाटते. ब्रह्मदेशातील प्रजेवर जगली पद्धतीने मोगलाई कर लादले आहेत, हे सुधारलेल्या ब्रिटिश राज्यपद्धतीचे वैशिष्ट्यच म्हटले पाहिजे! जमीनमहसूल हा तर चोहोकडेच असतो. पण ब्रह्मी प्रजेवर लादलेले तातमेडा व डोईपट्टी हे दोन कर आपणास ठाऊकही नाहीत. नाही म्हणावयास, औरगजेबाने हिंदूवर बसविलेल्या 'जिजिया' कराची आठवण डोईपट्टीने होईल, इतकेंच! तातमेडा कर वसूल करण्याच्या पद्धतीत गरीब रयतेवर किती जुल्म होत असतील ते असोत, पण तो आकारण्यातही अदाधुदीस बरीच वाट ठेवली आहे. शेतकऱ्याच्या दर झोपडीमागे सुमारे दहा रुपयेप्रमाणे तातमेडा आकारला जातो. तो का, किती व कोणी ठरवावयाचा, याला आधुनिक शास्त्रीय पद्धतीचे नियम मुळीच नाहीत. किमानपक्षी 'इतके रुपये तुमच्या खेड्यातून आले पाहिजेत' असे म्हटले की, 'तजी' (ब्रह्मदेशस्थ 'पाटील') व तमाडी (तातमेडा आकारणारे हपसर) करवसुलीची व्यवस्था करितात. गेल्या चार वर्षातले या तातमेडाचे सरासरीचे उत्पन्न ४३,७४,००० रुपये आहे. शहरगावचे लोक, सरकारी नोकर, धर्मोपदेशक, पतोजी इत्यादि पाढरपेशाकडून हा कर मुळीच वसूल केला जात नाही. त्याना माफी असते.

डोईपट्टीचा प्रकार तर और आहे. विवाहितावर पाच व विधुर किंवा अविवाहित यावर अडीच रुपये अशी दर वर्षाची साधारणपणे आकारणी पडते. ही फक्त पुरुषानाच लाग् आहे. सतरा वर्षाच्या मुलापासून तो साठी उलटेपर्यंतच्या म्हाताऱ्यास ही डोईपट्टी सारखीच जाचते. तातमेडाप्रमाणे हिची बाधाही नागरिक, सरकारी नोकर, धर्मोपदेशक व 'तात्या पतोजी' इत्यादि पाढरपेशास मात्र होत नाही. गेल्या चार वर्षाच्या सरासरीने डोईपट्टी म्हणून दरसाल सुमारे ५७ लक्ष रुपये सरकारी तिजोरीत येतात असें दिसते. याखेरीज आणखीही एक प्रकारचा नवा कर ब्रह्मी प्रजेवर लादण्यात येतो. राहण्यासाठी किंवा शेतीच्या इतर उपयोगाकरिता अडविण्यात आलेल्या जागेचें, दर चौरसफुटाला दीड पै या प्रमाणाने, भाडे आणि दर एकरी तीन रुपये याप्रमाणे मोकळ्या अथवा लागवडीच्या जमिनीचा आकार, डोईपट्टीच्या ऐवजी घेण्याचा प्रघात कित्येक ठिकाणी आहे. जेणेकरून अधिक उत्पन्न


होईल अशी आकारणी सरकारी कामकऱ्यानी करावी व रयतेला पिळून काढावे ह्याच हेतूने अशी योजना केलेली नव्हे काय? म्हणजे जमीनमहसूल, तातमेडा व डोईपट्टी (व तिचा हा सावत्र भाऊ) अशा करानीच मिळून सरासरीने ४७४ लक्ष रुपये दरवर्षी सरकारला मिळतात. शिवाय मच्छीमारीच्या धंद्यापासून मालीना सरासरीने सत्तेचाळीस ते अठ्ठेचाळीस लाखाची किफायत सरकार करते. दर जाळ्यामागे कर बसव किंवा मासे पकडण्याच्या जागेवर आकार ठरव, अथवा मच्छीमारी करण्याचे मक्ते दे—अशाच पद्धतीने हा कर घेतला जात असल्याने त्याचे उत्पन्न इतके अधिक आहे. गरीब शेतकरी व रोजमजुरी करून हातावर पोट भरणारानाच हे कर अधिक बाधणार हें उघड आहे.

एकदर ब्रह्मदेशची लोकसंख्या सुमारे एक कोट तीस लाख मानली तर निदान ९० लक्ष इसम ब्रह्मदेशीय म्हणता येतील. त्यातले सर्वच शेतावर राहतात असे नाही. पण सर्व लोकसंख्येपैकी ९० लाख जनानाच उपरिनिर्दिष्ट कर भरावे लागतात, असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. सगळ्या करांचें उत्पन्न साधारणपणे असे होतेः—

कर	लक्ष रुपये
जमीनमहसूल	३६८
तातमेडा	४४
डोईपट्टी	५७
इतर तसलेच कर	१॥
मच्छीमारीचे मक्ते	४७
	एकूण ५१७॥

नव्वद लक्ष इसमाकडून पाच कोट साडे सतरा लक्ष रुपये वसूल केले जातात म्हणजे प्रत्येकाला अदाजे पावणेसहा रुपये सक्तीने भरावे लागतात! हा सरकारच्या तिजोरीत जाणारी रक्कम झाली. प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या खिशाला खरोखरी किती चट्टा बसत असावा, हे आकड्यानी कसे सिद्ध करता येईल?

दिल्ली अथवा सिमला येथे बसून, मध्यवर्ति सरकारने लादलेले नवे कर कसे वाढले हे पाहिले, तर ब्रह्मदेशियाच्या आर्थिक हानीची कल्पना येईल.



श्वे डगॉन पॅगोडा—दुसरी बाजू.

१९१६–२१ ह्या पचवार्षिकात सरासरीने जितका कर मध्यवर्ति सरकारसाठी म्हणून ब्रह्मदेशात वसूल होत असे, (उदाहरणार्थ, आयात जकात, इन्कम-टॅक्स् वगैरे) त्यात शेकडा १२८ ची बाढ पुढील सहा वर्षांच्या सरासरीत झाली. म्हणजे पूर्वी ३३६ लक्ष वसूल होत, तेथे नतर ७६७ लक्ष होऊ लागले! लोकसख्या अर्थातच त्या मानाने वाढली असती किवा सपन्न झाली असती तर हा कराचा बोजा इतका जाचला नसता. हिदुस्थानातील इतर प्रातात असल्या कराची वाढ ह्याच काळात शेकडा ६४ या प्रमाणात झाली असता ब्रह्मदेशात मात्र ती १२८ प्रमाणे होते. ह्याचा परिणाम तेथील प्रजाजनास भोवला असलाच पाहिजे यात शका नाही. ब्रह्मदेशीय जनतेच्या पोषाखात नेहमी झक-पक दिसणारे तलम रेशमी वस्त्र असते. ते स्वस्त असे परदेशाहून येते. हिदुस्थानातील एकदर रेशमावरील आयात जकातीचा एकपचमाश एकट्या ब्रह्मदेशातील बदरात मिळाला. तेच प्रमाण काड्याच्या पेट्यावरील जकातीचे आहे. याचे कारण ब्रह्मी लोकाचे चिरूटाचे जबरे व्यसन असावे. ब्रह्मदेशाच्या वासपटीहून अधिक लोकसख्या असलेल्या हिदुस्थानात रेशीम व काड्याच्या पेट्या यावरील जकातीचा फक्त प्रत्येकी चारपचमाशच वसूल होतो व बाकीचा भाग छोट्याशा ब्रह्मदेशातून मिळतो, ही गोष्ट, येथील जनतेवर आर्थिक बोजा किती पडत असेल, हे पटण्यास पुरेशी आहे.

सरकारी कराच्या दृष्टीने पहाताना एकदम डोळ्यात भरणाऱ्या गोष्टीचा हा विचार झाला आता दुसऱ्या एका महत्त्वाच्याच–पण फक्त शेतकरी रयतेला नडणाऱ्या–अडचणीचा विचार केला पाहिजे. हिदुस्थानाप्रमाणेच ब्रह्मदेश कृषिप्रधान आहे. इतकेच काय पण ती सर्व शेती बहुधा भाताचीच असते! शेतीत रुपयापैकी तेरा आणे जमीन भातखाचरात गुतली जाते. सालीना सुमारे ७० लक्ष टन (९४,५०,००० खडी) भात ब्रह्मदेशात तयार होते. यावरून भाताच्या पिकाचा व तेथील व्यापारात, लोकाच्या राहणीत यामुळे किती दूरवर परिणाम होत असावा याचा अदाज करता येईल. परतु भाताच्या शिताभोवती भुते जमणारच. भाताचे वैपुल्य पाहून दूरवरची भुते गोळा झालीं व ब्रह्मी लोकाच्या तोडचा घास काढून घेण्यापर्यत त्याच्या बुभुक्षिततेची मजल गेली. अथवा 'हविषा कृष्णवर्त्मेव' याप्रमाणे भात खाऊन खाऊन त्याची भूक अधिकाधिकच वाढू लागली, अशातला प्रकार झालेला दिसेल.

इग्रजानी ब्रह्मदेश कसा घशात घातला, याचा इतिहास देण्याचे जरी हें स्थळ नसले, तरी एवढी गोष्ट खरी की, हिदुस्थानच्या राज्यकारभारी शकटाला ब्रह्मदेश जोडला गेल्यापासूनच ब्रह्मदेशच्या अलीकडील खऱ्या उन्नतीस (किंबहुना नागवणुकीस पाहिजे तर म्हणा) प्रारभ झाला. गोऱ्या ब्रिटिश व्यापाऱ्याच्या दृष्टीने ब्रह्मदेशची उन्नति म्हणजे तो कच्च्या मालाचे कोठार बनणे हीच होय. ब्रह्मदेशाने आपला सारा कच्चा माल पडत्या भावाने त्याच्या पदरात टाकून त्याचा महाग पक्का माल आपण मुकाटपणे घेतला म्हणजे या व्यापाऱ्याच्या दृष्टीने त्याची प्रगति सुरू झाली ! व इग्रजाच्या ताब्यात ब्रह्मदेश जाताच या अर्थाने त्याची उन्नति लवकरच सुरू झालीही !

ही उन्नति घडवून आणणाऱ्या मुख्य बाबी घडल्या त्या ह्याः भात-शेती करण्यास भरपूर मजूर व त्याना पोटापुरते अन्न देऊन गुलामाप्रमाणे राबवून घेणारे सावकार हिदुस्थानातून मद्रासेकडील विभागातून ब्रह्म-देशाकडे धावले. सुधारलेल्या व्यापारी भाषेत बोलावयाचे, तर जमिनीची उत्पादनशक्ति वाढविण्यासाठी लागणारे भाडवल व मनुष्यबल घेऊन हे मद्रासी भाडवलवाले ' ब्रह्मदेशच्याच केवळ हितासाठी ' जलयानांतून देशत्याग करून परकी ठिकाणी धावत गेले असे म्हणता येईल. एकदर विस्ताराच्या मानाने ब्रह्मदेशात लोकवस्ती कमी—म्हणजे पुष्कळच कमी आहे—ही गोष्ट खरी. हिदुस्थानात दर चौरस मैलास लोकसख्येची सरासरी २२६ पडते, तर ब्रह्मदेशात फक्त ५७ च आहे. प्रातवारीने पाहिले तर बगालचा आकडा ६०८ येतो आणि पजाबचे प्रमाण २०७ आहे. तुलनात्मक दृष्टीने ब्रह्मदेशात किती विरळ लोकसख्या आहे याची, या आकड्यावरून साधारण कल्पना येईल.

हें आकड्याचें किचकट पुराण आणखी थोडे लाबवावे लागणार, त्याला इलाज नाही. भाताच्या लागवडीखाली जमीन अधिकाधिक जाऊ लागली, तसतशी भांडवलाची गरज वाढली, आणि त्याच प्रमाणात परदेशी जाणारा तांदूळही वाढू लागला. ब्रह्मदेशातून तादुळाची निर्गत वाढली आणि भाताखाली अधिक एकर जमीन गुतू लागली ह्या गोष्टी खऱ्या आहेत; व त्याचे परिणाम पुढे काय झाले, हेच आपणांस पहावयाचे आहे. ह्यासाठी पुढील तुलनात्मक बाबीचे आकडे पहा :—

१८९६–५५	लक्ष	एकर	भात	जमीन
१९१६–१०६	,,	,,	,,	,,
१९२९–१२१	,,	,,	,,	,,

ही वाढ चटकन् डोळ्यात भरणारी आहे.

ह्यामुळे हिंदुस्थानातून आलेल्या मद्रासी सावकाराचा–ब्रह्मदेशात ते चेट्टी किंवा चेट्टियार म्हणून ओळखले जातात–प्रसार ब्रह्मी खेड्यापाड्यातून सुद्धा झाला आहे. 'सावकार' म्हटला की, तो चेट्टीच असा ब्रह्मी लोकाचा समज दृढ होण्याइतका प्रसार ह्या भाडवल पुरविणाराचा झाला! आजमितीस सुमारे साठ ते सत्तर कोटि भाडवल नुसत्या चेट्टीनी ब्रह्मदेशात गुतविले आहे, असा सरकारने नेमलेल्या बॅंकिंग इन्क्वायरी कमिटीचा साधा अदाज आहे! याखेरीज इतर दुकानदार, भाताचे गिरणीवाले किंवा अन्य प्रकारचे व्यापारी याच्या भाडवलाचा अदाज वेगळाच असणार. पण नुसत्या भातासाठी चेट्टियाराचे ६० ते ७० कोट रुपये ब्रह्मदेशात गुतले आहेत ही गोष्ट काय दर्शविते?

'शेतीसाठी भाडवल पुरविणारे सावकार' म्हणजे शेतकऱ्याच्या जमिनी आपल्या नावावर करून घेण्याचे कारखानेच होत. शेतीचा धनी असलेला शेतकरी काही निमित्ताने सावकाराकडून कर्ज घेतो, त्याबद्दल तारण म्हणून जमीन लिहून देतो आणि फेड झाली नाही म्हणजे सावकाराच्या जमिनी खडाने करावयास घेतो, आणि नतर मग नुसता मजुरी मिळविणारा नागऱ्या बनतो. हा अनुभव हिंदुस्थानातच काय, पण इतर सर्व देशातला आहे. शेतकऱ्याला कर्ज द्यावयाचे, त्याच्या जमिनी गहाण ठेवून घ्यावयाच्या व नतर कर्जफेडीसाठी जमिनीवर आपली मालकी प्रस्थापित करावयाची, हा सावकाराचा कायदेशीर शिरस्ता सर्वासच्च ठाऊक आहे. अशा प्रकारे सावकाराकडे जमिनी कशा जाऊ लागल्या, याचे गमक गहाणखताची जी झपाट्याने वाढ होत गेली तीत दिसते.

१९२० साली	४३१००	गहाणखतें	रजिष्टर	झालीं.	
१९२४ ,,	६१२००	,,	,,	,,	
१९२८ ,,	६३५००	,,	,,	,,	

गहाणखताची ही वाढ शेतकऱ्याच्या हलाखीचें व त्याच्यावर पडणाऱ्या

सावकारी आश्रयाच्या सावलीचे वाढते प्रमाण दर्शविते. गहाणखताची रक्कम पाहिली म्हणजे विशेषेकरून शेतकऱ्याची दरिद्रावस्था व असहाय्यता लक्षात येते. वरील तीन वर्षाची गहाणाची रक्कम अनुक्रमे–

४ कोट ३७ लक्ष
८ ,, ८३ ,,
९ ,, ४८ ,,
} रुपये आहे.

केवळ जमिनीची किमत वाढती असल्यानेच हे आकडे फुगले आहेत असे खास म्हणता यावयाचे नाही.

या आकड्यानी दर्शविलेल्या स्थितीस प्रत्यक्ष जाणाची पुस्ती जोडली म्हणजे ब्रह्मदेशातील लोकाची आर्थिक दृष्टीने आज कशी देना उडाली आहे, याची जाणीव होईल. खुद्द रगून शहर हे परकी वाटतच नाही. तेथे हिंदी भाषा सर्रास चालते. हिंदी व्यापाऱ्याची दुकाने, हिंदी कारखानदाराचे कारखाने, नोकरी करणाऱ्या हिंदी लोकाची तात्पुरती घरे, पैसेवाल्या हिंदी धनिकाच्या मोठमोठ्या हवेल्या व चाळी, ' रिक्षा ' (ही माणसाने ओढून न्यावयाची दुचाकी गाडी असते) ओढणारे हिंदी ' कूली ', प्रत्येक ऑफिसात चपरासी, पट्टेवाला किंवा ' दर्बान ' म्हणून राहिलेला हिंदी जवान, अशाचा मनस्वी भरणा रगूनमध्ये आहे ! पाढरपेशा ' बाबू ' लोकाचा कचेरीत प्रवेश झाला तर एक वेळ चालले असते. पण, ' कूली 'चे काम करणारे सुद्धा जर हिंदुस्थानातून ब्रह्मदेशात जाऊ लागले, तर तेथील बेकार ब्रह्मी प्रजाजनानी काय करावे ? आणि पोटाला अन्न तरी मग कोणत्या उपायानी मिळवावे ? सावकारी, शेती, दुकानदारी, नोकरी, हमाली या सर्वच पेशात हिंदी जनतेचे प्राबल्य दिसून आले, तर बिचाऱ्या ब्रह्मदेशीय बेकारानी दोष तरी कोणाला द्यावा ? अशा स्थितीत हिंदी लोकानीच आपल्या तोडचा घास काढून नेला, त्यानीच आमच्या जमिनी बळकावल्या, सर्व नोकरीच्या जागा तेच पटकावून बसले, आम्हाला व्यापारातही डोके वर काढण्यास अवसर त्यानी ठेवला नाही, अशी समजूत ब्रह्मदेशियाची झाली तर त्यात गैर काय आहे ?

हा वेळ पावेतो हिंदी सरकारकडून प्रत्यक्षपणे ब्रह्मी रयतेला जाचणाऱ्या कराची व तेथे स्थापित झालेल्या हिंदुस्थानातील नागरिकामुळे होणाऱ्या

ब्रह्मी प्रजेच्या बेसुमार कुचबणेचीच थोडक्यांत चर्चा झाली. इग्रजी व्यापाऱ्यानी ब्रह्मदेश धुवून नेण्याचा प्रयत्न आज किती तरी वर्षे चालविला आहे, त्याचा उल्लेख ह्यात केला नाही. तसेच अबकारी, जगल, कोर्ट फी वगैरे सरकारच्या शोषक खात्याचाही निर्देश टाळला आहे. तथापि ब्रह्मदेशस्थाची आर्थिक हलाखी कशी झाली आहे ह्याची अल्प तरी कल्पना येण्यास एवढें विवेचन पुरे आहे.

अध्याय तिसरा

राजकीय

'राजाच्या अपराधाविना प्रजेमध्ये अकाली मृत्यु देखील होत नाही,' अशी आपली प्राचीन आर्य लोकाची समजूत बरेच दिवसापर्यंत होती. प्रजेवर कोसळणाऱ्या अरिष्टाची, आपत्तीची व त्याबरोबरच प्रजाजनाच्या उत्कर्षाचीही जबाबदारी मुकुटभारभृतावर असते, हेच ह्या समजुतीतील मूळ तत्त्व होय. पण नोकरशाहीच्या अमदानीत तो नूर पालटला. इग्रज राज्यकर्ते आगगाड्या केल्या त्याचे श्रेय घेतात, देशात एकछत्री राज्य व सर्वत्र शातता प्रस्थापित केली, त्याचेही श्रेय 'टोपीकर' आपणाकडेच घेतात; निर्यात व्यापार वाढविला, शाळा-कॉलेजे उघडली, उद्योगधदे चालू केले इत्यादि सर्व बाबीच्या श्रेयाचा वाटाही त्याना पाहिजे असतो. मात्र, जनतेचें वाढते दारिद्र्य, बोकाळलेली बेकारी, बेसुमार बालमृत्यु, अज्ञानाचा पगडा इत्यादिकाची गोष्ट निघाली की, मग समाजातील घातुक रूढी, धार्मिक भावना वगैरेची सबब पुढे करून प्रचलित राज्यकर्ते स्वतःवरील जबाबदारी बेशरमपणे टाळून प्रजाजनावरच दोषाचे खापर फोडण्यास तयार होतात.

ही राज्यकर्त्याची भावना कशीही असो, अथवा आधुनिक कालच्या नवीन विचारसरणीप्रमाणे प्रजेच्या मनांतील राजाविषयीच्या कल्पना कशाही

बदलोत, अडाणी जनतेची पक्की समजूत अशी आहे की, राज्यकारभारातील दोषामुळेच आपणावर सर्व संकटे कोसळतात. आपणास होणाऱ्या फायद्याचे श्रेय खेडवळ कोणास देतात, ते सांगता येणे कठीण. परंतु. प्रजेचे पीडन होऊ लागले की, त्याचे सर्व खापर राजसत्तेच्या मस्तकावरच फोडावयाचे, ही त्यांची साधी, सरळ रीत असते. मग ती कदाचित् चुकीचीही असू शकेल. ब्रह्मदेशातील असंतुष्ट प्रजाजनांनी आपल्या हलाखीची जबाबदारी प्रचलित राज्यकर्त्यांवरच टाकली असून, या असंतोषातूनच सध्याच्या बंडाचा उद्भव झाला आहे असे म्हणता येते.

ब्रह्मी शेतकऱ्याची नागवणूक नोकरशाहीकरवी कशी होत असते, याचे ढोबळ दिग्दर्शन मागील लेखात केले. त्याच्या मनातून जुन्या ब्रह्मी राजघराण्याविषयीचा आदरभाव अद्याप नष्ट झाला नाही. कारण, ब्रह्मदेशीयाचा मंडाले येथे रहाणारा मूर्धाभिषिक्त राजा थीबा हा त्याच्या आठवणीत अद्याप कायमच आहे. शिवाय, थीबा म्हणजे सूर्यवंशीय भूपति, त्याची सत्ता 'साता' समुद्रापलीकडेही आहे तो जंबुद्वीपाचा देखील स्वामी आहे, तो धर्माचा आधार आहे, प्रत्यक्ष विष्णूचा तो अंश आहे, इत्यादि पौराणिक कल्पना आजमितीसही खेडवळाच्या मनात खेळत आहेत. अशा आपल्या पूज्य राजाला 'उपऱ्या' लोकांनी पकडून चोरासारखे कैदेत डांबून ठेवले, याबद्दल त्यांना साहजिकच पराकाष्ठेचे दुःख होऊन, त्याच्या भावना कायमच्या दुखविल्या गेल्या असल्यास त्यात आश्चर्य नाही.

अर्थात् आपल्या स्वातंत्र्याचे अपहारक म्हणूनच ते इंग्रज राज्यकर्त्यांस ओळखतात. थीबा राजाला पदच्युत करून त्याला कैदेत टाकण्याचा प्रसंग ब्रह्मी प्रजा कशी विसरेल? इ. स. १८८६ मध्ये ब्रिटिशांची सत्ता सर्व ब्रह्मदेशावर झाली असली, तरी १८५२ पासून हळूहळू एक एक प्रांत बळकावण्याचे इंग्रजी धोरण ब्रह्मी जनतेला कळले नव्हते असे नाही. फक्त त्यांनी आपल्या मनातील व्यक्त केलेला रोष निरुपयोगी ठरला एवढेच! मधूनमधून ही राज्यपद्धति आपणास नको, या भावनेने थारावडी व आसपासचे प्रांत यात बडेही झाली. ब्रह्मदेशात बंडाळी ही काही नवी चीज नाही. खून, लुटालूट, जाळपोळ, मारामारी, दरवडे ह्या गोष्टी तिकडील जनतेच्या आंगवळणीच पडलेल्या दिसतात! हिंदुस्थानांतील गुन्ह्यांचे प्रमाण

पाहिले, तर ते असे आढळते की, १० लक्ष लोकांपैकी दर वर्षी ६२६ जणांना कारागृहात जावे लागते. परतु ब्रह्मदेशांत तेच प्रमाण १६४० आहे; म्हणजे १० लक्ष ब्रह्मी प्रजाजनांपैकी १६४० इसम दर वर्षी कैदेत टाकले जातात. याचा अर्थ ते गुन्हे करतात हाच होतो. ब्रह्मी न्यायालयातील न्यायदानात व हिंदुस्थानातील न्यायदानांत फरक असतो, असे म्हणतां यावयाचे नाही. थारावडी जिल्ह्याची कीर्ति तर फारच मोठी आहे. तेथे दर वर्षी खून पुष्कळ होतात. तेथील शिरगणति ५ लाखांहून कमी असतांही १९२७ मध्ये त्या जिल्ह्यात ८५ खून आणि पेगू जिल्ह्यांत (लोकसंख्या ४,४६,६२८) ५४ खून झाले. तथापि यावरून त्या लोकांचे नैतिक वर्तनच सर्वस्वी दोषास्पद आहे, असा तर्क मात्र मुळीच काढता येत नाही. मनुष्य अनन्वित कृत्ये करावयाला प्रवृत्त होतो तो बहुधा परिस्थितीने त्याला भाग पाडल्यामुळेच होय. सुखासुखी अथवा गमर्ताखातर खून करणारे मनुष्यप्राणी अर्वाचीन इतिहासात तरी सापडत नाहीत. आपणास सोडून गेलेल्या राज्यलक्ष्मीला परत आणण्यासाठी जनता – मग ती कितीही अडाणी असो – प्रयत्न केल्यावाचून रहात नाही. आपले नष्ट झालेले स्वत्व किंवा स्वराज्य परत मिळविण्यासाठी धडपड करणे, हा मनुष्यस्वभावच आहे; व ब्रह्मदेशातील सध्याच्या बडाळीत हा मानवी स्वभाव प्रगट झाला आहे, असे म्हटले तर ते चूक होणार नाही.

राजकीय चळवळींत ब्रह्मी धर्मगुरूचे प्राधान्य असते, ही गोष्ट धर्म्य का अधर्म्य, हा प्रश्न तूर्त बाजूला ठेवून, तिजपासून काय काय परिणाम होतात, एवढेच पाहिले पाहिजे. सर्व ब्रह्मदेशात मिळून सुमारें ८०,००० धर्मगुरु असावेत. त्यांपैकी ६०,००० राजकीय चळवळीत उघडपणे भाग घेतात. फुंजीचें म्हणजे धर्मोपदेशकाचे समाजातील स्थान उच्चच असावयाचे. त्यांतूनही, पारमार्थिक लाभाच्या गोष्टी बोलण्याचे न सोडतां, बहुजनसमाजास सहज आकलन करिता येणाऱ्या अशा ऐहिक हिताहिताच्या बाबीचासुद्धा ते जेव्हां विचार करू लागतात, तेव्हां त्यांची लोकप्रियता अधिकच वाढते.

शिवाय पीतवस्त्र परिधान करणे–फुंजींनी पिवळेच वस्त्र वापरलें पाहिजे, असा नियम आहे – म्हणजे ऐहिक मर्त्य राजांच्या कार्यापासून अलिप्त राहण्याचा हक्क प्राप्त करून घेणेंच होय, असे धर्मभोळ्या ब्रह्मीजनांना वाटतें.

फुजीवर कसल्याही प्रकारचा आरोप येऊ शकत नाही किंवा त्याना कैदेंत डांबतां येत नाही, ही ब्रह्मी जनतेची पूर्वापर दृढ समजूत. ती फक्त इग्रजी अमलाखालीच ढासळण्याचा योग आला. पण, जेव्हा जेव्हा एखाद्या फुजीला पकडण्यात येई अथवा शिक्षा ठोठावली जाई, तेव्हा तेव्हा उडणारी खळबळ व लोकात पसरणारी प्रक्षुब्धता पाहून सरकारी अधिकाऱ्याना सुद्धा धाक वाटे! सरकार धर्मोपदेशकाना सुद्धा इतर गुन्हेगाराप्रमाणे कैदेत टाकते, ह्यामुळे अडाणी जनता जर राजकर्त्यांवर रुष्ट झाली, तर काय नवल?

सरकारविरुद्ध चळवळ करण्याचे व्यसन ब्रह्मी फुजीना अगदी अलीकडेच जडलेले दिसते. हिदुस्थानला मॉटेग्युसाहेबानी दिलेल्या सुधारणा ब्रह्मदेशाला लागू केल्या नव्हत्या. कारण, ब्रह्मदेश हा फार उशिरा ब्रिटिश अमलाखाली आलेला आणि निदान शभर वर्षे तरी उमेदवारीत काढल्याविना नवीन सुधारणा करण्यास तो प्रदेश लायक नसतो, हे राज्यकर्त्यांचे जणू व्यवहार-सूत्रच! परतु, ब्रह्मी प्रजेला अशा सापत्न भावाने—पक्तिप्रपचाने—वागविण्याचा अपमान साहजिकच दुःसह वाटला, आणि म्हणून ब्रह्मी जनतेने एकवटून जोराची चळवळ केली. याच वेळी फुजीची सेना राजकीय आखाड्यात उतरली असे म्हणतां येईल.

त्यालाही असेच एक कारण झाले. ब्रह्मदेशाला राजकीय सुधारणाचा हक्क कोणता द्यावा, याविषयी तत्कालीन ले. गव्हर्नर यानी आपल्या शिफारशी वरिष्ठ सरकारकडे पाठविल्या. मॉटेग्यु सुधारणा ब्रह्मी जनतेस पचण्यासारख्या नाहीत, असे त्याचे मत होते. इतकेच नव्हे, तर चालू असलेल्या राज्यपद्धतीच्या मानाने पिछेहाटीच्याच सूचना स्थानिक सरकारने केलेल्या पाहून ब्रह्मी जनता विशेष खवळली. वरिष्ठ सरकारने त्या सुधारणा (?) मानल्या नाहीत ही गोष्ट अलाहिदा. पण त्यामुळे जनतेचा अपमान झाला व सरकारविरुद्ध सघटित चळवळीस आरभ ह्या वेळेपासूनच झाला, असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. ब्रह्मी पुढाऱ्यानी लोकमान्याच्या 'होमरूल'ची मागणी केली व पुढे ह्या मागणीस महत्त्व येण्यासाठी महात्माजीच्या असहयोगाचा स्वीकार केला. मात्र अहिसेचे व्रत त्याना अद्याप कळलेले दिसत नाही!

ब्रह्मदेशीय इग्रज सत्ताधीशांना म. गाधींच्या असहयोगाचा तडाखा पहिल्याने भोवला तो नव्या मॉटेग्यू कायद्यान्वये होणाऱ्या मध्यवर्ति असेंब्लीच्या

निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचा. नतर रग्न युनिव्हर्सिटीच्या उद्घाटन-समारभापासून शिक्षणसस्थावर बहिष्कार घालण्यास जी सुरुवात झाली, ती १९२४ पर्यत जोरात होती. त्या मध्यतरीच्या काळात बादशहाचे बेटे (प्रिन्स ऑफ वेल्स) रग्न येथे येऊन गेले. त्याच्या स्वागतावर पडलेला कडक बहिष्कार इतका तीव्र होता की, बहिष्कारवाद्याना शासन करण्यासाठी स्थानिक सरकारला 'बर्मा अॅटी-बॉयकॉट अॅक्ट' या नावाचा एक कायदा १९२२ मध्ये पास करून घ्यावा लागला! पण ही चळवळ व्यर्थ गेली नाही. कारण, 'स्पेशल बर्मा रिफॉर्म्स कमिटी' नेमून, 'मॉडफर्ड' सुधारणा ब्रह्मदेशासही लाग् करण्यास त्याची समति मिळविण्याशिवाय दुसरे गत्यतरच सरकारला उरले नाही.

फुजीनी राजकारणात भाग घेऊन, ठिकठिकाणी गुप्त सस्था काढल्या; यग मेन्स बुद्धिस्ट असोसिएशन्स निघाल्या, 'सघ-समिती' स्थापण्यात आल्या आणि ह्या सर्व सस्थात फुजीचे प्राबल्य दिसे. फुजीनी चालविलेल्या चळवळीचे दृश्य फल १९२४ मध्ये दिसून आले. 'डोईपट्टी व घरपट्टी (तातमेडा) कर देऊ नका' म्हणूनच त्यानी उपदेश केला, व काही जिल्ह्यातील शेतकऱ्यानी त्याच्या सोयीनुसार वर्तन केले देखील! करबदीची चळवळ आपणाकडे नवी असली, तरी ब्रह्मी जनतेने त्या हत्याराचा उपयोग १९२४ साली केला होता, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

फुंजीनी करबदीची चळवळ सुरू करताच, त्याच्यावर 'राजद्रोह' व तसलेच इतर आरोप ठेवून त्याना सरकारने कारावासात टाकले. क्रिमिनल लॉ अमेडमेट अॅक्टाखाली गुप्त सस्था गैरकायदा ठरविल्या. तेव्हा फुजीना कैदेत टाकणाऱ्या सरकारचा हेतु बौद्धधर्मावर आघात करण्याचा आहे, असेच जनतेला वाटू लागले. अर्थातच ते अधिक खवळले. असतोषाचा पारा चढू लागला. राजसत्तेविरुद्ध चळवळ केल्यास 'होमरूल' मिळेल आणि मग डोईपट्टी किवा घरपट्टीसारखे घातुक कर लगेच माफ होतील अशी लोकांची समजूत झाली. ठिकठिकाणी लोकाची व सरकारी पोलिसाची झटापट होऊन मारामारीपर्यत पाळी येई. मॅजिस्ट्रेटने मिरवणुकीस बदी करावी, लोकानी फुजीच्या नेतृत्वाखाली ती मोडावी. नतर पोलिसाशी मारामारी व्हावी, हे प्रकार चालूच होते.

मडालेचा १९२४ सालचा दगा ह्या वेळच्या चळवळीत विशेष महत्त्वाचा होता. त्यांत दोन पोलिस, एक फुजी व एक मुलगा असे चवघेजण तात्काळ ठार झाले व जखमी झालेल्याची सख्या तर अधिकच होती. धर्मगुरूचे पुढारी यु उत्तम म्हणून एक फुजी होते (ते अद्यापही आहेतच). त्याना रगून येथे ऑक्टोबर १९२४ मध्ये राजद्रोही भाषणे केल्याबद्दल शिक्षा ठोठावण्यात आली. त्याच्या एका अनुयायाचीही तीच गत झाली. पण त्यामुळे लोकक्षोभ त्या वेळी किती बाढला, मॅजिस्ट्रेटचा हुकूम मोडून सभा किती भरविल्या गेल्या व युरोपियन रहिवाशाना ते दिवस किती धाकधुकीचे गेले, याची यथार्थ कल्पना रगून पोलीसच देऊ शकतील! पुढे ब्रह्मी सरकारने या सस्थामध्ये मतभेदाचे बीज पेरून, त्याची जूट युक्तीने मोडली, इत्यादि कथाभागाशी आपणास तूर्त कर्तव्य नाही राजकीय चळवळीत ब्रह्मी जनतेने भाग कसा घेतला आणि फुजींनी तिला कसले वळण लावल, हे पहाण्यापुरतेच राजकीय परिस्थितीचे धावते निरीक्षण केले आहे.

यु उत्तमाचा उल्लेख वर केलाच आहे. सरकारच्या दूर दृष्टीच्या व लाब कानाच्या चार खात्याने अशी माहिती मिळविली आहे की, हे श्री. उत्तम म्हणज फारच भयकर इसम आहेत. सरकारच्या मते त्यानी फ्रान्स देशाशी सगनमत बाधून १०,००० सैन्य व चार विमाने याचे साहाय्य मिळविले आहे. 'ते सर्व आपल्या मदतीस यावयाचे असल्याने ब्रह्मी शेतकऱ्यानी बड करावे, अत्याचार करण्यास मागेपुढे पाहू नये.' अशा आशयाची शिकवण उत्तमानी लोकात प्रसृत केली होती. आणि असतुष्ट प्रजेमध्ये अशा शिकवणीचा प्रसार जोराने झाला. डोईपट्टी, घरपट्टी (तातमेडा) याची माफी मिळावी म्हणूनच ह्या चळवळीस बहुजनसमाजाचा पाठिबा मिळाला.

कारण, हेच कर विशेषतः प्रजाजनाना जाचत. याचे प्रत्यतर ब्रह्मदेशीय कायदेकौन्सिलमध्ये, ह्या करावर झालेल्या चर्चेत आढळून येईल. तातमेडा किंवा डोईपट्टी हे कर अजिबाद रद्द करावे, म्हणून ठराब देखील कायदेकौन्सिलात आले होते. मार्च १९२५ ते सप्टेबर १९२६ पर्यतच्या कायदेकौन्सिलात आठ वेळा असल्या अन्याय्य कराविषयी चर्चा प्रत्यक्ष ठराब निघून झाली; आणि केवळ सरकारी पोळी खाणारानीच टाळी दिली म्हणून ते नामजूर झाले! सरकारपक्ष अथवा त्यांच्या कपूतील लोक तटस्थ असते, तर

हे ठराव केव्हाच मजूर झाले असते. परतु लोकमत दर्शविणारे हे सरकारी बगलबच्चे नेहमी लोकमताविरुद्ध बागतात, हा अनुभव आमच्याप्रमाणेच ब्रह्मी लोकानाही येऊन चुकला.

लोकमत नोकरशाहीविरुद्ध कसे बनत चालले होते, याचे दुसरे एक प्रत्यंतर म्हणजे सप्टेंबर १९२५ मध्ये लोकपक्षीयानी कौन्सिलात राजबद्यांच्या मुक्ततेसबधी आणलेला ठराव होय. नवीन ॲटी-बॉयकॉट कायद्यान्वयेही काही देशभक्त तुरुगात पडले होतेच. त्या सर्वाना मुक्त करावे, अशा आशयाचा ठराव चर्चेला निघाला, तेव्हा सरकारतर्फे, एकदर ३६ जणच डाबले गेले असल्याचे सांगण्यात आले. पण तेवढ्यानाही सोडण्याइतके थोर अतःकरण सरकारचे नव्हते. राजबद्याच्या मुक्ततेची मागणी ब्रह्मी लोक मधून-मधून करतातच. कारण जुन्या राजवटीत कोठल्याही मोठ्या समारंभाचे वेळी कैद्याची सुटका होत असे, हा शिरस्ता त्याना ठाऊक होता. पण, नोकरशाहीची वहिवाट अगदी वेगळी असते, हे समजण्यास त्याना बराच काळ लागला. हल्लीच्या बडात सुद्धा बडखोरानी व लोकानीही राजबद्याच्या मुक्ततेची मागणी केली आहेच प्रचलित बडाळीस राजकीय स्वरूप आहे की नाही, याचा जबाब दोन्ही प्रकारे दिला जातो. पण सरकाराविरुद्ध प्रत्येक लढ्यास, तसे म्हटले तर, राजकीय स्वरूप देता येईल. प्रचलित राजसत्तेने लादलेले जुल्मी व अन्यायी कर आम्हास जाचनात असे सागण्यासाठी व ते काढून टाका असे बजावण्याकरिता हे बड झालेले आहे, हे उघड दिसते. परतु आर्थिक बाबीतूनच त्याचा विकास पुढे राजकीय प्रश्नात झाला असून, हिंदी द्वेषाचाही वास त्याला येत आहे व त्याची कारणे वेगळी आहेत. ब्रह्मदेशविभागणीच्या बाबतीत त्याचा विचार होईल. लोकाच्या काय आकांक्षा आहेत, राजाविषयी त्याना काय वाटते आणि आजपर्यंत त्यांच्या मनात कसकशी स्थित्यतरे होत गेली याचा हा बेळपावेतो विचार झाल्यानतर पुढील लेखांत सामाजिक कारणामुळेच या असतोषाला जोर कसा आला ते पाहू.

अध्याय चवथा

सामाजिक

ब्रह्मदेश हा आमचाच आहे, अशी कित्येक हिंदी जनाची समजूत दृढ झालेली दिसते. 'ब्रह्म' हे नाव अगदी संस्कृत वाटते. जगाच्या आरंभीच नाभिकमलापासून उत्पन्न झालेल्या चतुर्मुख वेदाभ्यासजड पुराणपुरुषाचा व ब्रह्मदेशाचा निकटचा संबंध असावा, निदान ब्राह्मणांचा तरी तेथे विशेष पगडा असेल, अशा काहीशा अधुक कल्पना ब्रह्मदेशचे नाव घेताच हिंदी सुशिक्षितांच्या मनात येतात. आणि ब्रह्मदेशाविषयी एक प्रकारचा आपलेपणा वाटतो. शिवाय, रत्नागिरीत जन्मलेल्या भरतभूमीमधील अनभिषिक्त सम्राटाला काही काळ 'काळे पाणी' उपभोगण्यास ब्रह्मदेशातील पूर्वीच्या राजाच्या राजधानीस—मंडालेस—पाठविण्यात आले होते. तसेच मंडालेच्या सुवर्णमुकुटधारी थीबा राजासही त्याच राजसत्तेने अनभिषिक्त राजाच्या जन्मभूमीत—रत्नागिरीस—हवा खाण्यास कोंडून ठेवले होते. हा योगायोग निर्हेतुक असला, तरी त्यामुळे ब्रह्मी प्रदेशाविषयी आत्मीयभाव आमच्या जनतेत उत्पन्न झाला आहे.

परंतु असा बादरायण संबंध जोडला किंवा ब्रह्मी लढायाचा सर्व खर्च हिंदी कर भरणारानीच दिला असे म्हटले, तरी ब्रह्मी लोक हिंदी जनतेच्या कितपत जवळ येऊ शकतील, ही शंकाच आहे. कारण, हिंदी प्रजा बहुतेक आर्यवंशीय तर ब्रह्मी हे मंगोलियन गटापैकी आहेत. हिंदी भाषा इंडो-इराणी शाखेतल्या, तर ब्रह्मी भाषा 'तिबेटी-चिनी' संघातील. ब्रह्मी लोकांचा सर्रास बौद्धधर्म हिंदुस्थानात फक्त नावानेच ठाऊक आहे म्हटले तर वस्तुस्थितीचा विपर्यास होणार नाही. ब्रह्मी लोकांचा पोषाख, त्याची राहणी, त्याचे आचार, त्यांच्या आकांक्षा, पाहिल्या तर हिंदी प्रजाजनांत व त्याच्यात सर्वत्र 'विरोधाचेच साम्य' आढळेल. सूक्ष्मदर्शक दुर्बीण घेऊन बसणारास 'शिव शिव हरे' व 'हिप् हिप् हुरे' एक वाटतील. 'सुमार्कडेय' म्हणून

'समरकद'चे पूर्वीचे नाव तो सागेल, किंवा भगदत्ताने वसविल म्हणून 'बगदाद' अशी व्युत्पत्ति देखील देता येईल.

परंतु हे दुरान्वय खरे नव्हत. कदाहार म्हणजे आमच्या पुराणातील गाधारीचे माहेर, म्हणून 'तेथील अमीर मला करा' ही एखाद्या भाविक पण प्रगतिप्रिय पुराणिकाची आकाक्षा जितकी न्याय्य व रास्त असेल, तितक्याच योग्यतेचा सशोधकानी ब्रह्मदेशाचा व हिदुस्थानचा जोडलेला सबध होईल. कारण आजमितीस दोन्ही देश एकछत्री अमलाखाली आहेत. ते केवळ चुकीने किंवा यदृच्छेनेच म्हणा. पजाब्यात व मद्राशात वेषाचे, भाषेचे किंवा सामाजिक चालीरीतीचे कसलेही साम्य नसताना त्याना एकछत्राखाली यावे लागले याचे कारण राजकीय आहे हे सर्वाना ठाऊक आहेच. तशीच गोष्ट ब्रह्मदेशाची नाही. तो प्रथमपासून अगदी विलग राहिला असून, अलीकडेच ते ईशान्य सरहद्दीवरील राष्ट्र असल्यामुळे, हिदुस्थानच्या सुरक्षिततेसाठी व इग्लडच्या कल्याणाकरिता 'हिदी साम्राज्या'चा तो एक घटक झाला आहे. असो.

प्रचलित बडाळी ही प्रजेतील असतोषामुळे फैलावली आहे, हे उघडच दिसते. कारण, बहुतेक बडाच्या बुडाशी बडखोराचा असतोष, कोडलेल्या वाफेप्रमाणे, बाहेर पडण्याची धडपड करीत असलेला ज्ञानचक्षूना दिसतो. सामाजिक चालीरीतीमुळे ब्रह्मदेशात असतोष माजण्यासारखी परिस्थिति होती. रोगाचे निदान करिताना अमुक एका कारणाने हा रोग त्या वेळी जडला, हे प्रत्यक्ष धन्वतरीलाही सागता येणे कठीण. अनेक वेळची मिळून झालेली अनेक कारणे एकवटली की, त्याची परिस्फुटता रोग्याच्या आजारीपणाने होते, तशीच गोष्ट बडाळीचीही असते. केवळ राजकीय कारणानीच हे बड सुरू झाले किंवा नुसत्या आर्थिक अडचणीमुळेच ब्रह्मी लोक वैतागले अथवा शुद्ध हिदी द्वेषाचा समध त्याचे मानगुटीस बसला आहे, असे मुळीच म्हणतां येत नाही. अनेक बाजूनी विचार करावयाचा व ही परिस्थिति बडास अनुकूल होती की नव्हती, हे आपणच ठरवावयाचे अशी अभ्यासभूमिका आपली आहे, म्हणून ब्रह्मी समाजस्थितीत बडाळीस उत्तेजन देणाऱ्या कोणत्या बाबी असाव्या याचे सूक्ष्म निरीक्षण करावयाचे आहे.

ब्रह्मी समाजात जातिभेद नाही, वर्णभेदाचा सपर्क नाही, उच्चनीच हा भेदभाव ते मानीत नाहीत, त्यांच्यामध्ये 'साबकारी' अथवा 'सराफी' वृत्ति

मुळीच नसून, उलट सार्वजनिक कार्याकडे द्रव्य खर्च करण्याची हौस दाडगी असते. पोराबाळासाठीच सर्व इस्टेट राखून ठेवावी, ही कौटुंबिक भावना फारच थोड्याची! बहुतेक आपापली मिळकत धार्मिक अथवा इतर सार्वजनिक कार्याला देऊन टाकतात. समाजात 'बायकाचे बड' सर्वत्रच माजलेलें दिसते. किरकोळ बाजारहाट सर्व ब्रह्मी स्त्रियाच्यात हाती आहे. विकणाऱ्या व विकत घेणाऱ्या अशा दोघीही स्त्रियाच असतात. ब्रह्मी स्त्रियाना निवडणुकीचे वेळी मतदानाचा हक्क आहे. त्याची मिळकत विवाहोत्तरही वेगळी राहू शकते. कायद्याने त्या स्वतंत्र आहेत. घटस्फोटाची परवानगी देखील त्याना आहे. सर्व चळवळीत पुरुषाच्या खाद्याला खादा लावून, समान हक्काने त्याना वावरता येते. त्याची राहणी—अगदी गरिबाची देखील—आपल्याकडील मध्यमवर्गाच्या जोडीची असते ..... . अशा प्रकारची ही समाजरचना ऐकून काही कवींना तर 'भूवरी स्वर्ग अवतरला' असं वाटेल आणि अलीकडील विचाराचा वदलता ओघ पाहिला तर, ब्रह्मदेशीय समाजरचनाही बहुतेकाना आवडेल. विशेषतः स्त्रियाच्या हक्कात कायदेशीर सुधारणा व्हावी म्हणून खऱ्या कळकळीने प्रयत्न करणाऱ्यास उत्कृष्ट उदाहरण असे हे दाखविता येईल.

परतु प्रत्येक व्यवस्थेत काहीना काही तरी दोष हे असावयाचेच. ब्रह्मदेशात कसलेच समाजनिर्बंध नसल्याने त्या देशाचा फायदा झाला असेल, तद्वतच तोट्याचाही थोडासा भाग त्याच्या वाट्यास आला असलाच पाहिजे. हिंदुस्थानापासून तो प्रदेश जवळ, तेथे सुबत्ता अधिक, परकीयास विरोध करण्याची वृत्ति ब्रह्मी जनतेची नाही, उलट परधर्मीयाशी मोकळेपणाने रोटीबेटीव्यवहार करण्याचीच त्याची पद्धत, यामुळे पुष्कळच हिंदी लोक तिकडे गेले. द्रव्यार्जनासाठी प्रवाहपतित म्हणून बहुतेक ब्रह्मदेशस्थ झाले असल्याने त्याचे सर्व लक्ष हिंदुस्थानकडेच गुतून राही. 'आपली नौकरी सपली की, आपण स्वदेशी जाणार,' अशी भावना सदैव ज्याच्या मनात आहे, ते परदेशांत, धर्मशाळेत रहाणाऱ्या उपऱ्याप्रमाणे राहिले तर त्यात दोघाचाही तोटाच आहे. जितके हिंदी पुरुष साल दरसाल ब्रह्मदेशात येतात तितक्याच—किंबहुना त्याच्या निमपट स्त्रिया जरी ब्रह्मदेशात आल्या असत्या, तर ब्रह्मी लोकांचा व हिंदी जनांचा विरोध इतका वाढला नसता. ब्रह्मदेशात एकंदर

६,५३,९८० पुरुष व २,३३,०९७ स्त्रिया अशी हिंदी जनाची गणना आहे. आणि स्त्रिया बहुतेक शहरांतच रहाणाऱ्या आहेत. खुद्द रंगूनमध्ये ह्यापैकी जवळ जवळ निम्मी मंडळी राहते. रंगूनमधील हर प्रकारची दुकाने व खाद्यागारे चालविणे, हमाली, 'बाबू' काम (कारकुनी, खर्डेघाशी), वाहनाची वाहतूक इत्यादि सर्व कामे करण्यास हिंदी मनुष्यच लागतो. चपरासी अथवा भालदार हे हिंदीच असले पाहिजेत, असा नियम दिसतो! लष्कर तर बहुतेक सर्वच हिंदी ठेवले आहे. पोलिसाचे कामही हिंदी लोकाचेच. असा जिकडेतिकडे हिंदी मनुष्य चटकन् डोळ्यात भरतो. एक तर त्याचा वर्ण काळासावळा, याचा वेगळा व भाषा निराळी. ब्रह्मी जनता ही सर्वसाधारण गौरवर्णीयच म्हणता येईल, किंवा ठराविक काव्यमय भाषेतील केतकीवर्ण म्हणून जो म्हणतात तो ब्रह्मी स्त्रीपुरुषाचा आणि आम्हा हिंदी जनाचा पडला 'गोदूम' वर्ण. हे दोन्ही रंग एकमेकाच्या तुलनेत एकदम उठून दिसतात. शेतावर काम करणारे काही मजूर हिंदी व भाडवल पुरविणारे चेट्टी देखील हिंदीच. म्हणून कोठेही गेल्याबरोबर हिंदी मनुष्य दृष्टीस पडतो. आणि 'हा येथे कशाला?' अशा प्रश्न ज्याच्या तोंडचा घास निघाला किंवा ज्याची लूट बद पडण्याचा संभव, अशाच्या तोंडी नेहमी साहजिकच ऐकू येतो! विशेषतः ब्रह्मदेश म्हणजे गोऱ्यासाठी राखीव कुरण असावे असे ज्या गोऱ्या बाळाना वाटते, त्याना हिंदी लोकाची ब्रह्मदेशातील ही वाढ भयप्रद वाटली, म्हणूनच त्यानी 'हिंदी लोक ब्रह्मदेशात वाढू लागले' अशी ओरड चालविली. 'Europeans first raised the cry that the Indian is rapidly replacing the Burman' अशी कबुली खुद्द सरकारचीच आहे. युरोपियनाच्या डोळ्यात हिंदी लोकाची वाढ का सलली व त्यानीच प्रथम ही ओरड का केली, हें आता आफ्रिकेच्या उदाहरणावरून स्पष्ट असता वेगळे सागण्याची आवश्यकता उरते कोठे? यांत भर टाकली गव्हर्नरानी. रंगून युनिव्हर्सिटीतील विद्यार्थ्याना उद्देशून भाषण करण्याचे निमित्त काढून त्यानी ब्रह्मी प्रजाजनाना 'मथरेचा मत्र' दिला. "पहा हो, हिंदी व चिनी राष्ट्राचे दोन्ही बाजूनी आक्रमण होत असता ब्रह्मदेशीय संस्कृति किंवा राष्ट्रीय बाणा शुद्ध कसा राहणार अशी मला भीति वाटते." यातील अंतस्थ हेतु काय होता हे सांगावयास पाहिजे असें नाहीं.

परंतु, एकदर लोकसख्येंत हिंदी जनतेचे प्रमाण तर फारच थोडे दिसतें. शेकडा सात या प्रमाणात हिंदी जनता ब्रह्मी लोकात मिसळली आहे. म्हणजे ब्रह्मी तादळात हे खडेच समजावेत! आणि खरोखर खड्याप्रमाणेच ते तेथील लोकाना वाटतातही व त्याना उचलून टाकण्याचे प्रयत्नही चालू आहेत. पण हिंदी जनतेचा त्यात काही दोष आहे की नाही हे आपण पाहू. हिंदी जनतेत पजाबी, शीख, मलबारी, मोपले, मद्रासी, गुजराथी, भाटिये, बोहरी वगैरे अनेकप्रातीय अनेक जाती आल्या. त्यानी ब्रह्मदेशात जाऊन तेथील स्त्रियाशी लग्ने केली आणि सर्व ससार थाटून मुलेबाळे झाल्यावर भरपूर द्रव्य साचले, म्हणजे उतारवय स्वदेशी घालविण्यास ते निघून येत. मात्र हिंदी वसाहतवाले ब्रह्मी बायकोस किंवा तिच्यापासून झालेल्या अपत्यास घेऊन जात नसत. त्याना ब्रह्मदेशातच रहावे लागे. पुनर्विवाहाची सवय ब्रह्मी समाजात असली किंवा 'दासीपुत्रा'सारखा वेगळा अपमानास्पद वर्ग अशा सततीसाठी नसला, तरी एकदर समाजाला अशी मुले व अशा माता त्रासदायकच होतात. मुसलमानाच्या बाबतीत मात्र मिश्र दापत्यापासून झालेला एक वेगळाच वर्ग निर्माण केलेला दिसतो. ब्रह्मी माता व मुसलमान पिता अशा मिश्र जोडप्यापासून झालेल्या सततीस 'जेरबादी' म्हणतात आणि त्याची वस्ती देखील वेगळी मानण्याचा प्रघात आहे. खानेसुमारीच्या पत्रकात जेरबाद्याना स्वतत्र स्थान देण्यात येते. यावरून त्याची सख्या अजमावता येईल.

एवढ्यावरच ही अनर्थपरपरा थाबली नाही. हिंदी मजूर, चपरासी, पट्टेवाले किंवा असेच हलकी कामे करणारे लोक फारच कजुषीने राहत. फुटाण्याची फक्की किंवा चुरमुऱ्याची मूठ त्याच्या आहाराला पुरत असे. रहाण्यासाठीही त्याना विशेष सुखसोईची जागा लागत नसे. वस्त्राच्या बाबतींत तर त्याच्यासारखा काटकसरी म्हणजे आफ्रिकेतील वल्कलधारी झुलूच म्हटला पाहिजे. अशा अल्पसतुष्ट लोकासारखे राहता येणे ब्रह्मी प्रजेला शक्य नाही. त्याची रेशमी लुगी व इजी (ही ब्रह्मी वस्त्रे होत. लुगी कमरेस गुडाळून नेसतात व इजी अगात घालतात) ही सहसा सुटावयाची नाहीत. ब्रह्मी बनिताचे केशभूषा रचण्याचे व त्यात मोहक फुले घालून मिरविण्याचें 'व्यसन' कमी व्हावयाचे नाही, किंवा रोज शेवया खाण्याची किंवा मोटमोठे चिरूट ओढण्याची रीत बदलावयाची नाही. अशा जवळ जवळ विरोधी आवडी-

आई धरोवा आश्रमा ,, उत्तर-महाराष्ट्र

निवडीची व भिन्न राहणीची माणसे सर्कशीतील रिंगमास्तरच्या शिकवणीमुळे काही काळ एकत्र आली, तरी त्याचेमध्ये तीव्र भेद माजणार हे उघड आहे आणि तसा तो माजलाही.

अल्पसंतुष्ट स्वभावामुळे हिंदी कामगार थोड्या मजुरीवर पोट भरतात, पण तितक्या मजुरीत ब्रह्मी माणसाचा वरखर्चही निघत नाही. हिंदी मजुरास वरखर्चच नसतो असे म्हणता येईल. अशा परस्परस्पर्धेमुळे एकत्र राहणाऱ्या समाजात वैमनस्य का व कितपत माजते, हे सहज कळण्यासारखे आहे. रंगूनमधील रिक्षावाल्यांची मजुरी ही त्या विधानास पुष्टि देणारी एक गोष्ट आहे. आणि दुसरी गोष्ट म्हणजे चपराशाचे काम करणारे 'दर्वान' त्याच कचेरीतील ब्रह्मी कारकुनास व्याजाने कर्ज देतात ही होय. दर्वानाचा पगार १५–२०–२५ असाच काही तरी असावयाचा. तो पन्नास असें धरून चालले, तरी ७५–८० रुपये मिळविणारास कर्जाऊ रकमा देण्याइतकी शिल्लक दर्वानाजवळ राहते. याचा अर्थ असा होतो की, त्याच्या गरजा अगदीच थोड्या आहेत. अशा प्रकारे स्वत.च्या पोटाला चिमटा घेऊन किंवा खाण्याचे प्रमाण हलके व थोंड ठेवून हिंदी कामगारानी ब्रह्मी मजुराच्या पोटावर पाय आणिला अशी कोणाची समजूत झाली तर ती चुकीची म्हणता येईल काय? असो.

ब्रह्मी समाजात फुजींचे वजन किती असते याचा उल्लेख मागील लेखात केलाच आहे धर्मगुरूना देवभोळ्या समाजात मान मिळतो, यात आश्चर्य नाही. पण स्वर्गपाताळाच्या किंवा निर्वाणाच्या गोष्टी बोलण्याऐवजी धर्मोपदेशक प्रापंचिक व्यवहाराविषयी उपदेश करतात, तेव्हा जनतेचे नेतृत्व त्याचेकडे हक्काने येते. राजकीय चळवळीत पडणारे हे बुद्धभिक्षु पाहिले म्हणजे बदलत्या कालौघाप्रमाणे आपले कर्तव्य ओळखून समाजातील उणीव भरून काढल्याबद्दल त्याचे कौतुक करावेसे वाटते. ह्याच वेळी आपणाकडील हल्ली स्वकर्तव्यपराङ्मुखतेमुळे स्थानभ्रष्ट झालेल्या 'सर्वश्रेष्ठ' अशा एका वर्गाचे स्मरण होते. बुद्धभिक्षु अगदी नवमताचे पुरस्कर्ते असणे शक्य नाही. त्याच्यात पुराणमताचा अभिमान असणारच. पण त्यानी थोडीशी तरी सुधारणा एकदर सामाजिक, धार्मिक व राजकीय परिस्थितीशी जुळते घेण्यासाठी केली ही कमी महत्त्वाची बाब नव्हे.

बुद्धभिक्षूचा व त्याच्या गुरुप्रसादाचा पगडा ब्रह्मी जनतेवर विशेष असल्याने, मंत्रतंत्रादि सिद्धीवरही त्याचा विश्वास—दृढ विश्वास—आहे. मतरलेला ताईत दिला तर त्याला पिस्तुलाचीही गोळी लागणार नाही, असा स्वानुभवी सिद्धांत ते मानतात. असला ताईत वापरणारास बदुकीपासून मरण येऊ शकत नाही किंवा अमुक एक विशिष्ट आकृति अगर मंत्र शरीराच्या ठराविक भागावर गोदून घेतल्यासहि 'मृत्युंजय' होता येते, अशी ब्रह्मी जनतेची पक्की खात्री आहे. ताइताचे व गोदण्याचे हे वेड इतके कमालीचे पसरलेले दिसते की, त्याला धार्मिक (वेडगळ) समजुती ह्यापेक्षा दुसरे नावच देता येत नाही. पतोजींनी मारलेली छडी लागू नये, किंवा 'छमू छमू' चा उपयोग करण्याचा प्रसंगच येऊ नये, म्हणून गावठी शाळांतील विद्यार्थी देखील विवक्षित प्रकारे गोदून घेतात. रंगूनमध्ये राहणाऱ्या एका सुशिक्षिताने मला आपल्या 'मृत्युंजय' ताइताचा प्रभाव पुढे लिहिल्याप्रमाणे सांगितला, तेव्हा तर खरोखर आश्चर्यच वाटले.

काही नास्तिकाना एका साधूने ताईत दिला, आणि तो वापरला असता कोठेही गेल्यास बदुकीची गोळी लागणार नाही, अशी त्याची ख्याति सांगितली. पण त्यातील सर्वजण पडले पक्के नास्तिक! मंत्रदात्या बुवाची फजिती करण्यासाठी त्यानी त्या ताइतावर गोळी चालवून पाहिली. त्याचेजवळ पिस्तुल असे. प्रत्येकाने पाच पाच गोळ्या झाडल्या तरी एकही त्या ताइताला लागली नाही व हा चमत्कार पाहून सर्वच नास्तिक गडे, ताईत, दोरे, नवस इत्यादिकावर विश्वास ठेवू लागले म्हणे!

शहरगावच्या शिक्षितांची ही अवस्था, मग खेडवळांची गोष्ट विचारतांच कशाला? इंग्रजासारख्या बलिष्ठ शत्रूशी लढाई द्यावयाची, तेव्हा तयारीही जय्यतच पाहिजे. म्हणून बडखोरानी खरोखरच गमतीचा उपाय काढला. विशिष्ट प्रकारे गोदून घेतलेला इसम सहा महिने तरी बदुकीच्या गोळीने मरणार नाही, अशी त्याची समजूत आहे. म्हणून सरकाराविरुद्ध लढण्यासाठी जो जो जवान तयार होतो, त्याला तशा प्रकारे गोदून घ्यावे लागते. एक प्रकारचे ते संरक्षक कवचच म्हणता येईल, आणि म्हणून गोदून घेत असतानाच किती तरी लोकाना ब्रिटिश अधिकाऱ्यानी पकडून 'बडखोर' म्हणून डांबून ठेविले आहे. ज्याला आपण गुन्हे म्हणतो, ते

करण्याची प्रवृत्ति ब्रह्मी जनतेत विशेष दिसते, असे मागे आकड्यानी सिद्ध केलेंच आहे. त्याला देखील ब्रह्मी समाजरचना काही अशानी कारणीभूत असावी. आर्थिक अडचणीमुळे मनुष्याला गुन्हा करण्याची अनावर इच्छा होते, नाही असे नाही. पण गुन्हेगाराच्या धाडसाचीच तारीफ करणारे पुष्कळ लोक सापडतात. त्याच्या दुष्कृत्याकडे कोणी फारसे लक्ष देत नाही. शिवाय जबानीत असलेल्या मर्दाना कसला तरी पराक्रम गाजवावा असे वाटतेच. ब्रह्मी खेडेगावातील प्रमुख पुढ एकत्र जमतात व दरोडे घालून आपल्या योवनी धाडसाचे प्रदर्शन करण्यासाठी जवळपासच्या खेड्यातून आपणास कोणी सहकारी मिळतात की काय याची चौकशी करतात. तेव्हा सहजच शूर व साहसी युवक त्या टोळीला मिळतात व दग्याधोप्यास सुरवात होते. 'शांतिः शांतिः' म्हणून कितीही जप केला तरी मनुष्यमात्राला हाणामारी, ठोकाठोकी किवा तसल्याच गोष्टी मधून मधून पाहिजे अशा वाटतातच. ब्रह्मी प्रजेची ही उसळी, जीवितातील कटाळा घालविण्याचाच एक प्रकार असावा.

ब्रह्मदेशात राहणाराचा असा अनुभव आहे की, कोणत्याही ठिकाणापासून एका दिवसाच्या वाटेवर 'चेट्टी' असतो. चेट्टी हे पेढीवाले म्हणजे डबोले वाळगून असावयाचे. ब्रह्मी लोक हे चेट्टीच्या मानाने उधळ्या वृत्तीचे असणार. तेव्हा सर्वच गावकऱ्याचा टोळा चेट्टीने साठविलेल्या धनसचयावर असला तर नवल नाही. सर्वत्र ब्रह्मदेशात लाकडी घरे असतात, तर चेट्टी कधीही तसल्या खोपटात राहणार नाहीत. त्याना चागले मजबूत, पुर्जी सुरक्षित राखणारे विटाचे तरी घर हवे. या सर्व कारणामुळे द्रव्य लुबाडण्याचा मोह ब्रह्मी जवानाना होतो. आणि त्याचा प्रयोग चेट्टी किवा तसल्याच लोकावर व्हावयाचा.

एवच, बडाळीत चालू आहे अशा प्रकारची मारामारी किवा पराक्रमाची पराकाष्ठा ब्रह्मदेशीयाना मोजेचीच वाटते. तीत घाबरून जाण्यासारखे काही नसून, मर्दानी वाण्याचे ते एक कृत्य आहे, अशी त्याची समजूत असते. मात्र ज्याना अशा पराक्रमापासून ताप पोहोचतो किवा ज्याना त्याची झळ लागते, तेवढेच लोक, क्रौर्य, अमानुषता, रक्तपात, चोरटा हल्ला अशा शब्दानी आपला तिरस्कार व्यक्त करितात, हेही स्वाभाविकच आहे. पण हे सर्व असतोषाचे फल होय, यात तिलप्राय सदेह नाही.

आतापर्यंत बडाळीची कारणमीमांसा आर्थिक, राजकीय व सामाजिक दृष्टया कशी लावता येते ते पाहिले. यापुढे ब्रह्मदेशविभागणीच्या प्रश्नाचा ऊहापोह करावयाचा आहे. कारण हे दोन्ही विषय एकमेकात गुरफटलेलेच आहेत. यात पुष्कळच बाबींचा उल्लेख करावयाचा राहिला आहे. पण विभागणीची चर्चा होईल, तेव्हाच त्याचा निर्देश करता येईल. इकडे बडाळीस तर दिवसेदिवस रग चढत आहे, रोज बडखोराची सरशी झालेली ऐकू येते. त्या बातम्यातील मर्म कळण्यास ही चर्चा उपयोगी पडेल.

अध्याय पांचवा

युरोपियनांचें मत

ब्रह्मी बडाळीची कारणमीमासा राजकीय, सामाजिक आणि आर्थिक दृष्टीनी थोडक्यात केल्यानतर, आता ब्रह्मदेशविभागणीस एकदम हात घालण्याचे प्रयोजन असे की, हे दोन्ही प्रश्न एकमेकाशी सबद्ध आहेत. विशेषतः बडाळी माजवून ब्रह्मदेश वेगळा करून घेण्याचा घाट घालणारे धूर्त बगळे टपून बसलेले असल्यामुळे या प्रश्नाकडे अधिक बारकाईने पाहिले पाहिजे. म्हणून बडाळीच्या कारणमीमासेची फलश्रुति सागण्यापूर्वीच विभागणीने हे आख्यान सुरू केले आहे. हे सपले म्हणजे मग 'सकीर्ण समालोचन' करू.

स्वयनिर्णयाचे तत्त्व एकदा मान्य केले म्हणजे मग ब्रह्मदेशच काय, पण इतर कोणत्याही देशाने स्वातत्र्य मागण्यात गैर असे काहीच नाही. पण नुसत्या एवढ्या एकाच दृष्टीने ह्या प्रश्नाचा विचार करावयाचा नाही. ब्रह्मदेश स्वतत्र झाला किवा इग्रजाचे ताब्यात राहिला, तर त्यामुळे इतर कोणत्याही राष्ट्रावर कसले परिणाम होणार, हे पाहून त्याचे महत्त्व ठरविले पाहिजे.

ब्रह्मदेशातआज तीन पक्षाचे हितसबध गुतले आहेत. एक स्वतः ब्रह्मदेशचा. दुसरा आपल्या हिदुस्थानचा. कारण, हिदुस्थानापासून विलग होण्याची

ब्रह्मदेशाची खटपट चालू आहे–किवा ब्रह्मदेशाच्या नावाखाली 'शिकविता धनी' तसली खटपट चालवीत असेल!–तिसरा पक्ष म्हणजे आमचे साम्राज्य-सरकार–ब्रिटिश सरकार. हिंदुस्थानचा व ब्रह्मदेशचा सबध हा कसा आला, हे बहुतेकास ठाऊक आहेच. माणसाळलेल्या हत्तीने रानटी हत्तींना फुसलावून आणून 'पिहितमुख' खळ्यात पाडावे, तशापैकीच प्रकार ब्रह्मदेश 'कार्बीज' करण्यात झाला आहे. हिंदी तिजोरीतील द्रव्य खर्च झाले किवा हिंदी शिपायांचे रक्त साडले म्हणूनच ब्रह्मदेश हिंदुस्थानास जोडला गेला, असे मात्र मानण्याचे कारण नाही. राज्यकर्त्यांची त्यात सोय होती. ब्रह्मदेशासारख्या समृद्ध शेजाऱ्यावर परक्याची सत्ता असणे म्हणजे सपन्न जामदारखान्यावर चोराला नजर ठेवण्यास सवड देण्याप्रमाणेच होणार. म्हणून अज्ञान हिंदुस्थानच्या कृपाळू पालनकर्त्यांनी खबरदारी घेतली व ब्रह्मदेश परक्याच्या हाती लागू दिला नाही. याखेरीज खनिज तेल, चादी, कथील, जस्त, वुल्फ्रॅम (टंग्स्टन*), वैडूर्यमाणिकादि रत्ने, सागवानी उत्तम प्रकारचे लाकूड, रबर आणि 'रगून' तादूळ इतका कच्चा माल वैपुल्याने मिळण्याचे ठिकाण, बनिये इग्रज आपल्या हातातून जाऊ देणार नाहीत. आपल्या राज्य-शकटास रुळलेले लोक मिळावे म्हणून हिंदुस्थानातील बाबूची भरती तिकडे झाली. आणि 'बाबू पिछे कूली' देखील गेले.

ब्रह्मदेशविभागणी म्हणजे ब्रह्मी, हिंदी व ब्रिटिश प्रजाजनातील तिरंगी लढा होय, हे आता स्पष्ट कळले आहे. प्रत्येकाचे म्हणणे काय व ते समर्थनीय कसे, हे वारकाईने पाहिले म्हणजे ही चर्चा पुरी होईल. म्हणून प्रथमतः माबाप सरकारचे म्हणणे काय हे ऐकून घेतले पाहिजे. कारण अग्रपूजेचा मान त्याचाच आहे. शिवाय त्याचे धोरण फार दूरवरचे असणार व त्यात बऱ्याच लहानमोठ्या राष्ट्राचे हितसबध गुतलेले असावयाचे. म्हणून प्रथमतः ब्रिटिशाचे म्हणणे ऐकून घेऊ.

खनिज तेल, चादी, कथील, शिसे, जस्त, लोखड, वुल्फ्रॅम, लाल (रत्न), पाचू इतकी भूगर्भातील सपत्ति ब्रह्मदेशांत आहे.

ही खनिज द्रव्ये खणून परदेशी नेणाऱ्या कपन्या सर्व इग्लडमध्ये स्थापन झालेल्या असावयाच्या, किवा काही स्कॉटलडमध्ये असल्या म्हणून काय

* टंग्स्टनचा उपयोग विद्युद्दीपात होतो.

फरक होणार[1] ही लूट करण्यास खाणींचे एकदर ३८० परवाने १९२८ साली सरकारने दिले होते. खाणीतील मजुराना नऊ नऊ, दहा दहा तास काम देतात (आणि मजुरीचा मक्ता बहुतेक हिंदी जनतेला दिलेलाच आहे), किंवा त्याना पोटभर मजुरीही मिळणे कठीण होते, बायकाना खाणीत कमी मजुरीवर कामाला लावतात, इत्यादि माणुसकीच्या तक्रारी करण्याचे हे स्थळ नसून, एकदर लूट किती झाली आहे, इतकेच पहावयाचे आहे.

घासलेट, पेट्रोल व त्याचे इतर भाऊबंद मिळून ब्रह्मदेशातील खाणीतून दरसाल सुमारे पन्नवीस कोट गॅलन तेल तयार होते त्याची किमत सव्वा पाच कोटि रुपयापर्यंत जाते! चांदीची पैदाससुद्धा फार नाही! फक्त सुमारे ५७५० मण (बंगाली) इतकी म्हणजे ७५ लक्ष रुपयाची अंदाजे झाली. शिवाय एका वर्षात (१९२९–३०)

शिसे (प्रत १ ली)	७७,१४३ टन
,, (,, २ री)	६४,१२२ ,,
जस्त	६४,१२२ टन
तांबे	१०,९७८ ,,
लोखंड	७४,८१३ ,,
लाल (माणिक)–	३२,००० कॅरट
पाचूचे दगड	–४,५०० ,,

अशी एकदर खनिज संपत्ति निघाली. तिची किमत एकत्र करता येत नसली, तरी अंदाज बांधता येतो. जंगलातून लाकूडफाटा (इमारती व जळाऊ) असा दरसाल पुष्कळच निघतो त्याचे दरसाल वार्षिक उत्पन्न काही कमी नाही. १९२३-२७ सालची सरासरी पाहिली तर प्रत्येक वर्षी १ कोटि ९६ लक्ष रुपये, लाकडाचे नुसते परवाने देऊन सरकारने मिळविले असे दिसते.

ब्रह्मदेशचा भातांचा व्यापार दांडगा असल्याचे सर्वांस ठाऊक आहेच. येथून परदेशात (हिंदुस्थान वगळून) एकदर सुमारे एकवीस कोटि रुपयांचा तांदूळ एका वर्षात जातो! हा प्रत्यक्ष दिसणारा निर्गत व्यापार झाला. याखेरीज आयात व्यापार आहे तो वेगळाच. स्वदेशी व बहिष्कार असल्या शस्त्राचा आपणाकडे जितका उपयोग करतात, तितका ब्रह्मदेशात करीत

नाहीत. म्हणून परकी माल तिकडे फारच बोकाळलेला दिसतो. हा सर्व व्यापार चालविणाऱ्या मोठमोठ्या पाचसहाच पण सर्व विलायती कपन्या असून विलायती पेढ्या (बँका) व इतर मडळ्या आहेतच. त्याच्या मार्फत चाललेल्या लुटीचा अदाज एका तज्ज्ञाने असा केला आहे की, दरसाल सुमारे पधरा ते वीस कोटि रुपये वाहतुकीच्या व इतर विलायती कपन्या निव्वळ नफा म्हणून मिळवितात!

ब्रह्मी सरकारी नोकरीत युरोपियनाचीच अधिक पगारावर वर्णी लावण्याच्या नाना युक्त्या चालू आहेत. युरोपियन वसाहतीसाठी सर्व दृष्टीनी सोईस्कर असा दुसरा कोठलाच प्रदेश हिदी साम्राज्यात नाही, म्हणून अँग्लो-इडियन बगलबच्चे सारखी ओरड करीत आहेत. त्याचा हेतु काय असावा, हे न सागताच समजण्यासारखे आहे. त्याच्या व्यापाराचा व प्रपचाचा ब्रह्मदेशातील हा पसारा लक्षात घेतला, म्हणजे 'ब्रह्मदेश विभक्त करा' ह्या ओरडीच्या सुरात गोऱ्याचा गळाही का ऐकू येतो, याचे रहस्य थोडेसे ध्यानात येईल. सर्व खाणी व जगल याचा फायदा गोऱ्या व्यापाऱ्यानीच लुटावा, अशी इच्छा राज्यकर्त्याची. हिदुस्थानातले शहाणे झालेले प्रजाजन आणि तेथील लोकसभाना मिळणारे सवलतीचे हक्क, आपणास ही लुटालुट मुळीच पत्रू देणार नाहीत, ही भीति या भाडवलबाल्याना साहजिकच वाटते. आणि म्हणून 'ब्रह्मदेश वेगळा करा,' अशा ओरडीत गोऱ्या कपन्यानी व ब्रिटिश अधिकाऱ्यानीही आपला सूर मिळविला. अशा कपन्या ब्रह्मदेशातील खनिज तेल व इतर धातु वगैरे बाहेर काढीत आहेत. तेव्हा ब्रिटिश व्यापारोच सरक्षण करण्याच्या निमित्ताने ब्रिटिश सरकारला 'आपला हात जगन्नाथ' वृत्ति अनुसरण्यास पाहिजे असाच अर्थ यातून निघत नाही काय?

परतु याहीपेक्षा दूरदृष्टीचे कारण वेगळेच आहे. सिगापूर येथे नाविक केद्र केले असून, जागतिक आरमारी वर्चस्वाची चढाओढ आता हिदी महासागगतच चालणार आहे. म्हणून सिगापूरला आतरराष्ट्रीय राजकारणात विशेष वर्चस्व मिळत आहे. याचा दुसऱ्या शब्दात अर्थ असा की, भावी युद्धात सिगापूरहूनच बहुतेक आरमारी हालचाली होतील. मग आरमारासाठी नाविक ज्वलन (ॲडमिरल्टी फ्युएल) ब्रह्मदेशातून आयतेच हक्काने

व सबलतीने मिळेल. लढवय्याचा पुरवठा तेथूनच करावा लागेल. रसद तुटण्याची भीति उद्भवू देतां कामा नये. खुद्द ब्रह्मदेशात नेहमीच पुरकळ सेना जय्यत ठेवावी लागेल आणि हे सर्व साधण्यास सर्व दृष्टीनी ब्रह्मदेश कसा सोईचा आहे हे आता वेगळे सागण्यास नकोच. हिदुस्थानच्या देवडीचे रक्षण करण्याच्या मिषाने मागून गडबड करण्याऱ्या चीनला लाथेखाली तुडविता येईल, सयाममध्ये कांही हालचाल दिसली किवा फ्रेच इडो-चायनात फ्रेचानी कारस्थान रचले, जपानने उचल खाल्ली, डच लोकानी डोळे मोठे करून हिदुस्थानकडे पाहिले, अशा कोणत्याही शक्य वा अशक्य गोष्टीचा बदोबस्त करण्यासाठी ब्रह्मदेशावर अनियत्रित सत्ता असावयास पाहिजे, अशा प्रकारचीच विचारसरणी साम्राज्यवाद्यांनी लढविली आहे.

शिवाय रशियातील समाजसत्तावाद सर्वत्र जोराने फैलावत असता चीनमधून तो ब्रह्मदेशात व ब्रह्मदेशातून पुढे हिदुस्थानात आल्याविना कसा राहील? ही एक दहशत राज्यकर्त्यांच्या पोटात वागतच आहे. त्यामुळे ही लाट वाटेतच थोपवून धरण्याचा प्रयत्न करण्याकरिता, वायव्य सरहद्दीवर हिदी सरकारचा कडक बदोबस्त आहे, तसा ब्रह्मदेशातही ठेवता यावा, असे साम्राज्य-सरकारास वाटते. सयामच्या सरहद्दीवर सयामी सरकारने पुरकळच विमाने जमविली, म्हणून नेहमी सरकारी रिपोर्टात लिहिलेले असते, त्याचा बदोबस्त करता यावा म्हणून साम्राज्य-सरकारचे जे जे 'आकाशाधिपति' हिदुस्थानात येतात, ते ते सर्व ब्रह्मदेशात जाऊन सयामकडील सरहद्दीची 'पाहणी' करून येतातच. ती कारणे कोणतीही असोत. ब्रह्मदेश राजकीय प्रगतीच्या आकाक्षी 'चादोबा'च्या नादाला न लागता 'बेडगळ अज्ञाना'प्रमाणे सदैव आपल्याच पालकत्वाखाली रहावा अशी इच्छा इग्रजाची आहे हे खरे.

ब्रह्मी सरकारचे या बाबतीतले मत पाहिले, म्हणजे इग्रजाचे किती हितसबध ब्रह्मदेशात गुतले आहेत, हे सहजच कळून येईल. ब्रह्मदेश हिदुस्थानापासून वेगळा करावा, असे विधान करून त्यांनी म्हटले आहे की:—"किनाऱ्यालगतच्या वाहतुकीचे बिल तर चर्चेसाठी लोकापुढे आहेच. कल्पनाशक्तीला कितीही ताण दिला तरी त्यायोगे ब्रह्मदेशचा काडीइतकाही फायदा होईल असें वाटत नाही. उलट अशाने वाहतुकीचे दर चढतील

आणि त्यामुळे ब्रह्मी व्यापाराची कुचबणा होणार." कुचबणा कोणाची होणार आणि इतका प्रेमाचा उमाळा सरकारला का आला, हे स्पष्टच आहे. ह्या बिलाचा निर्देश सरकारने वारबार केलेला पाहून मात्र असे वाटते की, दर्यावर्दी बाहतुकीपासूनच गोऱ्या व्यापाऱ्याना ब्रह्मदेशांत बरीच किफायत असली पाहिजे. आणि ती गोष्ट खरीच आहे. इरावती फ्लोटिला कपनी इरावती नदींत एकसारख्या बोटी फिरवीत असते, ब खनिज तेलाची ने-आण करण्याचा मक्ता तिलाच आहे. तेल काढणारी एक व नेणारी दुसरी, अशा दोन्ही कपन्या सगनमत करून भयकर नफा लुटीत आहेत. तो इतिहास प्रस्तुत नाही. ब्रह्मी सरकारने आणखीही असे गृहीत धरले आहे की, "ब्रह्मदेश विभक्त झाल्यास ब्रह्मदेश जिकण्यासाठी हिदी तिजोरीतून जो खर्च झाला आहे, तो वसूल केला जाणार नाही." हिदुस्थानने इग्लडपासून वेगळें होण्याची भाषा तोडातून काढली की, ब्रिटिशाचे या बाबतीत काय उद्गार असतात, आणि त्या दृष्टीने ब्रह्मदेशच्या विभागणीविषयी त्याचे काय मत आहे, हे सूक्ष्म दृष्टीने पाहिल्यास विभागणीचे खरे मर्म उघड होईल.

आणखीही एका कोपऱ्यांतून मतलबी कावा सहजासहजी बाहेर पडतो. ब्रह्मदेशाला सोईस्कर अशी राज्यव्यवस्था कशी असावी, हे स्वानुभवाने मिळालेल्या ज्ञानावरून सर चार्लस इन्नेस व त्याचे हस्तक यानी सुचविलें आहे. त्यात मुख्य चार गोष्टीवर सरकारचे लक्ष अधिक असले पाहिजे, असे त्यानी बजाविले आहे:--

(१) ब्रह्मदेशात सर्वत्र शातता, सुरक्षितता व स्वस्थता नादण्याची व्यवस्था करणे.

(२) ब्रह्मदेशाचे ' आर्थिक स्थैर्य ' राखणे.

(३) कार्यक्षम अशा नोकरशाहीची नेमणूक करणे.

(४) औद्योगिक किवा व्यापारी क्षेत्रात धर्म, जात, कुळी याचा भेद-भाव मानला जाणार नाही अशी तरतूद करणे व तशा प्रकारचे निर्बध घालण्यास सरकारने सवड न ठेवणे.

सरकारच्या या चार कलमी बखरीत सर्व ' ब्रह्माड ' साठविले आहे असे म्हटले तरी चालेल. ब्रह्मदेश वेगळा झाल्यावर हिदी चेट्टी तेथे फार वेळ राहणार नाहीत; आणि मग त्याचे काम ' डॉसन ' बँकेला आयतेच पहावयास मिळेल.

दरसाल भातशेतीसाठी सुमारे २५ लक्ष रुपये एकटी डॉसन बँक कर्जाऊ देते. आर्थिक स्थैर्य व देशातील शातता ही परकी व्यापाऱ्याच्या लुटीस सवलत मिळावी म्हणूनच आहे, हे उघड आहे. कार्यक्षम नोकरशाही म्हणजे महागऱ्या पगारावर गोऱ्या लोकाची वर्णी, आणि शेवटचे कलम कशासाठी आहे हे स्पष्टच दिसतें. श्री. हाजी याच्या बिलाला इतका विरोध झाला, यातच त्याचे महत्त्व आहे. याच चार मुद्यावर सरकारी खलित्यात वारवार जोर पुनः पुन दिलेला आढळतो. त्यावरून ब्रिटिशाचे हितसबध त्यात किती गुतले आहेत हे कळून येईल. आणि मग ब्रिटिश अधिकारी, गोरे व्यापारी व अँग्लो-इडियन पत्रकार याना ब्रह्मदेश वेगळा का पाहिजे ते समजेल.

अध्याय सहावा

हिंदी लोकांचीं गाऱ्हाणीं

ब्रह्मदेशविभागणीस हिंदी जनतेचा विरोध आहे. हिंदुस्थानापासून ब्रह्मदेश विलग होऊं नये, असे हिंदी लोकाना वाटते. पण हे हिंदी लोक म्हणजे कोणाचे प्रतिनिधी किंवा अखिल राष्ट्राचे मत तेच त्याचे मत कशावरून? हे प्रश्न उपस्थित केल्यावर हिंदी 'लोकमत' काय किमतीचे आहे ते कळतें. वास्तविक ब्रह्मदेशात जाऊन व्यापारधदा करणागसच हिंदुस्थानाशी ब्रह्मदेश सदैव जोडलेला असावा, असे वाटते. ब्रह्मदेशात ज्याचे भाडवल गुतले आहे किंवा तेथील उदीम व्यवहारावरच ज्याचे पोट अवलबून आहे अशाची इच्छा ब्रह्मदेश हिंदुस्थानापासून वेगळा फुटून निघू नये अशीच असणार. कारण एकदा तो देश 'स्वतत्र' झाला म्हणजे तेथील हिंदी व्यापाऱ्यांस काय काय हालअपेष्टा सोसाव्या लागतात याची कल्पना प्रत्यक्ष अनुभवाने बऱ्याच जणाना लगेच येते. आफ्रिका, कानडा व अगदी जवळचा व ताजा मेसापोटेमिया येथील अनुभव कटु असल्याने ब्रह्मदेशाने हिंदुस्थानशींच

निगडित रहावे असा त्याचा आग्रह आहे. अर्थात् जोपर्यंत विचारास पटणारे एखादे कारण हिंदी जनता पुढे करीत नाही, तोपर्यंत अशा विरोधास साम्राज्यवादाचाच वास मागीत राहील. इंग्लंडला हिंदुस्थान हातचे जावें असे वाटत नाही याचे जे कारण तेच ब्रह्मदेशविभागणीच्या बाबतींत हिंदी व्यापारी पुढे करू लागले तर त्याना 'साम्राज्य नसलेले साम्राज्यवादी' म्हणावे लागेल. पण ह्या प्रश्नाकडे पाहण्याची एवढी एकच दृष्टि नाही. ज्या कारणानी ब्रह्मदेशविभागणीस विरोध करता येतो ती वेगळी आहेत व त्याचा अगदी शेवटी विचार करू. प्रथमतः हिंदी व्यापाऱ्याचे म्हणणे काय ते पाहू.

'आम्ही आलो नसतो तर ब्रह्मदेश अरण्यमयच राहिला असता. भाताची लागवड इतकी मुळीच झाली नसती. व्यापाराला व शेतीला भाडवल देखील मिळाले नसते. इतकी मजुरी किंवा मेहनत करणारी माणसे ब्रह्मदेशात नाहीतच मुळी.' अशा प्रकारची प्रौढीची भाषा हिंदी व्यापारी नेहमी बोलतात. त्यात तथ्यही आहे आणि सत्यापलापही पण आहे. 'हिंदी भाडवालवाले शेट्टी व राबणारे तैलगणी मजूर ब्रह्मदेशात आले नसते तर ब्रह्मदेशचा व्यापार आजमितीस इतका वाढला नसता,' असे सर्टिफिकेट वेगवेगळाल्या गव्हर्नराकडून त्याना मिळालेले असले तरी एकमेकाना दिवे ओवाळण्यापेक्षा त्याला अधिक महत्त्व नाही. 'कारण हिंदी व्यापारी ब्रह्मदेशात (किंवा इंग्रज व्यापारी हिंदुस्थानात) गेले ते केवळ परोपकारार्थच,' असे म्हणण्याइतका निलाजरेपणा कोणी करणार नाही. उलट ते केवळ स्वार्थासाठीच गेले ही गोष्ट खरी असली तरी शिष्टाचारानुरूप तिला गोडस स्वरूप देण्यात येते. आधुनिक पिढीत विचारोंध इतका स्पष्ट व 'नग्न' होत चालला आहे की, 'जन्मदात्यानीही आपणावर कसलाच उपकार केला नाही,' असे म्हणण्यापर्यंत त्याची मजल जाते! तेव्हा असल्या काळात उपकार, निःस्वार्थबुद्धि, ब्रह्मी लोकाचे हित, वगैरे गोड शब्दावर विश्वास ठेवणार कोण? इंग्रजाच्या बाबतीत आपण जे दोष काढीत आहोत, तेच ब्रह्मदेशच्या बाबतीत आपले व्यापारी व चेट्टी करीत आहेत. क्रिया एकच असता ती करणारे लोक वेगळे असले म्हणून तिचा दोष कमी कसा होईल? ब्रह्मदेशात आपणास पुष्कळ मजुरी मिळेल म्हणुन मजूर तिकडे धावले आणि आपल्या जवळच्या खेळत्या भाडवलास

तिकडे व्याज बरे येईल म्हणून चेट्टी पळत सुटले, ही गोष्ट काही खोटी नाही. मग आज आम्ही इतके भाडवल–सुमारे ७५ कोटि रुपये–तुमचेकडे गुतविले आहे ते परत द्या, असे म्हणणे वेडेपणाचे आहे. अगोदर त्याच्या दसपट नव्हे, शतपट रक्कम व्याजाचे रूपाने ब्रह्मी प्रजेला पिळून नेत आहां ती परत द्या, असे उलट ब्रह्मी प्रजेने म्हटले तर कसे होईल? आजपर्यंत गुतविलेल्या रकमेची किती पट मद्रास इलाख्यात परत नेली आहे? ते द्रव्य कोठून आले? इत्यादि प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्याचे कारण असें की, त्याच मुद्द्यावर पुढेमागे आपणास ब्रिटिश राज्यकर्त्यांशी भाडावयाचे आहे. शिवाय हे भाडवल जे ब्रह्मदेशात 'पेरले' ते ब्रह्मी लोकाच्या समतीने की काय, हा तर मुख्यच प्रश्न निघेल! अस्तु.

हिदी प्रजेचे दुसरे म्हणणे असे की 'आम्ही ब्रह्मदेश जिकला.' ह्यात तर मुळीच तथ्य नाही. ब्रह्मी युद्धासाठी पैसा व मनुष्यबळ हिदुस्थानने पुरविले असले तरी ते वेगळ्या परिस्थितीत व वेगळ्या कारणामुळे. हिदुस्थानला त्या वेळी सरकारच्या विरुद्ध जाता येणे शक्य नव्हते, आताही शक्य नाहीं. पण अशा जबरदस्तीच्या वागणुकीत सद्गुण आढळल्याबद्दल शाबासकी कसली द्यावयाची? आणि खरे बोलावयाचे तर विनाकारण एका स्वतंत्र राष्ट्राचे सौभाग्य हिरावून घेण्यात सहकार्य केल्याबद्दल हिदुस्थान आतरराष्ट्रीय स्वातत्र्य-न्याय-मदिरात दोषीच ठरेल. चोरीचा गुन्हा प्रत्यक्ष न करता त्यास मदत केली, एवढ्याचसाठी जर चोराच्या साथीदारास शिक्षा मिळते, तर राष्ट्राच्या बाबतीतही तोच न्याय का लाग् नसावा? आम्हा हिंदी जनतेच्या हातून अज्ञानामुळे व अविचारीपणामुळे काय काय घोर अपराध घडले आहेत ते, व आपणाकडे परकी कोणत्या दृष्टीने पहातात तेही, आमच्या ध्यानात यावे म्हणून थोडी अतर्मुख दृष्टि करून पाहिले पाहिजे. हिदी आपले बाधव म्हणून त्यानी केलेले सर्वच समर्थनीय ठरविले पाहिजे, अशी 'सिव्हिल-सर्व्हंटी' वृत्ति सध्या नको आहे. म्हणून अत्यत स्पष्टपणे व निर्भीडपणे आपल्या हिदी बांधवाच्या हातून घडलेल्या कृत्यांची छाननी केली आहे. ती किंचित् कटु वाटल्यास त्याबद्दल दोष कृष्णकृत्याचा आहे. ती उघडी करणाराचा किवा त्याचा अर्थ स्पष्टपणे मांडणाराचा नाही. हिदी बाधवाविषयी सहानुभूति नाहीं असा त्याचा अर्थ करू नये.

' ब्रह्मदेश वेगळा झाल्यावर तुमचा व्यापार बुडेल ' ही भीति अनाठायीच आहे. ब्रह्मदेशात पैदा होणारी सर्व चादी आणि सगळे खनिज तेल एकटा हिदुस्थान घेत आहे. लाकूड, तादूळ ह्या मालाविषयी तर बोलावयासच नको. साधारणपणे दर वर्षी ५० कोटि रुपयाचा माल ब्रह्मदेशातून हिदुस्थानात येतो. ' ब्रह्मदेशच्या वीसपट लोकवस्तीचे हे बडे गिऱ्हाईक ब्रह्मी मालाला आयते मिळत असता, ब्रह्मदेश वेगळा करून ते घालविण्याचा मूर्खपणा करू नका, ' असा उपदेश काही हिदी व्यापारी करतात. पण त्यातही पुनः त्याच्या ' स्व 'ला धक्का लागतो, ह्या भीतीचीच छटा प्रामुख्याने दिसते. कारण असे की, हिदुस्थानात जो ब्रह्मी माल खपतो, तो केवळ ' आपल्याच राज्यातल्या ' ब्रह्मी लोकानी केला, म्हणून नव्हे. तर हिदी प्रजेला त्याची गरज आहे, अन्यत्र तो स्वस्त मिळत नाही म्हणूनच हिदुस्थानी प्रजा ब्रह्मदेशातील माल खरेदी करते. ब्रह्मदेशाचे बाबतीतही असेच आहे. ह्या मालास असलेले दुसरे गिऱ्हाईक सोडून देशप्रेमाखातरच हिदुस्थानला ब्रह्मी व्यापारी माल विकीत आहेत असे मुळीच नव्हे. हा व्यापारी सौदा आहे. तो दोघानाही पटल्यावर मालाची खरेदीविक्री होतेच. व्यापारात तरी कोणी कोणावर उपकार करीत नाही. तेव्हा ' ब्रह्मदेशचा व्यापार बुडेल ' किवा ' हिदुस्थानातील माल ब्रह्मदेशास यापुढे मिळणार नाही ' अशा समजुती शुद्ध वेडगळ होत. सूर्यावर रुसण्यापैकीच तो एक प्रकार मानला जाईल. एक मात्र शक्यता सभवते खरी. ब्रह्मदेशातून येणाऱ्या मालावर, हिदी सरकार, ब्रह्मदेश वेगळा झाल्यावर, जकात बसवू शकेल किवा निर्यातीवरही निर्बंध लादले जातील. परतु हाही प्रश्न परस्पराच्या सोईचा आहे कारण दरसाल सुमारे १५।१६ कोटीचा माल हिदुस्थानातून ब्रह्मदेशी जातोच. तेव्हा एकमेकाला जसे सोईचे दिसेल तशा आयातनिर्यातीवर जकाती बसविल्या जातील. त्याची मोठीशी अडचण नाही. तीच बाब मजुराची, शिकलेल्या बाबूची किवा चेट्टीची आहे. त्याना पाहिजे असल्यास हिदुस्थानापासून वेगळा झालेल्या ब्रह्मदेशात रहावे. वेगळे हक्क, महागरा पगार किवा इतर सवलती किवा भाडवल सुरक्षित ठेवण्याचे आश्वासन स्वतत्र हिदुस्थानचे बाबतीत गोरे व्यापारी व सोकावलेले सिव्हिल सर्व्हट्स् मागतात तसे त्यानी मागण्याचे कारणच उरत नाही.

हिंदी जनतेची ही विचारसरणी सर्वस्वी चुकीची अशी आहे. कारण इंग्रज हिंदुस्थानविषयी ज्या आकांक्षा बाळगून आहेत, त्याच आमचे व्यापारी व इतर ब्रह्मदेशस्थ लोक ब्रह्मदेशाविषयी बाळगतात. दोघांचीही एकच चूक आणि ती म्हणजे 'आम्ही ब्रह्मदेशच्या (हिंदुस्थानच्या) हितार्थ पुष्कळ राबलो' या शब्दाचा प्रयोग होय. अगदी स्वतःच्या फायद्यासाठी देशत्याग करून हे दोन्ही समाज त्या त्या देशात आले असता 'केवळ जगाच्या कल्याणा' आपण देह कष्टवीत आहोत ही त्यांची समजूत झालेली दिसते. कदाचित् हे जाणूनबुजून पाघरलेले वेडही असावे. पण ह्या बाबतीत हिंदी राष्ट्रीय सभेने दर्शविलेली अनास्था अगदी अक्षम्य आहे. राष्ट्रीय सभा म्हणजे राष्ट्रातील सर्व महत्त्वाच्या बाबतीत लक्ष घालणारी एकच एक अशी राजकीय संस्था असता, आजपर्यंत तिने ब्रह्मदेशाकडे ढुंकूनही पाहिले नाही! महात्मा गांधी एकदा तिकडे गेले होते. पण थैल्या गोळा करणें किंवा अनंत्याचारी अहिंसेचा व चरख्याचा उपदेश करणें यापलीकडे त्यांचे राजकारण जाऊच शकले नाही. हिंदी लोकांनी तिकडे काय केले किंवा त्यांचे ब्रह्मी जनतेशी सबंध समाधानकारक आहेत किंवा नाहीत इत्यादि आवश्यक गोष्टीकडे लक्ष देण्यास काँग्रेसला फुरसत नव्हती. परंतु यांच्यापेक्षा अधिक खेदाची गोष्ट म्हणजे हिंदी राष्ट्रीय सभेत ब्रह्मदेशचे प्रतिनिधी भरपूर आहेत अशी प्रतारणा आजपर्यंत चालू दिली, ही होय! कराचीचीच गोष्ट पहा तेथे ब्रह्मदेशचे म्हणून सुमारे ११७ प्रतिनिधी आले होते, असे अधिकृत पत्रकात नमूद आहे. पैकी फार फार तर वरचे फक्त १७ इसम—किंबहुना शेवटचे सातच—ब्रह्मदेशातील असतील. बाकीचे शंभराहून अधिक प्रतिनिधी इतर प्रांतातलेच होते. ज्यांना इतर कोणत्याही प्रांतातून निवडून जाता आले नाही त्यांनी ब्रह्मदेशाला 'दत्तक देश' मानून त्याचे प्रतिनिधी म्हणून उघड्या बैठकीत किंवा विषयनियामक मंडळीत खुशाल उजळ माथ्याने फिरावे ही लबाडी सत्याचे प्रयोग करीत असणाराचे पुढे चालत आली! ब्रह्मदेशचे खरे प्रतिनिधी तेथे न आल्याने त्या प्रांताच्या हिताहिताची चर्चाच होऊ शकली नाही. आणि म्हणून आज एकदम अशा थराला गोष्टी आल्या असताही काँग्रेस त्या बाबतीत काही धोरण ठरवीत नाही, किंवा काँग्रेसला ठरविता येत नाही. काँग्रेसची चूक केवढीही असो,

ती घडली खरी व तिचे घोर परिणाम आज सर्वांस भोगावे लागत आहेत. हिंदी लोकांनी ब्रह्मदेशात बेसुमार गर्दी केली व तत्रस्थांच्या तोंडचा घास काढून घेण्याचा प्रयत्न कळत न कळत त्यांचे हातून झाला, या अक्षम्य वर्तनाचे प्रायश्चित्त भोगलेच पाहिजे. ब्रह्मी लोकात प्रसृत असलेल्या बुद्ध-धर्माची शिकवण 'अक्रोधेन जयेत् क्रोधम्' अशी असली तरी पोटाची आग इतकी तीव्र आहे की, सर्व धर्म बाजूला राहून त्यांना वांटत येणाऱ्यावर हल्ला करावासा वाटतो आणि असा हल्ला झाला म्हणजे हिंदी जनतेला वैषम्य वाटते. 'ब्रह्मदेशात परकी प्रजा म्हणजे हिंदी, चिनी व युरोपियन अशी असता फक्त हिंदी लोकांवरलांच विद्वेष इतक्या तीव्रतेने का करता?' असा प्रश्न काही हिंदी पुढारी ब्रह्मी प्रजाजनांना टाकतात. परंतु चिनी प्रजाजनांची संख्या थोडी आहे आणि त्यांच्या चालीरीति, रीतीरिवाज व धार्मिक समजुतीत ब्रह्मी जनांशी बरेच साम्य आहे. म्हणून चिनी लोकांचा इतका द्वेष झालेला दिसत नाही. युरोपियन हे बोलूनचालून सत्ताधारी. त्यांचा कितीही तिरस्कार वाटला तरी केवळ दंडधारी म्हणून गरजवताप्रमाणे त्यांच्या पुढे डोके हे लवविलच पाहिजे. हिंदी मात्र गचाळ खरे. त्यांना त्यांच्या घरी देखील मान नाही. जेथे तेथे साहेबांच्या मागे जाऊन यांनी स्वतंत्र राष्ट्राचे सौभाग्य हिरावून घेण्यास मदत तेवढी केली आहे! अशामुळे हिंदी द्वेष वाढतो आणि ब्रह्मी लोकांवरल गैरसमज पसरतो. पण ब्रह्मी जनांचा यात काय दोष?

हिंदी प्रजाजनांना ब्रह्मदेशाने वेगळे होऊ नये असे वाटते ते केवळ स्वार्थामुळेच. ब्रह्मदेशाशी व्यापारसंबंध असलेल्यांचेच मत या बाबतीत ग्राह्य ठरणार हे उघड आहे. पण केवळ स्वतःच्या हितासाठी दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राच्या स्वयंनिर्णयावर गदा आणण्याचे काम हिंदुस्थाना-सारख्या परतंत्र देशाला तर मुळीच करता यावयाचे नाही. कारण त्यायोगे खुद्द हिंदुस्थानच आपला स्वयंनिर्णयावरील हक्क सोडून देण्यास तयार आहे, असा तर्क निघेल. तेव्हा हिंदी जनांच्या स्वार्थी विचारसरणीत पुष्कळ महत्त्वाचे दोष असल्यामुळे ती त्याज्य ठरते. आता पुढे स्वतः ब्रह्मदेशस्थांचे या बाबतीतले विचार पाहू.


अध्याय सातवा

ब्रह्मी जनतेचें म्हणणें

इग्रजी व्यापाऱ्यांना ब्रह्मदेश स्वतत्र करण्याचा कळवळा का आहे, हें आता वाचकास समजलेच असेल. हिदी लोकाचा हितसबध ब्रह्मदेशविभागणीत कितपत आहे आणि त्यातही आखूड दृष्टीचीच विचारसरणी कशी आहे, हे आपण पाहिले. आता खुद्द ब्रह्मी प्रजाजनाचेच या बाबतीत काय म्हणणे आहे ते विचारात घेणे जरूर आहे. कारण आजकालचे दिवस स्वयनिर्णयाचे असून त्याच तत्त्वावर आपण स्वातत्र्यासाठी लढत आहोत. तेव्हा तो हक्क ब्रह्मी प्रजेस दिलाच पाहिजे.

ब्रह्मदेशातील बहुतेक पुढारी विभागणीस अनुकूल आहेत असे म्हणण्यात अतिशयोक्ति नाही. त्यातील काही लोक विभागणीस प्रतिकूल आहेत, असे आपण ऐकतो खरें, पण ते सुद्धा, 'सध्या ब्रह्मदेश हिदुस्थानाशी फटकून राहिला तर त्याची राजकीय प्रगति होणार नाही, म्हणूनच तूर्त विभागणी नको' असे म्हणतात दोन्हीहो पक्ष विभागणीवादीच आहेत. एकाला ब्रह्मदेश ताबडतोब अलग व्हावयास हवा, तर दुसऱ्याची धूर्त दृष्टि 'विभागणी आजच नको' असे म्हणत आहे. त्याची कारणे अनेक आहेत. विभागणीवादी उघड उघड सबाल असा टाकतात की, 'हिदुस्थानच्या हाताला हात लावून काळ कठण्यात ब्रह्मदेशचा काय फायदा आहे?' या प्रश्नाला समाधानकारक उत्तर देता येत नाही. पण काही तरी जबाब देण्याचा प्रयत्न केल्यास हिदी व्यापाऱ्याच्या तोडून खालीलप्रमाणे ठराविक साच्याची उत्तरें ऐकू येतील.

'ब्रह्मदेशचे सरक्षण करण्याची जबाबदारी ब्रह्मी लोकाना अद्याप घेता येत नाही. हिदी सैन्याची त्याना नेहमीच जरूरी असणार. ते वेगळे झाल्यावर त्याचा व्यापार अगदीच बुडेल. त्याचा तादूळ आम्ही मुळीच घेणार नाही. किवा त्याना लागणाऱ्या वस्तु देखील देणार नाही.' वगैरे वगैरे.



श्वे डेगोन पॅगोडा—सुवर्णमय कळस.

ह्या घमेडीचा पोकळपणा स्पष्ट करून सांगण्याची आवश्यकता नाही. इंग्रजाना 'हिंदुस्थान सोडून जा' म्हणून म्हटले किंवा 'हिंदुस्थानला स्वतंत्र करा' म्हणून म्हटले म्हणजे त्याचेही अशाच प्रकारचे उद्गार असतात ना? त्याना आपण जी किंमत देऊ तीच ब्रह्मदेशातील हिंदी जनाच्या वरील आशयाच्या तक्रारीस दिली पाहिजे, हे उघड आहे.

परंतु ब्रह्मी पुढारी काही काही मुद्दे माडतात ते महत्त्वाचे असून ते खोडून काढणे सोपें नाही. उदाहरणार्थ, आपण एक गोष्ट घेऊ. आज ब्रह्मदेशातून दरसाल अदाजे साडेआठ कोटि रुपये मध्यवर्ति सरकारला कर म्हणून दिले जातात. इन्कमटॅक्स (उत्पन्नावरील कर), आयात जकात, मिठावरील कर वगैरे मध्यवर्ती सरकारच्याच मालकीचे असून प्रातिक सरकार फक्त हे कर गोळा करण्याचे काम करते. तरी असे मिळविलेले हे आठ साडेआठ कोटि रुपये पर्यायाने प्रजेच्याच खिशातून गेले आहेत आणि हिंदुस्थानच्या मानाने ब्रह्मदेशाची प्रजा पुष्कळच कमी आहे. आकड्याचे प्रमाण घेऊन ही विषमता अधिक स्पष्टपणे माडता येते. हिंदुस्थानची लोकसख्या ब्रह्मदेशाच्या एकोणीस पट असून मध्यवर्ती सरकारला मिळणाऱ्या एकदर करापैकी सुमारे २१ पै (पावणेदोन आणे) ब्रह्मदेशातील लोक देतात. लोकसख्येच्या मानाने ब्रह्मदेशचा हिस्सा फार फार तर १०$\frac{१}{४}$ (दहा पूर्णांक एक चतुर्थांश) पै असावयास पाहिजे होता. तेव्हा हे साडेआठ कोटि रुपये ब्रह्मी प्रजा हिंदी सरकारला देते, त्यापैकी सुमारे निम्मे म्हणजे सव्वाचार कोटि रुपये विनाकारण दिल्यासारखे होत नाहीत काय? कारण ब्रह्मदेशने कराचा बोजा इतर हिंदुस्थानचे मानाने अधिक का सोसावा? आणि हे सर्व रुपये ब्रह्मदेशाच्या हिताखातर खर्च होत नसून हिंदी सरकारचा महागरा दिवाळखोरी खर्च भरून काढण्याकडेच त्याचा विनियोग होतो. करांचा बोजा अधिक सोसूनही विशेष फायदा होत नसेल तर मग ब्रह्मदेश वेगळा करून कराचे ओझे कमी का करू नये? असा प्रश्न ब्रह्मी पुढारी—विभागणीपक्षाचे—टाकतात.

ह्या प्रश्नाला समाधानकारक उत्तर नाही खरे. कारण अधिक कर दिल्याबद्दल योग्य मोबदला मिळत नाही, याबद्दल वाद असणेच शक्य नाही. आणखीही दुसरा एक प्रश्न विभागणीवाले उपस्थित करतात तो असा—हिंदी लेजिस्लेटिव्ह असेंब्लीत ब्रह्मदेशचे फक्त पाचच सभासद असतात. एकदर १४३

सभासदामध्ये पाच हे प्रमाण, ब्रह्मदेशच्या उत्पन्नाचे मानाने अगदीच थोडें आहे. पाचापैकी एक सरकारने नेमलेला, एक गोऱ्या व्यापाऱ्याचा प्रतिनिधि, असे दोन वजा करता 'खरेखुरे निवडलेले' असे तीनच प्रतिनिधी ब्रह्मदेशच्या वाटणीस येतात. त्याना दर वर्षी रगून ते दिल्ली-सिमला येथील यात्रा करण्याचा त्रास किती होत असेल हा प्रश्न बाजूला ठेवला तरी लेजिस्लेटिव्ह असेब्लीतील बहुतेक (ब्रह्मी दृष्टीने) निरर्थक अशा विषयावर चालणाऱ्या चर्चेस हजर राहून मत द्यावे लागते. कित्येक कायदे तर ब्रह्मी जनतेस लागू करण्याचा प्रसग येण्याचा सभव नसताही केवळ हिदुस्थानबरोबर गाठ पडली म्हणूनच तसले 'अजागळ' कायदे ब्रह्मी सरकारच्या कायद्याच्या ढिगात पडतात. शारदा कायदाच पहा ना? तो ब्रह्मदेशात उपयोगात आणण्याचा प्रसग कधी यावयाचा नाही, अशी समाजस्थिति तेथे आहे. परतु हिदुस्थानशीं 'लग्न' लावल्यामुळे ब्रह्मी सरकारासही तो मान्य म्हणून दप्तरी दाखल करणे भाग पडले. तसेच वायव्य सरहद्दीवर एवढा मोठा खर्च दरसाल होतो आणि असेब्लीत त्याविषयी कडाक्याचा वादही माजतो. पण ब्रह्मदेशचा व त्या सरहद्दीचा सबध येतो तरी कसा? म्हणून हिदुस्थानशीं निगडित राहून मिळणार काय? असा सवाल विभागणीवाले टाकतात.

राष्ट्रीय सभेत ब्रह्मदेशचा समावेश असला तरी तेथे कसा गोधळ चालत असतो हे मागे एकदा दर्शविलेच आहे राष्ट्रीय सभेतच जर ब्रह्मी हिताहिताची चर्चा नीटपणे होत नाही, तर सरकारच्या लेजिस्लेटिव्ह असेब्लीत तरी ती कशी व्हावी? असेब्लीच्या दिवाणखान्यात साधारणपणे जितके ब्रह्मी सभासद उपस्थित असतात, त्याच प्रमाणांत जर कॉग्रेसच्या मडपात ब्रह्मी प्रतिनिधीची गर्दी झाली असती तर कदाचित् ब्रह्मी प्रश्नास पुष्कळच चालना मिळाली असती. पण ते तसे होत नाही म्हणून तर ही ओरड!

ह्या दोन मुख्य प्रश्नांखेरीज इतरही पुष्कळ अशा बाबी आहेतच. त्यांचीं उत्तरे नीट देतां येत नसली तरी विभागणीचे भूत बेगळ्याच पण अत्यत महत्त्वाच्या कारणासाठी परतविले पाहिजे. तीं कारणे सागण्यापूर्वी ब्रह्मदेशातील विभागणीवाल्या पक्षातील वेगवेगळ्या पुढाऱ्याचे म्हणणें ऐकन घेतलें पाहिजे. तूर्त विभागणी नको म्हणणारा जो पक्ष आहे

त्यात यू मॉंग मॉग जी, थारावाडी यू पे, यू सित् ल्हॅंग, व यू क्रॉ म्यिन्, बॅरिस्टर, एम. एल. ए., हे चार प्रमुख नागरिक आणि पुष्कळसे 'फुजी' सामील आहेत. यू मॉग मॉग जी म्हणजे कराचीस गेलेल्या ब्रह्मी मडळाचे पुढारी. त्यानी तर हिदी फेडरेशनमध्ये ब्रह्मदेशचा समावेश का व्हावयास पाहिजे आणि ब्रह्मदेश वेगळा केल्याने तोटे काय होतील, हें जाहीर करण्यासाठी एक खास पत्रकच तयार केले आहे. फेडरल स्ट्रक्चर कमिटीवर ब्रह्मी पुढारी कोणी ना कोणी तरी असावे, अशी त्याची आग्रहाची मागणी आहे. बाकीच्यानी विभागणीस विरोध केला तो अशासाठी की, आज विभागणीनतर ब्रह्मदेशाला कोणती राजपद्धति मिळणार, याचा निश्चित निर्णय विलायतकर 'फिरगी' अजून काही देत नाही. दोनचार तारा करून विचारले, तरी मॅक्डोनल्डकडून जबाब येत नाही. तेव्हा हिदुस्थानची 'गट्टी' फू केली म्हणजे हिदुस्थानला मिळणारे स्वराज्यही ब्रह्मदेशास मिळावयाचे नाही. हिदुस्थानच्या हातास हात लावल्याने जर राजकीय हक्क आपणास मिळतात तर विनाकारण विलग होण्याची भाषा आताच बोला कशाला? असा त्याचा धूर्त विचार आहे. मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणाचे वेळी ब्रह्मदेश वगळला होता, तशी अवस्था पुनः भोगण्याचा प्रसग येऊ नये म्हणून हिदुस्थानच्या मागणीच्या सुरातच आपला सूर मिळविणे ब्रह्मी प्रजेच्या हिताचे आहे, असे या विभागणी-विरोधकाना वाटते व त्यात बरेच तथ्यही आहे. म्हणूनच ते विभागणीपक्षाला नावे ठेवतात. ब्रह्मदेशाला राज्यपद्धति कोणत्या पद्धतीची मिळणार हे समाधानकारक रीत्या अधिकारी वाणीने आश्वासन मिळाले व त्याप्रमाणे आचरण घडले म्हणजे ह्या पक्षाची विभागणीस हरकत नाही.

आता विभागणीवाला पक्ष घेऊ. त्यात यू बा पे, यू मॉग जी, एम. ए., बॅरिस्टर, मॉग द्वे ही मडळी प्रमुख आहेत. यू बा पे हे ब्रह्मी प्रातिनिधि म्हणून मडलाकार मेजाभोवती बसण्यास लडनला गेले होते, हें सर्वांस ठाऊक आहेच. त्यांचे व त्याच्या अनुयायाचे म्हणणें असे की, ब्रह्मदेश हिदुस्थानपासून फुटून निघाल्याने त्याचे कोणतेंही नुकसान होणार नाही, तर उलट फायदाच होईल. म्हणून कसलाही वाद न करता तत्काळ हिदुस्थानचा सबध तोडून टाकावा. M 1670

हिंदी जनतेच्या आक्रमणशील वृत्तीने ते घाबरले असावेत किंवा ब्रह्मी स्वातंत्र्यापिपासेने ते तृषाक्रांत झालेले असतील, इंग्रजी व्यापाऱ्यांचा विभक्तीकरणातला कावा न समजल्यामुळेही विभागणी लवकर करा असा त्याचा आग्रह असेल, कोणतेही कारण असो, आज ते अत्यंत उतावळे झाले आहेत, हें मात्र खरे. हिंदुस्थानच्या मागे लागल्याने आपणास अधिक हक्क मिळतील किंवा आपण वेगळे झाल्याबरोबर आपला व्यापार बसेल, यावर त्याचा मुळीच विश्वास नाही. इंग्रजी अधिकाऱ्याना ब्रह्मी प्रजाजनाचे म्हणणे मान्य करावयास लावण्याची ताकद आपल्या अंगी आहे आणि तशी चळवळ आपणास चालविता येईल, इतका दृढ आत्मविश्वास त्याना वाटतोच वाटतो. हिंदुस्थानापासून ब्रह्मदेशाला काहीच मिळवावयाचे नाही ही त्याची पक्की खात्री आहे. म्हणून ते 'विभागणी लवकर करा' असा मंत्र जपत बसले आहेत. त्याची पत्रे ह्याच मुद्यावर एकसारखा भर देत असतात.

फेडरेशनबद्दल त्याना विशेष आदर वाटत नाही, इतकेच काय पण मॉंग मॉंग जी किंवा थारावडी यू पे अशासारख्याना फेडरल स्ट्रक्चर कमिटीवर जावयास मिळावे म्हणूनच हिंदी फेडरेशनमध्ये ब्रह्मदेशचा समावेश व्हावा असे त्याचे मत आहे, असा आरोप ब्रह्मदेश तूर्त हिंदुस्थानपासून अलग करू नये असे म्हणणाराबर करण्यासही विभागणीवाले कमी करीत नाहीत. 'विभागणीस आमचा विरोध आहे.' असे एकमुखाने सरकारास कळविण्यासाठी जी एक प्रचंड सभा रंगून येथे भरली होती तीत हजर असलेले ब्रह्मी नागरिक व फुजी पाहून मात्र हा आरोप पक्षभेदाच्या व पैशाच्या दूषित दृष्टीने पाहिल्यामुळे केला आहे असे वाटते. दोन अडीच हजारावर प्रजाजन त्या सभेस हजर राहिले व ठिकठिकाणच्या नागरिकानी एकत्रित जमून ऐकमत्याने ठराव पास केले. त्यातील मुख्य असा होता:—

"ब्रह्मदेशाला संपूर्ण स्वायत्तता मिळाल्याविना हिंदुस्थानापासून तो वेगळा करू नये."

हा ठराव मंजूर करण्यात ब्रह्मी जनतेने—अर्थातच विभागणीविरुद्ध पक्षाने—ब्रिटिशाचे कारस्थानी डावपेच ओळखले, हे तर सिद्ध होतेच, पण शिवाय आपले सत्त्व कायम राखण्यासाठी घेतलेली खबरदारीही दृष्टोत्पत्तीस पडते. ब्रह्मदेशाला स्वायत्तता पाहिजे ही बाब विभागणीवाले व विरोधी अशा दोन्ही

पक्षांसही मान्य आहे यांत शकाच नाही. परतु एकाला वाटते की, आपण नुसती मागणी करण्याची खोटी की, स्वराज्य आपल्या हातात येऊन पडलेच असे समजा. इग्रज अधिकारी स्वराज्याचे दान देण्यासाठी आतूर होऊन बसले आहेत. परतु विभागणीविरुद्ध जो पक्ष आहे तो मात्र पक्का व्यवहारी दिसतो. ब्रिटिशाचे हातून स्वराज्य कधी सुटावयाचे नाही, एवढेच नव्हे, पण एकट्या ब्रह्मदेशाच्या ओरडीस इग्लड केव्हाच भीक घालणार नाही, हे त्याना कळून चुकले आहे. तेव्हा हिदुस्थानच्या स्वराज्य-मागणीच्या सुरात आपला सूर मिसळला तर बरेच काम होईल. हिदुस्थानच्या विस्ताराचा व स्वराज्याच्या लायकीचा फायदा ब्रह्मदेशाला मिळण्यासारखा आहे, तर तो का सोडावा? असा सरळ पण शहाणपणाचा मार्ग त्यांचा आहे. त्यापैकी एकमेकानी परस्पराना दोष ठेवावे यात नवल नाही, परंतु दोन्हीपैकी अधिक व्यवहार्य कोण आहे हे वाचकानीच ठरवावे.

विभागणीविरोधियाची सभा रगूनमध्ये भरली म्हणून बर म्हटलेच. तति दुसराही एक महत्त्वाचा ठराव मजूर झाला. त्यामुळे मडलाकार परिषदेस गेलेल्या ब्रह्मी प्रातिनिधीचे खरे स्वरूप प्रकट झाले. ठरावात म्हटलें आहे की—

" गेल्या मडलाकार परिषदेस गेलेले ब्रह्मी प्रतिनिधी हे खरं लोकनियुक्त नव्हत, ते लोकपक्षीयाच्या इच्छेविरुद्ध मतप्रदर्शन करीत असल्याने परिषदेच्या पुढील अधिवेशनप्रसगी खऱ्या लोकपक्षीय प्रतिनिधीची निवडणूक व्हावी, असे या सभेचे मत आहे. "

मडलाकार परिषदेस यू बा पे हे गृहस्थ गेले होते व त्याचेबरोबरच ब्रह्मदेशचे गव्हर्नर सर चार्लस इन्नेस हेही होते, हे लक्षात घेतले म्हणजे ' जी हुजूर ' करणारेच तेथे ब्रह्मदेशचे प्रतिनिधी निवडले असले पाहिजेत, हें उघड होते. यू बा पे हे ब्रह्मदेशचे एक प्रतिष्ठित ब्रह्मी प्रातिनिधि म्हणून गेले होते आणि 'त्याचे मत तेच सर्व ब्रह्मदेशचे' असें सागण्यात आले. हें सर्व ब्रह्मदेशातील बहुजन समाजाच्या मताविरुद्ध असल्याने आता त्यानी त्यास विरोध केला आहे.

ब्रह्मदेशियात अशी हीं मुख्य दोन प्रकारची मते आहेत. त्याचे या महत्त्वाच्या बाबीवर एकमत झाले असते तर असा गोधळ उडाला नसता.

परतु एके सरकार पक्ष व दुसरा लोकपक्ष अशा दोन विरोधी पक्षीयांच्या भिन्न मतात बहुजनसमाजाचे म्हणणे सरकार ऐकते की नाही हे पहावयाचे आहे. कारण सरकारच्या हातात वर्तमानपत्रे व बातम्या पाठविणाऱ्या सस्था असल्याने विनाकारण सत्यापलाप करून आपली बाजू कमताकत असली तरी जगी गाजावाजा करून तीच मोठी, असे भासविण्याचा प्रयत्न सरकारचा चालू आहे. लोकपक्षीयानी सघटित होऊन सरकारी प्रयत्नास प्रत्युत्तर देण्याची खटपट आरभिली आहे, पण तिला यश येण्यास अवधि लागेल.

ही प्रमुख कारणे झाली. पण आणखीही काही कारणासाठी ब्रह्मदेश वेगळा व्हावा अशी ब्रह्मी प्रजेची इच्छा आहे. 'ब्रह्मदेशात खरे ब्रह्मी रक्त असें फारच क्वचित् आढळते,' ही तक्रार कित्येक परपराभिमानी करतात. तीत भावनेचाच अश अधिक असला तरी त्याच्या म्हणण्यात तथ्य बरेच आहे. शुद्ध ब्रह्मी रक्ताचा प्रजानन सापडणे मुष्कील का झाले असावें, हे सामाजिक चर्चेत दर्शविले आहेच, आणि बहुजनसमाज अशिक्षित असल्याने त्यास हे कारण लवकर पटते. ब्रह्मी प्रजेच्या रक्तात भेसळ करणारावर द्वेषाची नजर पडते ती अशा विचारानीच! आधुनिक विचारसरणीच्या मडळीस 'शुद्ध' रक्ताचे महत्त्व मुळीच वाटत नसले तरी अद्यापिही इग्लड-अमेरिकेतही 'शुद्ध' रक्ताचा जाज्वल्य अभिमान बाळगणारे घरदाज असतात, ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे ब्रह्मी अशिक्षित समाजात शुद्ध रक्ताची वाण तत्काळ का पटली असावी, हे समजेल. प्रजेवरील आर्थिक बधने ढिली करण्याची आशा हिदुस्थानपासून ब्रह्मदेश वेगळा झाल्याने वाढणार हे तर उघडच आहे. तातमेडा किवा डोईपट्टी यासारखे अन्याय्य कर तर कमी करूच, परतु हिदी मध्यवर्ति सरकारला मेस्टन करारान्वये द्यावी लागणारी रक्कम व त्याचे बसूल करावे लागणारे कर आपणास वाचविता येतील आणि ते वाचले नाहीत तरी त्याचा विनियोग ब्रह्मी प्रजेच्याच प्रत्यक्ष फायद्यासाठी करता येईल, ही त्याची अपेक्षा आहे. सर्वात महत्त्वाचे मनोराज्य म्हणजे हेच की, स्वतत्र ब्रह्मदेशात हिदी माणसाचे प्राबल्य हल्ली आहे तितके रहाणार नाही व म्हणून ब्रह्मी प्रजेस गाजणारे पुष्कळ लोक निघून जातील. अर्थात् यात तथ्य कितपत आहे, हा प्रश्न अगदीच निराळा. पण अशा भावी सुखाच्या कल्पनाचित्रानी प्रत्येक पक्षाचा आपापल्या बाजूस तेथील लोकमत बळविण्याचा

प्रयत्न चाललेला असतो. त्यात खरे म्हणणे कोणाचे व ते तसे का हे पाहण्यापूर्वी विभागणीवाल्याचे खरेखुरे अत.करण जाणण्यासाठी काही महत्त्वाच्या मुलाखतींचा साराश अभ्यासिला पाहिजे.

अध्याय आठवा

मुलाखती

'ब्रह्मदेश तत्काळ स्वतत्र झाला पाहिजे, असे माझे ठाम मत आहे. त्यापासून ब्रह्मदेशचा काडीइतकाही तोटा होणार नाही.' असे रगूनमधील 'ट्रुथ' (सत्य) नामक दैनिकाचे सपादक ठासून म्हणाले.

पहिल्या प्रथम अभिवादन होताच मी रगूनमध्ये कशासाठी आलो, हे त्यानी ताडले व लगेच आपले उपरिनिर्दिष्ट ठाम मत ठोकून दिले. त्याचे वजन दाडगे आहे. नुसते दैनिक चालवून ते स्वस्थ नाहीत, तर साप्ताहिकही त्याचे हातीं आहे. गेल्या वेळी लेजिस्लेटिव्ह असेब्लीचे सभासदही ते होते. त्यांचे नाव मॉग द्वे असे असून विभागणीपक्षातील एक पुढारी म्हणून मी त्यांस भेटावयास गेलो. त्यांनी आपले स्पष्ट मत प्रकट करताच 'कशाकरिता' हा सीधा प्रश्न मी त्याना केला. 'आम्हाला स्वातत्र्य हवे.' 'स्वयनिर्णय नको का?' 'विनाकारण हिदुस्थानात समाविष्ट होऊन काय फायदा?' वगैरे ठराविक साच्यातील प्रश्नच त्यानी माझ्या प्रश्नाला उत्तर म्हणून उलट विचारले. तेव्हा थोडेसे वेड घेऊन पेडगावला जाणे भागच पडले. 'ब्रह्मदेशचा व्यापार बुडेल.' असे मी म्हणताच सपादक महोदय म्हणाले, 'मला नाही तसे वाटत. का म्हणून आमचा व्यापार बुडावा? आम्ही वेगळे झालो, म्हणजे आमचा माल हिदुस्थान घेणार नाही, असें कसे होईल?'

सपादकाना मध्येच सपादकीय काम पहावे लागे. तारा येत तिकडे लक्ष तर दिले पाहिजेच, तेव्हा विनाकारण साधे प्रश्न विचारून त्याचा अमोलिक

वेळ घेणे इष्ट नाही हे लक्षात घेऊन त्याना एवढेच विचारले की, 'पुढे स्वतत्र झाल्यावर ब्रह्मदेशची राज्यपद्धति कसल्या प्रकारची राहील ते आपण मला कृपा करून सागाल काय?' –' ते अद्याप ठरले नाही. बहुजनसमाज ठरवील त्याप्रमाणेच आम्ही वागू!'


प्र.–पण असे कसे म्हणता? ब्रह्मदेश स्वतत्र व्हावा असे ठरविणारांनी स्वतत्रतेची रूपरेषा तर ठरविलेली असेल ना? –' नाही. ते अद्याप काहीच ठरले नाही. आयत्या वेळी बहुमताने मान्य होईल तीच राज्यव्यवस्था आम्ही स्वीकारू.'

प्र.–मला आपले बोलणे मुळीच पटत नाही. स्पष्ट बोलतो याबद्दल क्षमा करा. आपण पाहिजे तर असे म्हणा की, ठरलेल्या राज्यघटनेची परिस्फुटता आता करता येत नाही. परतु तिचा विचार केला नाही हे मला खरेच वाटत नाही. एक तर आपण मला चकवू पहात आहा किवा आत्मवचना करून घेत आहा. खरे काय आहे ते तर सागाल? आपल्या गौप्याचा स्फोट होईल, अशी का आपणास भीति वाटते? –' छे, तसे काही नाही. खरोखरच बहुजनसमाजाने मान्य केलेली व्यवस्थाच आम्ही स्वीकारू. तिजबद्दल आज विचार करण्याचे कारणच नाही.'

प्र.–हे पहा, आपण हिदुस्थानापासून वेगळे होणार म्हणता आणि कोणती राज्यपद्धति आपणास पाहिजे याचा विचार अजिबातच केला नाही असे सागता, हे खरे वाटेल कसे? ज्याला वेगळे व्हावेसे वाटते तो वेगळे होण्याची इच्छा प्रकट करण्यापूर्वी, नतर कसे रहावयाचे याचा विचारच करीत नाही, असा आपल्या म्हणण्याचा आशय दिसतो. आपणास वसाहतीचें स्वराज्य हवे, निर्भेळ स्वातत्र्य पाहिजे, का आणखी कसले राज्य पाहिजे आहे, स्पष्ट तर करा! –' कानडाप्रमाणे वसाहतीचे स्वराज्य आम्हांला पाहिजे.'

प्र.–म्हणजे हिदी व्यापाऱ्याना आपण ताबडतोब हाकून देणार म्हणावयाचे? –' ते कसे? हिदी व्यापारी ब्रह्मदेशात राहिले म्हणून काय बिघडलें?'

प्र.–कानडांत हिदी लोकाविरुद्ध तर केवढी मोहिम चालू आहे. त्याना तेथे स्थाईक होण्यास किती अडचण पडते, त्याच्यावर बिचित्र निर्बंध कसे आहेत, इत्यादि प्रकार आपण जाणतच आहा. तसेच आपण ब्रह्मदेश स्वतत्र झाल्यावर करणार ना?–' नाही, नाही, पण तुम्ही हिदी लोकांची



"ब्रह्मदेश विलग करूं नका" म्हणणाऱ्यांची सभा

तरफदारी करण्यासाठीच मुद्दाम आलेले दिसतां. आमच्या मनांत हिंदी व्यापाऱ्यांचा द्वेष मुळीच नाही. आमच्यावर हा वृथारोप का करतां?'

प्र.—हें पहा, उगाच गैरसमज करून घेऊ नका. माझी येथील कोणत्याही हिंदी व्यापाऱ्याची ओळख नाही किंवा मला कोणी वकीलपत्रही दिलेले नाही. मी हे प्रश्न शुद्ध अभ्यासू दृष्टीनेच विचारीत आहें. हिंदी व्यापाऱ्यांविरुद्ध ब्रह्मी प्रजा चिडलेली आहे, असे वर्तमानपत्रातून दिसतें, म्हणून मी हे प्रश्न विचारले. आता सागा पाहू, आपल्या स्वतंत्र ब्रह्मदेशांत हिंदी नागरिकांचा दर्जा कसा राहील?—'का बरे, सध्या आहे तसाच तो कायम राहील. त्यांत फरक करण्याचे कारणच नाही.'

प्र.—असे काय बोलता? ब्रह्मदेश वेगळा झाल्यानंतर ब्रह्मी प्रजाजनांचीच नेमणूक सर्वत्र होईल ना? 'ब्रह्मी लोकांसाठी ब्रह्मदेश' हे तत्त्व तुम्ही पाळाल ना? मग आज येथे असलेल्या हिंदी जनतेचा दर्जा कायम कसा राहील?' यावर पुन्हा मूळपदावर येऊन संपादक महाशय म्हणाले, 'मी सांगितले ना की सर्व 'मेजॉरिटी' ठरवील त्याप्रमाणेच होईल म्हणून!'

प्र.—बरे तर, विभागणीला बहुजनसमाज अनुकूल आहे का?—'हो नसायला काय झाले? शेकडा ९०-९५ जणांना ब्रह्मदेश स्वतंत्र पाहिजे आहे.'

प्र.—होय ना? मग गावठी खेडवळांना ब्रह्मदेश स्वतंत्र झाल्यावर काय काय मिळेल हे आपण समजावून सांगितले असेलच. आपल्या पक्षाचा एखादा तरी जाहीरनामा निघाला असावा. त्यांत आपण जनतेला कसलीं कसलीं अभिवचने दिलीं आहेत?—'अभिवचने दिली नाहीत. पण त्यांना ब्रह्मदेश वेगळा व्हावा, असे वाटते खरे. आपणांला काय काय मिळावयास पाहिजे हे मग 'मेजॉरिटी' (बहुमत) ठरवील.'

संपादकांच्या 'बहुमताचा' हा अतिरेक पाहून खरोखरच संताप आला. तेव्हा थोडेंसें डिवचण्याकरितां मीं पुनः त्यांना जरा वेगळ्या आवाजांत म्हटलें, 'आपण तर एका मोठ्या दैनिकाचे संपादक म्हणविता; लोकमत तयार करण्याची जबाबदारी आपणांवर संपादकीय खुर्चीबरोबरच चालत आलेली आणि आपण तर पुनः पुनः 'मेजॉरिटी' 'मेजॉरिटी'चा जप करतां; हें कोडें मला तर उलगडतच नाही! वास्तविक लोक हे आपले अनुयायी; कोणत्या मार्गाने त्यांनी जावें हें आपणच त्यांना दाखवावयाचें,

तें सोडून उलट अनुयायाच्या मागे मागे जाणारे हे पुढारी मात्र मी आजच प्रथम पाहत आहें. कदाचित् आपले वर्तमानपत्र फार विख्यात नसेल. पण जेवढे आपले क्षेत्र असेल तेवढ्यात तरी आपले एक निश्चित मत ठरलें असलेच पाहिजे. आपण ते लपवून ठेवण्याचा प्रयत्न का करीत आहां, हे मात्र मला समजत नाही.'

हे बोलणे सपादकांना तिखट लागलेले दिसले. त्यानी कामाची सबब काढली आणि 'आमच्या पक्षाचे अध्वर्यु' म्हणून एका ब्रह्मी बॅरिस्टराचें नाव त्यानी सुचविले. त्याना भेटल्यास 'आमच्या भावी अपेक्षा काय आहेत त्या कळतील,' असेही ते म्हणाले. औपचारिक रीत्या नमस्कार झाले, अमूल्य वेळ घेतल्याबद्दल क्षमा करा म्हटले, आणि हसत हसतच आम्ही 'विभक्त' झालो.

दुसरी मुलाखत यू बा पे याची घेतली. ब्रह्मदेशचे प्रतिनिधि म्हणून हे गोलमेज परिषदेस लडनला गेलेले. त्याच्या हातात रगूनमधील चारपाच प्रमुख दैनिके व साप्ताहिके आहेत. कौतुकाने त्याना 'ब्रह्मी लॉर्ड नॉर्थक्लिफ' असेही म्हणतात. त्यानीही 'कानडाचे वसाहती स्वराज्य' आम्हांला पाहिजे, असे सागितले. त्यानी हिदी लोकाशी आमचा वैरभाव नाही, हेही कबूल केले. त्याना आम्ही ब्रह्मदेशातून हाकून देणार नाही म्हणून म्हटले. पण ह्या सर्वांचा मेळ मात्र कसा बसणार हे त्यांनी सागितले नाही. म्हणून त्याना वेगळाच प्रश्न मी विचारिला:—'ब्रिटिश सरकारकडून तुम्हाला पाहिजे तेच स्वराज्य मिळेल अशी खात्री आहे काय? आणि मिळाले नाही तर काय कराल?' असा दुहेरी प्रश्न टाकताच यू बा पे म्हणाले, 'हे पहा, आमचेकडे गाधीचा चरखा नाही आणि अहिसा नाही. ब्रह्मी लोक कसे आहेत, हे प्रस्तुतच्या बडावरून कळले असेलच. ब्रह्मी प्रजेच्या मागण्या जोपर्यत स्वीकारल्या जात नाहीत, तोपर्यत हे असेच चालू राहील.'

प्र.—या बडाच्या बुडाशी राजकीय आकाक्षा आहेत असे म्हणतां तर! बरे मग, परवा जी 'ब्रह्मदेश वेगळा करू नका' असे म्हणणाऱ्याची सभा झाली तिचे कसे काय? त्याना बहुजनसमाजाचा पाठिबा नाही की काय?

—'अलबत्! शेकडा ९९ लोक आमच्या पक्षाचे असून फक्त शेकडा एक त्यांच्या बाजूस आहेत. त्या सभेला फार फार तर ५०० लोक जमले

असतील!' [मी प्रत्यक्ष त्या सभेस हजर होतो आणि लोकसमुदाय अडीच हजारावर खात्रीने होता हे मी मोजले होते—पण!]

प्र.—असे काय! त्याच्या मताचा गाजावाजाच फार होतो म्हणावयाचा. फुंजी त्यात सामील का होतात किंवा थारावडी यू पू किंवा मॉग मॉंग जी-सारखे पुढारी त्या पक्षास का मिळाले ते सांगाल काय? —'हो हो, अहो त्याना विलायतेला जावयास मिळाले नाही, म्हणून त्याची ही खटपट आहे! राज्यघटना-कमिटीत आपलें नाव असावे असे त्याना वाटते. ते तरी विभागणीस अनुकूल नाहीत असें नाही. त्याचा व आमचा मतभेद फक्त अवधि किती लागावा यात आहे. त्यांच्या बोलण्याकडे विशेष लक्ष देण्याचे कारण नाही. फुजी याच्या मागे लागतात याचे कारण ते अडाणी आहेत व श्री. उत्तम काँग्रेसला (कराचीस) गेले होते, म्हणून उत्तमाचेच म्हणणे ऐकावे असे त्यांना वाटते. बाकी त्याना विशेष असा मान कोठेच नाही.'

यू बा पेचा आशय कळला. त्याचा सर्व रोखही लक्षात आला. आपल्या उच्चासनाची त्याना वरचेवर जाणीव झालेली दिसे आणि मधून मधून सर चार्लस इन्नेस यांच्या मर्जीतले आपण आहोत, म्हणून त्यांना अभिमानाचे वारेही लागल्यासारखे दिसे. पण खऱ्या परीक्षकाला त्यातील मर्म कळण्यासारखे होते.

विभागणीला विरोध करणाऱ्यापैकी मॉग मॉग जीच प्रमुख. त्याना भेटल्यावर 'माझे म्हणणे मी एका पत्रकात स्पष्ट करून सागितले आहे,' असाच त्यानी हवाला दिला! पत्रकात मात्र फेडरेशनचा अर्थ काय, ते तत्त्व किती चागले आहे, त्यामुळे फायदे किती होतील वगैरे साधार दर्शविले आहे. परंतु त्याचा मुख्य मुद्दा असा की, ब्रह्मदेशाला स्वायत्तता अल्पायासे मिळावी म्हणून सध्या हिदुस्थानपासून विभक्त होण्याची गडबड करण्यांत अर्थ नाही. हिदुस्थानच्या सुरातच आपला सूर आपण मिळवावा.

श्री. उत्तम हे तर सध्या ब्रह्मदेशातून हद्दपार झाल्यासारखेच आहेत. त्यांना मधुमेहाचा तीव्र विकार असून तूर्त ते कलकत्त्यास औषधोपचारासाठी इस्पितळांत आहेत. तरीही त्यानी माझ्याशी सुमारे अर्धा तास चर्चा केली, व ब्रह्मी प्रजेचे गाऱ्हाणे थोडक्यात पण मुद्देसूद रीत्या माडले. 'डोईपट्टी उठविल्याविना ब्रह्मी प्रजा सतुष्ट होणार नाही. हा अमानुष कर इग्रज लोक

वसूल करीत आहेत, म्हणून नेहमी नेहमी ब्रह्मदेशात बडे होतात. त्यांची खरी कारणे लक्षात न घेतां सरकार आपली दडपशाही चालू करते. आज ब्रह्मदेश वेगळा झाला तर साम्राज्यशाहीचा घिगाणा अधिक बेतालपणे चालेल. ब्रह्मदेशाचे त्यात नुकसान आहे, पण इतर राष्ट्राच्या स्वातंत्र्यालाही धोका पोहोचेल. तेव्हा सर्व हिंदी राष्ट्राने मिळून या विभागणीस विरोध करून डोईपट्टी प्रथम उठविली पाहिजे ' इतके त्यानी सांगितले.

सरकारच्या तालावर नाचणाराचे वर्णन देखील उत्तमानी केले. सर चार्लस इन्नेस यानी लंडनला आपणास पचतील तेच प्रतिनिधी कसे नेले आणि तेथे इतर सभासदास काही माहिती न देता, ब्रह्मदेशविभागणीचा प्रश्न तडका-फडकी कसा निकालात काढला, हेही त्यानी सांगितले. ' आर्थिक बंड असता त्याला राजकीय स्वरूप देऊन हिंदी प्रजेविरुद्धच ते आहे, असे भासविण्याचा सरकारी प्रयत्न चालला आहे,' इतके सांगून त्यानी पुष्कळ उपयुक्त सूचना केल्या व कोणाकोणास भेटावयाचे त्याची नावे दिली.

हिंदी व्यापारी वर्गातील प्रमुखाचीही गाठ घेतली. त्यानी हिंदी भांडवल ब्रह्मदेशात किती गुंतले आहे, ब्रह्मी प्रजा राज्यव्यवस्था पाहण्यास लायक का नाही वगैरे ठराविक कारणे सांगून हिंदी व्यापारी व नोकर याच्याशिवाय ब्रह्मी कारभार चालणारच नाही, असे आपले मत दिले. त्या सर्वांचे म्हणणें नुसते ऐकून घेणेच शहाणपणाचे होते.

अशा एकंदर मुलाखती झाल्या. त्यावरून निरनिराळ्या पक्षोपपक्षांच्या आकांक्षा काय आहेत आणि त्यांची विचारसरणी कशी धावते, हे कळून येईल. आता ब्रह्मदेशच्या बंडाळीचा आणि विभागणीचा विचार साकल्याने करावयाचा आहे. '

अध्याय नववा

समालोचन

ब्रह्मदेशचे बड अद्यापि आवाक्यात येत नाही असे सरकारने कबूल केले नसले, तरी ती गोष्ट सत्य आहे. सर्व राजबदीना प्रथम माफी जाहीर केली, तिचे क्षेत्र वाढविले आणि दोन वेळां ब्रह्मी पुढाऱ्याशी गव्हर्नरानी विचार-विनिमय केला. पण ह्या सर्वाचा परिणाम बडाळीवर मुळीच झालेला दिसत नाही. खून, लूट, दरवडे आणि सरकारी दप्तरे जाळण्याचे प्रकार अजून थाबले नसून, उलट वाढत्या प्रमाणावरच आहेत असे म्हणता येते. तेव्हा यावरून काय अनुमान काढावयाचे? ब्रह्मी प्रजेच्या मनात—विशेषतः बड-खोराच्या मनात—हिदी जनाचा द्वेष भरला आहे, असे सरकारतर्फे दर्शविण्याचा पुष्कळ प्रयत्न झाला, आणि त्याचे प्रत्यतर तिकडून हिदुस्थानात परतणाऱ्या हिदी रहिवाशाच्या गर्दीतही सापडते. पण, हिदी लोक हजारानी परतले, तरी त्यावरून त्याची भीति वास्तविक होती, असे मात्र मुळीच ठरत नाही विनाकारण माजविलेले हे हिदद्वेषाचे भूत बऱ्याच जणाना भेडसावू शकले, ही गोष्ट मात्र खरी. हा खटाटोप कसा सुव्यवस्थित होता व त्यात हेतु काय असावा, हे प्रथम पाहणे आवश्यक आहे.

हिदी लोकाची धोड आपल्या मार्गात येणार, हे ब्रह्मदेशातील गोऱ्या व्यापाऱ्याना फारच लवकर कळले. धान्य, लाकूड किवा खनिज सपत्ति ही लुटण्याचा मक्ता आपण बळकावून बसल्यानेच त्याची भूक भागणारी नव्हती. सरकारी नोकरी व शहरपेठेतील व्यापार यातही आपलीच वर्णी कायमची लागावी, आपणास कोणी प्रतिस्पर्धी नसावा, एकतत्री राज्य उपभोगण्यास सापडावे, अशी अपेक्षा गोऱ्याची होती व अजूनही आहे. परतु हिदी नोकर कमी पगारात मिळतात आणि हिदी व्यापारी सर्व व्यापार आपल्या हाती ठेवतात, तेव्हा त्याचे उच्चाटण कसे करावे याविषयी दीर्घ विचार होऊन सुपीक मेदूतील युक्ति बाहेर पडली. ब्रह्मी बडखोरात 'हिदी लोकाचा द्वेष फारच माजला आहे' असे दर्शविण्याचा जारीने प्रयत्न होऊ लागला.

बंडखोरी म्हटली म्हणजे तीत हल्ले प्रतिहल्ले व्हावयाचेच, आणि मारहाण देखील टळत नाही. बरे, बडखोर हिंदी लोकच वेगळे निवडून काढून त्याना ठोकतात असे म्हणावे, तर एकदर ज्या १०७४ इसमाना त्यानी यमसदनास पाठविले, त्यापैकी फक्त ७४ च हिंदी आहेत, असे सरकारचेच पत्रक आहे.

नोकरशाहीची युक्ति अशी होती की, मारहाणीत कोणी हिंदी सापडला की, तेवढाच मुद्दाम निर्दिष्ट करावयाचा व ब्रह्मी अथवा इतर प्रजाजनावर झालेल्या हल्ल्याचा निर्देश टाळावयाचा. 'एका हिंदी शेतकऱ्याची गज जाळली'–'खेड्यावर हल्ला झाला, एक हिंदी मेला' अशा प्रकारच्या विकृत बातम्या मुद्दाम पसरविण्यात आल्या. यात दुहेरी हेतु होते. भेदनीतीचा हा अगदी नवा डाव आहे. ब्रह्मी प्रजेच्या मनात हिंदी जनतेविषयी वैमनस्य आहे, असे प्रथम हिंदी लोकाच्या मनात भरवून द्यावयाचे, आणि नंतर स्वसरक्षणार्थ हिंदी लोकानी कडक उपाय योजण्याची विनति सरकारला केली की, हिंदी प्रजा तुमचा द्वेष करते म्हणून ब्रह्मी प्रजेची समजूत घालावयाची! असा दुटप्पी व दुहेरी डाव नोकरशाहीचा आहे, असे का म्हणू नये? पुनः गमत अशी की, बड मोडण्यास आघाडीवर हिंदी सैन्य गेले म्हणजे त्याचेही वेगळे पण विकृत स्वरूपात प्रतिपादन करता येतें. 'हिंदी शिपायाना तुमचेवर शस्त्र चालविण्यास काहीच वाटत नाही.' ही शिकवणं प्रत्यक्ष दिली नाही, तरी अप्रत्यक्ष रीत्या ब्रह्मी प्रजेच्या मनावर ठसली जाणार, यात शका कसली? असे बी पेरल्यावर मग 'तुम्ही हिंदुस्थानपासून वेगळे व्हा कसे?' म्हणून ब्रह्मी प्रजेला फूस दिली की, हे सर्व आपल्या कल्याणासाठीच आहे असे ब्रह्मदेशियाना वाटते.

अशी कारस्थाने रचण्यात ब्रिटिश मुत्सद्दी चतुर आहेत. ब्रह्मदेश हिंदुस्थानपासून वेगळा असावा, शहाणे व शिकलेले हिंदी व्यापारी आणि अधिकारी आपल्या राज्यात नकोत, फक्त गोऱ्या बाळानाच तो प्रदेश आदण मिळावा, अशा प्रकारची मनोराज्ये ब्रिटिश व्यापाऱ्याची आहेत. पण साम्राज्यवादी राजकार्यधुरधराचा हेतु यापेक्षा वेगळा आहे. त्याना ब्रह्मदेश विलग व्हावा असे वाटते, ते निराळ्याच कारणासाठी. जागतिक राजकारणाचे केंद्र युरोपमधून निघून आशियात आल्यास बरीच वर्षे झालीं. त्याचे धागेदोरे

पाहिले म्हणजे सिंगापूर एकदम स्पष्ट दिसेल. सिंगापूरचें नाविक केंद्र, बगदादचें वैमानिक केंद्र आणि कोठली तरी आणखी केंद्रे ही कशाची पूर्वतयारी दर्शवितात? शिवाय झोपेतून जागा होणाऱ्या चीनवर पाहिजे तेव्हा पाय टाकून त्याला दाबता यावे, अमेरिका, फ्रान्स, हॉलंड व जपान याच्या मेतकुटात जमल्यास माती कालविता यावी आणि उदयोन्मुख राष्ट्राची मान मुरगाळण्यास सबड व सत्ता मिळावी म्हणून साम्राज्यवाद्याची धडपड चालू असावयाचीच.


कारण साम्राज्यवादाची आधुनिक कल्पना अगदी वेगळी आहे. स्वतःची बिडी पेटविण्यासाठी, दुसऱ्याच्या घरादाराचीच काय, पण व्यक्तीची देखील राखरांगोळी करण्यासाठी खटपट करणे हे प्रचलित काली साम्राज्यवादाचें स्वरूप होऊन बसले आहे. म्हणून ब्रह्मदेश वेगळा करणे म्हणजे अशा सर्वग्रासी व सर्वभक्षक साम्राज्यवादाचे बूड स्थिर करण्यास मदत करण्यासारखें आहे, असे म्हणता येते. कारण असले वाढते साम्राज्य म्हणजे जगातील शाततेस जबरदस्त धोकाच होय.

ब्रह्मदेश वेगळा होऊन खराखुरा स्वतत्र होत असेल तर त्याबद्दल सर्वांनाच आनद होईल. 'पिछेसे आये और आगे बढगये' म्हणून हिंदी जनतेला ते एक अनुकरणीय उदाहरण होईल. परतु इजिप्त व इराक याची उदाहरणे ताजी आहेत. त्याना स्वातत्र्य असल्याचे कागदोपत्री नमूद आहे. पण ते स्वातत्र्य कसले आहे, याची चौकशी मात्र कोणी करू नये. एवढे कशाला! खुद्द ब्रिटिशाच्या जातभाईचीच गोष्ट पहा ना? आयर्लंड स्वतत्र आहे, असें म्हणणारास स्वातंत्र्याचा खरा अर्थ तरी कळला नाही किंवा त्याला वस्तुस्थितीचें ज्ञान तरी नाही असेच म्हटले पाहिजे. शेजारच्या, स्वधर्मी भाऊबदाना 'स्वराज्य' देण्यात जर इतके आढेवेढे तर ब्रह्मदेशाचे बाबतीत ते किती होतील बरे? म्हणून ब्रह्मदेशच्या विभागणीस विचारवताचा विरोध आहे तो अशासाठीच की, विभागणीमुळे साम्राज्यशाहीच्या वाढीस आळा न बसता, उलट जोम येईल. ब्रह्मदेशात गोरे सैन्य आणून ठेवले किंवा तेथे साम्राज्यवाद्यांचे 'स्वराज्य' बोकाळले म्हणजे आसपासच्या देशावर अनर्थ कोसळण्यास अवधि कसचा? एडन, सुएझ, माल्टा किंवा जिब्रॉल्टर या ठिकाणाना फक्त नाक्याची जागा म्हणूनच लष्करी महत्त्व आहे. पण ब्रह्मदेश म्हणजे

आशियांतील नाक्याची जागा होऊनच्या होऊन, खनिज तेल, चांदी, लाकूड खर, तांदूळ इत्यादि लढाईस आवश्यक अशा साधनसामग्रीचा भरपूर सांठा देखील त्या जागेभोवती अनायासे जगाच्या कल्याणासाठी (?) जगदुद्धारार्थ त्या पुण्यपुरुषांच्या हाती लागणार आहे. चीनवर नजर ठेवतां येईल, सयाम गडबड करू लागला तर त्याला लाथेखाली दडपता येईल, जपानचे आक्रमण वाढू लागल्यास त्यास पायबद घालता येईल, किवा सर्वत्र आपला वरचष्मा राखता येऊन 'आशियातील राष्ट्रे म्हणजे गोऱ्या घोड्यांचीं मनसोक्त चरण्याची कुरणें होत!' हे विधान बेधडकपणे घोषित करता येईल. अशासाठीच ब्रह्मदेशासारखा सपन्न व समृद्ध देश हिदुस्थानापासून वेगळा असावा असें इग्रजाना वाटते. हिदुस्थानवरील मगरमिठी ढिली होत चालली असें वाटू लागले तरी सुद्धा ब्रह्मदेशातून डोळे वटारून पाहिल्याने काम भागेल.

अशा अनेक दूरवरच्या धोरणासाठी ब्रह्मदेश वेगळा पाहिजे अशी 'ब्रह्मी प्रजाजनांची' (?) मागणी आहे. साम्राज्यशाहीचे बध घट्ट होणार म्हणजे आणखी कोठल्या तरी राष्ट्रावर या सर्वभक्षकाची वक्रदृष्टि वळणार! म्हणूनच ब्रह्मदेशविभागणीस विरोध करावयाचा आहे. आम्ही पारतत्र्यांत खिचपत पडलो, म्हणून दुसऱ्या स्वतत्र राष्ट्रानीही आमच्याच पक्तीत येऊन बसावें अशी आमची इच्छा नाही. म्हणून या गुप्त कटास कसून विरोध केला पाहिजे. त्या ठिकाणी ब्रह्मी बडखोरांनी आमच्या बांधवावर हल्ले केले आणि त्यांना देशोधडीस लावलें म्हणून सूड उगविण्यासाठी आम्ही पुनः ब्रह्मी प्रजेशीं लढलेच पाहिजे, अशी वृत्ति वेडेपणाची होईल. कारण प्रथमतः केवळ हिंदी लोकांवरच ब्रह्मी बडखोरानी हल्ले केले ही गोष्ट चुकीची. दुसरी बाब अशी की, त्यांनी आमचा द्वेष केला तरी जोपर्यंत तिसरा शत्रु आम्हा दोघांवर टपून बसला आहे तोपर्यंत आपसांतील वैरभावाचा विचार करण्यास फुरसत नाही. बडाळीचें खरे स्वरूप लक्षांत न घेतां सरकारी कलुषित दृष्टीनेच आम्ही तिकडे पाहत आहोंत, हे आश्चर्य होय.

वास्तविक ब्रह्मी बडाळीचा व विभागणीचा तसा कांहीच सबध नाही. बंडाळी ही निवळ प्रजेच्या गाऱ्हाण्याचें प्रगट स्वरूप होय. डोईपट्टी किंवा तातमेडा (घरपट्टी) वसूल करणारे शभरांहून अधिकारी बडखोरांच्या शौर्यास बळी पडले यावरून काय दिसतें? खेडयांवर हल्ला होतांच ते प्रथम



सुधारलेल्यें पण लाकडी घरें.

गावकामगागला का पकडतात आणि सारावसुलीचे किवा इतर सरकारी कागदपत्र का जाळून टाकतात, याचे उत्तर सरकारी अधिकारी कसे देणार? सरकारी कर, तो वसूल करण्याची जुलमी पद्धत व ते अधिकारी, याच्या विरुद्धच बडवाले मुख्यतः उठले आहेत, हे सिद्ध करण्यास दुसरा पुरावाच मुळी नको आहे. परतु बडाचे खरे स्वरूप उघडकीस आले, तर सर्वत्र सुधारलेल्या म्हणून नावाजलेल्या ब्रिटिश राष्ट्राची जगाच्या चावडीत नाचक्की होईल. कारण कायद्याने ५०–७५ वर्षे नि शस्त्र केलेली प्रजा – आणि तीहि लढवय्यी जात नाही अशी – सशस्त्र, सघटित, सुधारलेल्या व सुव्यवस्थित सरकारशी सात आठ महिने झजत राहून सरकारी अधिकारी ठार करते व सरकारी दप्तरे जाळून टाकते, याचा अर्थ काय होतो? 'देशबाधवाशी बेइमानीने वागा, त्याचे सर्व येत आम्हाला कळवा म्हणजे तुम्हास दहा गुन्हे (खून नव्हे!) माफ' असे जाहीर आश्वासन दिले, तरी बदखोर हाती लागत नाहीत, ही गोष्ट काय दर्शविते? बडाळीचा उपशम करण्यासाठी ब्रह्मदेशात आठ दहा हजार सैन्य नेले, मशिनगन्स उभारल्या किवा जागोजाग तोफा डागल्या, म्हणून अत्यत निर्वाणीने उठलेले ब्रह्मी शेतकरी भिणार थोडेच? त्याचे आगी समोरासमोर लढाई देण्यास सामर्थ्यही नाही. कारण मुख्यत. त्याचजवळ साधने नाहीत पण 'येनकेन प्रकारेण' ते प्रबल सम्राट सरकारला जेरीस आणीत आहेत, ही गोष्ट कोणालाच नाकबूल करता यावयाची नाही. इन्सेनकडे पोलिसाचा बदोबस्त सरकारने केला तर हेझादाचे बाजूस बडखोर बळावतात. म्हणून इन्सेनकडील पोलिस हेझादाकडे गेले की, थारावडीचे आसपास हल्ले वाढतात. अशी ही चुकवाचुकवीची आणि गनिमी काव्याची लढाई मोठ्या चिकाटीने लढण्यात ब्रह्मी शेतकऱ्याच्या मनातील तीव्र असतोष प्रकट होत आहे. हिदी प्रजाजनानी आपल्या तोडातील घास काढून घेतला असल्याने हिदी लोकावर ते तुटून पडले तर त्यात नवल नाही. परतु अशा बडाचे वेळी हे सर्व पक्षोपपक्ष लयास जाऊन मोठा एकच प्रतिस्पर्धी दिसतो, त्याविरुद्ध सर्व मोहीम चालते.

शेतकऱ्याची ही मनोभूमिका काही सुशिक्षित व सरकारकच्छपी लागलेल्या ब्रह्मी पुढाऱ्याना समजत नाही. आपण मागू तसले राज्ययत्र इग्लड आपल्या झोळीत टाकणार ही त्याची भावना झाली आहे. स्वराज्यदानाचे

बाबतींत इंग्लड किती चिक्कू व आखडत्या हाताचे आहे, याचा त्याना स्वतःला अनुभव नसला तरी इतर राष्ट्राच्या अनुभवावरून ब्रह्मी प्रजेस हे ज्ञान व्हावयास पाहिजे. परतु इतिहासापासून काहीच शिकावयाचे नाही असाच जर त्या इंग्रजाच्या कच्छपी लागलेल्या ब्रह्मी पुढाऱ्याचा निश्चय असेल तर त्याला कोण काय करणार आहे? अस्तु.

हिंदी सावकार म्हणजे मद्रासकडील चेट्टी व हिंदी मजूर अशा बडखोरीचे वेळी घाबरून हिंदुस्थानात पळून येतात, याचाही उलगडा केला पाहिजे. खुद्द बडाळीच्या टप्प्यात हिंदी, ब्रह्मी, युरोपियन असा भेद मुळीच पाळला जात नाही, हे उघडच आहे. आडवा आला की तो कापून काढण्याकडे प्रवृत्ति बडखोराची व्हावयाचीच, आणि अशी अस्वस्थता माजली म्हणजे मारवाडी, सावकार, दुकानदार अशाना अर्थातच भयकर भीति वाटते. ती भीति म्हणजे 'भाडवल' सुरक्षित कसे राहील याची. आपण जबरे व्याज घेतो, कुळाच्या कौटुंबिक हालअपेष्टाची किंवा सुखदुःखाची पर्वा करीत नाही, ते आपणाविषयी अत्यत असतुष्ट असतात, अशी जाणीव सावकाराना असते आणि म्हणून बडाळी माजली म्हणजे प्रथम हल्ला आपणावर होईल हे त्याना आपसूकच कळते, कोणी तिसऱ्याने सागावे लागत नाही. 'व्यापारी बनियाची' अशी जात कोठल्याही धर्माची अथवा कोणत्याही देशातली असो सशाप्रमाणे भित्री असते. हा अनुभव आपणाकडे सोलापूर मार्शल लॉचे वेळी आला. सरकारास 'घालीन लोटागण' करीत जाण्यास अशा भाडवलबाल्यांना मुळीच शरम वाटत नाही. त्याचा हेतु एकच– 'आम्हाला सुरक्षित ठेवा म्हणजे आमची कुळे व आम्ही पाहून घेऊ.' अगदी हाच प्रकार ब्रह्मदेशात घडला तर आश्चर्य नव्हे.

बडाळीच्या जिल्ह्यातील सावकारवर्ग जीव बचावण्यासाठी पळू लागला, तेव्हा इतर ठिकाणच्या ब्रह्मी प्रजाजनानी सावकाराचे खरे धारिष्ट ओळखून हिंदी दुकानदाराना निनावी धमकीची पत्रे पाठविण्यास आरभ केला. शूर वीराच्या पराक्रमावर पोकळ धमक्या देणारे घमेडीनदन चोहोकडेच उद्भवतात. बडखोरी माजली थारावडी जिल्ह्यात आणि अशी धमकी देणारी पत्रे प्रमुख हिंदी व्यापाऱ्यास आली रगूनमध्ये. यावरूनच त्यात खऱ्या बडखोरांचे आंग नसून उपटसुभ पुडांची ती कारबाई असावी असे स्पष्ट दिसते.

' तुम्ही लवकर पळ काढा, नाहीतर कठिण प्रसग ओढवेल ' अशा आशयाची ती पत्रे असत. एका भित्र्याने दुसऱ्या ' म्याडास भेडसावे ' तशापैकीच हा प्रकार झाला. कारण बडखोर अशा सनदशीर मार्गाने पूर्वसूचना देऊन हल्ला करीत नाहीत. पण बडखोरीचा फायदा घेणारे मात्र असा चोरटा हल्ला करण्याचा आविर्भाव आणतात. हिदी व्यापारीही पडले भित्रे त्याचे मन देखील त्याना खात असते की, आपण जी चैन चालविली आहे ती ब्रह्मी लोकाच्या मूर्खपणामुळेच. म्हणून कोठे खुट् झाले की, सशाप्रमाणे ते घाबरतात व आपल्य प्राणावर बेतले असेच त्याना वाटून ते पळत सुटतात!

ही कारणपरपरा कदाचित् खोटी वाटेल, पण तिला पुष्टिदायक असा एकच प्रसग व एका खऱ्या समाजोपयोगी सस्थेचे उदाहरण देतो. रगूनमधील ' आर्यसमाज ' हा ब्रह्मी प्रजेच्या डोळ्यावर येण्याचे मुळीच कारण नाही. तेथे आर्यसमाजाचे कार्य फार व्यापक, तसेच प्रशसनीयही आहे. पण त्या ' आर्याना ' ब्रह्मी बंडाळीची भीति वाटत नाही. किवा ते तेथून पळही काढ् इच्छीत नाहीत. उलट रगूनमध्ये ब्रह्मी व हिदी मजुराची जेव्हा जगी मारामारी दीड वर्षापूर्वी झाली, तेव्हा हिदी मजुराचे सरक्षण करण्यास आर्यसमाज अस्तनी वर सारून पुढे सरसावला आणि त्याने शक्य तितक्या हिदी मजुरास आर्यसमाजाचे आवारात घेतले, व बाहेर स्वतःचे लाठीचे पहारे बसविले. तेव्हा ब्रह्मी हल्ले लगेच थाबले. ' भित्यापाठी ब्रह्मराक्षस ' ही म्हण कदाचित् ब्रह्मी प्रजेच्या वागणीवरूनच आपल्याकडे प्रचारात आली असावी. कारण जरा धैर्य धरले किवा नुसती का होईना पण ऐट आणली, की भेडसावणारे ' ब्रह्मराक्षस ' पळून जातात असा अनुभव अनेक वेळा ब्रह्मदेशात आलेला आहे. खरे बडखोर अर्थातच भिवविण्याच्या भानगडीत पडत नाहीत.

बडखोराना कोणा परकीयाचे साहाय्य आहे की काय किवा पीत लोकाच्या मदतीस ' रक्त ' हस्तक धावून आले आहेत का कसे? ह्या सभवनीय शकेचेही निरसन केले पाहिजे. ब्रह्मदेश बगालला अगदी लागूनच आहे. तेव्हा तरुण क्रातिकारक अराजकानो ब्रह्मी बडखोराशी सगनमत केलें असावे, असे देखील कित्येकाना वाटते. याचे मुख्य कारण असे की, हे क्षुल्लक बड साम्राज्य-सरकारला थाबविता आले नाही किंवा एकदा पेटल्यानतर मग ते लवकर आवाक्यातही राहिलं नाही. बडखोरीचा उपद्रव थारा-

बडी जिल्ह्यात बहुधा नेहमीचाच असतो. तशापैकीच हाही असेल या समजुतीने सरकारने तिकडे प्रथम दुर्लक्ष केले, ही गोष्ट खरी. परतु दुसऱ्याही कारणासाठी सर चार्लस इन्नेस यानी बडाळीकडे कानाडोळा केला असावा. ब्रह्मदेशविभागणीसाठीच हे बड आहे असे दाखविण्याचा हेतु सर चार्लस याचा असावा, अशी शका मुत्सद्द्यांचे मनात येणे शक्य आहे. ब्रह्मी लोकाचा असतोष हा केवळ हिंदुस्थानशी जखडल्यानेच झाला आहे, विभक्त राहण्याची त्याची उत्कट इच्छा आहे, असे विलायतेतील लोकाना भासविण्याचा हेतु सर चार्लस इन्नेस याचा नाही असे म्हणवत नाही.

लोकात तर खरोखरच असा भ्रम निर्माण झाला होता की, बड हे काही खरे नाही. सरकारची ही नवी क्लप्ति आहे. पण शेवटी बड लुटुपुटीचे नसून खरोखरच ते सरकारच्या आवाक्याबाहेर गेले हे स्पष्ट झाले, तरीही हिंदी प्रजाजनाचा त्याजवर विश्वासच बसेना. कारण 'बड बड' म्हणून कितीही मोठे झाले तरी सशस्त्र ब्रिटिश फौजेपुढे बडखोरांचा टिकाव लागेल कसा? अशी शका प्रत्येकासच सुचे. बडखोराचा पाडाव इतके दिवस होत नाही याचा अर्थ सरकारचे मनात बड मोडावयाचे नाही असाच ते करीत. पण रेगाळत पडलेले हे बड आणखी काही काळ चालले तर 'लाल बावटा' आत शिरण्याचा सभव आहे. ब्रह्मी प्रजाजनाची वृत्ति समाजसत्तावादी स्वरूपाचीच असून त्याचेकडे व्यक्तिग्रत द्रव्यसचय करण्याचा प्रघात प्रथमपासूनच नाही, हे आपण पाहिले आहेच. प्रचलित काली कोणाही त्रयस्थाची मदत नसता किवा त्याच्यामध्ये कोणी सुशिक्षित पुढारी नसता इतके दिवस बडखोर बलशाली ब्रह्मी सरकारशी तोड देतात, याचा अर्थ गनिमी काव्याची लढाई ते पूर्णपणे खेळू शकतात हाच होय. ब्रह्मी शेतकरी एकाकीच लढत आहेत. बगल्याचे किवा लाल बावट्याचे साहाय्य त्यास सध्या तरी नाही. तसे साहाय्य देण्यासाठी दोघेही दोन्ही दिशास टपून बसले असल्यास मात्र माहीत नाही. कारण अडचणीत सापडलेल्या साम्राज्यवाद्यास अधिक तगाई करणे हे तर त्याचे ब्रीद आहे. असतु.

अध्याय दहावा

समाजस्थिति

'कोणत्याही राष्ट्राच्या सस्कृतीचे मोजमाप तेथील समाजात स्त्रियाना मिळणाऱ्या स्थानावरून करता येते,' असा एका अमेरिकन तत्त्ववेत्त्याचा सिद्धात आहे, व तो बव्हशी खरा दिसतो. ही कसोटी ब्रह्मी सस्कृतीस लावून पाहिली तर जगातील सर्व राष्ट्रात ब्रह्मदेशाला वरचे स्थान मिळेल. कारण ब्रह्मी महिलाना मिळते तितके स्वातत्र्य किवा तितके महत्त्व अन्यत्र कोणत्याच समाजात नाही, असे म्हणतात. खाजगी मालमत्तेचा किवा स्त्रीधनाचाच हक्क घेतला तर त्यासाठी सुधारलेले देश कायदे करू लागले आहेत व कांहीनी नुकतेच केलेले आहेत. परतु ब्रह्मी स्त्रीच्या जन्मसिद्ध हक्कापैकीच विवाहोत्तर खाजगी मालकीचा हक्क असल्याने बेगळा कायदा करण्याची आवश्यकता भासली नाही. तीच गोष्ट मतदानाची. इग्लड आपणास सुधारलेल्या राष्ट्रा पैकी अग्रेसर मानते. पण तेथे मतदानाच्या हक्कासाठी स्त्रियाना किती झगडावे लागले व त्यामुळे 'मताभिलाषी बायाचा धिगाणा' किती माजला, हे ठाऊक असणाराना ब्रह्मदेशात प्रथमपासूनच स्त्रियाना ते हक्क आहेत हे ऐकून आश्चर्य वाटेल. पण त्याहीपेक्षा आश्चर्य हे की, 'न स्त्री स्वातत्र्य-मर्हति' म्हणून दडक घालणारा आपलेकडे 'मन्' च होता आणि ब्रह्म-देशात स्त्रियाना इतके स्वातंत्र्य देणारा 'मन्' च आहे! ह्या मनूचे कोडें काही का असेना, जेथे स्त्रियाना कल्पनातीत स्वातत्र्य आहे तेथील समाज-स्थिति मनोरजक, उद्बोधक आणि काहीशी आकर्षक अशी वाटणारच.

स्त्रियाच्या समाजातील दर्जापासूनच लिहावयाचे तर असे म्हणता येईल की, बहुतेक सर्व स्त्रियाना 'आपण ब्रह्मदेशातच जन्मलो असतो तर फार बरें झाले असते,' असे वाटेल. एक तर काही बाबतीत पुरुषापेक्षा अधिक सबलती त्याना आहेत आणि दुसरें असे की, समाजात वावरण्याची पूर्ण मुभा ब्रह्मी स्त्रियाना असते. पडदा किवा बुरखा नसलेल्या स्त्रिया तरी आपले-कडे समाजात सर्रास कोठे मिसळतात? पण ब्रह्मी स्त्रियाचे तसे नाही. पडदा

कसा तो त्याना ठाऊक नाही. पण उलट रोजच्या व्यवहारात त्याना महत्त्वाचे अधिष्ठान आहे. म्हणजे मध्यम वर्गात आपणाकडे घरात अधिकार गृहिणीचा असला तरी बाजारहाट पुरुषाच्याच हाती असतो. तसेही ब्रह्मदेशात नाही. सर्वच कामे गृहिणीनी आपल्या ताब्यात घेतली असल्याने त्याना गृहिणी का म्हणावे ही पचाईतच पडेल. कारण गृहिणीसारखे घर राखण्याचे काम 'घरच्या मडळीं'ना करावे लागते. चूलबाईची आराधना करूनसुद्धा ब्रह्मी गृहिणी बाहेरची कामे साभाळतात. नुसत्या खरेदीसाठी त्याना बाजारात रोज जावे लागते असे नाही. बहुतेक ब्रह्मी बायका कसला ना कसला तरी व्यापार करतातच. म्हणून देवघेवीसाठी त्याना बाहेर फिरावे लागते. बाजारात बायकाचाच भरणा मनस्वी. आपल्या इकडे फक्त भाजी विकणाऱ्या तेवढ्या 'माळणी' असतात, पण ब्रह्मदेशात कापडचोपड, धान्य-भुसार, खाद्य पदार्थ इत्यादि सर्व प्रकारच्या दुकानात 'देवी'चेच प्राधान्य दिसते. खरेदी करण्याचे काम पुरुषवर्गाकडे असते तर दुकानदार ब्रह्मी बायकानी त्याना चागलीच 'टोपी' घातली असती. पण गाठ बायकाबायकाचीच पडते आणि एकमेकीची वर्मे समजतात. तेव्हा ठकवाठकवी सहसा होत नाही.

परतु विविध व्यवसाय करणारी ब्रह्मी अबला आपले सोदर्य बाढविण्याची फारच काळजी घेते. तिची केशभूषा रचण्यास खरोखरच चातुर्य लागते. ब्रह्मी लोकच मुळी थोडेसे खुजे. त्याचा केतकी वर्ण, गालांची हाडे उच व पुढे आलेलीं, नाकाच्या बोडीखालचा ओष्ठप्रात रुदट, भुवयात वक्रता कमी; डोळे बारीक इत्यादिकामुळे सोदर्यहानि जरी होत असली तरी ती केशकलाप, वस्त्रे व अगविक्षेप यानी भरून काढण्याची कला ब्रह्मी बायकाना ब्रह्मदेवाने प्रथमपासूनच शिकविलेली असावी असे वाटते. केशभार मोठा व लाब असेल तितकी अधिक शोभा, असे ब्रह्मी स्त्रिया समजतात. मात्र नेहमी वेणी न घालता 'अबाडा' बाधण्याची चाल त्याच्यात आहे. परतु अबाडा कामचलाऊ होय. काम करते वेळी केसाची गाठ मागे मारण्यास हरकत नसते. पण सायकाळी स्नान झाल्यानतर (ब्रह्मी लोक नित्याचे स्नान संध्याकाळीच करतात) किवा देवदर्शनाला जातांना ब्रह्मी महिलाचे केश डोक्याबरच मोठ्या खुबीने गुडाळलेले असतात. सकृद्दर्शनी डोक्याच्या

मध्यभागी छोटीशी पण उच अशी काळी मखमालीची ती टोपी आहे असा भास होईल. परतु सूक्ष्म निरीक्षण केल्यास तो केशाचा पुज असल्याचें दिसेल. व्यवस्थित बदोबस्ताने सर्व केसाना ताब्यांत ठेवण्याची ती युक्ति आमच्या इकडे कितपत आवडेल ते सागता येणे कठिण. पण 'नाबिन्य' म्हणूनच तिची नक्कल करणाऱ्या महाराष्ट्र महिला कमी आढळणार नाहीत. अशा केशकलापाची शेपटे किवा त्यात लांब देठासह घातलेली फुले कानापर्यत खाली सोडणे, ही एका विशिष्ट अवस्थेची खूण आहे. कन्या 'उपवर' झाली – आपण आता विवाहबद्ध व्हावे असे तिला वाटू लागले (हो, तिच्या आईबापाच्या मतापेक्षा तिच्या मतालाच ब्रह्मदेशात अधिक मान आहे) म्हणजे केस कानापर्यत लोबत सोडून ती फिरावयास जाते. आणि मग तिची मागणी करण्यास कोणी तरी तरुण येतोच. पूर्वी साधारणपणे मुलगी वयात आल्यानतरच तिचे लग्न होई. हो पहिली रीत जाऊन अलीकडे मात्र १४-१५ व्या वर्षी तिचे लग्न होते. तरुणतरुणीचे मन एक झाले तरी दोन्ही-कडील वडील मडळीची अशा विवाहास समति लागतेच. ती बहुधा मिळते आणि मिळाली नाही तरीही भागते. त्यात बावगे असे काहीच नाही. मुलामुलीना आपले लग्न ठरविण्यास ब्रह्मी समाजात मोकळीक बरीच आहे. सध्याकाळचे भोजन आटोपल्यानतर म्हणजे रात्री ८।। ते ९।। च्या दरम्यान प्रियाराधनाची वेळ म्हणून मानली जाते. 'न्याहारीचा वकुत' किवा 'गोदोहन-काल' हे शब्दप्रयोग आपणाकडे रूढ आहेत. तसाच 'प्रियाराधनकाल' हाही ब्रह्मी प्रजेत नित्याच्या परिपाठातला आहे. लग्नाच्या बाबतीत जात, गोत, कुल, शील, गरीबी, श्रीमती किवा धर्मदेखील आडवा येऊ शकत नाही. अगोदर ब्रह्मदेशात जाती, गोत्र, प्रवर असल्या अडचणी नाहीतच. त्यामुळे वैवाहिक निवडणुकीस स्त्रीपुरुषास क्षेत्र फारच मोठे असते. बरे, लग्नापूर्वी स्त्रीने मिळविलेली सपत्ति किवा तदनतर तिने कमावलेली मिळकत या दोन्हीवरही तिचाच ताबा असल्याने–

'नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ'

अशा आपत्तींत अथवा नुसते पटत नाही एवढ्या सबबीवर देखील तिला वेगळे होता येते किवा द्वितीय सबध करण्यास मुभा असते. गावातील पचांपुढे जाऊन तिने आपले गाऱ्हाणे सागावे आणि पचाची खात्री पटली की,

ती आपली मोकळी! ' काडी ' मोडण्याचा हा इतका ब्रह्मदेशातला साधा विधि आणि युरोपियन राष्ट्रातील घटस्फोटाचा कायदा यावरून स्त्रियाना कोणत्या समाजात स्वातत्र्य अधिक आहे ते स्पष्ट होईल. विवाहकालचे समारभ किवा नतरचे थोडेफार सोहाळे, यावर हिदु चालीरीतीची छाप पडलेली दिसते. याचे कारण मणिपुराकडील ब्राह्मणानी आपणासाठी ब्रह्मी समाजात स्थान प्राप्त करून घेतले हे होय. ब्रह्मी राजाने मणिपुराकडून काही ब्राह्मण ' गुलाम ' म्हणून आणले. पण ते गुलाम म्हणून न राहता हळूहळू ब्रह्मी प्रजेलाच त्यानी आपल्या कह्यात घेतले. त्याना ' पोन्ना ' किवा ' बेदिगसाया '* असे म्हणतात. नामकरण, ' व्रतबध ' अथवा विवाह अशा समारभप्रसगी ' पोन्ना 'ला बोलावलेच पाहिजे, अशी भाविक लोकाची समजूत आहे. आणि अजून देखील श्रद्धावान् समाजात अशा ब्राह्मणाचे प्रस्थ थोडेफार दिसते. अस्तु.

विवाहोत्तर दोन तीन वर्षेपर्यत जामात श्वशुरगृहीच राहतात. तात्पुरता घरजावईच असा तो समजावा. नतर जरूर तर वेगळे बिऱ्हाड करता येते. पण हल्ली व्यवसायानिमित्त एका कुटुबात एके ठिकाणी सर्वाना राहता येणे शक्य नसते. म्हणून लग्न होताच स्वतत्र बिऱ्हाड थाटण्याची चाल परिस्थितीमुळेच रूढ होत आहे. मात्र एक विचित्र चाल अजून पूर्ववत् तशीच चालू आहे. विवाहासाठी नवरदेव आपल्या भावी पत्नीच्या घरी जाऊ लागले म्हणजे गावातील काही वात्रट मुलें त्याच्या वाटेत एक सोनेरी दोरी बाधतात, आणि ती तोडून पुढे जाण्यास नवरदेव धजत नाही. कारण कदाचित् लग्न अपेशी ठरेल अशी भीति त्याला वाटते. ' आम्हाला पेढ्यासाठी पैसे द्या म्हणजे वाट मोकळी करतो ' असा त्या मुलाचा आग्रह असतो. एका दृष्टीने ' मिष्टान्नमितरे जनाः ' पैकीच हा प्रकार! पोटभर खाऊ घातले किवा घालण्याचे वचन दिले की, नवरदेवाचा मार्ग मोकळा होतो.

असाच दुसरा प्रकार ब्रह्मदेशात इतर ठिकाणी होतो. विवाहोत्तर वधूवर ज्या घरात राहतात, त्यावर दगडाचा भडिमार करून त्याना एकात लाभू द्यावयाचा नाही, हा उद्देश उभयपक्षाच्या स्नेह्यासोबत्याचा असतो. दोघाच्याही

---

* बेदिग + साया म्हणजे वेदांग + पडित. साया = पडित

सुदैवाने (किंवा दुर्दैवाने) हा त्रास फक्त पहिल्याच रात्री देतात. त्यात दगड कोणाला लागतील, जखम कोणाला होईल इत्यादि दूरवरचे विचार त्याच्या डोक्यात येतच नाहीत. ही दगडाची वृष्टि थांबविण्यास उपाय एकच. 'बाबानो, हे घ्या १०-१२ रुपये, पुरे करा एकदाची कटकट' असे म्हटलें आणि मित्राना मनोवाञ्छित रक्कम मिळाली तर त्या युगुलाला स्वास्थ्य लाभते! नाही तर इस्पितळात जाऊन पडण्यापर्यंतही पाळी येते!

ब्रह्मी स्त्रियाची सौंदर्याची कल्पना जरा वेगळी असावी असे दिसते. आपला केतकीवर्ण टिकून रहावा किंवा चेहरा तुळतुळीत असावा म्हणून त्या एक प्रकारच्या झाडाच्या सालीची वस्त्रगाळ पूड सकाळी व सन्याकाळी तोंडावर फासून घेतात. वसंतपूजेच्या वेळी ब्राह्मण हातातोंडावर केशरी गंध चोपडतात किंवा चित्रातील हळदीकुंकवाचे समारंभात आपल्याकडे बायकाच्या हाताना गंध लावून ते खरखरीत शिपानी विरल व सारखें करतात, तशासारखाच पण त्याहून अगदी भिन्न असा हा मुद्राशास्त्राचा प्रकार आहे. 'पिवळे भस्म' तोंडाला लावल्याप्रमाणे ब्रह्मी बायका दिसतात, पण भस्म सुकल्यानंतर आपोआपच कमी कमी होते—ते उडून जाते—तसे पिवळ्या पुडीचे नाही. ती तासन् तास चेहऱ्यावर तशीच बसते. आणि ती लावून समाजात वावरणे म्हणजे काही विचित्र चाल नव्हे, अशाचप्रमाणे ब्रह्मी बायका वागतात. सौंदर्य वाढविण्यासाठी काही काळ आपण विद्रूप दिसलो म्हणून बिघडत नाही असे त्याना वाटते. लहान मुलीपासून आजीबाईपर्यंत सुद्धा या पीतगंधाचा उपयोग सर्वजणी करतात. त्याचा पोषाख पाहिला तर सुटसुटीत पण मोहक असतो. स्त्रियाना सोईचा असा दुसरा पोषाख, गरिबीच्या अडचणी लक्षात घेतल्या तर, आढळणार नाही. आपल्या इकडे वस्त्रान्तर करताना किंवा स्नान करताना आडोसा नसल्याने स्त्रियाची फार पंचाईत होते. पण ब्रह्मी स्त्रियाच्या पोषाखाने ही अडचण दूर केली आहे. भर रस्त्यावर स्नान किंवा वस्त्रान्तर करण्यास ब्रह्मी स्त्रियाना कसली भीति वाटत नाही. यावरून त्या निर्ढावल्या आहेत असे नव्हे, तर त्याच्या वस्त्राची योजनाच अशी आहे की, आडोशाची आवश्यकताच त्याना भासत नाही.

स्त्रीपुरुषाच्या वस्त्रास 'लुंगी' असे म्हणतात. कासोटा घातल्याशिवायच लुंगी परकराप्रमाणे नेसावयाची असते. ती धोतरासारखी गुंडाळता येत नाही.

तिचीं दोन्ही टोके एकत्र शिवलेली असल्याने डोक्यावरून अथवा पायाकडून तींत आपण शिरावे लागते. साधारणपणे दोन वार लाबीचे हे वस्त्र असते. पण ते दुहेरी असल्याने एकूण चार वार कापडात एक लुगी होते. पुरुषाच्या व बायकांच्या लुगीत थोडासा फरक असतो. मात्र नेसण्याच्या पद्धतीवरून स्त्रीपुरुष हा भेद चटकन् कळतो. विशेषत: लहान मुलामुलीच्या बाबतीत लिगभेद ओळखण्याची अतिशयच पचाईत पडते. पण लुगी नेसण्याच्या पद्धतीने ते कोडे सोडविण्यास अडचण नसते. केस डोक्यावर मध्यभागी बाधता यावेत म्हणून लहानपणी त्याची थोडी निगा राखावी लागते. आजूबाजूच्या केसाना कात्री लावणे तर क्रमप्राप्तच होते. परतु केशकर्तनाविषयी त्याना काहीच वाईट वाटत नाही, म्हणून बालपणी अनवश्यक केस कापणे आवश्यक होते आणि म्हणून मस्तकभूषणामुळे हा मुलगा की मुलगी असा सदेह पुष्कळ वेळा पडतो. स्त्रियाच्या बाबतीतही उरोभाग उन्नत असणे कुरूपतेचे लक्षण समजत असल्याने लहानपणापासूनच वक्षःस्थळाभोवती तग पट्टा बाधलेला असून वर ' इजी ' घालतात. स्त्रियाची इजी म्हणजे लाब हाताचे पोलकेच म्हणता येईल. ती इजी बहुधा पाढऱ्या रगाची असते; आणि इजीवर दुसरे कसलेही वस्त्र घेण्याची चाल ब्रह्मदेशीय ललनात नाही. लुगी व इजी या दोनच कपडयात त्याचे काम भागते. लुगी नेसून चालण्यात स्त्रियाना बरेच कौशल्य सपादन करावे लागते. म्हणून ब्रह्मी महिला चालताना फारच मोहक दिसतात. पायावर किवा इतर कोठल्याही भागावर वस्त्राची सुरकुती येत नाही. लुगीची टोके दोन्हीकडे खोवली म्हणजे झाले, अशी स्त्रियाची रीत आहे. पुरुषाच्या लुगीची दीड घडी (निरी) मध्यभागी येते. आणि त्यावरूनच स्त्रीपुरुष ओळखता येतात. पादत्राण वापरण्यात काटकसर आहे का चिक्कूपणाचे ते लक्षण मानावे, हे समजणे कठीण होईल. लाकडी खडावा तिकडे सर्रास वापरतात. मात्र ' आगठ्या 'ऐवजी पायाचा पुढला भाग अडकविण्यासाठी आडवी पट्टी किवा जोड्यासारखे आवरण असते. पण त्यात फक्त दोनच बोटे घालून ब्रह्मी स्त्रिया इतक्या चपळाईने जातात की, त्याच्या त्या सर्व हालचालीकडे सारखे पाहत बसावेसे वाटते! आणि तिकडे नवीन गेलेल्या मनुष्याचे तर न कळत तसे होते हे सागावयास पाहिजेच असें नाही.

सर्वसाधारणपणे ब्रह्मी स्त्रीला 'मा' म्हणतात. तीच जरा पोक्त झाली की 'मे' म्हणून तिला सबोधतात. म्हणून नवयुवतीना 'मे' म्हटल्यास त्याना राग यावयाचा. कारण त्याना 'मि' म्हणतात. पण 'मिमि' असे दोनदा म्हणण्याचा मान विवक्षित व्यक्तीलाच असतो. प्राणप्रियाने प्रियेला मिमि म्हणावयाचे व 'तिने' याला 'मॉग' म्हणून हाक मारावयाची असा शिरस्ता आहे. कोणी कोणी 'मॉग' न म्हणता 'शी' असेही सबोधतात. ब्रह्मी स्त्री प्रेमळ तर असतेच, पण विशेषतः आपल्या मोकळ्या व उदार मनाच्या वागणुकीने ती आपली छाप बसविते. तिचे मन मोठे असले तरी 'सवती'ला त्यात थारा मुळीच मिळावयाचा नाही. बहुपत्नीकत्व धर्मशास्त्राने मान्य केले आहे खरे, पण ब्रह्मी गृहिणीचा गृहस्थाबर इतका तावा असतो की, त्याची सहसा द्वितीय सबध करण्याची छाती होत नाही. घटस्फोट झाल्यानतर अथवा विधुरावस्थेत त्याला बदी कोण करू शकणार? पण जन्मसिद्ध हक्क न बजावणारीच पुरुष मडळी ब्रह्मदेशांत अधिक दिसतात. कारण बहुपत्नीक असा इसम क्वचितच आढळतो. घरकामात आणि व्यापारी देवघेवीत देखील ब्रह्मी स्त्रियाच प्रमुख असल्याने त्याचे शिक्षण फार झाले असावे असे वाटते. परतु ब्रह्मी समाजरचनेमुळे सर्वत्रच साक्षरता असली तरी सुशिक्षित स्त्रिया तितक्याशा नाहीत. पण नुसती अक्षरओळख तरी कमी कशी म्हणावी? हिदुस्थानात दर हजारात फक्त तेवीस स्त्रिया साक्षर सापडतात. तर ब्रह्मदेशात त्याच्या **पांचपटीहून अधिक** म्हणजे **सवाशे** स्त्रिया साक्षर आहेत. पुरुषाचीही गोष्ट तशीच. हिदुस्थानात दरहजारी १६१ इसम साक्षर आहेत. पण ब्रह्मदेशात ५७६ निघतात! हा फरक का पडतो व ब्रह्मी शिक्षणपद्धति कसली आहे हे पुढे कळेलच. ब्रह्मी स्त्री साक्षर असली तरी तिची देवावरील भक्ति, भूतसमधाची भीति, नॅटवरची श्रद्धा किवा ताईत, तोडगे अथवा गोदून घेणे यावरील विश्वास मुळीच ढळला नाही. फुजी दिसला की ती अगदी भाविकपणे गुडघे टेकून त्याला वदन करील, दोन्ही अष्टम्या, पौर्णिमा आणि अमावास्या या दिवशी न चुकता जवळच्या पॅगोडाला जाईल, मेणबत्त्या जाळणे, छत्र्या दान करणे किवा फुले वाहणे ही पूजाकर्मे अगदी यथासाग करील. गोदून घेण्याचे बाबतीत स्त्रियांची एक मौजेची समजूत आहे. ब्रह्मी पुरुष नाभी-

पासून खाली गुडघ्यापर्यंतचा सर्व भाग गोदवून घेत असले तरी स्त्रिया सहसा गोदून घेत नाहीत. काही रानटी जातीत मात्र स्त्रियाच्या तोडावर गोदण्याची चाल आज आहे. पण एकमेकाच्या बायका पळविण्यात कसलाच विधि-निषेध न वाटणाऱ्या काळात, परीट कपड्यावर खुणा करतो तशा, बायका हुडकून काढण्यासही काही तरी खुणा लागत, आणि म्हणून तोडावर गोदण्याची चाल पडली असावी. असो. इतर ठिकाणच्या स्त्रिया गोदण्याचा उपयोग अगदी निर्वाणीचा उपाय म्हणून करतात आणि तो उपाय

' कधि करिशी लग्न माझे तुज ठावे ईश्वरा '

या अवस्थेतील मुली योजतात. लग्न लवकर व्हावे असे वाटले किंवा अमुकच इसम आपणास हवा अशी इच्छा असली तर गोल ठिपके देऊन एक त्रिकोण काढून घ्यावयाचा, अशी ब्रह्मी युवतींची रीत आहे. होता होईल तो हे गोदणे सहसा न दिसेल अशाच भागावर करतात. परंतु अशा सर्व बाबतीत सल्लामसलत देणारा ' साया ' (पंडित) असतो. तो कधी ओठावर तर कधी जिभेवरसुद्धा गोदून घेण्यास भाग पाडतो. युवकाना सुद्धा अशा गोदण्याने इच्छितप्राप्ति होते. वशीकरणाचाच हा एक गावठी प्रकार आहे की काय कोण जाणे.

ब्रह्मी स्त्रीजीवन इतके विस्ताराने सांगितल्यावर, त्याना धूम्रपानाची मोकळीक आहे, समाजात समान दर्जा आहे, इत्यादि पुनः सांगण्याची आवश्यकता नाही. त्याच्यात दोष असेल तर तो एकच. त्या स्वदेश सोडून सहसा बाहेर जाण्यास तयार नसतात. प्रेमळपणा, माहेरची ओढ आणि धार्मिक समजुतीचा जबर पगडा इत्यादिकामुळे अद्यापि पश्चिम दिशेकडे त्याची दृष्टि गेली नाही असे दिसते. मात्र सौंदर्य टिकविण्यात आणि ते वाढविण्यात त्या निसर्गतःच तरबेज असतात. कपड्याची स्वच्छता, नीटनेटका पोषाख, व्यवस्थित केशभूषा इत्यादिकाकडे त्या विशेष लक्ष देतात. परकेपणा असा त्याना कोणाबद्दलच वाटत नाही. बौद्धधर्माच्या शिकवणीने त्याचे अतःकरण खरोखरच उदार करून ठेवले आहे. म्हणून ' ही काळी बाई, हिच्याशी मी कशी बोलू ! ' अशी शंका देखील तिच्या मनांत येत नाही. याच कारणासाठी हिंदी मुसलमानाशी किंवा खिश्चनाशी लग्न करण्यास ब्रह्मी स्त्रिया तयार होत असाव्या. असो.

ब्रह्मी समाजातील दोन मोठे गुण घेण्यासारखे असतील तर त्याची चौग-पद्धति आणि फुजींचे अधिष्ठान. बुद्धविहार किंवा 'गाव देऊळ' म्हणजे चोग (Kyaung) होय. लहानसे का खेडे असेना तेथे चोग असावयाचेच. त्या चौगमध्ये बुद्धाची मूर्ति ठेवून पूजेअर्चेची सोय तर असतेच, पण पाथस्थाची राहण्याची व्यवस्था तेथे होऊ शकते. शिवाय फुजी—धर्मोपदेशक—तेथे राहतात व विद्यादानाचे महत्त्वाचे कार्य करतात चोगमधील शाळा मोफत असतात. आणि लोकात प्रस्तुत असलेल्या धार्मिक समजुतीप्रमाणे बहुतेकजण शाळेत दोन तीन वर्षे तरी मुलामुलीना पाठवितातच. चोगमध्ये राहणारे फुजी 'मधुकरी' मागून निर्वाह करितात. आणि काही गरीब विद्यार्थीही त्याच मधुकरीत आपले भोजन उरकतात मात्र सूर्योदयापूर्वी ठराविक प्रकारच्या भाड्यात मधुकरी आणावी लागते नतर पुनः 'भिक्षा देहि' करावयास जावयाचे नसते. शाळेत मुले दोन रागा करूनच असतात, पण त्यानी नीट बसलेच पाहिजे असा नियम नाही. उलट, आडवा पोटावर पडूनच प्रत्येकजण अभ्यास करताना दिसतो. तसेच शाळेत गोगाटाला महत्त्व अधिक. चीनमधील शाळाचा हा सस्कार असावा. छापील मूळाक्षरे अथवा 'लाकडी पाट्या' विद्यार्थी वापरतात त्याचे शिक्षक म्हणजे पीतवस्त्रधारी फुर्जा. फुजी होणे हा प्रत्येक पुरुषाचा धर्म आहे म्हणजे आयुष्यात प्रत्येकाने निदान चार महिने तरी पीतवस्त्र धारण करून शास्त्रातील कडक नियमानुसार आचरण केले पाहिजे. पूर्वी अर्थातच ही मुदत अधिक होती. पण हल्ली ती चार महिन्यावर येऊन ठेपली आहे. साधारणपणे मुलगा जाणतानेणता झाला म्हणजे तो फुजीची दीक्षा घेतो. आपल्याकडे मुजीला जितके महत्त्व तितकेच ब्रह्मी फुजी बनण्याच्या समारभाला देतात. हा समारभ थोडासा वेगळा आहे. आधी शक्य तितका डामडौल करून त्या मुलाची मिरवणूक काढली, आप्तेष्टाना मिष्टान्न चारले, म्हणजे मग मुज्या मुलाला नवे कपडे देऊन त्याची 'शेडी' काढतात आणि सन्याशाच्या डोक्याप्रमाणे सर्व शीर्षभाग तुळतुळीत करतात. फुजी बनल्यानतर विलासाना आणि भोगाना रजा द्यावयाची असते. इतर वेळी चित्रविचित्र रगाच्या लुग्या नेसणारे हे लोक फुजी झाले की, फक्त पिवळे वस्त्र आगावर घेतात आणि कमरेभोवती गुडाळतात. शिरस्त्राण असें ब्रह्मी जनतेत नसतेच. एक गुलाबी रेशमी रुमाल—हातरुमालाएवढा—

डोक्याला बाधण्याची चाल ब्रह्मी पुरुषांत आहे. पण अलीकडे शिरस्त्राण-विरहित जाण्याचा पथ आपणाकडे बोकाळला आहे, तसाच तिकडेही थोडा फार वाढलेला दिसतो. फुजीना मात्र मस्तक उघडे ठेवूनच जावे लागते. आधीच ब्रह्मा पुरुषाचे व ' कचा 'चे वाकडे. म्हणजे त्याच्या डोक्यावर फार केस उगवतच नाहीत. कदाचित् ते बायकाना नेहमी डोक्यावर बसवून घेतात म्हणून ही प्रतिक्रिया झालेली असेल. पण ब्रह्मी पुरुषाना मिशा जवळजवळ नसतातच, असे म्हणण्यात अतिशयोक्ति नाही. त्यामुळे सर्वांनी आधुनिक पद्धतीचे प्रतिदिनक्षौर अवलबिले असावे अशीच कल्पना होते. म्हणून फुजी झाल्यावर सन्यासी डोके करवावयाचे म्हणजे त्याना विशेष हाल वाटत नसावेत. फुजीनी पाळावयाचे नियम इतके कडक आहेत की, त्याची चेष्टा करावी असाही मोह एखादे वेळी व्हावयाचा विशेषत: स्त्रियाचे बाबतीत फुजींची अनुदार दृष्टि, ब्रह्मी उदार समाजव्यवस्थेत, विरोधानेच अधिक टीकास्पद होते. फुजीजवळ वस्त्रे, ' कमडलु ', भिक्षापात्र ही जशी ठराविक आयुधे असावयाची, तसाच एक ताडपत्राचा पखाही असतो. त्याचा उपयोग वारा घेण्यासाठी नसून कोठल्याही समुदायात स्त्रिया आलेल्या असल्या तर त्याचेकडे दृष्टि जाऊ नये म्हणून स्वत:चे तोडापुढे धरण्यासाठी करतात! पुष्पबाणाचा हल्ला परतविण्यासाठी ' ढाल ' म्हणून हे ' मोले उणे व्यजन पुढारी ' धरतात. पण हे ' पचशर ' कसल्याच ढालीला दाद देत नाहीत व ' अनग ' राहून देखील तो मदन त्रिभुवनविजयी होतो, हे बिचाऱ्या फुजीना कळत नाही! सकाळी मधुकरीला जावयाचे तेव्हा भिक्षा स्त्रीने घातलेली चालावयाची नाही. इतकेच काय, पण एका होडीत कोणी स्त्री इतर मुशाफरासमवेत असेल तर फुजीला त्याच वेळी त्या होडीतून प्रवास करता यावयाचा नाही. हल्ली आगगाडीचा प्रसार तिकडे झालेला आहे आणि बायकासाठी एक डबा खास राखलेलाही असतो. तेव्हा फुजी त्या गाडीतून प्रवास करतात की नाही हे समजणे कठीण आहे. कदाचित् त्यानी काही तोड काढली असावी. कुटुबीयात राहणे हे तर फुजीला वर्ज्यच असते!

दुसरी अशी एक गमत ' दक्षिणे 'सबधाने होते. पीतवस्त्रधाऱ्याने सुवर्ण किवा रौप्य याना स्पर्शही करू नये, अशी पूर्वापार चालत आलेली आज्ञा. तिचा मूळ हेतु असा की, द्रव्याचा अभिलाष त्यानी धरू नये किवा धन-

सचयही त्यानी करू नये. पण अलीकडे कांही काहीं फुजी पहावे तो नोटाचीं पुडकीं बेदिक्कतपणे जबळ बाळगतात किवा कोणा भाविकाकडून सुवर्ण वा रौप्यदान स्वीकारावयाचे झाल्यास त्या मौल्यवान् धातूचा 'स्पर्श' आपणास होऊ नये म्हणून ते हातावर एकादे फडके पसरतात. त्यावर कोणतेही नाणे टाकले म्हणजे फुजीला विटाळ होत नाही!* तशीच गोष्ट भोजनाविषयी आहे. फुजीनी मध्यान्हानतर अन्नग्रहण करावयाचे नाही अशी शास्त्राज्ञा असता भुकेने व्याकुळ झालेले हे बुद्धानुयायी घड्याळाकडे किवा सूर्याकडे न पाहता आपल्या शेजारच्या भिक्षूस विचारतात, 'काय रे, अद्यापि बारा बाजले नाहीत ना?' यावर तो उत्तरतो, 'छे, अजून अर्धा पाऊण तास सहज अवकाश आहे.' 'तेवढ्यांत दोन घास खाऊ या चल बघू!'


फुजीच्या जेवणातही धर्मशास्त्राच्या आज्ञा आडव्या येतातच. जेणेकरून केवळ शरीरपोषण होईल इतकेच साधे अन्न (स्निग्ध पदार्थ वर्ज्य करून) त्यानी खावयाचे असते. इतर ब्रह्मी बौद्धधर्मी असले तरी मासाहारी आहेत. त्याना कसलाच विधिनिषेध नसतो. परतु भात किवा शेवया याच्या जोडीला कादे व वाळलेली लसूण त्याच्या स्वयपाकात मनस्वी असते तसेच कोबळ्या बाबूचे ताजे कोब, आब्याचा, चिचेचा किंवा तसलाच कोवळा पालाही पुष्कळच खातात. ह्या कोवळ्या पाल्याची त्याची हौस इतकी दाडगी आहे की, चहा सुद्धा ते हिरवाच खातात! गुडाखूची किवा चिचेची ओली रास दुकानात इकड आपण पाहतो तशीच मोठी रास ब्रह्मी दुकानात ओल्या चहाची दिसते. आणि तो चहा चघळत राहण्याचीही सवय फैलावली आहे. आपण काही चागले जिन्नस (लाडू, करज्या, पुरणपोळ्या) इष्टमित्राकडे पाठवितो, तसाच समारभानिमित्त हिरवा चहा पाठविण्याची ब्रह्मी लोकाची चाल आहे. चहा पिण्याचे निरानेराळे प्रकार आपण ऐकले होते व काही तर प्रत्यक्ष पाहून किळस येण्यापर्यंत पाळी आली होती. पण त्या सर्वावर ताण करणारी रीत म्हणजे हिरवा चहा चघळत राहण्याची होय! म्हणजे कपबशीतून चहा पीत नाहीत असे नाही. ती फॅशन ब्रह्मदेशात रूढ झालीच

---

* विठाईच्या घराची 'पायरी चढणार नाही' अशी शपथ घेतलेल्या बगभटासारखीच ही अवस्था म्हणावी.

आहे. एका कपाने त्यांचें भागत नाही. त्यांना सबंध किटलीच लागते. आणि दुधाशिवाय बहुधा सामान्य लोक चहा पितात. असतु.

भोजनसमयी सर्व मडळी एकदम बसतात. मात्र एका पात्रांत त्यांचे भोजन होत नाही. मध्यभागी सर्व अन्न ठेवलेले असून त्यांतून प्रत्येकाने पाहिजे तसें आपल्या 'ताटलीं'त काढून घ्यावे अशी साधारण रीत असते. जेवतांना पाणी प्यावयाचे नाही असा जसा काही त्याचा पणच दिसतो. भोजनोत्तर मात्र पाणी पितात. तेथे भाडे एकच असते आणि त्यावर सुर्वांचें काम भागतें. या बाबतीत ब्रह्मी जनतेने इस्लामानुयायाचे अनुकरण केलें असे म्हणावें तर ब्रह्मी लोकांचा बुद्धधर्म पैगंबरापेक्षाही जुना. ठिकठिकाणी पाणी पिण्यासाठी कोणी धर्मात्मा दोनचार मडकी ठेवण्याची व्यवस्था करतो. त्यालाच साखळीने एक भाडे बाधलेले असते आणि त्याने येणाराजाणारानी खुशाल पाणी प्यावे व पाणी ठेवणाराला दुवा द्यावा. आमच्या कडील धर्ममार्तंड कोणी तिकडे गेले तर मात्र भ्रष्टाकार करणाऱ्या ह्या लोकोपयोगी जलस्थानाचा त्याना सताप येईल आणि ज्यानी ते ठेवले असेल त्याचा ते उद्धार केल्याविना राहणार नाहीत. असो. भोजनोत्तर मुख्य कार्यक्रम चिरूट फुंकण्याचा. त्यातही जेवणाप्रमाणे सर्व मडळी मोकळेपणाने भाग घेतात. मूल स्वतःच्या पायावर उभे राहू लागले (अर्थ शब्दशः घ्यावयाचा) म्हणजे त्याला चिरूट ओढण्यास मुभा मिळते. मग समोर बाप असो किंवा बापाचा बाप असो. स्त्रीपुरुष हा भेदाभेद न बाळगता चिरूट ओढावयाचा हीच तेथली चाल! हे चिरूट लाब म्हणजे निदान बीतभर असतात. गोल असा हा चिरूट ओठात धरला म्हणजे आधीच विचित्र दिसणारे ब्रह्मी लोक अधिक विचित्र दिसू लागतात आणि धूर सोडीत बोलण्याने त्यांची आधीचीच बोबडी भाषा अधिकच बोबडी होते. हे चिरूट घरोघर करतात. किंबहुना चिरूट वळतां येत नाहीत अशा मुलीचें लग्न होतच नाही असें समजावें! इतकी धूम्रसमिधा तयार करण्याची चाल घरगुती झालेली आहे. मात्र समाधानाची बाब इतकीच की ह्या चिरूटांत तबाखूच भरलेली नसते. तंबाखूच्या जोडीस एक प्रकारच्या लाकडाचे बारीक तुकडे, त्यांवर साखरेचें पाणी दिलेले असे असतात आणि त्यामुळे चिरूट मोठा असतो किंवा मुलें देखील तो ओढतात, एवढ्यानेच घाबरण्याचें कारण नाही. कांही झालें



चोगमधील फुंजी, शिक्षक व विद्यार्थी

तरी चिरूट तो चिरूटच! चिरूट तोंडात धरून सर्व कौटुंबीय मंडळी गप्पा-गोष्टी करीत बराच वेळ बसतात आणि मग विडा चघळण्यास घेतात. कारण विडा खाण्याचे व्यसन ब्रह्मदेशात बरेच फैलावले आहे. फुजी विडा खाताना सहसा दिसत नाहीत, पण चिरूट ओढताना मात्र ते बरेच वेळा आढळतात.

धर्मात्यक्ष म्हणून हे पीतवस्त्रधारी सर्वत्र मानले जातात. तात्पुरते 'फुजी' बनणारे नागरिक वेगळे आणि कायमचा सन्यास घेतलेले निराळे असतात. आपल्या आयुष्यातील काही काळ धर्मकारणी लागावा असे वाटणारे अधून-मधून 'फुजी' बनून चोगमध्ये जाऊन भिक्षावृत्तीने राहतात. पण अशाना मान कमीच असावयाचा नित्य फुजी आणि नैमित्तिक फुजी असे पाहिजे तर दोन विभाग कल्पावे. समाजात जाती किंवा दुसरी उच्चनीच वर्ग दर्शविणारी व्यवस्था ब्रह्मदेशात नसली तरी सर्वांपेक्षा फुजी श्रेष्ठ हे मात्र सर्वत्र खरे आहे. फुजीच्या गुणावरून किंवा अगच्या करामतीवरून आणि सन्यासकालावरून त्याच्या पायऱ्या ठरविल्या आहेत. त्या सर्व फुजींचा मुख्य म्हणजे 'राजगुरु' व तो नेहमीच राजधानीत रहावयाचा. पण हल्ली राजा नसल्याने ही परंपरा तुटली असे झाले नाही. मुख्य फुजी मंडाले येथे राहून सर्वदेशीय धार्मिक चळवळीवर देखरेख करितो. फुजीच्या अंगी नसलेलेही कित्येक गुण ब्रह्मी भक्तांनी त्याना चिकटविले असल्याने फुजी हा त्या समाजात आवश्यक असा घटक होऊन राहिला आहे. एक वेळ आमच्या समाजातील भटजींचे वर्चस्व कमी होईल किंवा भटजीबुवाशिवाय आमची सर्व कार्ये पार पडू शकतील, पण ब्रह्मी भक्ताचे तसे व्हावयाचे नाही. कित्येक जरूरीच्या तर काही अनवश्यक अशाही बाबतीत **'फुंजीवचनं प्रमाणम्'** अशी स्थिति तेथे आहे. आमच्याकडे भटजीचा वर्ग म्हणून जो आहे त्याची आवश्यकता केवळ धार्मिक विधीपुरतीच असल्याने त्याची एवढी मातब्बरी नाही. यद्यपि राजकारणात किंवा सार्वजनिक चळवळीत 'बामणा'चीच भरती दिसते, तत्रापि हे 'चळवळे' ब्राह्मण आणि धार्मिक कार्याचा मक्ता असलेले भटजी (तेही ब्राह्मणच, हे खरे) एक नव्हत. त्याचे दोन वेगवेगळे गट आहेत. म्हणूनच पारमार्थिक लाभ साधून देणारे 'दलाल' भटजी व ऐहिक जगाच्या भानगडीत समाजाचे नेतृत्व पत्करणारे पुढारी याच्यामध्ये ऐहिकानाच महत्त्व द्यावे लागेल. आणि समाज ते तसे देत

असल्याचे दिसतेही. परतु ब्रह्मी धर्मगुरूनी ऐहिक व पारमार्थिक अशी कार्याची फारकत होऊन्च दिली नाही. पारमार्थिक हिताच्या गोष्टी बोलणारे सन्यासीच आज ब्रह्मदेशात प्रमुख पुढारी असून राजकारणात त्याचे महत्त्व मुळीच कमी नसते त्याना सन्यासी म्हणून म्हणता येते. मात्र त्याची वस्त्रे भगवी नसून पिवळी असतात. नाही तर असे म्हणता आले असते की, भगवी वस्त्रे सन्यासनिदर्शक जशी आहेत, तशीच राजकारणी आग्वाड्यातील 'लाल' मातीचीही ती सूचक का मान नयेत? धर्म व राजकारण एक करावी की नाही—ती एक होणे कसे शक्य आहे? इत्यादि वितडवाद हल्लीच्या परिस्थितीत पुष्कळ निघाले आहेत. आणि ब्रह्मदेशीय समाज-स्थितीत त्या प्रश्नाचे व्यावहारिक उत्तर आढळते, अस म्हणण्यास प्रत्यवाय नाही. मात्र इतके खरे की, ह्या धर्मगुरूना थोडे अधिक शिक्षण असते किवा त्यानी बाह्य जगाशी किंचित् जरी सबध ठेवला असता तरी आधुनिक जगातील कितीही पराक्रमी व शस्त्रास्त्रसपन्न राष्ट्राला पुरून उरण्याची धमक त्यानी आपल्या राष्ट्रात उत्पन्न केली असती. खेदाची गोष्ट एवढीच की, आज-मितीस तुटपुज्या ज्ञानाचे धर्मगुरु, राजकारणात बरेच उच्च स्थान पटकावून बसले आहेत. नाही तर ब्रह्मदेशविभागणीस खरा विरोध ताबडतोबच करून गोलमेज परिषदेच्या ठरावाचा धुव्वा उडविणे त्याना काही कठीण नव्हते. ब्रह्मी 'गोत्रा'च्या पण 'इन्नेस'शास्त्रीय प्रतिनिधीचीच निवडणूक मडलाकार परिषदेसाठी झाली तेव्हा, किवा ती मडळी विलायतेस गेली तेव्हा, ब्रह्मदेशा-तील खरेखुरे पुढारी (म्हणजे विभागणीविरुद्ध पक्ष) अगदी झोपल्यासारखे वागले. आणि आता ब्रह्मदेशाविषयी निर्णय लडनमध्ये पोट-कमिटीने ठरविला, तेव्हा त्यानी विरोधाची तार पाठविली. नतर सभा केल्या. असो हे साग-ण्याचा मथितार्थ इतकाच की, समाजातील अनुपमेय स्थान फुजीना लाधलेलें आहे, त्याचा भरपूर फायदा घेण्यास लागणारे ज्ञान त्याचे अगी नाही. परतु बदलत्या परिस्थितीतसुद्धा आपणावरील जबाबदारी ओळखून फुजीनी राज-कारणात भाग घेण्याचे जे व्यवहार्यचातुर्य दाखविले त्याबद्दल त्याना खरोखर धन्यवाद दिले पाहिजेत. धर्माज्ञाचा अर्थ नीट लावण्यास देखील नुसत्या भाषाज्ञानापेक्षा अधिक शहाणपणाची जरूरी असते व ती जुन्या कल्पनानाच कवटाळून बसणाराना बहुधा नसते, असे आपणास दिसून येते. तसे ब्रह्म-

देशात घडले नाही, ही त्या समाजाची कार्यक्षमताच म्हणावयास काय हरकत आहे?

फुजीची ही परपरा आजतागायत चालू शकली, याबद्दलचे श्रेय एकट्या पीतवस्त्रधारी जनासच देता येत नाही. ब्रह्मी जनतेकडे त्या श्रेयप्राप्तीचा अर्धा वाटा जातो. कारण जनतेने अशा धार्मिक पुरुषास पोसण्याचे नाकारले असते तर त्याच्या हातून झाली ती कामगिरी कशी घडली असती? आज देखील ब्रह्मदेशात लोकाची दानधर्माकडेच अधिक प्रवृत्ति आहे. आपण पैशाची पुरचुडी बाळगून ठेवावी, किवा 'मरावे परी मुर्तिरूपे उरावे' अशा प्रकारची विचारसरणी ब्रह्मी समाजात रुजतच नाही असे दिसते. आपणास काही पैसे मिळाले किवा लभ्याश झाला तर लगेच त्यातील बराचसा भाग एगाद्या चोगल्या व्यवस्थेसाठी देऊन टाकतात. नाहीतर पॅगोडावर घटा लावण्यात, मर्ति उभारण्यात अथवा वाटेत पाथस्थाना पिण्यासाठी पाण्याची व्यवस्था करण्यात खर्च करण्याची पद्धत आहे. कौटुबिक सुखापेक्षा सार्वजानिक हिताकडेच त्याची दृष्टि अधिक दिसते. कदाचित् पूर्ण विचारान्तीच हे वर्तन त्याचे हातून घडत असावे, अथवा केवळ वाडवडिलानी केले तसेच आपण करावे ह्या अधश्रद्धेने, इष्टानिष्ट विचार न करतामुद्धा, त्याचे हातून असला 'परोपकार' होत असेल. पण त्याची ही वृत्ति आहे यात सशय नाही. 'सावकार' अशा अर्थाचा शब्दच ब्रह्मी भाषेत नाही आणि ब्रह्मी समाजरचनेतही त्याला स्थान नाही. म्हणून ब्रह्मदेशात सावकारीचा प्रवेश हिदुस्थानशी तो निगडित झाल्यापासूनच झाला आणि मद्रास इलाख्यातील 'चेट्टी,' 'दक्षिणार्य भिक्षुकगण पळत सूटला' तसे सावकारी करण्यासाठी तिकडे धावले. ब्रह्मदेशात चेट्टीचे भाडवल किती आहे याची कल्पना मागे दिलीच आहे, परतु त्याचा प्रसार कसा सार्वत्रिक झाला आहे याची प्रचीती पटण्यास इतकेच सागावयास पाहिजे की, कोठल्याही गावापासून जास्तीत जास्त म्हणजे एका दिवसाच्या मजलीत कोणा ना कोणा तरी चेट्टीचें घर सापडलेच पाहिजे! आपल्याकडे मारवाड्याचा जसा प्रसार झाला आहे तशाच प्रकारचा ब्रह्मदेशात चेट्टीचा. किबहुना इकडच्यापेक्षा तिकडेच अधिक!

पण अशाही परिस्थितीत ब्रह्मी समाजाने आपली सामाजिक दानधर्माची कल्पना बदलू दिली नाही. कदाचित् धार्मिक कारणामुळे असो अथवा

पिढ्यान्‌पिढ्याच्या सस्कारामुळे असो, दागदागिने, जमीनजुमला किंवा इमारती वगैरेत पैसे गुतवावे आणि आपल्या मुलाच्या मागची ददात नाहीशी करावी असल्या विचारसरणीचा ब्रह्मी जनतेवर पगडा बसूच शकला नाही. फक्त कपडे आणि इतर राहणी सोडली तर त्याच्या मनावर बौद्धधर्मीय वैराग्याचा परिणाम झालेला स्पष्ट दिसतो. ब्रह्मी घरात आकर्षक असे काही वाटावयाचेच नाही. बाधणूक, सुबक रचना अथवा बाह्यांग अशा कशातही ब्रह्मी घरे डोळ्यात भरत नाहीत. घराच्या बाधणीत 'कमान' असणे म्हणजे चेनीचे व वैराग्याभावाचे लक्षण असल्याने ब्रह्मी घराना कमान अशी नसतेच. मात्र थोडक्यात सर्व आटोपशीर काम केलेले म्हणून ती लाकडी घरे पाहण्यात कौतुक किंवा कुतूहल असेल तेवढेच! पण वाडे, बगले, किंवा चाळी बाधण्यात सुद्धा जे रचनाचातुर्य आपण अपेक्षितो ते ब्रह्मदेशीय घरात मुळीच आढळत नाही. घरे, तिकडे कारागिराचा अभाव म्हणावा तर पॅगोडा, चौग किंवा बुद्धाच्या प्रचड मूर्ति असल्या ठिकाणी दिसून येणारे अप्रतिम कौशल्य पाहून आपण आश्चर्यातिशयाने थक्कच होतो! कोरीव नक्षीकाम, मूर्तींची घडण, बाधेसूदपणा, त्याचा भव्य आकार, कल्पनातीत उची, प्रत्येकीला उभारलेले नक्षीदार छत, मूर्तीवर घातलेले रगीत दागिने व भूषणे वगैरे पाहून असे कारागीर अन्यत्र मिळणार नाहीत हा विचार मनात येतो आणि तिकडे घरे पहावीत तर अगदी म्हणजे अगदीच साधी! त्यात टापटीप असते, आटोपशीरपणाही एकदम दिसतो. थोडक्यात बिऱ्हाड थाटून सर्व व्यवस्था करून घेण्याचे ब्रह्मी गृहिणीचे कौशल्यही नजरेस पडते. परतु याबद्दल ब्रह्मी स्थापत्यविशारदाची किंवा कुशल कारागिराची आठवण न होता गृहिणीच्या गृहदक्षतेची होते. यावरून हेच अनुमान निघते की, जी काय कला-कुसरता दर्शवावयाची ती देवासाठी देवालयात किंवा फुर्जीच्या चौंगमध्ये. घरगुती राहणीत साधेपणाच ठेवावयाचा. ही विचारसरणी राजपुत्र सिद्धार्थाच्या अनुयायाच्या मनात मुरून राहणे अशक्य नाही.

त्याची घरे सर्व लाकडाची असतात. याची कारणे दोन असावीत. एक लाकूड सुबलक व म्हणून स्वस्त मिळते. आणि दगड, विटा वगैरे बाध-कामास लागणारे सामान सहजासहजी मिळत नाही. दुसरे, वरचेवर होणाऱ्या धरणीकपामुळे घराना धक्का पोहोचू नये ही तरतूद. कारण ब्रह्मदेशात

धरणीकप म्हणजे बेळगाव-धारवाडकडे प्लेग किंवा कॉलरा जितका नित्याचा तसेच होत! कित्येक घरे जमिनीपासून ८–१०–१५ फूट उंचीवर 'बाधलेली' असतात. म्हणजे लाकडी खाबावर तो घराचा साचा उभारलेला असतो. घर सर्व लाकडी ही कल्पनाच आपणाकडे यावयाची नाही. तक्तपोशी एक वेळ लाकडी असते किंवा खोल्यामध्ये 'पडद्या' लाकडाच्या उभारतात, हे बऱ्याच जणाना ठाऊक आहे. पण सबध घरच लाकडी, ही कल्पना महाराष्ट्रात तर मुळी करणेच कठीण जाईल. ओढनताणून साम्य दर्शवावयाचेच तर रेल्वे क्रॉसिंगच्या ठिकाणी किंवा इतरत्र देवडीवाल्या-(गेट कीपर)साठी उभारलेल्या लाकडी घराचे दर्शविता येईल. तशीच पण पाहिजे तितकी मोठी घरे अथवा लाबच्या लाब चाळी येथून तेथून सर्व लाकडाच्या 'बाधलेल्या' पाहून एकदम आश्चर्यच वाटते. कारण सुदर, मजबूत व उठावदार इमारत म्हटली की, चिरेबदी अथवा निदान पक्क्या विटानी तरी ती बाधलेली असलीच पाहिजे, असा आपला मनातच सकेत ठरून गेलेला आहे. घरे बाधण्याची ही निराळी तऱ्हा आपणास फारच विचित्र वाटते, पण उत्तर हिदुस्थानातही अशीच आश्चर्य वाटणारी दुसरी एक पद्धत आहे. तिकडे सर्व बाधकाम दगडाचे करतात. म्हणजे काही काही दरवाजे सुद्धा दगडी असतात. त्यामुळे लाकडांचा घरबाधणीत उपयोग होतो हें देखील तेथील रहिवाशाना नवीन शोधाप्रमाणे वाटते. याचे प्रत्यतर काशीतील 'काठकी हवेली' म्हणून जो प्रचड पेशवाईवाडा आहे त्याच्या नावात सापडते. काशीत बहुतेक घरे दगडाचींच बाधलेली आहेत. खिडक्याची किंवा दुसरी दारे मिळाली तर लाकडी घालतात. याचे कारण तिकडे इमारती लाकूड कमी हे तर आहेच, पण दुसरे म्हणजे वाळवीची भयकर भीति हेही कारण लाकूड कमी वापरण्यात आहेच. म्हणून 'लाकूड वापरून बाधलेली हवेली' असे पेशव्याच्या वाड्यास म्हणतात. (काठ = काष्ठ, हवेली = इमारत.) इतरत्र सर्व घरे दगडाचीं असता हे एकच घर लाकूड घालून बाधले गेल्याने तत्रस्थाना आश्चर्य वाटून त्यानी 'लाकडाचे घर' असे त्या इमारतीस म्हटल्यास वावगे काहीच नाही. अशा काशीवासियाना ब्रह्मदेशांतील लाकडी घरे आणि त्यात सुखाने ससार करणारे ब्रह्मी लोक पाहून काय वाटेल बरे?

ते असो. तो विचार आपणास तूर्त करावयाचा नाही. लाकडी घराचे फायदे किंवा तोटे काय आहेत हे आटोपून आपली लाबलेली ही समाज-पाहणी संपविली पाहिजे अशा घरात स्वयपाक करावयाचा म्हणजे खरो-खरच एखादे वेळी पंचाग्नि नव्हे 'पंडाग्नि'—साधन करण्याचा प्रसग यावयाचा. पण बर्फमय प्रदेशात राहणारा जसा हिमवृष्टीपासून सरक्षण करण्यात जन्मत.च तरबेज बनतो तशीच गोष्ट ब्रह्मदेशातल्या काष्ठगृहात राहणाराची आहे. स्वयपाकघरात जेथे प्रत्यक्ष चूलबाईची बैठक असते तेथे मातीचा ओटा घातलेला असतो आणि आजूबाजूला ठिणगी उडून देण्यात ब्रह्मी गृहिणी दक्षता बाळगतात. शिवाय त्याच्याकडे स्वयपाकातही स्त्रियाना फार वेळ घालावा लागत नाही. आणि तितका वेळ, बाहेरचे सर्व उद्योगधंदे स्त्रियासच आटोपावयाचे असल्याने, देऊन त्याचे चालणारही नाही. स्वयपाकघरात भांडी ताम्यापितळेची नसून मृत्तिकापात्रासच प्राधान्य दिले जाते. ह्या भाड्यात आणि साऱ्या गाडग्यामडक्यात मात्र पुष्कळच फरक असतो त्याना एक प्रकारची जिल्हई दिलेली असल्याने त्यातून पाणी झिरपत नाही किंवा ती लवकर फुटतही पण नाहीत. त्यात पुन्हा सुबक घाट, मोहक आकार अशा कलाकुसरीची भर पडते. नदीकाठच्या शहरात कुभकाराची कला बरीच परिणत झालेली आढळते. हा अनुभव सयुक्त प्रातातील शहरा-वरून आपणास येतोच. याचे कारण नदीकिनारी अनायासे मिळणारी मऊ माती. असो.

ब्रह्मी घरात आणखीही दोन सोई प्रामुख्याने कराव्या लागतात. गृह-देवतेची म्हणजे गृहाधिष्ठित नॅट्ची राहण्याची जागा राखून ठेवावयाची ही एक आणि दुसरी देखील गृहदेवतेचीच सोय आहे घरातली चालतीबोलती जी 'देवता' असते तिचे किरकोळ सामानविक्रीचे छोटेसे दुकान असते. त्याची सोयही घरातच करावी लागते. नॅट्ला नेहमी दक्षिण दिशा प्रिय असल्याने त्या बाजूच्या खाबावर तो बसलेला असतो, अशी समजूत रूढ आहे. आणि म्हणून घरात गेल्याबरोबर त्या खाबावर पल्लव-फुले वगैरे टाकलेली दिसतात. गृहिणीची दुसरी सोय घरात प्रवेश करतानाच केलेली दिसून येते. इतर घरापेक्षा किंचित् सखलात असलेले हे छोटेखानी दुकान बहुतेक प्रत्येक घरातच असते. कारण प्रत्येक गृहिणी दुकानदार—(रीण?)

बनून कसला ना कसला तरी व्यापार करतेच. तिच्या दुकानात रोजची उलाढाल फारशी झाली नाही तरी गप्पाचा अड्डा जमण्यास ती जागा सोईची वाटते. आणि ब्रह्मी स्वभावास चकाट्या पिटणे हे फार रुचते. काही घरात दुसरीही एक सोय साधतात. पाण्याची विपुलता असल्याने पाणथळ जागा काही कमी नसतात. आणि घरे बाधताना ती जमिनीला लागून कधीच बाधावयाची नाहीत ही त्याची चाल. तेव्हा अनायासे पाण्यावरील लाकडी हवेल्या 'उठविता' येतात. मात्र त्या तरत्या नसतात. ज्या खाबावर घर उभारलेले असते ते खाबच मुळी पाण्यात रोवतात. त्यामुळे रोज लागणारे अन्न–परसातून भाजीपाला सहज तोडून आणतात त्याप्रमाणे– घरात बसून मिळविता येते. वर बसून खाली पाण्यात जाळे टाकले अथवा हूक सोडला की काम भागते. 'खाटल्यावर बसून' खाणे मिळते! कारण तादूळ आणि 'पाणशेगा' असल्यावर आणखी खाणे ते काय पाहिजे? शेवया शिजवून काद्याबरोबर किवा नुसत्या तशाच खाण्याची ब्रह्मी जनतेची आवड कित्येक युरोपियनाना अत्यत गलिच्छ व विचित्र वाटते. कारण शेवया म्हणजे हातानी केलेला पिठाचा पदार्थ आहे अशी कल्पनाच त्याना करवत नाही!


ब्रह्मी भाषा ही वेगळी आहे. तिची लेखनपद्धतीसुद्धा निगळी आहे. यावनी लिपीप्रमाणे उलट्या बाजूने ती लिहितात, असा याचा अर्थ नव्हे. तर देवनागरीशी कसलेही नाते न जुळणारी अशी ती आहे. अक्षरांचे वळण वर्तुळाकार असते. कित्येक वेळा बहुतेक अक्षरे म्हणजे वर्तुळेच होत, असे समजण्यास प्रत्यवाय नाही मात्र भेद दर्शविण्यासाठी वर्तुळाचा भाग वेगवेगळ्या ठिकाणी काटलेला असतो असे म्हणता येईल. ब्रह्मी भाषेचा दुसरा विशेष म्हणजे ती एकाक्षरयवी आहे हा होय. 'खा, पी, तू, मी, ज' असे काही एकाक्षरी शब्द आपल्या भाषेत आहेत, परतु ब्रह्मी भाषेत बहुतेक भरणा अशाचाच असल्याने ती ऐकणे खरोखरच गमतीचे वाटते. शिवाय हेल काढून बोलणे शिष्टसमत समजतात. त्यामुळे तर विशेषच मौज येते. ह्या भाषेचा आणखीही एक महत्त्वाचा विशिष्ट गुण म्हणजे तिचे उच्चार फार अस्पष्ट आहेत. उच्चारानुसारी भाषा लिहून घेऊ म्हटल्याने साधणार नाही म्हणून 'गुरुमुखाविना' ब्रह्मी भाषा उच्चारता येणे अशक्यच आहे. श्रवणेंद्रिय

तीक्ष्ण व सूक्ष्म भेदाभेद ओळखण्यात पटाईत करून ठेवले आणि वाटेल तसे ओठ हलविता येत असले तरच ब्रह्मी भाषा नीटपणे बोलण्याचा अभ्यास करता येईल, एरवी नाही. एकाच तऱ्हेने लिहिलेले पण उच्चार बेगबेगळे होणारे किती तरी शब्द ब्रह्मी भाषेत आहेत आणि उच्चाराप्रमाणे अर्थही बदलतात. म्हणून ब्रह्मी भाषा शिकणे हे कठीणच काम दिसते.

आपणास बोलता आली नाही किंवा समजली नाही तरी ब्रह्मी भाषा ऐकत बसण्याने पुष्कळच करमणूक होते. ह्या भाषेचा आणि संस्कृताचा कांही संबंध जुळतो का ते पाहणे मनोरंजक आहे. संस्कृत व ब्रह्मी ह्या भाषांचा तुलनात्मक अभ्यास केला तर ब्रह्मी लोक बोबडे आहेत असे दिसते. म्हणजे **'गाला उलोनि पलला, सल्व खले नवल कलितसां काय'** ही जशी बालगोपालाची 'अव्यक्तवर्णरमणीय' भाषा तशीच दुसरीही असते. 'र' चा किंवा 'श, ष, स' याचा उच्चार जेव्हा नीट करता येत नाही तेव्हा मुले 'वसता' म्हणण्याऐवजी 'वथता' म्हणून हाक मारतात किंवा 'मुरलीधर'चे स्वरूप बदलतात. तसाच काही अंशी प्रकार ब्रह्मी भाषा-भाषीचा झालेला दिसतो. 'ललतां हलिनेचि झालिला पाय' अशापैकी 'लडयोरभेदः' ते करीत नाहीत. किंवा उत्तर हिंदुस्थानात 'पूडी-कचोडी' म्हणताना 'र' ऐवजी 'ड' वापरतात तसाही भेद त्याचे हातून होत नाही. तर विशेषतः र, श, ष, स आणि क्वचित् प्रसंगी 'च' याऐवजी अनुक्रमे, य, स, त, थ व स असा अक्षरभेद केलेला आढळतो. उदाहरणार्थ, ब्रह्मी महिन्यांची नांवे पाहू—

(१) मेथ, (२) प्येथ, (३) मेदोन्, (४) करकट्, (५) थीन, (६) कन, (७) तु, (८) प्येत्स, (९) नु, (१०) मकय, (११) कोन, (१२) मेन.

ही बारा नावे नेहमीच्या प्रचारातली नसून आपणाकडे 'इंदुवासर, भृगुवासर' ही जशी शिष्टजनाच्या मुखात असतात, तशीच महिन्यांची वरील नांवे होत. थोडासा विचार केल्यास ती बारा राशींची नावे असल्याचे आढळून येईल. प्रत्येक महिन्याला 'याथी'चे म्हणजे राशीचें नांव दिलेले दिसते. तीच गोष्ट 'उतू'ची (ऋतूची) आहे. 'हेमत' उतु, 'गेमत' उतु आणि 'वथत' उतु असे तीनच ऋतु ब्रह्मीजन



चात्रान चौगमर्धाल वृद्ध फुजी

ओळखतात. त्यांची नावे कशी आली हे समजण्यासारखेच आहे. मात्र त्याच्या वसतात आणि आपल्या वसतात फार फरक आहे. आपणासारखे शुक्लकृष्ण पक्षही त्यांचेकडे प्रचलित आहेत. मेन वद्य ते करकट् शुद्ध अखेर 'गेमत,' करकट् वद्य ते ग्येत्स शुद्ध अखेरचा 'वथत' आणि उरलेल्या चार महिन्यातील 'हेमत' अशी वाटणी ब्रह्मी करतात. म्हणजे 'गेमत' हा उन्हाळा व 'वथत' हा पावसाळा असा तिकडील शिरस्ता दिसतो. 'हेमत' मात्र आपल्या हिवाळ्याशी जमतो. त्यांची वर्षगणना चाद्रमानाने असल्याने महिन्याचे दिवसही नक्की नसावेत असे वाटते. पण सोईसाठी ब्रह्मी ज्योतिष्यानी एका महिन्यात २९ व दुसऱ्यात ३० दिवस असे प्रमाण ठरवून टाकले आहे. त्यामुळे क्षयवृद्धीचा फारसा घोटाळा उडत नाही. तसेच दर तीन वर्षांनी 'धोंडा' यावयाचा, तो महिनाही ठरलेलाच आहे. 'करकट्'च नेहमी (म्हणजे तीन वर्षांनी एकदा) अधिक असावयाचा. त्याला ते 'दुतीय' (द्वितीय) असे म्हणतात.

दिवसाची नावे देखील आकाशस्थ ग्रहावरून पडलेली दिसतात. 'यवि' (रवि), 'सद' (चद्र), 'इग' (मगळ), 'बोद्द' (बुध), 'ग्येपति' (बृहस्पति), 'थौक्य' (शुक्र), 'सने' (शनि), अशी दिवसाची नावे आहेत. दिवसगणनेत एक महत्त्वाचा भेद आहे तो असा की, बुधवारला दोन नावे देऊन एका दिवसाचे दोन भाग कल्पिले जातात. सूर्योदयापासून नव्या दिवसास आरभ न होता मध्यरात्रीनंतर होतो. म्हणून रात्री १ ते दुपारी १२ पर्यत बुधवार व नतर मध्यरात्रीपर्यत 'याहू' (राहू) असे म्हणतात. ही नावें सस्कृतची विकृत स्वरूपेच होत. ती कशी झाली किवा त्यापासून काय अनुमान काढावयाचे हे अर्थात्च तज्ज्ञाचे काम आहे. मला त्यातील काहीच कळत नाही.

ब्रह्मदेशाचे कोणतेही वर्णन तेथील पॅगोडाविषयी लिहिल्यावाचून पुरे होऊ शकत नाही. किबहुना असेही म्हणता येईल की, ब्रह्मदेश म्हणजेच पॅगोडाचा प्रदेश होय. ब्रह्मी लोकाच्या राहणीत त्याचे कपडेलत्ते बगळल्यास अत्यत साधेपणा असतो हे मागे सागितलेच. त्यांची घरे तर अगदी साधीं म्हणजे झोपडीवजाच असतात. कलाकुसरीला त्यांत कोठेही स्थान नसतें. परतु ह्या साधेपणाचे उट्टे ब्रह्मी पॅगोडात निघतें असे म्हणता येईल. पॅगोडा-

साठी खर्चिलेले द्रव्य अगणित असते आणि ते सर्वस्वी सार्वजनिक रीत्या गोळा होते. पॅगोडा बाधण्यासाठी स्थापत्यशास्त्रकोविदाना बरेच परिश्रम घ्यावे लागतात. तेथील कारागिरी, सुवर्णाचा लेप देण्यात दाखविलेले कौशल्य, पॅगोडाच्या उच्च शिखरावर रत्नजडित सुवर्णघटा टागून ठेवण्याची अजब करामत, प्रचड बुद्धमूर्ती कोरण्यास व त्या नाना भूषणानी भूषविण्यात लागणारी सौदर्य-समीक्षता इत्यादि गुणाचे एकसमयावच्छेदेकरून भरणारे प्रदर्शन म्हणजे हे पॅगोडाच होत, असें म्हणता येते. पॅगोडा म्हणजे आपणाकडे बुद्धाचे स्तूप कार्ला-साची येथे जसे आहेत तसलेच पण थोडया फरकाने व श्रीमतीने सजविलेले, स्तूपच होत. गौतमबुद्धाच्या शारीरिक अवशेषावर, त्याच्या वापरातील साहित्यावर, गौतमप्रणीत किवा अन्यानी रचिलेल्या धर्मग्रथावर अथवा बुद्धमूर्तीवर हे स्तूप रचले जातात. त्याना बुद्धधर्मात अत्यत महत्त्वाचे स्थान आहे. कारण या समाधीचा नित्यदर्शनासाठी उपयोग होतो, आणि नवविधा भाक्ति पॅगोडाच्या रोखानेच भक्ताच्या अतःकरणातून वाहू लागते. निरनिराळ्या देवता नसल्याने बुद्धधर्मीयाचे पूजनअर्चन वगैरे अशा पॅगोडातच होते. म्हणून मूळ स्तूपाभोवती बुद्धाच्या अनेक आकाराच्या मूर्ती बसविलेल्या असतात, व तेथे नित्यशः भक्तगणाची रहदारी चालू असते. ह्या पॅगोडासबधाने हल्लीच्या चिकित्सकबुद्धीच्या काळात काही विचक्षणी लोकाच्या मनात शका येतात. याचे कारण असे की, गौतमबुद्धाच्या शारीरिक अवशेषावर बाधलेले स्तूप ब्रह्मदेशात व दक्षिणेकडील इतर बेटातही पुष्कळ आढळतात. उदाहरणार्थ, त्याच्या दातावर उभारलेले एकदर स्तूप घेतले तर गौतमबुद्धास शेकडो दात होते, असे मानण्याचा प्रसग येईल. हीच गोष्ट त्याच्या वापरण्यात आलेल्या कमडलु, भिक्षापात्र इत्यादि उपकरणाची आहे. परतु, धर्मसस्थापकाचे ठायी त्याच्या अनुयायाची असलेली उत्कट भाक्ति लक्षात घेतली तर ह्या गोष्टीत आश्चर्य बाटण्याचे कारण नाही. येशू ख्रिस्ताचे बाबतीतही युरोपांत अशाच गोष्टी सागतात. हा आकाशातील बाप जेव्हा क्रूसावर चढला—नव्हे त्याला खिळयानी तेथे जखडून टाकले— तेव्हा उपयोगांत आणलेल्या खिळयांचे महत्त्व ख्रिस्तानुयायात साहाजिकच वाढले. आणि 'त्या बेळचे खिळे आमच्याजवळ आहेत' अशी सात्त्विक बढाई प्रमुख प्रमुख ख्रिस्त मंदिरांतील धर्माध्यक्ष मारूं लागले. ख्रिस्ताला टागण्यासाठी उपयोजिलेले

म्हणून प्रसिद्ध असलेले, सर्व युरोपातील देवालयामधील हे खिळे एकत्र केले तर खडोगणती भरतील, अशी ख्रिस्तानुयायाचीच कबुली आहे. साराश काय की, असल्या धार्मिक भावनेच्या बाबतीत शास्त्रीय चिकित्सेची कसोटी लावाबयाचा नसते.

असो. पॅगोडाभोवती गातमबुद्धाच्या भिन्न भिन्न आकाराच्या मूर्ती असतात म्हणून म्हटले त्या अर्थातच स्थानमाहात्म्यावर अवलबून असतात. कारण देवालय बाधणे ही जशी आपणाकडे पारमार्थिक लाभ साधून देणारी बाब मानतात, तशीच तिकडेही. पण ज्या मानाने पॅगोडाला महत्त्व त्या मानानेच अधिक महत्त्व तेथे उभारलेल्या बुद्धमूर्तीना असणार व त्या प्रमाणातच बाधणाराला श्रेय किवा पुण्य अधिक मिळणार अशी कल्पना भाविकाची असते. खुद्द ब्रह्मदेशातच काय, पण आजूबाजूच्या सयाम, इडोचायना, मलाया इत्यादि भागातही श्वे डेगॉन पॅगोडाइतके महत्त्वाचे आणि धार्मिक श्रेष्ठतेचे दुसरे स्थान नाही. त्यामुळे सर्वात अधिक मूर्तीची गर्दी तेथेच व्हावी, हे ओघाओघानेच येते. तेव्हा ह्या स्तूपराजाचे वर्णन थोडे विस्ताराने केल्यास ब्रह्मी जनतेच्या मनातील महत्त्वाच्या भावनाचीही आपणास ओळख होईल. श्वे डेगॉनचा पौराणिक इतिहास फार प्राचीन काळापासूनचा असून अनेक दतकथाचा त्याच्या रचनेशी सबध येतो. त्या गलबल्यात तूर्त न पडणेच बरे. हा पॅगोडा रगूनमध्ये एका लहानशा टेकडीवर उभारलेला असून बराच उच आहे. सुरुवातीला त्याचा परीघ सुमारे पाव मैल (१३५० फूट) असून ३७० फूट उचीपर्यत तो चढविला आहे. अर्थातच घेर कमी होत गेलेला असून शिखरावर एक भले मोठे छत्र बसविलेले आहे. त्या छत्राभोवती अनेक घटा आहेत, व इतक्या उचीवर सहजच येणाऱ्या वाऱ्यामुळे त्या एकसारख्या मजुळ ध्वनि करीत असतात. हा उच शिखर असलेला जगी स्तूप खालपासून वरपर्यत सोनेरी वर्खाने मढविलेला दिसतो. पचमहाभूताना दाद न देता सोनेरी रग कायम टिकविणे ही कमी खर्चाची बाब नव्हे. तसेच शिखराबर उभारलेले छत्र अत्यत वजनदार हवे म्हणून आतून लोखडाचे असले तरी हिरेमाणकाचे कोदणे करता यावे म्हणून जाड सोन्याच्या पत्र्याने मढविलेले आहे. हे रत्नखचित छत्र अर्थातच सर्व पॅगोडात मौल्यवान् असते. श्वे डेगॉन पॅगोडावरील छत्राची किमत पूर्वीच्या हिशेबाप्रमाणे सातआठ लाख

रुपये तरी व्हावी अमा, ते छत्र पाहिलेल्यांनी अदाज केलेला आहे. कारण इतक्या उंचीवरील शिखराभरणाची खरी किमत खाल्न पाहणारास येणे शक्य नाही.

श्वे डेगॉन पॅगोडाचे भोवती आणखीही काही आवारे बांधलेली आहेत. त्यात भाविक लोक पूजेसाठी जातात. ब्रह्मी पूजेचा प्रकार आपणाकडील पद्धतीहून थोडासा भिन्न आहे. देवळात जाताना फुले, मेणबत्त्या आणि उदबत्त्या वगैरे घेऊन जावे लागते. शिवाय प्रत्येक वाराला एक ठराविक जनावर नेमलेले आहे आणि त्या जनावराची प्रतिमा असलेल्या मेणबत्त्या देवापुढे (बुद्धापुढे) लावावयाच्या असतात. ब्रह्मी लोक वाढदिवस वार्षिक मानण्याऐवजी साप्ताहिक मानतात व म्हणून प्रत्येक आठवड्याला म्हणजे आपल्या वाढदिवशी त्या दिवसाच्या जनावराची आकृति असलेली मेणबत्ती बुद्धापुढे लावणे हे आयुगरोग्यप्राप्तीच्या अनेक मार्गांपैकी एक कृत्य आहे. मंगळवारी जन्मलेल्याने सिहाकृति मेणबत्त्या घ्यावयाच्या, शुक्रवारी सूकर छाप मेणबत्त्या जाळावयाच्या, वगैरे ठराविक प्रकार ' धर्माज्ञे 'प्रमाणे निश्चित झालेले आहेत. आपल्या इष्टमित्रासाठीही आपण त्याच्या दिवशी मेणबत्त्या लावल्या तर चालतात. असो. पॅगोडाला जाताना पाणी व फुले ही अवश्य लागतात. ती प्रवेशद्वारापाशी मिळतातही. ब्रह्मी लोक देवदर्शनाला येतात, तेव्हा आधी घटा वाजवितात. ही घटा डोक्यावर कधीच टागलेली नसते. देवालयात चढण्यापूर्वी बाहेरचे बाजूस एका खाबास ती अडकवून ठेवतात व ती फार उच्च नसल्याने वाजविण्यासाठी हात डोक्यावर न्यावा लागत नाही. साबराचे शिग किवा लाकडी ठोकळा घटानाद करण्यासाठी घटेजवळच ठेवलेला असतो. त्याने प्रथमत: घटा बडवून नतर खाली जमिनीवर एक ठोका द्यावयाचा. हेतु हा की, पृथ्वी आणि आकाश याना बजावून आपण प्रार्थना करतो, अशी खात्री करून घ्यावयाची. श्वे डेगॉन पॅगोडाजवळ असलेली नारोशकरी घटा ही जगातील तिसऱ्या नबरची आहे असे म्हणतात. तिचा व्यास सात फूट साडेसात इच असून ती चवदा फूट उच्च आहे. पधरा इच जाडीच्या या अजस्र घटेचा आवाज तिला अनुरूप अशा ' ठोकणी 'ने केला तर किती दूरवर ऐकू जाईल याची कल्पनाच करावी. ह्या घटेश्वराचे वजन ९४,६८२ पौंड म्हणजे जवळजवळ ५९ खडी (बगाली मापाने) भरेल ! असो.

घटाबादन केल्यानतर आत जाऊन मूर्तीपुढे किवा मूर्तीवर पाणी ओतावयाचे, फुले वहावयाची, मेणबत्त्या, दिवे काय असतील ते लावावयाचे आणि नतर गुडघे टेकून डोळे मिटून प्रार्थना करावयाची अशी रीत आहे. हे झाल्यानतर इतर बुद्धमूर्तीचे दर्शन घेण्यास जातात, व ऐपतीप्रमाणे तेथे काही धान्य टाकून पुढे चाल् लागतात. श्वे डेगॉन पॅगोडाच्या सभोवार लहानमोठे असे शेकडो बुद्ध आहेत. त्यात मानवी आकाराच्या २०–२५ पट असेही कित्येक असून गौतमबुद्धाला वेगवेगळ्या रीतीने बसविण्यात आले आहे. एके ठिकाणी तर त्या परमवैराग्यशाली धर्मसस्थापकास बिलासी पर्‍याप्रमाणे आडवेच निजविले आहे. शिवाय त्याच्या अगावर इतकी आभरणे व भूषणे चढविली आहेत की, प्रत्यक्ष बुद्धाला ते सर्व पाहून अत्यत विषाद प्राप्त होईल. सोनेरी वस्त्रे, कर्णभूषणे, बाहुभूषणे याचा त्याग केल्यानतरच ज्ञानी झालेल्या बुद्धास, बादशाही बेड्याना कधीच लाभत नाही, इतके वैभवी स्वरूप सध्या द्यावयाचे म्हणजे त्याच्या शिकवणीचा गधही आपणास लागला नाही असे दर्शविण्यापैकीच होय. परतु भक्तिभावाने प्रेरित झालेले हे बौद्धधर्मीय लोक आपल्या धर्मसस्थापकास शक्य तितक्या वैभवात बुडवून ठेवण्याचा प्रयत्न करतात. स्वत' विरागी राहून द्रव्य साठवावयाचे व त्याचा विनियोग बुद्धमूर्ति उभारण्यात अथवा उभारलेल्या सुशोभित करण्यात करावयाचा, ही तर त्याची धार्मिक परमोच्च कोटीची भावना. कदाचित् असेही असावे की, बुद्धाने जिवतपणी अत्यत हाल सोसले व ऐहिक सुखाचा त्याग केला म्हणून आता निर्वाणास गेल्यानतर सर्व विलास त्याचे अगी जाऊन बिलगत आहेत! अस्तु.

ह्या श्वे डेगॉन पॅगोडाचा पुष्कळसा भाग गेल्या वर्षी आग लागून जळाला व प्रेक्षणीय असे मदिर नष्ट झाले. ते बाधण्याचे काम चाल् आहे. पॅगोडाचे आसपास अनेक भिक्षूभिक्षुणी उपजीविकेसाठी आणि बुद्धभक्तीसाठी धडपडत असतात. प्रवासी यात्रेकरूची सोय व्हावी, म्हणून ओट्या बाधलेल्या असतात. तेथेच रक्तपितीने पीडलेले अथवा 'आधळेपागळे आणि थोटे' राहून भिक्षा मिळवितात. 'सदाल' (चाडाळ) म्हणून जो वर्ग पॅगोडा झाडून स्वच्छ ठेवण्यासाठी ठेवलेला असतो, तो जवळजवळ गुलामच आहे असे समजावे. त्याना इतर समाजात मोकळेपणाने हिडता येत नाही. ब्रह्मी

जनतेतील ते अस्पृश्य म्हणण्यास हरकत नाही. त्याची स्थिति अत्यत करुणास्पद असते खरी, आणि सर्व रीतीने उदार असणारा हा समाज सदालाचे बाबतीत इतका क्रूर का झाला हे समजत नाही. हळू हळू त्या अस्पृश्याचा दर्जा वाढण्याची चिन्हे दिसत आहेत. त्याच्यातच कैदेतून सुटलेले खुनी, दरोडेखोर, चोर किवा तसलेच गुन्हेगार असतात. पूर्वीची पद्धत अशी की, ज्या गुन्ह्याबद्दल शिक्षा होईल तो व ज्याला शिक्षा होते त्याचे नाव तोडावर गोदून टाकावयाचे. म्हणजे लोकाना ह्या मनुष्यापासून चार पावले दूर रहावें असे प्रथमदर्शनीच कळावे. अशाची प्रजाही देव-दासात गणली जाते. स्मशानातील ' डोंबा 'चाही समावेश अशा अस्पृश्यामध्येच करतात. पण हे सर्व मिळून फार थोडे लोक होतात.

साधारणपणे ब्रह्मी नागरिक कोणत्या मनोवृत्तीचा असतो, ह्या प्रश्नाचें उत्तर देणे फार कठीण आहे. कारण ब्रह्मी जनाच्या मनात काय चालले आहे हें चेहऱ्यावरून ताडता येत नाही. बहुधा मानवी मुखचर्येवर मानसिक व्यापाराचे चित्र उमटलेले सापडते आणि चाणाक्ष इसम ते बरोबर ओळखू शकतो. परतु जेथे विचित्र काहीच नाही तेथे तो कितीही चाणाक्ष असला तरी काय करील? ब्रह्मी लोक आनदी आहेत, विनाकारण फुकाची काळजी ते कधीही करणार नाहीत, सबड मिळाली की, ' चैन ' करून घेतील हे सर्व खरे. इतर वैराग्यपर राहणीतही त्याच्या मनातील सुखलोलुपता आणि काबाडकष्टाचा कटाळा ही स्पष्टपणे दृग्गोचर होतात. अर्थात् सुख व कष्ट याचा सापेक्षत्वानेच आपण विचार करीत असतो आणि म्हणून आपल्या इकडे कष्टाची जी कल्पना आहे, तिला धरूनच मी ब्रह्मी मनुष्याची तुलना करीत आहे. चिरूट फुकीत तासन्या तास गप्पा छाटीत बसणे अथवा दुसरा कोणी काम करीत असताना त्याचे कौशल्य वाखाणीत राहणे यातच त्याना मजा वाटते. ब्रह्मी लोकात कारागिरी आहे, ती प्रथमतः पॅगोडा किवा चोगमधील मूर्ति व इतर बाधकामास लागणारे सामान तयार करण्यातच दिसते. नतर धर्मशास्त्राच्या ' पोथ्या ' तयार करण्यातही कौशल्य व चिकाटी कमी लागते असे नाही. त्याच्यावर लाक्षारसाने मढविलेली ' मळपृष्ठे ' घालावयाची, सचित्र प्रती तयार करावयाच्या किवा बुद्धचरित्रातील निरनिराळे प्रसग चित्रित करावयाचे, ही कामें करण्यात बरीच मडळी तरबेज असते. भिक्षूची भिक्षा-

पात्रे किंवा पूजापात्रे, कमंडलु वगैरे लाकडाची असली तरी त्यावर लाखेचा थर देऊन तकतकी आणतात, व म्हणून ती चागली टिकाऊ व दिखाऊही होतात. लाकडी पण लाखेने मढविलेले हे जिन्नस इतके सुबक ब्रह्मदेशाव्यतिरिक्त कोठेच होत नाहीत असे म्हणता येते. स्वतःसाठी लागणारे रेशमी वस्त्र पूर्वी ब्रह्मदेशातच तयार होत असे, पण आता विलायती माल अधिक मोहक व स्वस्त मिळतो—आणि विशेष असे की, त्यासाठी मेहनत फारशी नसतेच. बाजारात गेले की लुगी मिळते, ही त्याची समजूत. मात्र तिला निरनिराळे चित्तवेधक रग देण्यात ते करामत खर्च करीत असतात. इतर बाबतीत विचार कमी असे दर्शविणारे ब्रह्मी नागरिक सौंदर्याच्या बाबतीत इतके शौकी कसे, ह्याचे आश्चर्य वाटते. त्याना असलेली सौंदर्यसमीक्षता हिंदुस्थानातच काय पण कित्येक सुधारलेल्या युरोपियन राष्ट्रात तरी असेल की नाही याची शंका वाटते. विलासप्रिय मोगल बादशहाचे दडपण पडलेल्या प्रातातील लोकसुद्धा इतके सौंदर्यदक्ष नाहीत. निसर्गदत्त सवलतीचा फायदा पुरेपूर घेऊन मानवी कारागिरीची थोडीशी जोड देऊन ब्रह्मी लोकानी—विशेषतः महिलानी—आपणा स्वत.स सौंदर्याच्या बाबतीत अखिल जगात वरंच वरचे स्थान प्राप्त करून घेतले आहे. आणि त्यातही आश्चर्य हे की, त्यासाठी जुनें सर्वच सोडून नव्याचेच त्यानी अधानुकरणही केलेले नाही. किंबहुना नवे असे त्यानी, अद्याप लुगी व ती रगाविण्यात लागणारे अनेक रग याशिवाय, काहीच स्वीकारले नाही मुद्रारगसाहित्य किंवा परकी फॅशनचे कपडे स्त्रियात तिकडे मुळीच प्रसृत नाहीत. असो.

ब्रह्मी मनुष्याचे विकार चेहऱ्यावर मुळीच दिसत नाहीत, यावरून त्याला विकार नसतील असा तर्क करणे चुकीचे होईल. इतर माणसाप्रमाणे तोही विकारवश होतो. पण विकाराची प्रतिक्रिया काय होईल याचा अदाज तो लागू देत नाही. एकाद्या ब्रह्मी कारकुनाला किंवा गडयाला वरिष्ठ अधिकारी सडकून रागे भरला, तर त्या वेळी उत्तरे देण्याच्या किंवा आपला निर्दोषीपणा सिद्ध करण्याच्या भानगडीत तो पडणार नाही. सध्याकाळ झाली म्हणजे मुकाट्याने हातात डाह* घेऊन तो जाईल आणि आपल्या बरि-

* Dah हें एक हातभर लाबीचे कोयत्यासारखें हत्यार आहे

ष्ठाचा खून करील! त्याला त्यात काही वाटणार नाही. परंतु अशा लहान-सहान बाबीवरून क्रोधाचा पारा इतक्या थराला क्वचितच जातो. बरेच दिवसाचे साचलेले वैर असले म्हणजेच अशा एकाद्या निमित्ताने ते बाहेर पडते. असली माणसे दुसऱ्याच्या विरुद्ध दुः म्हणून सोडण्यास चागली उपयोगी पडतात. आणि इग्रज प्रभूनी त्याचा खरोखरच उपयोग करून घेतला असल्याचे दिसून येते. हिंदीद्वेष ब्रह्मी प्रजेच्या मनात भरविण्याने खुद्द बडाळीच्या क्षेत्रात नाही, पण अन्यत्र हा द्वेष माजलेला आहे. ब्रह्मी जननेने विचार करून हिंदी प्रजेच्या विरुद्ध काढर स्वबुद्धीने उठविले असते तर गोष्ट वेगळी. ब्रिटिशाच्या चिथावणीने त्यानी एखादे दुष्कृत्य करण्यास उद्युक्त व्हावे यात त्याचाच दोष दिसतो. आणि हा दोष राष्ट्रास अत्यत विघातक आहे, हें कोणीही विचारवत कबूल करील. विचारशक्तीचा अभाव ब्रह्मी पुढाऱ्यातही कसा दिसतो, हे मुलाखतीवरून स्पष्ट होईलच. ब्रह्मी जनतेतील उदार मताचा (आणि हे विचाराभावाचेच एक लक्षण मानता येते) फायदा हिंदी व्यापारी व नोकरानी घेतला त्याच्या अनेक पट युरोपियन लाटेगगाजी व त्याचे सहकारी ख्रिस्ती मिशनरी यानी घेतल्याचे रगूनमध्ये नुसत हिडले तरी कळून येईल.

इतके असले तरी ब्रह्मी उत्सवप्रियता काही कमी नाही. कसले ना कसले निमित्त काढून पॅगोडाला वनभाजनास जावयाचे, जत्रा भरवावयाची, घरीही काही धार्मिक कृत्याच्या नावाखाली मेजवान्या झोडावयाच्या, नाच, गाणेबजावणे करावयाचे, यात कसलीही आपत्ति आली तरी खड पडू शकत नाही. स्वतःचे घर जळाले म्हणून ब्रह्मी मनुष्य कधी हताश होऊन किवा पुनः पुनः तीच आठवण काढून रडत बसणार नाही. ही दुःस्थितीशी बेफिकिरी विचारजन्य असती तर प्रशसनीय व अनुकरणीयही ठरली असती. ह्या बेफिकिरीबरोबरच त्याची विनोदी वृत्ति आणि आनदी स्वभाव ही दिसून येतात. ब्रह्मी वर्षारभ ठराविक दिवशी येत नाही, तसाच तो किती दिवस चालावयाचा हेही ठरलेले नसते. पण तो जेव्हा साजरा करतात तेव्हा एकमेकावर पाणी ओतावयाचे व सुग्रास भोजने झोडावयाची, हाच त्यातील मुख्य भाग आहे. मुले, मुली, पुरुष, बायका हातात पाणी घेऊन एकमेकाना न कळत परस्पराच्या अगावर ते ओतण्यासाठी टपून बसतात आणि न कळता पाणी पडले म्हणजे जी गमत उडते तिची विशेष मौज



बुद्धविहार (चौग) मधील मोफत शाळा

असते. ज्याच्या अगावर पाणी पडते तो एखादे वेळी खरोखरच चिडतो; पण त्या चिडण्यानेच गमतीस रग चढतो. हा प्रयोग कोणावरही करतात. युरोपियन किंवा परकी लोक त्यातून सुटत नाहीत. या सणात ब्रह्मी विनोदी वृत्ति दिसते. साधे बोलणे असले तरी त्यातही टोमणे, व्याजस्तुति आणि कोट्या याचाच भरणा आढळतो. म्हणून कोठेही सभा चालू असली की, त्या ठिकाणी ' खसखस पिकली ' असे वाटते. ' स्वदेशी 'ची उपयुक्तता त्याना पटलेली नाही तथापि ती पटविणे मात्र कठीण नाही. फुजीच्या मार्फत कोणतीही शिकवण ब्रह्मी समाजाच्या अगदी खालच्या भागापर्यंत पोहोचविता येते. विचारवत व धोरणी पुढारी अशा अनुकूल परिस्थितीचा पुरेपूर फायदा घेण्यास चुकणार नाही. परंतु साक्षरतेचा प्रसार झाला तसा शिक्षणाचा झाला नसल्याने अव्वल इग्रजी अमलात आपणाकडील पुढारी इग्रजी भपक्याने दिपून गेले, तशीच अवस्था ब्रह्मी जनतेची आजमितीस आहे. काही काळानतर त्याना आपली चूक कळून येईल. परंतु इग्रजाचे ब्रह्मदेशातील वाढते वर्चस्व म्हणजे हिंदुस्थानाभोवती दास्यशृखलेचा फास घट्ट करण्यासारखे आहे, हे लक्षात घेऊन स्वार्थासाठी तरी ब्रह्मदेशीयास कोणी लुबाडू नये, अशी खटपट करणे हे हिंदी प्रजेचे कर्तव्य ठरते. शिवाय आजपर्यंत मिळालेल्या अनुभवाचा इतरेजनाना फायदा करून देणे म्हणजेच त्याचा खराखुरा उपयोग असल्याने बधुभावाने अथवा कोणत्याही भावनेने ब्रह्मदेश इग्रजाच्या आहारी न जाईल म्हणून हिंदुस्थानने प्रयत्नाची पराकाष्ठा केली पाहिजे. ' यत्ने कृते यदि न सिद्धयति कोऽत्र दोषः ? '

आतापर्यंत ब्रह्मी समाजातील ठळक ठळक दिसणारे विशेष सागितले. स्त्रीवर्गाला त्यात मान बराच असतो, म्हणून त्याच्या वर्णनाला अग्रस्थान देऊन प्राधान्यही दिले. इतर पुष्कळच गोष्टी आणखी सागता येण्यासारख्या आहेत. परंतु त्याविषयी किंवा मडाले, पेगू, अमरपुरा येथील पॅगोडाविषयी शाततेच्या काळात ब्रह्मदेशची सफर केल्यावर मगच लिहावे हे बरे. प्रेक्षणीय स्थळे पाहण्यास बडाळीच्या धामधुमीच्या काळी सवड नसावी हे रास्तच आहे. ही समाजस्थिति कळण्यास मात्र रगून व आसपासच्या खेड्यातील ' उम्याउम्या'चे वास्तव्य (!) कारणीभूत झाले. काही ब्रह्मी परिचिताना बरोबर घेऊन मी हिडलो आणि ' हे काय ? ' ' ते कसले ? ' असे विचारले.

तसेच त्याच्या बरोबरीच्या ब्रह्मी कुटुंबात जाऊन गृहव्यवस्था पाहिली. पण या सर्व बाबतीत मला असे दिसले की, ही चोकस बुद्धि ब्रह्मदेशात चालविण्यास पुष्कळसा वाव असून फारच महत्त्वाची, मनोरजक आणि उद्बोधक अशी माहिती मिळण्याचा सभव आहे. इतकेच काय, परतु काही शोध लागण्याची शक्यता आहे. पण ह्या सर्व बौद्धिक आनददायी चैनी करण्यास मुख्यतः काल व द्रव्य पाहिजे. शिवाय एकट्यादुकट्याचे हे काम नव्हे. बऱ्याच जणानी तिकडे जाऊन थोडेसें परिश्रम केल्यास त्याना एम्. ए. साठी लागणाऱ्या प्रबधास भरपूर साहित्य मिळून पुन. मानवी ज्ञानात भर टाकल्याचे श्रेय लाभणार आहे. तेव्हा रुळलेला मार्ग सोडून आमचे सुशिक्षित व पदवीधर बधु किंचित् जरी आजूबाजूस गेले तरी पुष्कळच नवीन काम त्याना लाभेल व ते त्यानी मिळवावे इतकीच विनति शेवटी करावीशी वाटते.

हे बरेच लाबलेले 'ब्रह्मपुराण' येथे सपले. 'महाराष्ट्रीय' वाचकाना ते वाचून दाखविण्याचे काम यथाशक्ति व यथामति पार पाडले. ही कामगिरी वाचकाना कितपत पसत पडली हे ज्याचे त्यानेच ठरवावयाचे आहे. मात्र महाराष्ट्राने सध्याचे काळी बाह्य जगांतील राजकारणात लक्ष घालून घराबाहेर दृष्टि फेकण्याची वेळ सध्याचीच आहे एवढे ध्यानात ठेवावयास हवे.

परिशिष्ट

— १ —

चितगांगमधील शस्त्रागारांवर आक्रमण

गेल्या वर्षी चितगाग येथे 'आर्मरी रेड' झाली क्रातिकारकानी सरकारी अधिकाऱ्यावर हल्ला चढविला, एकदोघास ठार केले, तारा तोडल्या, बदुका लुटल्या . . ... यापलीकडे जास्ती माहिती कोणास मिळू शकली नाही हे जे 'चित्तग्रामशस्त्रागारावर आक्रमण' झाले त्याबद्दल सध्या तेथे खटला चालू आहे. त्यासबधी टीकात्मक विधाने खटला न्यायाधीन (Sub judice) असल्याने करता येत नाहीत. परतु एकदर बाहेर आलेली माहिती सुसगत रीतीने देण्यास कसलीच हरकत नाही. म्हणून चित्तग्राम खटल्याची हकीकत थोडक्यात आज देत आहे, ती कळल्याविना खटल्यात काहीच राम वाटणार नाही.

अठरा एप्रिल १९३० रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास चितगागमध्ये एकदम खळबळ माजली. शहरच्या मध्यभागी असलेल्या टेलिफोन ऑफिसच्या तारा तोडण्यात येऊन आतील यत्रसामग्री फोडून मोडून टाकली आणि पेट्रोल ओतून त्या इमारतीस आग लावण्यात आली. तेथे असलेल्या पहारेकऱ्यास क्लोरोफॉर्म देऊन बेशुद्ध केले. जवळच असलेल्या तार ऑफिसातही असाच प्रकार करण्यासाठी क्रातिकारक गेले होते. तेथे त्यानी गोळ्या झाडून व्यत्यय करण्यास आलेल्याना परत फिरविले आणि ते लगेच पुढे चालू लागले. त्याच वेळी चितगागहून 'लक्षम्' जक्शनकडे जाणारी एक मालगाडी धूम व मीरसराइ या स्टेशनामध्ये रुळावरून घसरली आणि तिने तो रस्ता अडविला. नागलकोट व धूम या स्टेशनाजवळील तार ऑफिसच्या तारा कापण्यात आल्याने चितगाग रेल्वे स्टेशन मास्तरास कोणाशीच तार–व्यवहार करता येईना. ह्या सर्व गोष्टी साधारणपणे एकाच वेळी झाल्या धूम स्टेशन चितगागहून सुमारे ४३ व नागलकोट ७२ मैल दूर आहे.

आता या आक्रमणाचा मुख्य भाग चितगागमध्येच पण दोन ठिकाणी झाला, तो पाहू. चितगाग हे आसाम-बगाल रेल्वेचे मुख्य ऑफिस आहे.

तेथेच सर्व कचेऱ्या व त्यावरील गोरे हपीसर राहतात. शिवाय अब्बल दर्जाचे बदर म्हणून चितगागची गणना होऊ लागल्यापासून पुष्कळ युरोपियन व अमेरिकन व्यापाऱ्यानी (सभावित लुटारूनी) आपापली दुकाने व 'गोदामे' येथे बाधली आहेत. रेल्वेवरील गोरे कामकरी, बदरातील व्यापारी व सरकारी वरिष्ठ अधिकारी याची पुष्कळ वस्ती चितगागमध्ये आहे. चितगाग जिल्ह्याचे हे मुख्य ठिकाण तर खरेच, पण त्याखेरीज चार जिल्ह्याचे मुख्य ठिकाण म्हणून कमिशनर व त्याच्या बरोबरच्या इतर कचेऱ्या चितगागला आहेत. इतके सर्व सागण्याचा मतलब हाच की, येथे युरोपियन वस्ती पुष्कळ आहे रेल्वे ऑक्झिलियरी फोर्स व सरकारी पोलिस लाइन या दोन्ही ठिकाणी शस्त्रागारे आहेत. त्याखेरीज आणखी दोन ठिकाणी हत्यारे व दारूगोळा ठेवण्याची सोय असून तेथेही हत्यारे नेहमी जय्यत ठेवली जातात.

अशा एकदर चार अस्त्रागारापैकी रेल्वे ऑक्झिलियरी फोर्सचे एक व पोलिस लाइनमधील दुसरे अशा दोन्हीवर एकसमयावच्छेदेकरून हल्ला चढविण्यात आला. हे प्रकार रात्री साडेदहानतरच घडले. युरोपियन लोकाची शस्त्रे अर्थातच काळजीपूर्वक ठेवली असतील आणि विशेष दक्षतेने सरक्षिली असतील यात सदेह नाही, पण अशा ठिकाणीही जाऊन हल्ला करून, रक्षकाना व अधिकाऱ्याना ठार करून, कडेकोट बदोबस्ताने ठेवलेल्या कोठाराची जबरदस्त कुलुपे तोडून, त्यातील शस्त्रे व दारूगोळा लुटून, उरलेल्या भागास आग लावून देण्यास पुष्कळच वेळ लागला असला पाहिजे. गुपचुपपणे हे काम होण्यासारखे खास नव्हते. वेळही गाढ निद्रेची नव्हती. साहेबानी मदिराक्षीसमवेत मदिरासेवन करून गप्पागोष्टी किवा 'कळपा'त जमून मजा मारण्याचे वेळी हा दगा चाललेला. सुमारे शभरसवाशे गोरे लोक जवळपास राहात असलेले. खुद्द पोलिस लाइनमध्येही काही नाही तरी ७५-१०० शिपाई होते. कोठारापाशी पहारेकरी काय गडबड करतात हे तिखट कानाच्या माणसाला ऐकू येईल, इतके त्यामधील अतर. पण त्या क्रातिकारकानी काय मोहिनी घातली कोणास ठाऊक, कोणी त्याना विरोध करण्यासाठी पुढे सरसावला नाही! नाही म्हणावयास पहिल्याने 'हुकुमदर्रर' करण्यास—म्हणजे कोण आहे ही चौकशी करण्यास— जेवढी मडळी आली तेवढी मात्र मृत्युमुखी पडली. रेल्वे शस्त्रागाराचे मुख्य अधिकारी जेवत होते.

जेवताजेवताच ते, बाहेर काय धादल आहे म्हणून पाहण्यास आले. येता येता 'बगाली कुतरडी' अशा प्रकारचे काही तिरस्कारयुक्त शब्द त्यानी काढले म्हणतात. त्यानतर लगेच त्यांस गोळी लागली—ते खालीं पडले. त्याच्या तोडावर बदुकीच्या दस्त्याचे ठोसे बसले—'कुत्र्याचा जोर पहा' असे उद्गार निघाले—आणि...मग लुटीचे काम चालू झाले. यानतर कोणी चौकशी-साठी आले नाही किवा विरोध करण्याचीही कोणाची छाती झाली नाही. पहाटे सव्वातीनपर्यंत बदुकीची फैर झडत होती. विद्युद्दीप हातातून चोहोकडे प्रकाशत होते. क्रातिकारकाच्या मोटारी इकडूनतिकडे फिरत होत्या. अस्त्रा-गाराची दारे फोडून बदुकाची नासधूस चालू होती. पण गोऱ्या रहिवाशा-पैकी एकही खरा शूर मायेचा पूत निघाला नाही, किवा शत्रु आहे कोण ते तरी आपण पाहू असे म्हणून सामना देण्याची इच्छा त्याला झाली नाही. क्रातिकारकापैकी प्रत्येकास तीन याप्रमाणे पुरून उरणारे, जगातील शूर लढवय्ये, शिपाईगिरीचा पोकळ अभिमान बाळगणारे गोरे लोक व त्याना पुरेशी शस्त्रे शिल्लक असता एकाही पठ्ठ्याला विरोध करावेला नाही किवा होत असलेले नुकसान डोळ्यानी नुसते पाहण्यात शरम वाटली नाही, ही गोष्ट कोणास लाच्छनास्पद व कोणास भूषणास्पद आहे हे न सागताच कळेल.

क्रातिकारकानी हातात विद्युद्दीप घेतले आणि जिकडून मडळी हल्ला करण्यासाठी येणार तिकडच्या रोखाने लुटलेल्या शस्त्रानीच फैर चालू ठेवली. हे खरे असले तरी त्याना आडकाठी करण्याचा प्रयत्नही कोणी केला नाही, हेही तितकेच खरे होय. प्रयत्न करून विफलता पदरी येणे हा दोष खात्रीने नव्हे. पण प्रयत्नच न करतां स्वस्थ राहणे हा अक्षम्य अपराध ठरेल. काही गोरे लोक मोटारीतून शस्त्रागाराकडे निघाले, पण विरोध करण्यासाठी म्हणून नव्हे, तर उजेड कसला दिसतो ते पाहण्यासाठी! त्याच्या मोटारीला गोळी लागतांच त्यानी सूबाल्या ठोकला आणि लपूनछपून राहून, काय होते ते पाहत ते बसले, अशा आशयाच्या जबान्या त्या त्या लोकानी दिलेल्या आहेत. पोलिसलाइनकडेही तशीच रड होती. आणि क्रातिकारकाना विरोध कोणाचाच झाला नाही. त्यांना लाबविता आले तेवढे त्यांनी लाबविले आणि पहाटे सव्वातीननतर पळ काढला! या चकमकीत तीन युरोपियन अधिकारी व बाकी सहासात हिदी सरकारी नोकर ठार झाले.

हा हल्ला एवढ्यावरच थावला नाही. क्रांतिकारकाना हुडकून काढण्याचा व त्याचा पक्का बंदोबस्त करण्याचा आता जारीने प्रयत्न सरकारने चालू ठेवला. मग त्याना पुष्कळ काम मिळाले, सगळे वरिष्ठ अधिकारी जमले, तारा झाल्या, लखोटे लिहिले, खास गुप्त पोलिस बोलाविले, लष्करची मदत मागितली, सर्व ' उत्तर-कार्ये ' अगदी यथासांग पार पाडण्यासाठी कसून तयारी केली. मोटारी, मोटारीतील सामान, कपडे, पेट्या इत्यादि सामान क्रांतिकारकानी जेथल्या तेथेच टाकले होते. त्यावरून लगेच सुगावा मोठ्या ' शिताफी 'ने लावला. मग झडत्या घेतल्या! तपास जारीने चालविला! काही जणाना अटक केली! . पण खरे गुन्हेगार काही केल्या सापडेनात. चितगागमध्येच एक जखमी युवक आहे, अशी बातमी लागताच तिकडे सर्वांनी गराडा देऊन मग त्याजकडून सर्व माहिती मोठ्या कौशल्याने मिळविली शस्त्रागारास आग लावीत असता हातावरचे पेट्रोल पेटून तो भाजला होता. त्याला त्या रात्रीच्या घादलीच्या वेळीही गुन्हेगाराच्या मुख्याने मोटारीत घालून आणून आपल्या घरी ठेवले होते. भाजलेल्या मुलाचे नाव हिमांशुसेन. त्याने दिलेल्या कबुली जबाबावरून या कटात मडळी कोण कोण सामील आहेत, याचा तपास लागला. पण त्याच्या ठावठिकाणाबद्दल कोणासच पत्ता नव्हता

ता. २२ एप्रिल गेजी म्हणजे गुन्हा घडल्याचे पाचवे दिवशी बातमी आली की, चितगागजवळच असलेल्या जलालाबाद टेकडीवर फरारी इसम दिसतात. तेथे झाडी पुष्कळ असून जाण्याचा रस्ता जरा बिकटच आहे. टेकडी काही मोठी नाही, पण आजूबाजूसही तशाच टेकड्या आहेत व लहान ओढे झाडीने आच्छादलेले आहेत. त्या टेकडीवर हल्ला चढविण्या-साठी तीन चार ' सेनानी ' निरनिराळ्या मार्गानी निघाले. लष्करी शिपा-याची पलटण आणली. सशस्त्र गाडीही तेथपर्यंत नेली. मशिनगन्सचा उपयोग केला! टेकडीवरून लष्करी पलटणीच्या रोखाने गोळीबार झाला असे सागतात. लगेच दुसऱ्या एका टेकडीवर मशिनगन रोखून समोरच्या टेकडीवरील प्रत्येक इचइच भागात गोळ्या बेधडक झाडल्या. रात्र पडेपर्यंत गोळीबार करून रात्री १०—१०॥ च्या सुमारास लष्कर शहराकडे परतले. सकाळी पुनः पलटणी टेकडीकडे गेल्या. छाती धडधडत असताच सर्व

सशस्त्र अधिकारी वर चढले! एकदर ११ प्रेते सापडली! दोन मृत्युपथास लागलेले होते त्याना पाणी पाजण्यापूर्वी 'स्टेटमेट देता का?' असे विचारण्यात आले. पाणी प्याल्यानतर लवकरच ते दोघेही स्वर्गी गेले! असे एकदर तेरा इसम रात्रीच्या गोळीबारास बळी पडले. पोलिसाकडे कोणास जखमही झाली नाही. आमच्या सैनिकाचे व गोऱ्या हफीसराचे अशा प्रकारचे शौर्य काय वर्णावे?

तेराही मुलाची—कारण या हल्ल्यात १६ ते २८ वर्षाच्या आतील तरुणच होते—प्रेते ओळखण्यात आली. मुख्य पुढारी सापडलेच नाहीत. त्याना पकडून देणारास पाच हजाराची बक्षिसे लावण्यात आली. यानतर काही आरोपी खुद्द चितगागमध्ये सापडले व फेणी स्टेशनवर तिघाना पकडले असता पोलिसावर गोळ्या झाडून ते निघून गेले! हल्ला झाल्यानतर सुमारे तीन आठवड्यानी म्हणजे ६ मे १९३० रोजी चितगागजवळ असलेल्या कर्णफुली नदीच्या पैलतीरी काही आगेपी आहेत, असा सुगावा लागला. पोलिसपार्टी व गोरे अधिकारी रात्रीच धडपडत गेले. दोन टोळ्या करून त्यानी गुन्हेगाराना पकडण्याचा प्रयत्न केला. चकमकी झाल्या, बराच वेळ गोळीबारात पाठलाग झाला. शेवटी निष्पन्न इतकेच झाले की, चार प्रेते पोलिसाना मिळाली व दोन मृत्युपथी लागलेले बीर आढळले! लगेच पोलिसानी धावपळ केली व त्या दोहोपैकी देवप्रसादाला विचारले की, 'बाळ, तुला काय पाहिजे?' 'पाणी' म्हणताच त्याला पाणी दिले आणि नतर पोलिस अधिकाऱ्याने त्या आसन्न-मरण वीरास म्हटले, 'हे पहा आमचे बडे साहेब येथे आहेत. तुला काही स्टेटमेंट करावयाचे असल्यास साग.' हे ऐकताच तो मृत्युमुखी गेलेला वीरपुत्र एकदम हुशार झाल्यासारखा होऊन म्हणाला, 'काय, मि. लोमन येथे आहेत का? (मि. लोमन हे बगालचे इ. ज. ऑफ पोलिस होते, व पुढे लगेच डाक्यास त्याचा खून झाला.) कारण लोमन येथे असतील तर मला त्याना गोळी घालावयाची आहे.' नतर त्याला किंचित् ग्लानि आली. पण पुन्हा उजवा हात वर करून तो म्हणाला, 'ह्या माझ्या हातास गोळी लागली नसती तर तुमच्या हातात कधीच सापडलो नसतो. जिवात जीव असताना मी तुमचे हाती सापडलो, ही वाईट गोष्ट झाली.' आणि अल्प काळातच देवप्रसाद देवलोकी गेला!

हे त्याचे मृत्यूपूर्वीचे शब्द सरकारी अमलदाराने शपथेवर कोर्टात सांगितले आहेत. भारतीय युद्धांत बाळ अभिमन्यु किंवा मराठी इतिहासात दत्ताजी शिंदे रणांगणी पडले होते तेव्हाचा व हा प्रसंग यांत विशेष अंतर नाही. 'लोळावे मांडीवरी' अशीच अभिमन्यु, दत्ताजी व देवप्रसाद यांची वये होती. दत्ताजीने सांगितलें की, 'बचेंगे तो और भी लढेंगे.' त्याहीवर ताण करणारे देवप्रसादाचें हे उत्तर आहे. अभिमन्यूचे बाबतीत झालेल्या अधर्मयुद्धाचा सूड उगविण्यास 'कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम्' शक्ति असलेला त्याचा मामा श्रीकृष्ण व 'झाले बहु होतिल बहु आहेतहि बहु, परंतु यासम हा' अशा पराक्रमाचा धनुर्धारी पिता असे दोघे समर्थ होते. शिव्याचा अपमान भरून काढण्यासाठीही त्याचे प्रतापी बंधु महादजी होतेच. पण देवप्रसाद मात्र अतृप्त इच्छेने–निराशेने – दुःखाने व असहायतेने विव्हळत स्वर्गी गेला!

अशा कितीतरी वीरशोकरसपर प्रसंगानी ह्या हल्ल्याला महत्त्वाचे स्वरूप प्राप्त करून दिले आहे.

—

— २ —

'शस्त्रागार–आक्रमण' म्हणून जो खटला चितगांग येथे गेले आठदहा महिने चालू आहे, त्यात एकंदर हजर आरोपी ३५ आहेत. त्यांची नांवे खालीलप्रमाणेः—

(१) अनंतलाल गुलाबसिंग, (२) धीरेंद्रलाल दस्तीदार, (३) फणीद्रलाल नंदी, (४) सुबोधचंद्र राय, (५) सुबोध विश्वास, (६) श्रीपति चौधरी, (७) सहाय्यराम दास, (८) नित्यपद प्रमथभूषण, (९) सुबोधकुमार चौधरी, (१०) अश्विनीकुमार चौधरी, (११) सुखेंदुविकास दस्तीदार, (१२) बाळ हरेंद्र, (१३) विजयकुमार सेन, (१४) शांतिभूषण नाग, (१५) फकीरचंद सेन, (१६) अर्धेंदुशेखर गुहा, (१७) नंदलाल गुलाबसिंग, (१८) मधुसूदन महीमचंद्र, (१९) रणधीर जयंतकुमार, (२०) ननिगोपाळ चंद्रकुमार, (२१) गुलाबसिंग रामबक्षसिंग, (२२) आशुतोष विपिनचंद्र, (२३) मलिनविकास जगबंधु, (२४) जोगेंद्र



सरकारी पोलिसाचे शस्त्रागार–चितगाग

ऊर्फ मनागुप्त, (२५) रजनलाल सेन, (२६) लालमोहन अखिलचद्र, (२७) अनिलबधु दीनबधु, (२८) अनिलकुमार रक्षित, (२९) सुबोधचद्र महेद्रचद्र, (३०) सुकुमार, (३१) सुबोधचद्र मित्र, (३२) सौरिद्रदत्त, (३३) लोकनाथ बाळ, (३४) गणेश घोस व (३५) आनद गुप्त.

आता या ३५ जणाची थोडक्यात माहिती दिली पाहिजे. सर्व बड-खोराचा पुड पुढारी म्हणून अनतलाल (१) समजला जातो. लोकनाथ (३३) व गणेश (३४) हे त्याचे डावेउजवे हात म्हणता येतील. गुलाबसिग (२१) ह्याचे दोन्ही पुत्र अनत (१) व नदलाल (२) ह्या खटल्यात गुतले असल्यामुळे बापाने मुलाच्या कृत्याकडे कानाडोळा केला किवा मूक समति दर्शाविली म्हणूनच बहुधा त्यालाही या खटल्यात गोवलें आहे. सरकारी वकिलाचे म्हणणे असे की, गुलाबसिगास आपल्या दोन्ही मुलाची कारस्थाने पूर्णपणे ठाऊक होती. आणि अशा गुन्ह्याविषयी त्याने पोलिसाना खबर दिली नाही किवा त्यापासून मुलाना परावृत्तही केले नाही म्हणून तो गुन्हेगार ठरतो. तसेंच जोगेद्र गुप्त (२४) व रजनलाल सेन (२५) ह्या दोघाची मुले ह्या कटात होती व त्याना बापाची फूस असावी, अशाच आरोपावरून दोघाना कटात गोवले आहे. कर्णफुली नदी ओलाडून गेलेल्या सहा आरोपीत ह्या दोघाचे पुत्र होते. मृत्युशय्येवर अस-तानासुद्धा 'मला मि. लोमन याना गोळी घालावयाची आहे,' असें बोलणारा देवप्रसाद हा जोगेंद्र गुप्त (२४) याचाच मुलगा होय! तसेंच त्या वेळी जीं चार प्रेते मिळाली, त्यात रजतसेन याचे एक होते. तो रजनलाल (२५) याचा मुलगा. गुलाबसिग (२१) व रजनलाल (२५) हे दोघे वकील आहेत.

एकदर १९ वीर मृत्युमुखी पडले. त्याच्यापैकी अकरा जणाचीं प्रेते जलालाबाद टेकडीवर सापडली. कर्णफुली नदाच्या पैलतीरी समीरपुराजवळ जें समरयुद्ध झालें व चार प्रेते व दोन मृत्युपर्थी लागलेले जखमी पोलिसाच्या हातीं लागले, ते सहा इसमः—

१ स्वदेश राय, २ मनरजनसेन, ३ देवप्रसाद गुप्त, ४ रजनसेन, ५ मोतीलाल, ६ अर्धेंदु दस्तीदार.

यापैकी अर्धेंदु व देवप्रसाद जखमी असताना पोलिसाच्या हाती लागले. बाकीच्या चौघानी आत्महत्या केली अथवा ते पोलिसाच्या गोळ्यांस बळी पडले, ते समजण्यास मार्ग नाही.

वरच्या आरोपीन्या यादीपैकी लोकनाथ (३३), गणेश (३४) व आनद (३५) ह्या तिघाना पोलिसाधिपति टेगार्ट यानी चद्रनगर येथे (फ्रेच हद्दीत) पकडले. ह्या बाबतीत सरकारी पोलिसानी आतरराष्ट्रीय कायद्याचा व फ्रेच कायद्याचाही भग केलेला दिसत असून याबद्दल त्याना जाब कोणीच विचारला नसावा असे वाटते! शिवाय, तेथून तिघाना पकडून आणल्यानंतर वाटेत त्याचे अमानुष व अनन्वित हाल करण्यात आल्यामुळेच, टेगार्ट याचेवर कलकत्त्यास दोनदा गोळी झाडण्यात आली होती असे म्हणतात. जलालाबाद टेकडीवरील लढाई, समीरपुराजवळची चकमक, फेणी स्टेशनवरचा चमत्कार आणि चद्रनगरची धरपकड हे पाच अध्याय चितगाग-शस्त्रागार–आक्रमण–पुराणात अत्यत महत्त्वाचे, चित्ताकर्षक व रोमाचकारी म्हणून गणले जातील.

या खटल्यात एकदर ३०१ साक्षीदार सरकारतर्फे दिले असून, आता फक्त २५ जणाच्याच साक्षी व्हावयाच्या उरल्या आहेत. त्यानतर दोन्ही तर्फेच्या वकिलाची भाषणे व निर्णय. सेशन कमिट करण्याची भानगड असल्या प्रकारच्या खटल्यात नेहमी असते. परतु सरकारने कार्यसौकर्यासाठी तिरगी न्यायाधीशांचें एक त्रिकूट नेमून सव्यापसव्याचा हा प्रकार टाळला आहे. एक रायबहादूर, दुसरे खानबहादूर असे डाव्याउजव्या बाजूस बसणारे दोन न्यायाधीश एका गौरवर्णियाच्या जोडीस देऊन तिघाचे ट्रिब्यूनल नेमले आहे. त्याच्या पुढेच खटला चालत असतो. सरकारपक्षीय वकिलाची कमतरता असणार कशी? आरोपीचा बचाव करण्यासाठी कलकत्त्याचे एक नामांकित बॅरिस्टर श्रीयुत शिरीष बोस येथे येऊन राहिले आहेत. शिवाय श्री. घोसळ व इतर पाच वकील त्याच्या मदतीस असतात. प्रथमतः बोस हे सर्वच आरोपीच्या वतीने काम चालवीत. पण मध्यतरी आरोपीना नग्न करून झाडा घेण्याची प्रथा जेव्हा अधिकाऱ्यानी अमलात आणली, तेव्हा मात्र अनत (१), लोकनाथ (३३) व गणेश (३४) यांनी आपण स्वतःच आपली बाजू माडणार असल्याचे सागितले, व त्याप्रमाणे साक्षीदाराची फेरतपासणी सुद्धा त्यानी केली.

हे शस्त्रागारावरील आक्रमण होऊन वर्ष तर होऊन गेलेच, पण सरकारच्या मनात क्रांतिकारकाच्या पराक्रमामुळे दहशत बसली आहे, ती कायमचीच! आज चितगागला एका लष्करी ठाण्याचे स्वरूप प्राप्त झालेलें दिसते, तर आठ दिवसापूर्वी लष्करी वस्तीत तुरळक इतर नागरिक जाऊन राहिले आहेत असे वाटत असे. प्रत्यक्ष कायद्याने –लष्करी कायदा पुकारला नव्हता तरी –लष्करी अधिकारी, गुरख्याच्या पलटणी, मिलिटरी पोलिस वगैरे बडेजाव असा झोकात होता की, सरकारचे घोडे किती दणाणले आहे याची त्यावरून उत्कृष्ट कल्पना येई. ठिकठिकाणी नाक्यानाक्यावर गुरखे सगीन रोखून उभे दिसत. साहेबाच्या बगल्याभोवती तर, मोगलाई जनानखान्यापुढे असतो तसा, खासा कडक बदोबस्त असे. रस्त्यावर टेपरवारी नाकी उभारण्यात येऊन, खिळे मारलेले लाकडी ओडके आडवे टाकून ठेवले होते. हेतु हा की, कोणी चपळाईने पळून जाऊ लागला तर अडखळून अथवा पायात खिळा घुसून तो अडकून पडावा. तार ऑफिस, टेलिफोन, बगला, पोस्ट, बॅक इत्यादिकाकडे रक्षकाचा भरणा जास्त असावयाचाच. करफ्यू ऑर्डर पुकारण्यात आली. रात्रीच्या गाड्या खासा वटहुकूम काढून लवकर सोडण्याची व्यवस्था झाली. लष्करी सशस्त्र पोलिस सारखे टेहाळणी घालू लागले. व त्याच्या विरुद्ध तक्रार करण्यासाठी सवड नसल्याने रस्त्यावरून हिडणाराची मात्र कठिण अवस्था होई.

गुरख्यानी तर अगदी भडावून सोडले! जेथे पहावे तेथे गुरखा दिसे! रात्री आठापुढे कोणास घराबाहेर पडतां येईना किवा कोठे जमून गप्पा मारता येईनात. उच टेकड्यावरील घरे लष्करी अधिकाऱ्याच्या ताब्यात गेली. आजूबाजूच्या टेकड्यावर फौज व बदुकाही जमवून ठेवल्या. रात्रदिवस अशी ही नाकेबदी झालेली कशासाठी, म्हणून किंचित् अतस्थ चौकशी केल्यानतर, असे कळले की, गेल्या वर्षी अस्त्रागारावर क्रातिकारकानी आक्रमण केले, त्यापेक्षा अधिक भीषण स्वरूपाचा तसाच हल्ला लवकरच होणार आहे, अशी सरकारच्या दूर पल्ल्याच्या लांब कानास बातमी लागली होती! अर्थातच लष्करी बदोबस्त कडक झाला तर नवल काय? पण ह्या बातमीत काही तथ्य होते की नाही, याचा सारासारविचार मात्र कोणी केलेला दिसत नाही.

ही बातमी कळताक्षणी आधीच घाबरलेले मित्रे अधिकारी अधिक बावचळल्यासारखे वागू लागले. चाल् असलेल्या खटल्यातील अठरावीस इसम फरारी आहेत म्हणून म्हटलेच. ते चितगाग जिल्ह्यांतच आसपास दडून असून खेडवळ लोक त्याना आसरा देतात, अशी अधिकाऱ्याची समजूत झाली. बर्ष होऊन गेले, 'फरारी गुन्हेगारास थारा देऊ नका,' म्हणून जाहीर फर्माने काढली, त्याना पकडून देणारांस बक्षिसाची लाल्च दाखविली, दाढीदीक्षितताना बगलेत मारले, तरीही हे मूठभर हिदु लोक बेइमानपणे बागतात, हे जिल्हाधिकाऱ्यास कसे खपेल? त्यानी वरून हुकूम आणवून लष्करी जादा पोलिस ५२ खेड्यांवर लादले!

त्यातही अशी मेख मारून ठेवली आहे की, मुसलमान रहिवाशाकडून जादा पोलिसाचा खर्च घेतला जाणार नाही! मुसलमानाना माफी देण्यात आली असे म्हणतात. त्याचा अर्थ उघड आहे. खुद्द कलेक्टरशी माझी मुलाखत झाली, त्या वेळी त्यानी स्पष्टच म्हटले की, आगेपी व फरारी देखील एकजात हिदु आहेत. आसाम-बगालकडे हिदुमुसलमान तेढीस विशेष रग चढतो, तो अशामुळे की, साधारण लोकवस्तीत शेकडा ८५ प्रमाणे मुसलमान असून, सर्व व्यवहार बहुधा त्याचे हाती असतात. शेकडा १५-२० हिदु असणाऱ्या गावी जादा पोलिसाचा खर्च फक्त हिदूनीच भरावा, अशा फर्मानाचा अर्थ काय होणार? शिवाय दिवस हे असले – पडत्या धारणीचे. रुपयाचे तादूळ सहासात आण्यास विकावे लागतात! तेव्हा मोगलाई जिजिया करावरही ताण करणारी ही नवीन करपद्धति आहे की नाही?

जादा पोलिस नुकतेच लादण्यात आले असून, त्यांची बरदास्त राखण्याकरिता खुद्द कलेक्टरांनी आपला दौरा तिकडे काढला होता. मी त्याना भेटलो तो ते दौऱ्यावरून आल्यानतरच. दौऱ्यावर असताना त्यानी ठिकठिकाणी म्हणे सभा भरविल्या आणि 'फरारी गुन्हेगारांस पकडून द्या' म्हणून आग्रहाने सागितले. 'पोलिसांजवळ फरारी इसमाचे फोटो दिले आहेत. त्याना थारा देऊ नका. सरकारी नोकराना गुन्हेगार पकडण्यासाठी मदत करा.' अशा आशयाची याचना करणाऱ्या कलेक्टराना काही खेडवळानी अत्यत स्पष्ट शब्दात पण खडसून जबाब दिला, असे येथील दैनिक 'पाचजन्य' पत्राने प्रसिद्ध केले आहे. कलेक्टरानी 'आम्हास मदत करा' अशी दीनवाणीने

याचना करताच काही ग्रामियानी जिल्हाधिकाऱ्यास म्हटले की, 'तुम्ही लठ्ठ पगार खाता आणि आम्हालाच त्रास देता. तुमच्या अयोग्यतेचा परिणाम आम्ही का सोसावा? त्यापेक्षा तुम्ही ती खुर्ची सोडा व आम्हाला तुमचा पगार द्या. म्हणजे गुन्हेगार आम्ही लगेच पकडून देऊ की नाही पहा!' 'पाचजन्या'त प्रसिद्ध झालेला हा सवाद खरा असावा असे मानण्यास बरीच कारणे आहेत. खुद्द कलेक्टरानी अशा आशयाच्या काही लेखी तक्रारी 'साक्षर' खेडवळाकडून आपणाकडे आल्या, असे कबूल केले आहे.

या सर्व गोष्टीवरून सध्याची चितगागची परिस्थिति लक्षात येईल. लष्करी अधिकारी व चारीपेकी दोन गुरखा पलटणी परतल्या असल्या, तरी बाकीचा बदोबस्त पूर्वीसारखाच आहे. खटला चालू असल्या वेळचा देखावा पाहून तर सदेहच पडतो की, आरोपी कैदी समजावयाचे अथवा खुद्द न्यायाधीशानाच बदिस्त मानावयाचे? कारण तिघाही न्यायाधीशाच्या राहत्या घरावर जागता पाहरा आहे. त्याचा कोर्टात येण्याचा व कोर्टातून स्वगृही जाण्याचा मार्ग रोज सकाळसध्याकाळ बदलण्यात येतो. शिवाय, जेव्हा ते कोर्टात येतात, तेव्हा त्याच्यापुढे बदूक रोखलेल्या २०-२५ गुरख्यानी भरलेली एक मोटार लॉरी असते! मध्यतरी न्यायाधीश भरलेली मोटारगाडी आणि मागेही तशीच २०-२५ गुरख्यानी भरलेली, दुसरी उघडी लॉरी,— असा बदोबस्त, इतकी काळजी व इतकी व्यवस्था ठेवल्यास त्या न्यायाधीशाच्या केसाना तरी धक्का लागण्याची शक्यता उरते कोठे? श्रीकृष्णाने रुक्मिणीला पळवून नेऊ नये, म्हणून अबा-पूजनासाठी तिला पाठविताना, रुक्मीने जी व्यवस्था राखली तिचे वर्णन खुद्द रुक्मिणीनेच असे केले आहे की, 'स्वसखी, धात्री, जननी, विप्र स्त्री मडळी न ती पेटी!' तशापेकीच मोटारीत घालून नेलेल्या या 'माणका'ची स्थिति होती. रुक्मिणीस सभाळणाऱ्या मडळीशी ती मोकळेपणाने बोलू तरी शकत असे. पण ह्या न्यायासनस्थाना आपसात तरी बोलता येते की नाही, याची शकाच वाटते. मग यात खरा कैदी कोण? आणि कैद्यांत व न्यायाधीशात फरक तरी कसला?

आरोपीना कोर्टात आणतात, तेव्हाचा देखावा तर औरच असतो. तुरुगापासून कोर्टापर्यंतचा सर्व रस्ता दुतर्फा गुरख्यानी गुफलेला असतो.

आरोपीना कोर्टात ११॥ वाजता याबयाचे तर १०॥ पासूनच गुरखे रस्त्याबर डाबले जातात. त्या रस्त्याने इतर कोणासच येऊजाऊ देत नाहीत. मग आरोपीना पोलिस बदोबस्तात आणतात. ते सर्व गाणी म्हणत आनदाने जातात. कारण सर्वच जण १३ ते २८ च्या आतले, एका गावी राहणारे, एकत्र खेळलेले, एकत्र काम केलेले यामुळे त्याच्या चेहऱ्यावर आनद व समाधान यांची जी छटा दिसते, ती मोटारीतून येणाऱ्या न्यायाधीशाच्याही मुद्रेवर नसते! आरोपी कोर्टातून परत जाण्यापूर्वी एक तास पुनः गुरख्याना कवाईत करावा लागतेच.

कोर्टात मात्र वेगळा प्रकार आहे. फक्त दहा प्रेक्षकानाच आवारात जाता येते. तेव्हा सुद्धा झाडा अगदी कसून घेतात. लेखी परवानगी, पास, पोलिसाची तपासणी वगैरे सर्व चालतेच. पण ३५ आरोपी असताना १० च प्रेक्षकाना आत घ्यावयाचे, हा न्याय कोठला? न्यायालये ही सार्वजनिक असल्याने तेथे जाण्यास खरे म्हटले तर कोणासच मज्जाव नसावा. पण न्यायमदिरातच जर अन्याय होऊ लागला, तर मग न्याय तरी कोठे मिळावा? असा प्रकार प्रेक्षकाचे बाबतीतच होतो असे नाही. निमसरकारी किंवा पाऊणसरकारी ठरलेल्या असोशिएटेड प्रेसच्या खास बातमीदाराचीही अशी तपासणी घेण्याचा प्रयत्न सरकारी अधिकाऱ्यानी केला. तेव्हा त्याने तर कोर्टात जाणेच नाकारले!

अशी परिस्थिति इतरेजनाच्या बाबतीत आहे. मग खुद्द आरोपीचे किती हाल होत असतील? सर्कशीतील वाघसिंहाना तरी अधिक मोकळीक मिळते असे म्हणता येईल. आरोपीचा पिजरा, त्याचे दुहेरी आवरण, आजूबाजूला कडेकोट बदोबस्त वगैरे पाहून असे वाटते की, व्याघ्रसिंहापेक्षा सहस्रपट क्रूर व भयकर अशी ही नवीच जनावरे सरकारने कोठून तरी महत्प्रयासाने मिळविली असावीत! त्याना रोज नग्न करून झाडा घेतात! आणि या सर्व जबरदस्त तयारीचे कारण असे सागण्यांत येते की, तुरुगात काही खणण्याचे काम चालू असता जेथे हे शस्त्रागारावरील आक्रमण करणारे आरोपी ठेवले आहेत, तेथेच जामिनीत पुरलेली काही रिव्हॉल्व्हर्स व गोळ्या सरकारी कामगाराना सापडल्या. आज जवळजवळ वर्षभर हे आरोपी तेथे तुरुगात आहेत. कडक पाहऱ्यातून ही हत्यारे आत गेली कशी आणि गेल्यानतर जमिनीत

गाडलीं कोणी व केव्हा? त्याचे उत्तर कसेही दिले तरी अधिकाऱ्यावरच शितोडे येतात. तेव्हा कित्येक पुढाऱ्याचे म्हणणे असे की, जनतेवर जुलूम करण्यास काही तरी कारण मिळावे म्हणून मुद्दाम उकरून काढलेले हे नाटक असावे.

ते काहीही असो, चितगाग जिल्ह्यातील व खुद्द शहरातीलही जनता आज फार विवचनेत पडली आहे, हे मात्र खरे. सरकारी लष्करी दिमाखाने किंवा गुरख्याच्या अस्तित्वाने लोक डरत नाहीत, हे तर स्पष्टच झाले आहे. खेडवळही हालअपेष्टास भितात असे नव्हे. पण जादा पोलिसाचा खर्च सोसावयाचा कसा? सर्व सोगे घेता येतात पण दामाजीपताचे सोग आणता येत नाही, त्याची वाट काय? हीच विवचना सर्वांचे मनात घोळत आहे. चितगागवासियाकडे कोणाचेच लक्ष नाही, म्हणून त्याना पराकाष्ठेचे वाईट वाटत आहे. महात्माजींना व सरदार पटेलाना तार करून इकडे बोलावण्याचा त्यानी निश्चय केला आहे. पण कार्यवाहुल्यामुळे त्याना इकडे पाहण्यास वेळ कसा होणार? कराची कॉग्रेसमध्ये इकडील गुन्हेगारावर सरकारी अधिकाऱ्यानी जे अनन्वित जुल्म केले, त्याविषयी कोरडा निषेध प्रकट करणारा ठराव माडण्यासही महात्माजीनी व सरदार वल्लभभाईनी परवानगी दिली नाही, हे तेथे असणाऱ्या सर्वास ठाऊक आहे. त्याच्याकडून या बाबतीत आता तरी काय मदत होणार आहे?

— ३ —

चित्त आकर्षून घेऊन मनाला आल्हाद देणारे ग्राम म्हणून चित्तग्राम हे नांव पूर्वी चितगागला होते तें कधीपासून? नतर त्याचे नाव मोगल अमदानीत बदलले ते केव्हा आणि तेथील एकदर वातावरण अथवा परिस्थिति अशा 'बडखोरी'स अनुकूल कशी निघाली? गाव तरी कितीसे मोठे आहे? व्यापार कसला चालतो? हे 'बडखोर' लपूनछपून राहू शकले कसे? इत्यादि अनेक प्रश्न मनात येतात. एखाद्या भूगोलाच्या पुस्तकावरून किंवा इतिहासाच्या टाचणावरून ही माहिती पुरवितांही येईल. परतु प्रस्तुत काली हे नीरस प्रकरण मध्येच हवे कशाला? शस्त्रागार-आक्रमण-पुराणच

पुढे चालवावयाचे, तर आता त्यात आरोपी म्हणून सापडलेल्यांची थोडीशी माहिती दिली पाहिजे.

'अनत' हा त्यातला पुढारी म्हटला तर काही जुन्या पिढीच्या वाचकाना नाशिकची आठवण व्हावयाची. आणि मौज कशी आहे पहा की, अनताच्या जोडीला नाशिकाप्रमाणे 'गणेश'ही चितगागला आहेच! मात्र इतर साथीदारात बरीचशी मडळी वेगळी आहेत. 'अनत' हा तर अगदी तरणाबाड पोर–नुकतीच (गद्धे)पचविशी उलटलेला एक जवान. त्याची शक्ति म्हणजे खरोखरच अचाट. अफझुलखान 'डोगरातील चुवा' पकडून आणण्यासाठी विजापुराहून निघाला, तेव्हा त्याची 'कीरत' अशी होती की, पहार वाकवून तिचे तो कडे करीत असे! हाच पराक्रम अनताचा होता, असे सरकारतर्फेच्या वकिलानी कोर्टापुढे सागितले आहे. अफझुलखानाच्या अजस्र व दाडग्या आहाराला जसे थोडे शाहिरी तिखटमीठ व गोधळी मसाला असण्याचा सभव, तसाच पहारीच्याही बाबतीत असावा असे वाटते.

पण तशी बात अनताची नव्हे खुद्द सरकारी वकिलाने खटला सुरू करताना जे थोडेसे 'मगलाचरण' केले व नादी म्हटली, तीत अनताच्या पराक्रमाचा असाच उल्लेख आहे. त्या वकिलाना तर शाहिराचे पक्कीत बसविता येत नाही ना? लोकनाथ बाळ म्हणजे खरोखर मारुतीच तो! चालती मोटार मागे खेचून धरून थाबविण्याइतकी प्रचड शक्ति त्या बाळाची! चितगागला किवा त्या शहराच्या आसपास ह्या दोन मल्लाची कीर्ति पसरण्यास मग बेळ का लागावा? दोघेही प्रख्यात तालिमबाज म्हणून लोकविश्रुत झाले व त्यानी ठिकठिकाणी तालीम करण्याचे आखाडे काढले. अशा प्रकारे देशातील होतकरू व तरुण मडळी या बडखोराच्या कच्छपी लागण्यास सुरुवात झाली म्हणून सरकारी वकिलानी सागितले.

परतु तालीमखाने किवा व्यायामशाळा काढणे हा कोठल्याही कायद्याने गुन्हा ठरत नाही. इतकेच काय, पण अशा व्यायामशाळेचे विद्यार्थी कसले ज्ञान सपादन करतात, हे पाहण्यासाठी कित्येक वेळी सरकारी अधिकाऱ्यास सुद्धा निमत्रण असे आणि त्याप्रमाणे ते अधिकारी ते पाहण्यास जात व खूष होत. अनताच्या हालचाली गुप्तपणे वेगळ्या असत व तो स्वयसेवक दल उभारून त्याना कवाईत शिकवी, लाठी फिरविणे वगैरे लष्करी काम सुद्धा

त्यात असे आणि बेळोवेळी परिषदा भरत तेव्हा प्रमुख भाग घेऊन ज्वल जहाल भाषणे करविण्याचा व करण्याचा त्याचा उपक्रम असे, अशा आशयाच्या तक्रारी सरकारी वकिलांनी आपल्या भाषणात पुढे मांडल्या आहेत.

पण सरकारी साक्षीपुरावयांत खटल्याविषयी बऱ्याच गोष्टी बाहेर आलेल्या आहेत की, त्यामुळे सरकारवरच बाजू पुष्कळ शेकण्याचा संभव आहे. अनता चळवळ्या होता, तो स्वयसेवकाना लष्करी कवाईत शिकवी, त्यांच्यापुढे जहाल भाषणे घडवून आणी, ह्या आरोपाखेरीज युवकपरिषदा भरवून तेथे मारामारी करणे, राजद्रोही कायद्याविरुद्ध कायदेभग करण्याचा आग्रह धरणें, व शेवटी सरकारच्या मनात दहशत बसेल असा सशस्त्र हल्ला करण्यास सर्वांना तयार करणे असेही आरोप अनतावर करण्यात आले आहेत. डिसेंबर १९२३ मध्ये चितगाग येथे रेल्वेची रोकड घेऊन जात असता ती लुटण्यात आली. भर दिवसा हा प्रकार घडला, तरी त्यात आरोपी कोण होते हें कळेना! सुमारे साडेपाच महिन्यानी यात अनताचे अग असावे म्हणून त्याला कलकत्त्यास पकडून चितगागला आणण्यात आले. पण ज्या पोलिस अधिकाऱ्याने अनताला पकडून चितगागला आणिले त्याचा चितगांगमध्ये लगेच खून पडला. पुढे अनत निर्दोषी ठरला व म्हणून सुटला, ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे.

एवढ्यानेच थाबले नाही. बगाली 'सोटेशाही बरबटा' जो निघाला त्याने बाटेल त्या 'अनिष्ट' इसमास विनाचौकशी मनास येईल तितका काळ डाबून ठेवण्याची मुभा बगाली अधिकाऱ्यास मिळाली. आणि शेकडो बगपुत्र 'डाबिस्त' (डिटेन्यू) म्हणून कारावासात खितपत पडले! अनत व त्याचे चारपाच सवगडी-लोकनाथ, गणेश वगैरे त्यात होतेच. पण खैर ही की, १९२८ च्या सुरवातीस त्याना छोट्या कैदेतून काढून सबध हिदुस्थान-एवढा बिस्तार असलेल्या मोठ्या तुरुगात मोकळे सोडले. मात्र मागे सारखे शुक्लकाष्ठ लावून ठेवलें. ही सर्व मडळी धोका देणारी आहेत, त्यांचेवर सारखी पाळत ठेवली पाहिजे, असे सरकारी चार-पदूनीं ठरविलें; आणि त्याप्रमाणे एकदर सुमारे दोन डझन हेरांची सहा मडळीवर देखरेख ठेवण्यासाठी नेमणूक झाली. कामाचे महत्त्व जाणून शिपाई गडी (कॉन्स्टेबल) या टेहळणीसाठी मुद्दाम नेमला नाही, बरच्या अधिकाऱ्याची योजना केली व

चितगागसारख्या छोट्या शहरात सहा इसमांवर चोवीस तास पहारा ठेवण्यात आला.

अनताच्या व त्याच्या अनुयायाची खलबते कसलीं चालत, हे पोलिसांनाही प्रथम प्रथम समजले नाही. चोवीस तास पहारा ठेवून हे पोलिस काय करीत होते तेहीं उमगण्यास मार्ग नाही. एवढे मात्र खरे की, कलकत्त्याच्या हेराध्यक्षाकडून वरचेवर गुप्त सूचना येत व ह्या सहा 'भयकर' इसमांवर विशेष कडक नजर ठेवण्यात येई. शेवटी कलकत्त्याचे काम चितगांगला राहूनच करण्याकरिता तेथील पोलिसाधिपतीस जास्ती मदतनीस देऊन अधिक अधिकार देण्यात आले. 'इटेलिजन्स ब्रॅच' म्हणजे 'माहिती खाते' चितगाग-मध्ये ठाणे देऊन बसले! मध्यतरी अनताच्या फदास काही तरुण मुले लागून त्यांनी शिक्षणक्रम सोडला, हे पाहून जिल्हाधिकाऱ्यानी अशा विद्यार्थ्याच्या पालकास भेटून स्नेहीभावनेची सूचना केली: 'अनताच्या नादी आपल्या मुलांना लागू देऊ नका.' अशाच आशयाचा तो कर्णमत्र होता.

पण ही गोष्ट अनताला कळताच तो बेधडक त्या गोऱ्या अधिकाऱ्याच्या कचेरीत जाऊन भेटला व 'माझी बदनामी का केलीत?' असा रोखठोक जबाब यौवनी ओढ्त्यात त्याने विचारला. साहेब जरासे चपापलेच. 'मी तुझ्या वर्तणुकीविषयी बोललो नाही. मी फक्त त्याना असा सल्ला दिला.' पण अशा समर्थनास अनत पुरून उरणारा होता. 'हे तरी तुम्ही कां सागितले? त्यामुळे गैरसमज माजला. माझी वर्तणूक सशयास्पद वाटत असली तर मला तसे स्पष्ट सागा. पाठीमागे काही तरी बोलू नका.' असे त्याने अधिकाऱ्याना सांगितले व गैरसमज दूर करण्यासाठी पुनः त्या पालकाना भेटा, असे बजावले.

इकडे दोडदोन वर्षाच्या अवधीत व्यायामशाळेचे काम जोराने चालूच होते. अनताचे साथीदार मोटारहाक्याचे शिक्षण घेत. खाकी कपडे लष्करी पद्धतीचे शिवून घेऊन ते घालून ऐटीने ते कवाईत करीत. कोठे तरी त्यांची गोलदाजीची तालीम चालू असावी, असेही वाटले. कारण एका मुसलमान बाईने त्यासबधी थोडीशी माहिती पोलिसास दिली होती. शिवाय स्फोटक द्रव्ये तयार करताना अपघात होऊन एकदोघांना जखमा झाल्या व त्यांना उघडपणे इस्पितळांत उपचारासाठी नेलेही. रात्रीअपरात्री ही जवान मडळी

कोठे तरी फिरण्यास जात, असेंही कळलें! पुढे तर पोलिसांच्या दूरदृष्टीच्या लांब कानांना अशी बातमी लागली की, हल्ला करण्यासाठी ह्या कपूने शस्त्रें जमविलीं, स्फोटक द्रव्ये तयार करण्याची तयारी केली आणि द्रव्यही गोळा केलें! लगेच २४ हेरांच्या ऐवजी ३० जणांची योजना झाली. कडक बदोबस्तांत भर पडली आणि टेहळणीस रग चढला! पोलिस खात्यांतील वरिष्ठ-कनिष्ठांनीही या सर्व गोष्टी कबूल केल्या आहेत; पण एकाही चाणाक्षाला झडती घेण्याची अथवा कोणाला अटक करण्याची बुद्धि कशी झाली नाही?

हा सर्व प्रकार समजल्यानंतर, भाविक गावकरी बेगळेंच कारण देत असत, त्यांत सत्य आहे असे वाटू लागतें. चितगांगवासियाचें प्रथमपासून म्हणणे असे की, बाल श्रीकृष्णाला घेऊन मथुरेच्या कारावासांतून नद निघण्याचे सुमारास तेथील पहारेकऱ्यांस जशी मोहिनी पडली, तशीच अनंताच्या कर्तबगारीने पोलिसास भुरळ पाडली. कारण चितगागसारख्या छोट्या शहरांत आपल्या पाळतीवर कोणी आहे की नाही हे अगदी अजागळास सुद्धा एकदोन दिवसांत उमगून येईल. मग अनतासारखा धूर्त इसम इकडे दुर्लक्ष कसा करील? शिवाय शस्त्रागारावर आक्रमण करणे म्हणजे 'ब्रिज' खेळण्याप्रमाणे दोन मिनिटांत ठरणारा बेत नव्हे. त्यासाठी किती तरी महिन्यांची तयारी प्रथमपासून चाललेली असली पाहिजे, हे उघड आहे. रात्री साडेदहाच्या सुमारास सशस्त्र लोक मोटारीतून हल्ला करण्यासाठी जातात ही बातमी चोवीस तास पहारा ठेवणाऱ्या तीस टेहळ्यांस जर कळू शकली नाही तर मग त्यांनी टेहळणी ठेवली तरी कशावर? अशाच प्रकारचे अनेक प्रश्न उपस्थित करून चित्तग्रामवासी वर सांगितल्याप्रमाणे अनुमान काढतात. अनताला दैवी अश मानण्यापर्यंतही त्यांची मजल गेली आहे.

हा अनत पोलिसांच्या कचाटीत सापडला कसा हेंही कित्येकांना कोडें वाटे; पण पोलिसांनी त्याला पकडून देणारास पांच हजार रुपयांचें बक्षिस लावलें असतांही तो कोणास 'गावला' नाही. शेवटी एके दिवशी कलकत्त्यास बंगाल पोलिसांच्या मुख्याधिकाऱ्यास अनताने पत्र लिहून 'XXX तारखेस XX वाजतां मी आपणांस भेटण्यास येत आहें, पकडण्याची व्यवस्था करावी.' असें कळविलें व त्या पत्राच्या नकला चितगांगच्या जिल्हाधिकाऱ्यां-

कडेही पाठविल्या. आणि ठरलेल्या दिवशी ठराविक वेळी अनत कलकत्त्यास मि. लोमन याचे पुढे उपस्थित झाला! त्याला पश्चात्ताप मुळीच झालेला नव्हता किंवा तो निराश देखील दिसत नसे. 'मला लपूनछपून राहण्याची पुष्कळ सोय असताना सुद्धा मी आपण होऊन तुमचे स्वाधीन होतो, याचें कारण स्पष्ट आहे' असे त्याने लिहिले.

स्पष्ट कारण हेच की, जी मडळी या खटल्यात आरोपी म्हणून पकडली ती १६ ते २८ वर्षांच्या आतलीच होती. त्याना धाकदपटशा दाखवून किंवा त्याना नाही नाही त्या थापा देऊन त्याचेकडून बित्तबातमी काढण्याचा प्रयत्न कसून करण्यात आला. चारपाच जणानी कबुली जबाब देखील लिहून दिले! मात्र एकही 'शकर' माफीचा साक्षीदार निघाला नाही. आपल्या सहचाऱ्यानी हालअपेष्टात रहावे व आपण मात्र बाहेर असावे, हे अनताला सहन न होऊनच तो पोलिसाच्या स्वाधीन झाला असावा. शिवाय अनत आरोपीच्या कपूत जाताच ज्या चारपाचजणानी कबुली जबाब दिले होते ते लगेच परत घेतले व पोलिसाना तोडघशी पाडल्याप्रमाणे केले!

कोर्टापुढे अनत व इतर आरोपी आपले म्हणणे सादर करतील तेव्हा पुष्कळ गोष्टीचा उलगडा होईल. मुख्यतः हल्ला करण्याचा या तरुणाचा उद्देश समजेल. कारण पोलिसाचे हाती सापडण्यापेक्षा आत्महत्या करण्यात त्याचे हेतु खात्रीने वेगळे असले पाहिजेत. ते कळल्यास आधुनिक वग-युवकांची मनोभूमि कशा प्रकारे नागरली आहे व तीत कोणते पीक येते आणि अन्यत्र येते त्यापेक्षा त्यात वैशिष्ट्य काय, ह्या सर्वत्र गोष्टीवर बराच प्रकाश पडण्याचा सभव आहे. खटल्याचे काम सपेपर्यंत बाट पाहण्यापलीकडे त्याला दुसरा उपाय नाही. खटल्यात बाहेर आलेल्या सरकारी व्यवस्थेतील छिद्राचा परामर्ष सुद्धा आता घेता येत नाही, म्हणून थोडे सबूरीने घ्यावे हेच बरे.

M
954-1
T17B

آخری درج شدہ تاریخ پر یہ کتاب مستعار
لی گئی تھی مقررہ مدت سے زیادہ رکھنے کی
صورت میں اتنا یومیہ دیر انہ لیا جائے گا

24.11.69

954.1
T17B

याच लेखकाचें पुस्तक

सिंहाला शह

म्हणजेच

अफगाणिस्तान व वायव्य सरहद्दी-विषयीं ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक माहितीनें भरलेला टीकात्मक ग्रंथ प्राचीन काळापासून ते नादिरशहाच्या राज्यारोहणसमारंभापर्यंतचा कालखंड यात नाविन्यपूर्ण व मनोरंजक भाषेंत चटकदार रीतीनें सांगितला आहे

" टिकेकरांचें पुस्तक अपूर्व झालें " आहे अफगाणिस्थानसंबंधीं आणखी " कांहीं सांगावयाचें राहिलें आहे असें " मला तरी निदान वाटत नाहीं " असा अभिप्राय केसरीकार श्री. न. चिं. केळकर यांनीं प्रस्तावनेत दिला आहे

प्रथोत्तेजक मंडळीने "सिंहाला शह" या पुस्तकास साडेतीनशे रुपयांचें पारितोषिक दिलें ही एवढी एकच गोष्ट त्याचे महत्त्व व लोकप्रियता विशेष सुस्पष्ट करीत आहे

आर्टपेपरवरील बारा चित्रें व दोन नकाशे

पृष्ठसंख्या ३५२ + २४

किंमत फक्त दोन रुपये

याच लेखकाची

मुसलमानी मुलखाची मुशाफरी

पेशावर, बसरा, आबादान, बगदाद, तेहरान, मशहद, केश या मुक्कामावरून लिहिलेलीं पत्रे यांत आहेत. तीं वाचून त्या त्या प्रदेशांतील राजकारण, समाजस्थिति, लोकरिवाज वगैरेंचे ज्ञान होईल आपल्या शेजारचे लोक कसे राहतात, आपणाविषयी त्यांच्या कल्पना काय आहेत, तिकडील प्रवासांत मौज कशी असते इत्यादि गोष्टी जाणण्याची इच्छा बालवृद्ध स्त्रीपुरुषास देखील असते ती 'मुशाफरी'च्या वाचनानें सफल होईल.

पृष्ठे १८८

किंमत एक रुपया

सर्व वर्तमानपत्रांनी मुशाफरीची प्रशंसा केली आहे

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण :—

नवीन समर्थ विद्यालयाचा समर्थ भारत छापखाना, ९४७ सदाशिव पेठ, पुणे २